# प्रांतरचना व महाराष्ट्र



REFBK-0000922
REFBK-0000922
नं. २०६

वा. दा. रानडे

# प्रांतरचना व महाराष्ट्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 20226 वि:
क्रमांक 204 नों: दि:

प्रस्तावना : महामहोपाध्याय द. वा. पोतदार

लेखक

वा. दा. रानडे

REFBK-0000922

किंमत दीड रुपया

प्रकाशक :

वा. दा. रानडे

३/४ ९/० एरंडवणा, पुणें ४.

सर्वाधिकार लेखकाचे स्वाधीन

मुद्रक :

जी. वाय. हिरवे

साथीदार प्रिंटर्स,

टिळक रोड, पुणें २.

विक्रेते :

व्हीनस बुक स्टॉल

अप्पा बळवंत चौक,

पुणें २.

क्रमांक 204 नों: दि: 22.1.5

# प्र स्ता व ना

'**प्रांतरचना व महाराष्ट्र**' या सध्याच्या एका ज्वलंत बनलेल्या किंवा बनविलेल्या प्रश्नावर श्री. वा. दा. रानडे यांनी एक लहानसे परंतु विवेचक माहितीने भरलेलें असे पुस्तक उद्याच्या श्रीरामनवमीच्या सुमुहूर्तावर प्रकाशित करण्यासाठीं छापून पुरें केले ही फार संतोषाची गोष्ट होय.

सांप्रत महाराष्ट्रांत या प्रश्नावर वर्तमानपत्रांतून आणि व्याख्यानांतूनहि सडकून चर्चा चालू आहे. त्यांतील बराच भाग एकमेकांवरील रागाचा आणि चिडाचिडीने भरलेला असतो. उच्च पातळीवरून प्रौढ पद्धतीने प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करावयाचा काळ निघून गेल्यासारखा दिसतो. एकाअर्थी असे दाखवून देता येईल कीं तसले भरपूर लिखाण यापूर्वीच होऊन गेलेले आहे. तथापि विचारांची बैठक पायाशुद्ध करावयाची तर ती शांतपणानें आणि अभ्यासू वृत्तीनेच होईल. ही दृष्टि ठेवून महाराष्ट्रात साधारणपणे १९११ पासून या विषयाची महाराष्ट्रापुरती मीमांसा यामागेच झालेली आहे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्याद्वारा जे सर्वपक्षसंमत भारदस्त निवेदन राज्य-पुनर्रचना मंडळाला सादर करण्यांत आले तितके प्रौढ आणि नमुनेदार विवेचन अन्यत्र क्वचितच आढळेल.

महात्मा गांधी हे भाषानुसार प्रदेशराज्यनिर्मितीचे कट्टे पुरस्कर्ते होते. आणि त्यांच्या या पुरस्काराला देशांतील बहुसंख्य पुढाऱ्यांनीं पाठिंबा दिला होता. १९२८ तील सर्वपक्षीय पुढाऱ्यांनीं प्रसिद्ध केलेल्या अहवालांत याचें निःसंदिग्ध विवेचन आढळतें. इतकें कीं तेथें कसोटचा ठरवितांना 'भाषिक' कसोटीला इतर सर्व कसोटचांत अग्रस्थान दिलेलें आढळतें.

पण अलिकडे श्रेष्ठ पुढाऱ्यांनी पूर्वी स्वतः हिरीरीनें पुरस्कारिलेल्या तत्त्वाचा त्याग करून उलट माघार घेतलेली दिसते. आणि कित्येकांनीं तर स्पष्ट तसें बोलूनहि दाखविलें आहे. तथापि लोकमतांत बद्धमूल झालेले विचार ओसरत नाहींत हें पाहतांच अनेक नरमगरम वक्तव्यें सुरूं ठेवीत टाळलेला प्रश्न या श्रेष्ठीनां हातीं घ्यावा लागलाच. वास्तविक जेव्हां भारताची घटनापरिषद भरली होती तेव्हांच एका प्रधान बाबीचा सुस्पष्ट निर्णय करून संविधानांत ग्रथित केला असता तर आजची भडक स्थिति आपल्याला कधींहि दृष्टीस पडली नसती!

हें खरें कीं घटनेंतच पुनर्रचित राज्यांचा निर्देश करण्यांला अवकाश नव्हता. देशी संस्थानांचा एक तृतीयांश भारत स्वतंत्र भारतांत विलीन करून घेण्याचा प्रश्न त्याहीपेक्षां निकडीचा होता. तो देशी संस्थानिकांची निष्ठा, दुर्बलता आणि आमच्या पुढाऱ्यांची समयसूचकता आणि तडजोडवृत्ति यांच्यायोगें उत्तम तऱ्हेनें आणि फारच लवकर सुटला.

नवी राज्यें निर्माण करणें तडकातडकी होण्याजोगे कार्य नव्हतें. पण म्हणून प्रदेश राज्याच्या सीमा बदलण्याबाबत जी जुजबी तजवीज घटनेंत केली ती हा प्रश्न केवळ भरडून काढण्याची वृत्तीच दर्शविते. आमचें निश्चित असे मत आहे कीं ज्याप्रमाणें राष्ट्रभाषेचा प्रश्न खूप ओढाताण करून परंतु अत्यंत योग्य पद्धतीनें तत्त्वें, टप्पे व निश्चित तजविजी घटनेंत दाखल करून मार्गस्थ केला, त्याचप्रकारची व्यवस्था राज्यपुनर्रचना प्रकरणीं प्रथमच करावयास हवी होती. ब्रिटिश दास्यकाळांत झालेली आणि केलेली प्रांतरचना अव्यवस्थित व बिनबुडाची होती. साम्राज्यरक्षणाच्या दृष्टीनें ती राबविण्यांत आली. लोकहितसंवर्धनाच्या दृष्टीनें ब्रिटिशांनीं प्रांतांची रचना केलीहि नव्हती. आणि करण्याचें अगत्यहि त्यांस नव्हतें. स्वराज्य प्राप्त झाल्यावर अशी पुनर्रचना करणें निकडीचे कार्य समजणें अगत्याचें होते. ही निकड स्वच्छपणें नमूद करून पुढील पुनर्रचना अमुक अमुक तत्त्वें गृहीत धरून दहा किंवा पंधरा वर्षांत अमुक क्रमानें करण्यांत यावी असा स्पष्ट निर्देश संविधानांत करावयास पाहिजे होता. म्हणजे असें कीं पुनर्रचना करणें अवश्य आहे, ती इष्ट पुनर्रचना करतांना भाषिक एकता व प्रौढी, सांस्कृतिक वैशिष्टय, आर्थिक स्वयंपूरकता, भूमीची सलगता, आणि अखिल भारतीय हिताची स्ववर्धिचता ही व अशी नमूद केलेलीं तत्त्वें मार्गदर्शक समजावी. राष्ट्रपतींनीं या तत्त्वांस अनुसरून प्रदेशांची इष्ट ती पुनर्रचना करून तपशीलवार आराखडा पांच वर्षांत सादर करण्यासाठीं एक प्रातिनिधिक महाजन मंडळ नेमावें व त्यांस सर्व प्रकारचे तज्ज्ञ साहाय्यार्थ द्यावे. संपूर्ण चौकशीचे अधिकार या मंडळास राहतील. सर्व सरकारांनीं या मंडळासाठीं तें मागेल ती माहिती पुरवावी. शिवाय इष्ट ती माहिती मंडळासाठीं मिळवून सादर करावी. मंडळाला स्वतः जातीनें चौकशी करण्याचा व माहिती पडताळण्याचा आदेश राष्ट्रपतींनीं अवश्य वाटल्यास द्यावा.

कोणालाहि आपल्या योजना, सूचना, तक्रारी, या मंडळाला सादर करता याव्या इ. इ. चौकशी पूर्ण झाल्याची महाजन मंडळाची खात्री झाल्यास एक किंवा अधिक भागाची पुनर्रचना योजना सादर करिता यावी. या क्रमानें हप्त्यानें किंवा एकदम दहा वर्षांत हें काम पूर्ण व्हावें. लोकसभेंत कायद्याचे मसुदे यावे व निर्णय व्हावे. हे प्रकरण निकालांत काढण्याची कमाल काल-मर्यादा पंधरा वर्षांपेक्षां अधिक असूं नये.

वर सुचविलेल्या प्रकारानें जर हा प्रश्न हाताळला गेला असता तर पुढाऱ्यांना आणि सरकाराला लोकांना विश्वासानें आदेश देतां आला असता कीं सर्व प्रांतांनीं या घटनात्मक पद्धतीनें या कार्यांत सहभागी व्हावें आणि नवजात स्वतंत्र भारताची मांडणी करून घ्यावी. आरडाओरडा, चळवळ, घोषणा, चिडाचीड, अरेतुरे कोणी करण्याचें कारण नाहीं. एकदां तत्त्वें ठरविण्याची कटकट पडली असती पण निरपेक्ष परिस्थितींत तो अवघड प्रश्नहि अधिक सुलभ रीतीनें सोडविण्याचें यश घेतां आले असतें. राष्ट्रभाषेचा प्रश्न काय कमी गुंतागुंतीचा होता ? पण त्याची समाधानकारक सोडवणूक झालीच ना ?

परंतु पूर्वी भाषिक तत्त्वांवर पुनर्रघटना करण्याचीं जीं दिशा पुढाऱ्यांनीं दाखविली होती ती टाकावी व उलट दिशेनें जाता यावें याचीच पूर्व तयारी संविधानकांत करून ठेवण्यांत आली असा स्पष्ट निष्कर्ष काढण्यांत आम्हांला कसलाच संकोच वाटत नाहीं आणि याचाच स्फोट सांप्रत विकोपाला गेल्याचें आज दिसत आहे. लोकांच्या तोंडावर प्रथम दार कमिशन फेकण्याचा प्रयत्न झाला. तें आंगलट आलें तेव्हां जे. व्ही पी. अहवाल तयार झाला. त्यांत चळवळ करण्याची स्पष्ट सवड किंवा आवाहनहि समाविष्ट करण्यांत आलें. त्यानेंहि प्रांतांचें समाधान होईना तेव्हां फाझलअल्ली कमिशन नेमण्यांत आलें. दहा लक्ष रुपये खर्च करून या कमिशननें काय साधलें तें सांप्रत आपणांसमोर आहेच.

या कमिशनलाहि सूचना करण्यांत आली होती कीं आधीं पुनर्रचनेची तत्त्वें ठरवा. तीं लोकसभेला सादर करून लोकसभेच्या संमतीनें पुढील आराखडा तयार केला असता तर काम अधिक सुकर झालें असतें.

तत्त्वें ठरविल्याशिवाय म्हणजे पाया घातल्याखेरीज इमारत उठविणारच

कशी? पण आज नेमकें तेंच घडलें आहे. म्हणून संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या निवेदनांत प्रथम तत्त्वांचा उहापोह केलेला आहे. आणि त्या तत्त्वांस धरून महाराष्ट्राच्या प्रश्नाची सोडवणूक करून दाखविली आहे.

जेथें जें रुचलें तेथें तें तत्त्व मानून राज्यपुनर्रचना मंडळानें जो घोटाळा करून ठेवला आहे तो आतां प्रजेला निस्तारावा लागत आहे.

वास्तविक राज्यपुनर्रचना मंडळाला मनांतून जें पटलें तें निर्भीडपणें कागदावर उठविण्याचें धैर्य झालेलें दिसत नाहीं. भाषिक राज्य विरोधक एकसारखी हांकाटी करीत असतात कीं भारताची एकता, दृढता आणि हित ही मुख्यत्त्वें साधलीं आणि सांभाळलीं पाहिजेत. पण हा आक्रोश करण्याचें कारणच काय? भारताचें हित हेंच प्रधान ध्येय पाहिजे हें कोणत्या भाषिक-राज्यपुरस्कर्त्यांनें नाकारलें आहे ? जनता भारतविरोधी, भारतद्वेष्टी आणि भारतद्रोही बनत चालली आहे काय? भारताचीं स्वतंत्र- शकलें पाडण्यांच्या उद्योगाला ती लागली आहे काय? प्रदेशराज्यांची मागणी ही केवळ लोक-शाही कारभाराच्या सोयीसाठींच मागण्यांत येत नाहीं काय? कोणी जबाबदार व्यक्तीनें वा गटानें भारतांतून फुटून स्वतंत्र होण्याचा हक्क मागितला आहे काय; आज नाहीं उद्यां मागतील असा संशय घेण्याला बळकट पुरावा आहे काय ? जनतेचें मन भारतविरोधी फुटीरपणाकडे झुकत आहे काय? सर्व जगांत गुन्ह्यांच्या प्रकरणी भारताचा क्रमांक सर्वांत खालीं लागतो असें लोकसभेत नुकतेंच सरकारतर्फे आंकडेवारीनें दाखवून देण्यांत आलें नाहीं काय ? केवळ भाषाच तेवढी आम्ही जाणतो, आर्थिक स्थैर्य, जीवनमानाचें उच्चीकरण आम्ही ओळखीत नाहीं असें कोणी म्हणाला आहे काय ? ज्याच्या शब्दाला किंमत आहे अशा कोणी असली विचारसरणी पुरस्कारिली आहे ? मग व्यर्थ आकांडतांडव किंवा जलताडन कां ? नसते उपदेश रोज कशाला ?

पुनर्रचना भाषिक तत्त्वांस अनुसरून न करतां अन्य तत्त्वांवर करावी हें प्रामाणिक मत असेल त्यांनीं तसें सरळ मांडावें. तसें सरळ आणि सप्रमाण मंडण त्या पक्षाचे चांगल्याप्रकारें करण्यास पुष्कळ वाव आहे. कारण हें राजकारण आहे, गणित नव्हे. गणितांत दोन उत्तरें संभवतच नाहींत. पण राजकारणांत संभवतात. दोन्हीं मतें लोकांस समजूं द्या. अंती लोकमत जें

पसंत करील तें व्यवहारांत स्वीकारणें हाच लोकशाहीचा प्रशस्त मार्ग होय. पण गडबड्, जबरदस्ती, दडपेगिरी, धूळफेक यांच्या आश्रयानें जाणें नको.

श्री. रानडे यांनीं हा छोटा ग्रंथ लिहून त्यांत सर्वत्र माहिती व युक्तिवाद यांचा आश्रय केला आहे. म्हणून मी या प्रयत्नांचे हार्दिक स्वागत करितो. आतां त्यांचा कल क्वचित् चीन रशियाकडे झुकल्यासारखा दिसतो. पण आपले प्रश्न आपल्या सोईप्रमाणें आणि गरजेप्रमाणें आपणच सोडवावे हें श्री. रानडे यांनाहि मान्यच आहे. पान ४० वर फुटून निघण्याचा हक्क मान्य करून पाकिस्तान टाळतां आलें असतें ही श्री. रानडे यांची मीमांसा पुष्कळांना मान्य होणार नाहीं. येथें रशियाला श्री. रानडे भाळल्यासारखे लिहितात. पण पुढे त्यांनीं फुटीरपणाचा मोह मानला नाहीं याबद्दल आम्हांस अत्यंत संतोष वाटतो. हिंदुस्थानांत फुटीरपणाचा विचार स्वप्नांतदेखील नको.

खेडें हा घटक मानून चौकशी व्हावी व आराखडा तयार केला पाहिजे हे आमच्या मराठी साहित्य-संमेलनांत अनेक वर्षांपूर्वींपासून सुचविलेलें आहे. पण त्यावेळीं आमच्या राजकीय पुढाऱ्यांनीं डोळे मिटले होते म्हटले तरी चालेल ! त्यामुळें वेळ टळली आणि गाडी चुकली !!

प्रांत रचनेच्या विषयावर श्री. रानडे यांच्या मताशीं आमचें बहुतांशी सहमत आहे. पण ते जेव्हां एका भाषेचा प्रांत फार मोठा होत असेल तेव्हां एकच प्रांत ठेवावा हा भाषावार पक्षाचा आग्रह नाहीं म्हणतात (पृ. १६) तेव्हां आम्ही त्याशीं सहमत होऊं शकत नाहीं. 'हिंदी'ची समस्या पाहून बिचकल्यामुळे असें होतें. आम्ही राजकीयदृष्ट्या ब्रजमंडळ, अवधमंडळ, राजस्तान मंडळ असे प्रदेश सिद्ध करावे या मताचे आहो. तशी हिंदी सर्वस्वी एक आहे हा आम्हांला भ्रम वाटतो. पूर्वी आणि पश्चिमी ही दोन कुळें तर हिंदीची सर्वच विद्वानांनी मानलीं आहेत. ब्रज, अवधी यांना या राजकारण-प्रकरणीं बोली म्हणून निकालांत काढण्याचें कारण नाहीं. असा आमचा या प्रकरणीं अभिप्राय आहे.

विभाग मंडळाची कल्पना आम्हालाहि मान्य आहे. परंतु चीन व रशियांच्या उदाहरणांवर प्रसन्न होऊन या मंडळांना विशेष अधिकारदान करण्याला आम्ही एकाएकीं अनुकूलता देऊं शकत नाहीं. (पृ. ५०)

तसेंच केरळाच्या वाढत्या लोकसंख्येविषयीं लिहितांना श्री. रानडे यांनीं ' नियमना 'चा तोडगा सुचविल्याचें वाचून आम्हांस हंसू आल्याविना

राहिलें नाहीं. (पृ. ५७) नियमनाचा उपदेश बिचाऱ्या केरळीयानांच कां ? भारतांत अन्यत्र जागा असेल तेथें जाण्यांस त्यांना हक्क नाहीं काय ? भारतातच जागा अपुरी पडेल तेंव्हा नियमनाचा तोडगा लागू करा. तूर्त हे स्पष्ट ध्यानी घ्या कीं जरी प्रदेश राज्यें भाषावार केलीं तरी कोणाहि भारतीयाला अखिल भारतांत कोठेहि सुखानें जातां व राहतां आले पाहिजें. तो त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. भाषिक राज्य म्हणजे केवळ त्या भाषिकांचें कुंपण नव्हे. सर्व भारत सर्व भारतीयांचा आहे. आणि म्हणूनच एका स्थायी भाषिकाला एखाद्या अन्य भाषिक भागांतून ' चलेजाव ' करण्याचा अधिकार नाहीं. तो भारतीय नागरिकत्वाविरुद्ध मोठा गुन्हा होईल. हा इषारा ' लाल बाग ' भाषणांत आम्ही निक्षून दिलेलाच आहे.

पंजाबी भाषेबाबत लिहितांना (पृ. ९६) लिपीचा प्रश्न श्री. रानडे यांनीं मांडला आहे. येथें हें लक्षांत घेणें अगत्याचें आहे कीं संविधानांत ठरल्याप्रमाणें अखिल भारताच्या कारभाराची व अखिल भारतीय व्यवहाराची आपण ठरविलेली भाषा हिंदी आणि तिची लिपी देवनागरी होय. अर्थात देवनागरी लिपि भारतांत सर्वांना अवगत असलीच पाहिजे. तसे झाल्यावर मग दोन लिप्या चालविण्याचा आग्रह आपोआपच लुला पडेल आणि पडलाच पाहिजे.

प्रत्येक पुनर्रचित राज्याचा प्रदेश सलग पाहिजे ही एक महत्त्वाची कसोटी मानली पाहिजे. श्री. रानडे सलगपणाचा उल्लेख करतात पण तिला स्पष्टपणें कसोटीच्या पंक्तीला बसवावयास विसरतात.

एखादे शिथिल वाक्य (पृ. ६३) किंवा एखादा चुकीचा अभिप्राय (पृ. ७९) असले किरकोळ दोष सांगत बसत नाहीं. तरी एक दोष अवश्य नमूद करण्यासारखा आहे. तो स्थळांच्या नांवाबाबत आहे. ' हुमनाबाद ', भतिंडा, तिमार, किंवा कोटाह आणि याहीपेक्षां म्हणजे बांसवाडाबद्दल बन्सवारा, डुंगरपुर ऐवजीं दुंगारपुर ही विकृति अवश्य टाळली पाहिजे.

अधिक लिहिण्याचे हें स्थळ नव्हे. जे लिहिलें त्याला कारण श्री. रानडे हेच झाले. त्यांनीं असा चांगला ग्रंथ योग्य समयीं प्रसिद्ध करून जी सेवा केली आहे त्याबद्दल त्यांचे सर्वांनीं अभिनंदन केले पाहिजे.

ता. १८-४-५६ **दत्तो वामन पोतदार**

# निवेदन

भारताचे नवे प्रांत १ ऑक्टोबर १९५६ ला अस्तित्वांत येत आहेत. प्रांतांच्या फेररचनेची अनेक वर्षांची मागणी आता पुरी होत आहे. ही फेर-रचना कोणत्या तत्वांवर करावी ? त्यात भाषेला कितपत महत्त्व द्यावे ? हा गेलीं कांहीं वर्षे अत्यंत वादग्रस्त प्रश्न झालेला आहे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करणारे राष्ट्रीय नेतेच आता भाषावार प्रांतांमुळें राष्ट्राचे ऐक्यास बाध येईल, फुटीरवृत्ति वाढेल असे प्रतिपादू लागले आहेत. अशा परिस्थितीत भाषावार प्रांतांचे पुरस्कर्त्यांची भूमिका खरोखर काय आहे हे मांडून त्या अनुरोधाने प्रांत रचनेच्या प्रश्नाची पार्श्व-भूमि व नव्या प्रांतांची घडण यासंबंधी विवेचन करण्याचा प्रयत्न या छोट्या पुस्तकांत मी केला आहे.

सर्वच प्रांतांच्या नियोजित फेररचनेचा विचार मी केलेला असला तरी मुंबई व महाराष्ट्राचा विचार अधिक सविस्तर केला याचे कारण सर्वांत वादग्रस्त प्रश्न त्यांचे फेररचनेचाच आहे. 'प्रांतरचना व महाराष्ट्र' हे नांव पुस्तकाला दिले ते याच उद्देशाने. साहित्याच्या क्षेत्रांत पुस्तकरूपानें माझे हे पहिलेच पदार्पण आहे. महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांना मी प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली व आपल्या बहुविध व्यापातून वेळ काढून त्यांनीं विवेचक प्रस्तावना लिहिली याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

हस्तलिखित वाचून उपयुक्त सूचना केल्याबद्दल प्रा. स. वा. कोगेकर व माझे मित्र श्री. स. मा. गर्गे यांचाहि मी आभारी आहे.

साथीदार प्रिंटर्सच्या सहकार्यामुळेच पुस्तक इतक्या लौकर प्रसिद्ध करता आले. त्यांचा मी आभारी आहे. तसेच मुखपृष्ठ सजविण्याचें काम आपुलकीने केल्याबद्दल श्री. सी. पु. थत्ते यांचेहि आभार मानतो.

३१/४० एरंडवणा,
पुणें ४.
१८ एप्रिल, १९५६.

**वा. दा. रानडे**

# अनुक्रमणिका

## भाग पहिला : फेररचनेची भूमिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | फेररचनेची आवश्यकता ... ... | १ |
| २ | फेररचनेची तत्वे ... ... | १० |
| ३ | रशिया–चीननें प्रश्न कसा सोडविला ? ... | ३५ |


## भाग दुसरा : नियोजित फेररचना


| | | |
|---|---|---|
| १ | मद्रास ... ... ... | ५२ |
| २ | केरळ ... ... ... | ५४ |
| ३ | कर्नाटक ... ... ... | ५७ |
| ४ | हैद्राबाद ... ... ... | ६५ |
| ५ | आंध्र ... ... ... | ७० |
| ६ | मुंबई ... ... ... | ७२ |
| ७ | मध्यप्रदेश ... ... ... | ९० |
| ८ | राजस्तान ... ... ... | ९२ |
| ९ | पंजाब ... ... ... | ९४ |
| १० | दिल्ली ... ... ... | १०३ |
| ११ | उत्तरप्रदेश ... ... ... | १०४ |
| १२ | बिहार ... ... ... | १०९ |
| १३ | बंगाल ... ... ... | ११२ |
| १४ | आसाम ... ... ... | ११४ |
| १५ | ओरिसा ... ... ... | ११९ |
| १६ | भाषिक अल्पसंख्याकांना संरक्षण ... ... | १२१ |
| १७ | भाषावार प्रांतांची वाटचाल ... ... | १२५ |
| १८ | नव्या प्रांतांचा नकाशा ... ... | १३२ |

* * *

ती. अण्णा व आई

यांच्या स्मृतीस

* * *

क्रमांक २०५ नोंः दिः

# प्रांतरचना व महाराष्ट्र

## प्रकरण पहिलें

## फेररचनेची आवश्यकता

प्रांतांची फेररचना करून नवे प्रांत १ ऑक्टोबर १९५६ ला अमलांत आणण्याचा निर्णय सरकारनें घेतला आहे. प्रांत पुनर्रचना समितीचा अहवाल जाहीर झाल्यापासून देशांत प्रांतरचना हाच सर्वांत जास्त चर्चेचा विषय झालेला आहे. प्रांतांची फेररचना आज आवश्यक आहे काय ? असेल तर कोणत्या तत्वावर व्हावयास पाहिजे ? नवे प्रांत निर्माण करताना सरकारनें ही तत्वें डोळ्यापुढें ठेवली आहेत कां ? इतर देशांनी हा प्रश्न कसा सोडविला ? त्यांचे अनुकरण आपणास कितपत करता येईल ? या सर्व दृष्टींनी या विषयाचा विचार केल्यानेच त्याचे स्वरूप स्पष्ट होईल, हाच दृष्टिकोन पुढें ठेवून या प्रश्नाचे विवेचन व त्यासंबंधीचे माझे विचार मांडण्याचे मी योजिले आहे.

### प्रांत हवेतच कशाला ?

प्रांतांच्या फेररचनेचा विचार करतांना उपस्थित होणारा पहिला प्रश्न म्हणजे फेररचनेचीं आजच आवश्यकता आहे काय ? यापेक्षाहि मूलभूत प्रश्न म्हणजे प्रांत हवेतच कशाला ? सबंध देशच एक घटक समजून कारभार पहाणे अधिक सोयीचे होणार नाहीं कां ? फेररचनेचे आवश्यकतेचा विचार करण्यापूर्वी प्रांत असावेत कीं नसावेत या मूलभूत प्रश्नाचाच विचार प्रथम करूं या.

प्रांत असावेत कीं नसावेत हा हिंदुस्थानच्या दृष्टीने तरी वादाचा प्रश्नच नाहीं. प्रांतच नकोत असे मत आपल्या स्वातंत्र्य लढ्याच्या काळांतहि कोणी जबाबदार नेत्यानें व्यक्त केलेले नाहीं, स्वातंत्र्यानंतर देशाची राज्यघटना तयार करण्यांत आली तेव्हांहि ही सूचना कोणी आग्रहाने मांडलेली नाहीं. हिंदुस्थान हे संघराज्य (फेडरेशन) आहे या तत्वावरच आपली राज्य-

घटना आधारलेली आहे, प्रांत पुनर्रचना समितीपुढे झालेल्या साक्षीतहि प्रांतच नकोत अशी भूमिका कोणी मांडल्याचा उल्लेख नाहीं. फेररचनेच्या प्रश्नाचा या दृष्टिकोनातून विचार करण्याची आवश्यकताहि समितीला भासली नाहीं. समितीचा अहवाल जाहीर झाल्यानंतर देशांत ठिकठिकाणीं तिच्या कांहीं शिफारशीविरुद्ध निदर्शने झाली. प्रांतांच्या फेररचनेमुळे देशांत अशांतता, वितुष्ट, वाद, भांडणें वाढत जाणार असतील तर प्रांतच नकोत, वादाचे मूळच नाहींसे केले म्हणजे वाद थांबतील असे श्री. राजगोपाला-चारीना वाटू लागले. दिल्ली विद्यापीठाच्या पदवीदान समारंभासाठी दिल्लीस गेले असता केलेल्या एका भाषणांत ( २७ नोव्हेंबर १९५५ ) त्यांनी हा विचार मांडला.

राजाजी स्वत:च्या भूमिकेशीच ठाम नाहींत. असे त्यांचे भाषण वाचले असता दिसून येईल. प्रांतांची फेररचना आणखी पंधरा वर्षे पुढें ढकलावी अशी त्यांची पहिली सूचना आहे. हे शक्य नसेल तर सबंध देश एकच घटक मानून निरनिराळ्या जिल्ह्यांत त्याची विभागणी करावी व कमिशनरा-मार्फत कारभार पहावा असे त्यांनी सुचविले. पण हे त्यांचे मतहि ठाम नाहीं. कारण त्याच भाषणात सबंध दक्षिणेचा एक प्रांत करावा अशी सूचना त्यांनी केली आहे. राजाजींचा स्वत:चाच गोंधळ उडाला आहे हे यावरून स्पष्ट दिसते.

सबंध देशच एक घटक मानावा ही राजाजींची सूचना छोट्या देशांचे बाबतीत योग्य आहे. पण हिंदुस्थानसारख्या मोठ्या देशांच्या बाबतींत ती उपयोगी नाहीं. हिंदुस्थानांतील उत्तर प्रदेशासारखें सध्याचे कांहीं प्रांतच कारभाराच्या दृष्टीने फार मोठे, अवाढव्य असल्याची टीका होत आहे. मग सबंध देशाचाच एक घटक केला तर तो केवढा अवाढव्य होईल ? भाषा व इतर दृष्टींनी देशाचे जे स्वाभाविक विभाग पडलेले आहेत त्यांचेच प्रांत बनवून संघराज्य स्थापन करणे हे केवळ राज्यकारभाराचे दृष्टीनेच नव्हे तर देशातील लोकांच्या स्वाभाविक विकासाचे दृष्टीनेहि योग्य आहे. संघ-राज्याचे तत्वावर देशाची राज्यघटना तयार करण्यात आली ती याच उद्देशाने. ब्रिटिश राजवटींतील १९३५ च्या कायद्यातहि संघराज्याचे तत्वच मान्य करण्यात आले होते पण त्यात प्रांत व संस्थाने या विषम घटकांची

सांगड घातल्याने राष्ट्रीय नेत्यांनी त्यास विरोध केला. या विरोधामुळे त्या कायद्यातील संघराज्य सरकारसंबंधीचा भाग अमलातच आला नहीं. फक्त प्रांतिक स्वायत्तता तेवढी १९३७ साली अमलात आली. तेव्हाप.सून गेली अठरा वर्षे प्रांतांचा कारभार याच स्वायत्ततेच्या तत्वानुसार चालू आहे. सबंध देशाचा एकच घटक करणे म्हणजे ही अठरा वर्षातील प्रगति बाजूला सारून पुन्हा मागे पाऊल टाकणे होय. ते आता शक्य नाहीं.

सबंध देशाचा एक घटक करण्याची कल्पना पाकिस्तानवरून राजाजींना सुचली असावी. पश्चिम पाकिस्तानचे प्रांत रद्द करून त्यांचा एक घटक पाकिस्तानचे राज्यकर्त्यांनी केला. पण या योजनेला तेथेहि बराच विरोध झाला व या प्रश्नावर लोकांचा कौल न घेता त्यांच्या इच्छेविरुद्ध निर्णय त्यांच्यावर लादण्यात आला हे विसरून चालणार नाहीं.

या सर्व गोष्टींचा विचार करता प्रांतच नकोत ही भूमिका स्वीकारणीय नाहीं हे दिसून येईल.

यानंतरचा प्रश्न प्रांताच्या फेररचनेचे आवश्यकतेचा. याबाबत तीन मते प्रदर्शित केली जात आहेत.

(१) फेररचना नको. सध्या आहेत तेच प्रांत ठीक आहेत.

(२) फेररचना हवी पण तिची आजच आवश्यकता नाहीं. हा प्रश्न कांहीं वर्षे पुढे ढकलावा.

(३) फेररचना शक्यतो लवकर होणे आवश्यक आहे.

या तिन्ही मतांचा आता थोडचा विस्ताराने विचार करू या.

## सध्याचीच प्रांतरचना ठीक ?

प्रांतांच्या फेररचनेची आवश्यकताच नाहीं. सध्याचे प्रांत ठीक आहेत. या मताला देशांत फारच थोडा पाठिंबा आहे. या मताचे लोक बरेच असते तर फेररचनेचा प्रश्नच उपस्थित झाला नसता. प्रांतरचना समितीपुढील साक्षीतहि हे मत कोणी आग्रहाने प्रतिपादल्याचा उल्लेख अहवालात नाहीं. असे असले तरी प्रांतरचनेच्या प्रश्नाचा विचार करताना या मताचाहि विचार केला पाहिजे.

सबंध देश एकच आहे. एखादा भाग या प्रांतात असला काय किंवा त्या प्रांतात असला काय तो देशाचा भाग आहे. सध्याची प्रांतरचना बरी

वाईट कशीहि असो ती आज अनेक वर्षे अस्तित्वात आहे. लोकांनी तिच्याशी जुळवून घेतले आहे. या प्रांतांचीहि एक विशिष्ट परंपरा निर्माण झाली आहे तेव्हां फेररचना करण्याने ही बसलेली घडी विसकटेल. फेररचना होत नाहीं म्हणून देशाच्या विकासाच्या मोठमोठ्या योजना अंमलात आणण्यांत अडथळें येत आहेत असेहि नाहीं तेव्हां सध्याचेच प्रांत कायम ठेवावेत अशी या मतामागील भूमिका आहे.

वरवर विचार केल्यास ही विचारसरणी बरोबर वाटते पण अधिक खोल तपासणी केल्यावर तिच्यातील दोष लक्षांत येतात. सबंध देश एकच आहे हें खरे पण आपला देश बहुभाषिक आहे. प्रादेशिक भाषांचे विकासाबरोबर त्या त्या भाषिक प्रदेशाची संस्कृति, इतिहास, परंपरा निर्माण होत गेलेली आहे. स्वाभाविकच आपल्या भाषेच्या लोकांचा सलग प्रांत असावा असे निरनिराळ्या भाषिक प्रदेशांतील लोकांना वाटू लागले व त्यांतूनच फेररचनेची मागणी करण्यांत येऊ लागली. सध्याचे प्रांत ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभाराच्या सोयीचे दृष्टीनें निर्माण केले. त्या त्या प्रांतातील लोकांच्या स्वाभाविक व न्याय्य आकांक्षा विचारात घेण्याची आवश्यकता त्यांना भासली नाहीं. त्यांनीं निर्माण केलेल्या प्रांतांत निरनिराळे भाषिक लोक एकत्र राहिले खरे पण ते स्वखुषीने एकत्र आले नव्हते. ही एकी त्यांच्यावर लादण्यात आली होती. आपणास पाहिजे तशी प्रांतरचना करणें ब्रिटिश राजवटीत शक्य नव्हते कारणें तसा अधिकारच आपल्याला नव्हता पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही लादलेली एकी आपण कायम ठेवू लागलो तर ते लोकशाही विरोधी होईल. हिंदुस्थान हे एक संघराज्य आहे. संघराज्याचे घटक समान दर्जाचे आणि स्वाभाविकरित्या विकसित होत आलेले असले पाहिजेत. सध्याची अ, ब, क व ड ही वर्गवारी रद्द केली पाहिजे त्यासाठीच प्रांतांची फेररचना करणें आवश्यक आहे.

## फेररचना आजच का हवी ?

प्रांतांची फेररचना करणें आवश्यक आहे हे कबूल पण ती आजच करण्याची आवश्यकता नाहीं. हा प्रश्न कांहीं वर्षे पुढें ढकलावा या मताचा विचार आता करू या. प्रांत पुनर्रचना समितीपुढें अनेक जणांनी हे मत प्रतिपादले. भाषावार प्रांतांचा विचार करण्यासाठीं घटना समितीने १९४८

साली दार कमिशन नेमलें होते. सध्या कोणतेहि नवे प्रांत बनवू नयेत. हिंदुस्थानांत एकतेची व राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली, संस्थानांचा प्रश्न सुटला आणि इतर दृष्टीनें परिस्थिति अनुकूल झाल्यावर हा प्रश्न हाती घ्यावा अशी शिफारस या कमिशनने केली होती. हा प्रश्न पुढें का ढकलावा यासाठीं कमिशनने पुढील कारणें दिली होती.

(१) प्रांतांच्या फेररचनेपेक्षा अधिक निकडीचे असें संरक्षण, अन्न, निर्वासित, चलनवाढ व उत्पादन हे प्रश्न हिंदुस्थानपुढें आहेत,

(२) हिंदुस्थानला सध्या ज्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे त्यांत आणखी सरहद्दी निश्चित करण्यामुळें व मुंबई, मद्राससारख्या शहरांच्या भवितव्याचे प्रश्नामुळें निर्माण होणारे तप्त वातारण, कटुता व वाद यांची भर घालण्यासारखी सध्या देशाची परिस्थिति नाहीं.

(३) सध्याच्या प्रांतांची विभागणी करून नवे प्रांत निर्माण केल्याने होणाऱ्या आर्थिक परिणामांचा अभ्यास करून त्यादृष्टीनें तयारी व योजना आखली पाहिजे.

( ४ ) सध्या जो अधिकारीवर्ग उपलब्ध आहे तो नव्या प्रांत निर्मितीमुळें व सरकारांमुळें पडणारी जादा जबाबदारी पेलण्यास अपुरा आहे.

दार कमिशनच्या शिफारशींचा विचार करण्यासाठीं कॉंग्रेसनें पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांची एक समिति डिसेंबर १९४८ मध्यें नेमली होती ( जे. व्ही. पी. कमिटी म्हणून ती ओळखली जाते. ) सध्याचा काळ प्रांताचे फेररचनेस योग्य नाहीं असे मत तिनेहि आपल्या अहवालात (८ एप्रिल १९४९) व्यक्त केले होते. व त्यासाठीं पुढील कारणें दिली होती.

(१) या प्रश्नामुळें अधिक महत्वाच्या प्रश्नांवरून लक्ष दुसरीकडे वळेल.

(२) देशाच्या कारभाराची व आर्थिक व्यवस्थेची घडी त्यामुळें विस्कटेल व आपल्या आर्थिक आणि राजकीय अडचण दूर करण्याचें मार्गात अडथळे येतील.

(३) राष्ट्रीय प्रगति एकवटण्याचे कार्य कुंठित होईल.

(४) आपण आजून राष्ट्राची उभारणी करण्याच्या अवस्थेत असतानाच फुटीर गटांना त्यामुळें मोकळीक मिळेल.

लोकसभेत ७ जुलै १९५२ ला भाषावार प्रांतरचनेच्या ठरावावर बोलताना पंतप्रधान पंडित नेहरूंनी हेच मत प्रतिपादले. ते म्हणाले, " भारतात एकतेची भावना वाढविण्याकडे आपण सर्वात जास्त लक्ष दिले पाहिजे. या ऐक्याच्या आड येणारी कोणतीहि गोष्ट थोडी लांबणीवर टाकता येईल. जग पेचप्रसंगाच्या कड्यावर उभे असतां विशिष्ट तात्विक भूमिके-साठीं किंवा भाषावार विभागणीसाठीं सबंध हिंदुस्थानांत अस्थिरता निर्माण करणें अत्यंत अदूरदर्शीपणाचे आहे. "

प्रांतांच्या फेररचनेचा प्रश्न पुढे का ढकलावा यासंबंधीं दार कमिशन जवाहर—वल्लभभाई—पट्टाभि समिति व पंतप्रधान पंडित नेहरूंनीं पार्लमेंटांत व्यक्त केलेल्या मताचा उल्लेख प्रांत पुनर्रचना कमिशननें आपल्या अहवालांत केला आहे. फेररचनेच्या विरोधकांनीं कमिशनपुढें दिलेल्या साक्षीत हा प्रश्न वीस ते पंचवीस वर्षे पुढें ढकलावा अशी सूचना केली व आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ पुढील मुद्दे मांडले.

(१) ज्या कारणांमुळें १९४८ व १९५२ मध्यें प्रांतांची फेररचना करणें योग्य नव्हते, ती आतां नाहींशीं झाली आहेत असे दर्शविणारा कोण-ताहि लक्षांत घेण्यासारखा बदल अंतर्गत व आंतराष्ट्रीय परिस्थितींत झालेला नाहीं.

(२) फाळणीने निर्माण केलेले प्रश्न तसेच काश्मीरचा बिकट प्रश्न सुटावयाचे आहेत.

(३) सरहद्दीपलीकडील आंतरराष्ट्रीय परिस्थिति व घडामोडी लक्षांत घेता आपली राष्ट्रीय शक्ति व संपत्ति आपण वाया घालवून चाल-णार नाही.

(४) देशाच्या आर्थिक प्रगतीकडे अजूनहि सर्वांत अधिक व निकडीने लक्ष दिले पाहिजे.

(५) सध्याच्या रचनेंत कोणताहि महत्वाचा बदल केल्यास प्रांतीय भावना निर्माण होऊन राष्ट्रीय एकतेस बाध येईल.

या कारणांचा उल्लेख करून कमिशन आपल्या अहवालांत म्हणते, " या युक्तिवादांत तथ्य नाहीं असे नाहीं. स्वातंत्र्यानंतरचे परिस्थितीपेक्षां अंतर्गत व आंतरराष्ट्रीय परिस्थिति अधिक सुधारली आहे यांत शंका नाहीं.

पण आंतर्राष्ट्रीय परिस्थिति व देशापुढील आर्थिक प्रश्न अजून अशा स्वरूपाचे आहेत कीं त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. प्रांतांच्या रचनेत मोठ्या प्रमाणावर बदल केल्याने देशाच्या साधनसंपत्तीवर आर्थिक व कारभाराचे दृष्टीने मोठा ताण पडण्याचा संभव आहे हेहि खरे. पण आता वस्तुस्थितीच अशी आहे कीं हा प्रश्न आणखी पुढे ढकलणे अव्यवहार्य आहे.

फेररचनेचा प्रश्न निकडीचा झाला आहे याचे कारण मोठ्या प्रमाणावर नियोजनाचा कार्यक्रम हिंदने हाती घेतला असल्यानें स्थिर राजकीय घटक निर्माण करण्याचा विचार आता केला पाहिजे सध्याच्या अनिश्चित परिस्थितीचा एक प्रत्यक्ष आणि खेदजनक परिणाम म्हणजे वादग्रस्त प्रदेशांत भांडवल गुंतविणें टाळण्याची सर्वसाधारण प्रवृत्ति दिसून येत आहे.

फेररचनेच्या मार्गातील एक मोठा अडथळा म्हणजे माजी हिंदी संस्थानांचा प्रदेश ब्रिटिश राजवटीत व सत्ता संक्रमणानंतरच्या सुरवातीच्या काळांतहि अविभाज्य समजला जात होता. संस्थानांच्या विलीनीकरणाने हा अडथळा दूर होऊन वैचारिक भूमिकेवरून या प्रश्नाकडे पहाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे."

सध्याचे प्रांतरचनेस बराच काळ लोटून ती स्थिर होण्यापूर्वीच प्रांतांच्या सरहद्दी ठरवून योग्य प्रांत निर्माण करणें आवश्यक आहे. ( प्रांतरचनेचा ) साचा एकादा पक्का झाल्यावर त्यात बदल करणें अधिकच कठीण जाईल असे मत इंडियन स्टॅटच्यूटरी कमिशनने आपल्या अहवालात व्यक्त केले होते. त्याचा उल्लेख करून प्रांत पुनर्रचना कमिशन म्हणते. कांहीं माजी संस्थानांच्या प्रदेशाबाबत ( illassorted units ) तर हे अधिकच खरे. प्रस्थापित हितसंबंधाचे पाय तेथें खोल रोवले जाण्यापूर्वी आणि योग्य फेररचना करणें अवघड होण्यापूर्वीच त्यांच्या भवितव्याचा विचार केला पाहिजे.

" कमिशनच्या नेमणुकीमुळेच लोकांच्या मनांत कांहीं अपेक्षा निर्माण झाल्या असून फेररचनेसाठी देशाची मानसिक तयारी झाली आहे अशा परिस्थितींत विधायक दृष्टीकोन अवलंबिण्याची शिफारस केली नाहीं तर निराशेची भावना पसरुन त्या अनुषंगानें उद्भवणाऱ्या इतर अनिष्ट परिणामाना तोंड द्यावे लागेल. " असेहि मत कमिशनने व्यक्त केलें आहे.

फेररचना पुढें ढकलणें का शक्य नाहीं याचे आणखी एक कारण

सांगतांना कमिशन म्हणते " प्रश्न कांहीं काळ पुढे ढकलणें कदाचित शक्य झाले असते पण आंध्र प्रांताची स्थापना करण्याचा निर्णय व त्या निर्णयास कारण झालेल्या घटना यामुळें हा प्रश्न आता तातडीचा झाला आहे हा निर्णय घेतला नसता तरीहि राजकीय पक्षांनी जोपर्यंत फेररचनेच्या धोरणास बांधून घेतले आहे तोपर्यंत फेररचना आणखी पुढें ढकलण्याने अधिक असंतोष निर्माण होण्याचा संभव आहे."

" हिंदुस्थानचा राजकीय नकाशा पुन्हा काढण्याचे काम आता हाती घेतले पाहिजे, आणि जे बदल होणार त्यामुळे बहुसंख्य हिंदी जनतेचे समाधान होईल अशा आशेने, टाळता येण्यासारखा विलंब टाळून हे काम आता पुरे केले पाहिजे " असा कमिशनचा या प्रश्नावरचा निष्कर्ष आहे.

प्रांतांची फेररचना काही वर्षे पुढे ढकलणे का आवश्यक नाहीं व ते कसे शक्यहि नाहीं. हे आपण पाहिले. फेररचना विलंब न लावता हाती घेणे कसे निकडीचे व जरुरीचे झाले आहे याचेहि उत्तर त्यात आलेच. तेव्हां त्या मताचा निराळा विचार करण्याची आवश्यकता नाहीं.

## प्रांतरचना राज्यघटनेचा भाग

वास्तविक प्रांतरचनेचा प्रश्न हा आपल्या राज्यघटनेच्या प्रश्नाचाच एक भाग आहे. घटना तयार करतांनाच प्रांतांची फेररचना व्हावयास हवी होती एवढेच नव्हें तर घटना अमलात आली त्याचवेळी नवे प्रांत अस्तित्वात यावयास हवे होते तसे झाले असते तर या प्रश्नावर गेल्या आठ वर्षात जी कटुता, वाद आणि भांडणे निर्माण झाली ती टळली असती. सरकारच्या निरनिराळ्या विकास योजना पुऱ्या करण्याचे बाबतीत लोकांचे ऐच्छिक सहकार्य मिळणे अधिक सोपे गेले असतें. याबाबतीत झाला हाच विलंब जास्त आहे.

निरनिराळ्या प्रांतांचे फेररचनेसंबंधी प्रांत पुनर्रचना कमिशनने केलेल्या शिफारशीबद्दल मतभेद असतील पण फेररचनेचे कार्य आता हाती घेऊन विलंब न लावता पुरे केले पाहिजे या कमिशनच्या निष्कर्षाचे बहुसंख्य जनतेने स्वागत केले. एखाद्या प्रश्नावरील लोकांचा असंतोष तात्पुरता दूर करून तो प्रश्न पुढे ढकलायचा असला कीं कमिशन किंवा कमिटी नेमावयाची हे ब्रिटिशांचे धोरण होतें. स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेस सरकारनेहि तेच

धोरण चालू ठेवले. प्रांतरचनेच्या प्रश्नासाठी दार कमिशन व कॉंग्रेसची जवाहर–वल्लभभाई–पट्टाभि समिति नेमण्यांत आली. त्यां दोघांनीहि हा प्रश्न कांहीं वर्षे पुढे ढकलण्याची शिफारस केली त्यामुळें जनतेत असंतोष पसरला. कमिशने व कमिटयांच्या हातून हा प्रश्न सुटत नाहीं अशी लोकांची खात्री झाली. आंध्र प्रांताचे स्थापनेसाठी तेथील जनतेने संघटितपणे व एकजुटीने निदर्शने व चळवळ केली. श्री रामलूंनी आत्मबलिदान केले. सरकारला आंध्र प्रांताची मागणी मान्य करणे भाग पडले ( १ ऑक्टोबर १९५३ ) एवढेच नव्हे तर या प्रश्नाचा विचार करण्यासाठी प्रांतपुनर्रचना कमिशन नेमावे लागले. ( २९ डिसेंबर १९५३ ) प्रांताच्या फेररचनेसाठी जनतेने चालविलेल्या चळवळीचा हा पहिला विजय होता. फेररचना लांबणीवर न टाकता व विलंब न लावता हाती घेतली पाहिजे ही कमिशनची शिफारस म्हणजे दुसरा विजय आहे. कमिशनने केलेल्या शिफारशी सरकार अंमलात आणतेच असे नाहीं. कमिशने व समित्या नेमायच्या आणि त्यांचे अहवाल दप्तरांत पडून रहायचे असाच अनुभव आतापर्यंत अनेकदा आलेला आहे. पण प्रांतरचनेच्या मागणीची तीव्रताच एवढी होती की सरकारला हा प्रश्न आणखी पुढे ढकलणे शक्य नव्हते. प्रांत पुनर्रचना समितीचा अहवाल बाजूस सारला जाणार नाहीं. ऑक्टोबर १९५६ च्या पहिल्या आठवडयापर्यंत नवे प्रांत अस्तित्वात येतील असे आश्वासन गृहमंत्रि पंडित गोविंद वल्लभपंत यांनी लोकसभेंत १४ डिसेंबर १९५५ ला प्रांतरचना अहवालावरील चर्चेची सुरवात करताना केलेल्या भाषणात दिले. प्रांतांच्या फेररचनेच्या चळवळीचा हा तिसरा विजय होय.

प्रांतांची फेररचना होत आहे. ती आता कोणी थांबवू म्हटले तरी शक्य नाही पण फेररचना कोणत्या तत्वांवर होत आहे? प्रांतपुनर्रचना कमिशनने कोणत्या आधारभूत तत्त्वांवर आपल्या शिफारशी केल्या ? सरकारने हीच तत्त्वें मान्य केली की त्यांत कांहीं बदल केला ? हिंदुस्थानप्रमाणेच बहुभाषिक असलेल्या मोठ्या देशांनी कोणती तत्त्वें डोळयांपुढें ठेवून हा प्रश्न सोडविला या प्रश्नांचा विचार पुढच्या प्रकरणात आपण करूं या.

## प्रकरण दुसरें

# फेररचनेची तत्वें

### भाषिक पायावर फेररचना

प्रांतांची फेररचना कोणत्या तत्वावर व्हावयास पाहिजे या प्रश्नाचा विचार करताना पहिल्या प्रथम कोणते तत्व डोळयापुढें येत असेल तर ते भाषेचे. प्रांतांच्या फेररचनेची मागणी म्हणजे भाषावार प्रांतांची मागणी असे समीकरणहि अनेकदा मांडलें जाते. प्रांतपुनर्रचना कमिशन आपल्या अहवालात म्हणते, " प्रांतांच्या फेररचनेची मागणी व भाषावार प्रांतांची मागणी यांचे समीकरण अनेकदा केले जाते. याचे कारण एकोणिसाव्या शतकांत प्रादेशिक भाषांची आश्चर्यकारक वाढ होऊन निरनिराळ्या भाषिक गटात आपण एक आहोत, आपला स्वतंत्र सांस्कृतिक घटक आहे अशी जाणीव निर्माण झाली. राज्यकारभाराचे घटक विचारपूर्वक ठरविण्यात यावे असे हिंदुस्थानातील पुरोगामी लोकमताला वाटू लागले तेंव्हां त्या ध्येयाने भाषिक सलग घटकाने मूर्त रूप धारण केले. ब्रिटिश राजवटीतील प्रांतांची फेररचना करण्याची चळवळ यातूनच उद्‌भवलेली आहे. "

प्रांतांच्या फेररचनेचा विचार करताना भाषेच्या तत्वाला कितपत महत्व द्यावे याचा विचार एका स्वतंत्र प्रकरणात कमिशनने केला आहे. " गेल्या शंभर वर्षांतील एक महत्वाची घटना म्हणजे प्रादेशिक भाषांची झालेली वाढ. विचार प्रकटनाचे एक संपन्न व प्रभावी साधन म्हणून या काळात त्यांची वाढ झाली असून त्या भाषा बोलणाऱ्या लोकांत एकीची भावना निर्माण झाली. या भाषा निश्चित टापूत बोलल्या जातात व अनेक ठिकाणी या भागांचे मागे ऐतिहासिक पार्श्वभूमीहि असल्याचे आढळून येते ही वस्तुस्थिति लक्षात घेता या भागाचे एकीकरण करून स्वतंत्र प्रांत स्थापन करण्याचे मागणीस वाढता पाठिंबा मिळत असून काही ठिकाणी तर तोच ताबडतोबीचा राजकीय कार्यक्रम घेण्याइतके स्वरूप या मागणीस आले आहे " हे कमिशनने मान्य केले आहे.

आ.क्र. २०५२९ दि. ३-५-७१

**कमिशनचा समतोल दृष्टिकोन** क्रमांक ...२०६... नोंः दिः २.२१.७१

भाषावार प्रांतांना अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही बाजूने कमिशनपुढे जे मुद्दे मांडण्यात आले त्यांचा विचार करून कमिशनने असा निष्कर्ष काढला कीं केवळ भाषेच्या तत्वावर प्रांतांची फेररचना करणे शक्यहि नाहीं व योग्यहि नाहीं. कमिशन म्हणते, " प्रश्नाचा सर्व बाजूंनी पूर्ण विचार केल्यावर आमचा निष्कर्ष असा आहे कीं, केवळ भाषा किंवा संस्कृतीच्या एकाच कसोटीचे पायावर प्रांतांची फेररचना करणे शक्यहि नाहीं व योग्यहि नाहीं, राष्ट्रीय ऐक्याचे दृष्टीने या सर्व प्रश्नांचे बाबतीत समतोल दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

असा समतोल दृष्टिकोन पुढीलप्रमाणे होईल.

(अ) राज्यकारभाराची सोय व कार्यक्षमतेला मदत होणार असेल तर भाषिक एक जिनसीपणा हा महत्वाचा फरक असल्याचे मान्य करणे पण बाकीचे सर्व राज्यकारभारविषयक, आर्थिक व राजकीय विचार दुय्यम लेखून हेच एक तत्व बंधनकारक आहे असे न मानणे.

(आ) निरनिराळ्या भाषिक गटांच्या दळणवळण, शैक्षणिक व सांस्कृतिक गरजा पूर्णपणे भागतील अशा तरतुदी करणे मग हे भाषिक गट राज्यकारभाराचे दृष्टीने एकभाषिक घटकात असोत किंवा अनेकभाषिक घटकात असोत.

(इ) ज्या ठिकाणी परिस्थिति समाधानकारक असेल आणि आर्थिक, राजकीय व कारभाराचे दृष्टीने समतोल राखण्यासाठी अनेकभाषिक प्रांत असणेच फायद्याचे असेल तेथे असे प्रांत कायम ठेवणे. मात्र सर्व घटकांना समान हक्क व संधि मिळाव्यात यासाठी आवश्यक त्या संरक्षण हक्कांची तरतूद करणे.

(ई) ' होमलँड ' कल्पना अमान्य करणे. सर्व नागरिकांना हिंदी संघराज्याच्या कोणत्याहि भागात समान संधि आणि समान हक्क आहेत हे हिंदी घटनेच्या मूलभूत तत्वांपैकी एक आहे ' होमलँड 'ची कल्पना मान्य करणे म्हणजे हे तत्वच नाकारणे होय.

(उ) ' एक भाषा एक प्रांत ' हे तत्व अमान्य करणे. भाषिक एक-जिनसीपणाच्या दृष्टीनें या तत्वाचे समर्थन करता येणार नाहीं, कारण

भाषिक तत्वाला बाध न आणताहि एकच भाषा बोलणाऱ्या लोकांचे एकापेक्षा अधिक प्रांत स्थापन करणें शक्य आहे. हे तत्व व्यवहार्य हि नाहीं याचे कारण हिंदी संघराज्यातील हिंदी भाषिक लोकांसुद्धा निरनिराळ्या भाषिक गटांना एकत्र आणून त्यांचे स्वतंत्र भाषिक प्रांत बनविणें नेहमीच शक्य होईल असें नाहीं.

(ऊ) एक भाषिक प्रांत स्थापन झाल्याने जी एक प्रकारची निराळे-पणाची भावना निर्माण होईल. तिचा अनिष्टपणा घालविण्यासाठीं विधायक उपाय योजून हिंदी राष्ट्रवादाला अधिक खोल अधिष्ठान देणें, निरनिराळ्या प्रादेशिक संस्कृतीत अधिक देवघेव, प्रांताप्रांतात अधिक सहकार्य व सलोखा वाढविणें व राष्ट्रीय धोरण आणि कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीत अधिक एकसूत्रीपणा आणण्यासाठीं मध्यवर्ति सरकार व प्रांत यांच्यातील दुवे अधिक बळकट करणें."

## भाषावार प्रांतांमागील भूमिका

या भूमिकेच्या पायावरच कमिशनचा अहवाल आणि त्यातील शिफा-रशी आधारलेल्या आहेत तेव्हां या भूमिकेचा थोडा विस्ताराने विचार केला पाहिजे. केवळ भाषेच्याच तत्व वर प्रांतांची फेररचना करणें योग्यहि नाहीं व शक्यहि नाहीं असे कमिशनचे म्हणणे, पण भाषावार प्रांतांचे पुरस्कर्ते हि केवळ भाषेचे तत्वावर प्रांतरचना करावी असे म्हणत नाहींत. त्यांच्या भूमिकेचा हा विपर्यास आहे. प्रत्येक प्रांत राज्यकारभाराचे दृष्टीने सोयीचा आणि आर्थिकदृष्ट्या शक्यतो स्वयंपूर्ण असला पाहिजे हे तेहि मान्य करतात. कारभाराची सोय आणि आर्थिक स्वयंपूर्णता या दोन तत्वांना बाध येऊ न देता भाषावार प्रांतरचना करणें शक्य आहे. हिंदुस्थांनात निरनिराळ्या भाषिकांचे सलग असे मोठे प्रदेश आहेत. ते एकत्र आणून भाषावार प्रांत निर्माण करता येतील. मुंबई व पंजाब प्रांत सोडला, तर इतर चौदा प्रांतांचे बाबतींत अशाच प्रकारची शिफारस कमिशननें केली व या शिफारशींचे स्वागतहि देशात चांगले झालें. कमिशनवर मुख्य टीका झाली ती मुंबई व पंजाबबाबत त्यांनीं केलेल्या शिफारशींबद्दल आणि ती होण्याचे कारण इतर चौदा प्रांत कमिशननें ज्या तत्वांचे आधारे निर्माण केलें तीच तत्वें या दोन प्रांतांना मात्र लावली नाहींत. अहवाल बद्दल सर्वांत जास्त असंतोष या दोन प्रांतातच आढळून आला.

एकभाषिक प्रांत असो किंवा अनेकभाषिक असो निरनिराळ्या भाषिक गटांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक गरजा पूर्णपणें भागतील अशी तरतूद केली पाहिजे असे कमिशन म्हणते. एकभाषिक प्रांतात ही तरतूद स्वाभाविकपणेच होते म्हणूनच शक्य तो एकभाषिक प्रांतांचा पुरस्कार भाषावार प्रांतांचे पुरस्कर्ते करतात अनेकभाषिक प्रांतांतहि अशी तरतूद घटनेने किंवा कायद्याने केली तरी ती कागदावरच राहून प्रत्यक्षात भेदभाव होण्याचा संभव असतो सध्याच्या मध्यप्रदेशातील हिंदी–मराठी वाद, मुंबई प्रांतातील गुजराती. मराठी व मराठी–कानडी वाद अशा भेदभावातूनच उद्भवलेलें आहेत. म्हणूनच अनेक भाषिक प्रांत नकोत आणि एकभाषिक प्रांत निर्माण करणे शक्य असता तर मुळीच नकोत अशी भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांची भूमिका आहे.

आर्थिक, राजकीय व राज्यकारभाराच्या दृष्टीने समतोल राखण्यासाठी अनेक भाषिक प्रांत असणें फायद्याचे असेल तेथें ते कायम ठेवावे असें कमिशनचे मत असून या दृष्टीनेच मुंबई व पंजाब या द्विभाषिक प्रांतांची शिफारस अहवालात करण्यात आली.

## द्विभाषिक प्रांत लादू नका

अनेक भाषिक किंवा द्विभाषिक प्रांतांचा विचार करताना एक महत्वाची गोष्ट लक्षात घ्यावयास हवी. ती म्हणजे जे भिन्न भाषिक गट एका प्रांतात येणार त्यांनीं स्वखुषीने व एकमेकांच्या संमतीनेच एका प्रांतांत रहाण्याचा निर्णय घेतला पाहिजे. हा निर्णय त्यांच्यावर लादला जाता कामा नये. ब्रिटिश राजवटीत ज्यांच्यावर अनिच्छेने अशी एकत्र नांदणूक लादली गेली त्या प्रांतात भाषिक वाद वाढत गेले. याची ठळक उदाहरणें म्हणजे सध्याचा मध्यप्रदेश व हैद्राबाद. मुंबई प्रांताच्या बाबतींतहि असेच झाले आहे. अनेक भाषिक प्रांत कायम ठेवायचे तर सर्वच अनेक भाषिक प्रांत कमिशननें कायम का ठेवले नाहीत ? मध्यप्रदेश व हैद्राबादचे फेररचनेस निराळे तत्व आणि मुंबईचे फेररचनेस निराळे तत्व असा पक्षपात का ? आपल्या भाषिक प्रांतांत सामील होण्याची मध्यप्रदेश व हैद्राबादच्या जनतेची जशी इच्छा होती तशीच मुंबई प्रांतातील जनतेचीहि होती मुंबई शहर महाराष्ट्राला मिळू द्यावयाचे नाही व त्या शहराचा स्वतंत्र प्रांत करणेहि शक्य

नाहीं अशा श्रृंगापत्तीत कमिशन सापडले व त्यातून मार्ग काढण्यासाठीच द्विभाषिक प्रांताची शिफारस करण्यांत आली असे दिसतें. इतर प्रांतातील जतनेप्रमाणें स्वत:च्या भाषिक प्रांतासाठीं उत्सुक असलेल्या मुंबई प्रांतातील मराठी भाषिक जनतेचे या शिफारशींनी समाधान झाले नसेल तर ते स्वाभाविकच होते कांहीं आवश्यकता नसता आणि जनतेच्या इच्छेविरुद्ध द्विभाषिक प्रांत तिच्यावर लादल्यानेच हा असंतोष निर्माण झाला.

## 'होमलँड व भाषावार प्रांत'

'होमलँड'चे कल्पनेस कमिशनने केलेला विरोध बरोबर आहे पण भाषावार प्रांतांची मागणी या भूमिकेवरून करण्यांत येते असे यांतून कमिशनला सूचित करावयाचे असेल तर ते मात्र बरोबर नाही. विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांचा भाषिक प्रांत स्थापन झाला आणि तीच भाषा बोलणारे नागरिक दुसऱ्या एकाद्या प्रांतांत स्थायिक झाल्यावरहि आपल्या भाषिक प्रांतावर त्यांनी हक्क सांगणे हा. 'होम लँड' कल्पनेचा खरा अर्थ आहे. पण या अर्थानें भाषावार प्रांताची मागणी करण्यांत आलेली नाहीं. तसे सूचित करणे म्हणजे या मागणीचा विपर्यास करणें होय. 'होमलँड' कल्पनेवर कमिशनने केलेली टीका बरोबर असली तरी भाषावार प्रांतांच्या मागणीचे बाबतींत ती गैर लागू आहे.

## 'एक भाषा एक प्रांत'

'एक भाषा एक प्रांत' ही विचारसरणी कमिशनला अमान्य आहे व त्यासाठीं कमिशननें दोन कारणें दिली आहेत.

(१) भाषिक एकजिनसीपणाच्या दृष्टीने ही विचारसरणी समर्थनीय नाहीं; कारण एकाच भाषेच्या प्रदेशाचे एकापेक्षा अधिक प्रांत असू शकतील.

(२) हे तत्व व्यवहार्य नाहीं कारण सर्वच एक भाषिक गट एकत्र आणून त्यांचे स्वतंत्र भाषिक घटक बनविणें शक्य नाहीं.

एक भाषा बोलणारांचा प्रदेश कितीहि अवाढव्य असला तरी त्याचा एकच प्रांत बनवावा असे भाषावार प्रांतांचे पुरस्कर्ते म्हणत नाहींत. त्यांच्या भूमिकेचा हा विपर्यास आहे. प्रांत अवाढव्य होत नसेल तर एका भाषिकांचा एकच प्रांत असावा त्यांचे अनेक प्रांत बनवू नयेत असे त्यांचे म्हणणें. संयुक्त

महाराष्ट्राचा एकच प्रांत बनविणें शक्य असता विदर्भांचा स्वतंत्र प्रांत करू नये. तसेच तेलगू भाषिकांचे आंध्र व तेलंगण असे दोन प्रांत करू नयेत असे त्यांना वाटते. म्हणूनच यासंबंधात कमिशननें केलेल्या शिफारशींना त्यांनीं विरोध दर्शविला. महाराष्ट्रात विदर्भ सामील केल्याने अवजड व अवाढव्य प्रांत स्थापन होईल हा आक्षेप खरा नाही. उत्तरप्रदेश किंवा कमिशनने सुचविलेल्या नव्या मध्यप्रदेशापेक्षा कांहीं संयुक्त महाराष्ट्र मोठा होत नाहीं.

## सीमा निश्चितीसाठीं खेडे घटक

निरनिराळ्या भाषिक गटांना एकत्र आणून त्यांचे काटेकोर सलग भाषिक प्रांत बनविणें नेहमीच शक्य होईल असे नाहीं असे कमिशनचे म्हणणें. भाषावार प्रांतांचे पुरस्कर्त्यांचाहि असा आग्रह नाहीं. भाषावार प्रांतांचे पुरस्कर्तेही ही शक्यता लक्षात घेतात. त्यांचे म्हणणें एवढेच कीं भाषिक प्रांत बनविताना शक्य तो त्या त्या भाषेचा सलग प्रदेश एकत्र आणावा व त्यासाठीं खेडे हाच घटक मानून विभागणी करावी. प्रांतांच्या सीमा ठरविताना जिल्हा हाच सर्वात छोटा घटक मानला आहे, असे कमिशनने एका ठिकाणी म्हटले असले तरी हे तत्वहि त्यांनी सर्व प्रांतांना सारखे लागू केलें नसून कांहीं ठिकाणी जिल्ह्यांचेच नव्हे तर तालुक्यांचेहि तुकडे पाडले आहेत. यामुळेच सीमेवरील प्रदेशांचे वाद मिटविण्यात कमिशनला समाधानकारक यश आलेले नाहीं. खेडे हाच घटक मानून प्रांतांच्या सीमा ठरविल्या असत्या तर हे वाद बऱ्याच प्रमाणात दूर झाले असते.

## पाकिस्तानच्या मागणीशी तुलना

भाषिक प्रांत स्थापन झाल्याने एक प्रकारची निराळेपणाची भावना वाढेल असे कमिशनला वाटतें व त्यावर उपाय म्हणून हिंदी राष्ट्रवादाला अधिक खोल अधिष्ठान देण्यासाठीं प्रांता-प्रांतात निरनिराळ्या प्रादेशिक संस्कृती, प्रांत व मध्यवर्ति सरकारात परस्पर देवघेव व सहकार्य वाढविण्याचे उद्देशाने कमिशनने कांहीं शिफारशी केल्या आहेत. या शिफारशींचा सविस्तर विचार आपण नंतर करूच पण येथे एवढेच सांगावयाचे की भाषिक प्रांत झाल्याने निराळेपणाची भावना वाढेल ही जी भीति कमिशनला वाटते ती खरी नाहीं. विविधतेतून ऐक्य हे आपले वैशिष्ट्य आहे. भाषावार प्रांतांची मागणी राष्ट्रीय ऐक्याशी विरोधी नाहीं. भाषावार

प्रांतांच्या मागणीची तुलना कित्येकदा पाकिस्तानच्या मागणीशी केली जाते पण तो हेतुपूर्वक केला जाणारा विपर्यास आहे. हिंदमधून फुटून निघण्याची मागणी एकाहि प्रांताने केलेली नाहीं. भाषावार प्रांत स्थापन झाले तरी प्रांताप्रांतात दळणवळण व सहकार्य चालू राहीलच.

प्रांतांची फेररचना करतांना कमिशनने जी सहा आधारभूत तत्वे आपल्या डोळयापुढें ठेवली त्यांचा सविस्तर विचार आपण आतांपर्यंत केला भाषावार प्रांतांचे पुरस्कर्ते जी भूमिका मांडतात त्यासंबंधीच्या गैरसमजावर यापैकीं कांही तत्वे कशी आधारलेली आहेत हेही आपण पाहिले. राज्यकारभाराची सोय आणि आर्थिक स्वयंपूर्णता हीं तत्वें भाषावार प्रांतांचे पुरस्कर्त्यांनाहि मान्य आहेत. तीं मान्य करूनहि भाषावार प्रांतरचना करणें शक्य आहे. हिंदमध्यें द्विभाषिक किंवा अनेक भाषिक प्रांत ठेवण्याची कांहीहि आवश्यकता नाहीं. कारभाराचे सोयीच्या दृष्टीनें प्रांतांचा विस्तार फार मोठा नसावा हे भाषावार प्रांतांच्या पुरस्कर्त्यांनाहि मान्य आहे. प्रांत फारच मोठा होत असेल तर एका भाषेचा एकच प्रांत असावा असा त्यांचा आग्रह नाहीं पण एका भाषेचा एकच प्रांत निर्माण करणें शक्य असेल तर मात्र त्याचे लहान लहान तुकडे पाडू नयेत एवढेच त्यांचे म्हणणें. या भूमिकेत खरोखरी अमान्य होण्यासारखे नाहीं. पण प्रांतरचना कमिशननें ती मान्य केलेली नाही.

## सरकारनें सुचविलेली तत्वें

प्रांतपुनर्रचना कमिशन नेमतांना सरकारनें जो ठराव केला त्यात फेररचनेची तत्वे निश्चित करण्याची पूर्ण मोकळीक कमिशनला देण्यांत आली असली तरी कांहीं व्यापक तत्वे त्यात सूचिच केली आहेत ठरावात म्हटले आहे :

" एखाद्या प्रदेशाच्या भाषा आणि संस्कृतीस निःसंशय महत्व आहे. कारण भाषा व संस्कृति त्या भागातील लोकांच्या जीवन पद्धतीचेच प्रातिनिधिक असतात. पण प्रांतांच्या फेररचनेचा विचार करताना इतरहि कांहीं महत्वाचे घटक लक्षात घेतले पाहिजेत. पहिला आवश्यक विचार म्हणजे हिंदुस्थानचे ऐक्य व सुरक्षितता कायम राखणे. एवढेच नव्हे तर आणखीं मजबूत करणे. प्रत्येक प्रांताच्या दृष्टीनेच नव्हे तर संबंध राष्ट्राच्या दृष्टीने

आर्थिक व राज्यकारभारविषयक विचार तितकेच महत्वाचे आहेत. आपल्या आर्थिक, सांस्कृतिक व नैतिक प्रगतीसाठीं हिंदने नियोजनाला सुरवात केली आहे. राष्ट्रीय नियोजनाचे यशस्वी अंमलबजावणीत ज्यामुळे अडथळे येतील असे बदल करणें राष्ट्रीय हितास बाधक होईल. ''

यांत सूचित केलेली चार तत्वे कमिशननेच सूत्ररूपाने मांडली आहेत ती पुढीलप्रमाणे.

(१) हिंदुस्थानचे ऐक्य व सुरक्षितता कायम राखून त्यास अधिक बळकटी आणणे.

(२) भाषिक व सांस्कृतिक एकजिनसीपणा.

(३) आर्थिक व राज्यकारभाराचे दृष्टीने विचार.

(४) राष्ट्रीय नियोजनाची अंमलबजावणी.

## ऐक्य व सुरक्षितेस बाध नाहीं

भाषावार प्रांतरचनेने देशाचे ऐक्य व सुरक्षिततेस कोणतीहि बाध येत नाहीं. देशाचे तुकडे पडतील, फुटीरपणा वाढेल ही भीती अनाठायी व अवास्तव आहे. भाषावार प्रांतांचे मागणीमागे फुटीरपणाची वृत्ति मुळीच नाहीं. हिंदी संघराज्यातून फुटून निघण्याची मागणी एकाहि प्रांताने केलेली नाहीं. निरनिराळ्या भाषिक प्रदेशांचा स्वाभाविक विकास होण्याचे दृष्टीनेच ही मागणी केली जात आहे. भाषावार प्रांत होऊन अशा स्वाभाविक विकासाला वाव मिळाल्यानेच देशाचे ऐक्य व सुरक्षिततेस बळकटी येईल. उलट असा वाव मिळाला नाहीं तर असंतोष वाढत जाऊन ऐक्य व सुरक्षिततेस बाध येईल. तेव्हां देशाचे ऐक्य व सुरक्षिततेचे दृष्टीनें भाषावार प्रांतरचना होणें इष्टच नव्हे तर आवश्यक आहे.

'हिंदुस्थानचे ऐक्य व सुरक्षितता' या प्रकरणात कमिशन लिहिते, '' राष्ट्रीय ऐक्याचे दृष्टीने फेररचना करतांना दोन उद्देश डोळ्यांपुढें ठेवले पाहिजेत.

(१) प्रांतीयवाद किंवा भाषिक दुराग्रहीपणासारख्या फुटीर प्रवृत्तींना मुळीच उत्तेजन देता कामा नये.

(२) राष्ट्रीय ऐक्याला बाध येऊ न देता प्रत्येक विभागातील लोकांच्या अनिर्बंध विकासाला पूर्ण वाव मिळेल अशी तरतूद केली पाहिजे. यापैकीं

दुसरा उद्देश साधला तर पहिला त्याच्याबरोबरच साधला जाईल. पण दुसरा उद्देश साधला नाहीं तर मात्र पहिलाही साधणार नाहीं. उलट त्यांच सूचित केलेली प्रांतीयवाद व भाषिक दुराग्रहाची वृत्ति वाढण्याची भीति खरी ठरेल. तेव्हां खरे महत्व दुसऱ्या उद्देशाचेच आहे व भाषावार प्रांतरचना केल्यानेच तो साध्य होईल. पण कमिशनला ही विचारसरणी पटली नाहीं.

जी गोष्ट राष्ट्रीय ऐक्याची तीच राष्ट्रीय सुरक्षिततेची. सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रांतांच्या फेररचनेचा विचार करताना पुढील गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत असे कमिशनला वाटते.

(१) कारभाराच्या घटकांची रचना अशा प्रकारची असली पाहिजे कीं ज्यामुळे लष्कराच्या कोणत्याहि विभागांत प्रादेशिक, जातीय किंवा इतर संकुचित निष्ठा निर्माण होऊन हिंदी संघराज्याशी असलेल्या त्यांच्या अविभाज्य निष्ठेस बाध येणार नाहीं.

(२) लष्करीदृष्ट्या मोक्याच्या भागांत परिणामकारक आणि प्रत्यक्ष नियंत्रण आवश्यक आहे. अशा विभागांत राष्ट्रीय सुरक्षिततेचा विचार करूनच लोकांच्या हाती सोपवावयाच्या कारभाराचे व सुरक्षिततेचे स्वरूप ठरविले पाहिजे.

(३) राष्ट्रीय सुरक्षिततेचे दृष्टीने आणखी एक महत्वाचा विचार म्हणजे सरहद्दीवरील प्रांतांचा आकार आणि साधनसंपत्ति. संरक्षण व्यवस्थेची प्राथमिक जबाबदारी मध्यवर्ति सरकारची असली तरी संरक्षण व्यवस्थेचा वराच मोठा वाटा प्रांताने उचलला पाहिजे. यासाठीं सरहद्दीवरचा प्रांत कारभाराचे दृष्टीने सुव्यवस्थित, सुस्थिर, साधनसंपत्तीने समृद्ध आणि आणीबाणीच्या लष्करी परिस्थितीतून उद्भवणारे तातडीचे प्रश्न सोडविण्यास समर्थ असला पाहिजे. याचा अर्थ सरहद्दीवर छोट्या प्रांतांपेक्षां मोठे, विपुल साधन संपत्तीचे प्रांत असणे अधिक सुरक्षितपणाचे होईल.

भाषावार प्रांतरचनेने सुरक्षिततेस बाध येण्याऐवजी मदतच होईल. लष्करांत ज्यामुळे प्रदेशिक किंवा जातीय अशा संकुचित निष्ठा निर्माण होतील अशा स्वरुपाचे प्रांत निर्माण करता कामा नयेत असे कमिशन म्हणते. लष्करांत काय किंवा सामान्य जनतेत काय प्रांतीयवाद, जातीयवादासारख्या संकुचित निष्ठा कशामुळे निर्माण होतात ? त्यांच्या भाषेच्या व संस्कृतीच्या

स्वाभाविक विकासास वाव मिळाला नाहीं तर त्यांची चळवळ विकृत स्वरूप धारण करण्याचा धोका असतो. यातूनच प्रांतीयवादी व जातीयवादी चळवळींचा उगम होतो. भाषावार प्रांत निर्माण केल्याने या अनिष्ट प्रवृत्ति वाढणार नसून उलट त्यांना निकोप वळण लागेल.

राष्ट्रीय सुरक्षिततेचे दृष्टीने कमिशनने केलेल्या दुसऱ्या दोन सूचनांबाबत मात्र मतभेद होण्याचे कारण नाहीं. पण या सूचनांचाहि खरा फायदा भाषावार प्रांत केल्यानेच मिळेल. कारण सरहद्दीवर सलग भाषिक प्रदेशाचे प्रांत निर्माण केले नाहीत तर तेथील लोक असंतुष्ट रहातील आणि त्याचा प्रतिकूल परिणाम संरक्षण व्यवस्थेवर झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

## आर्थिक स्वयंपूर्णता.

प्रांतांची फेररचना करतांना आर्थिक स्वयंपूर्णतेचे तत्व किती मर्यादेपर्यंत लागू करावे याचाहि थोडा विस्तारानें विचार केला पाहिजे. प्रत्येक प्रांत अगदी काटेकोर अर्थाने आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण असणार नाहीं. आर्थिकदृष्टया तो आपला कारभार चालविण्यास समर्थ ( viable ) असला पाहिजे हे कसे ठरवायचे? कमिशन म्हणते, " आर्थिक क्षमतेचा ( Financial viability ) विचार दोन दृष्टींनी केला पाहिजे. एक अल्प मुदतीपुरता विचार आणि दुसरा लांबमुदतीचा विचार. अल्प मुदतीपुरता विचार म्हणजे अंदाजपत्रकातील जमाखर्चांचा समतोल राखण्यासारखी प्रांताची आर्थिक परिस्थिति असली पाहिजे. लांब मुदतीचा विचार म्हणजे प्रांताला आपली आर्थिक साधनसंपत्ति एवढी वाढविता आली पाहिजे कीं औद्योगिक वाढीचवरचा टप्पा गाठण्यासाठीहि त्याला अंदाजपत्रकाचा तोल राखता आला पाहिजे व आर्थिक धोरण म्हणूनच केवळ तुटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले पाहिजे.

प्रांतांनी मध्यवर्ति सरकारकडून कितपत मदत घ्यावी. यासंबंधी कमिशन लिहिते. प्रांतांनी मध्यवर्ति सरकारकडून आर्थिक मदत घेणे अपरिहार्य असेल. पण अशा मदतीचा उपयोग सर्व साधारणपणें औद्योगिक वाढीचे कार्यक्रमासाठीं करण्यांत आला पाहिजे. नेहमीच्या महसुली अंदाजपत्रकातील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीं नव्हे."

आर्थिक स्वयंपूर्णतेचा काटेकोर अर्थ प्रांत पुनर्रचना कमिशनहि लावत

नाहीं असे यावरून दिसून येईल. प्रांतांच्या आर्थिक क्षमतेबाबत कमिशनने ज्या कसोटया सुचविल्या आहेत त्या भाषावार प्रांतांचे पुरस्कर्त्यांनीहि अमान्य केलेल्या नाहींत. तेव्हां त्याबाबत मतभेद असण्याचे कारण नाही.

## फेररचना व आर्थिक नियोजन

प्रांतांच्या फेररचनेने पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीत कोणताहि अडथळा येता कामा नये हे एक तत्व कमिशनने फेररचना करतांना डोळ्यां-पुढे ठेवले होते व या दृष्टीने पुढील सूचना अहवालांत केल्या (१) सुस्पष्ट आणि अगदी आवश्यक कारणें असल्याशिवाय, कोणताहि बदल करू नये. (२) सध्याची घडी विसकटल्यानें होणारे नुकसान भरून येईल असा कायम फायदा फेररचनेने मिळाला पाहिजे (३) फेररचनेमुळें कारभारावर होणाऱ्या परिणामांचा पूर्ण विचार करून हे प्रश्न शक्य तितक्या कमी काळांत सोडविण्यासाठीं योग्य ती व्यवस्था केली पाहिजे

कमिशनने केलेल्या या सूचनामध्ये अमान्य करण्यासारखे कांहीं नाहीं.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत अनेक धरण योजना हातीं घेण्यात आल्या असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत आणखी कांहीं योजना हाती घेतल्या जाणार आहेत. ज्या नद्यांवर ही धरणें बांधली जाणार त्या सध्या अनेक प्रांतांतून जातात. त्यामुळें या योजनांशी ज्या ज्या प्रांतांचा संबंध येतो त्यांच्या संयुक्त नियंत्रणाखाली त्यांचे काम चालू आहे. या संयुक्त नियंत्रणा-मुळे काम लौकर पुरे होण्यात अडथळे येतात. हे अडथळे टाळावयाचे असतील तर शक्य तो एकाच प्रांताकडे धरण योजनांचे नियंत्रण राहील अशारीतीने प्रांतांची फेररचना केली पाहिजे अशी कमिशनची सूचना आहे पण प्रत्यक्षात ती अंमलात आणणे कठीण आहे, याची कमिशनलाहि कल्पना आहे. कांहीं प्रांतांच्या सीमा निश्चित करतांना व विशिष्ट प्रदेश एखाद्या प्रांतांत समा-विष्ट करताना तेथें कोणत्या भाषेचे किती लोक आहेत याला महत्व न देता तो भाग त्या प्रांताला जोडल्याने आर्थिकदृष्टया व धरण योजनांचे अंमल-बजावणीचें दृष्टीने त्याचा फायदा होईल, या विचाराला कमिशनने अधिक महत्व दिलेले आहे उदाहरणच घ्यावयाचे तर तें बेल्लारीचे घेता येईल. बेल्लारी जिल्ह्यातील सिरुगुप्पा, बेल्लारी व हॉस्पेट तालुका आणि मल्ल-पुरम तालुक्याचा कांहीं भाग आंध्रला जोडावे अशी शिफारस कमिशनने

केली आहे. या भागात तेलगू लोकांची बहुसंख्या नाही तरीहि तो आंध्रला जोडण्याची शिफारस कमिशनने केली याचे कारण तुंगभद्रा धरण या भागात बांधले जावयाचे आहे आणि त्याचा फायदा आंध्र प्रांताला मिळावयाचा आहे. बेल्लारीच्या या वादग्रस्त विभागाचे भवितव्य ठरविण्यासाठींच सरकारने मिश्रा कमिशन नेमले होते व त्याने भाषिकदृष्टया विचार करून हे भाग म्हैसूर प्रांताला जोडण्याची शिफारस केली होती. प्रांतपुनर्रचना कमिशनने तो निर्णय बदलला.

कमिशनचा हा निर्णय व त्यामागील तत्व बरोबर आहे काय ? मला वाटते सीमेवरील प्रदेशाचे भवितव्य ठरवितांना भाषेलाच अधिक महत्व द्यावयास हवे. बेल्लारीचे जे विभाग कर्नाटक किंवा म्हैसूरपासून तोडण्यांत आले, तेथील लोकांची स्वाभाविक इच्छा आपल्या भाषेच्या प्रांतांत म्हणजे कर्नाटकात सामील होण्याची आहे. आपल्या भाषिक प्रांतापासून आपण दुरावलो हा असंतोष त्याच्यांत नेहमी रहाणार. आंध्र-बद्दल त्यांना आपलेपणा वाटणार नाहीं व आंध्रच्या फायद्यासाठीं त्यांच्या भागांत जे तुंगभद्रा धरण बांधले जात आहे, त्याच्या योजनेचे अंमलबजावणीत त्यांच्याकडून हार्दिक सहकार्य मिळणे कठीण जाईल. यापेक्षा धरण योजनेवर आंतरप्रांतीय नियंत्रण ठेवण्याने कमी अडचणी येतील. असे नियंत्रण सध्या यशस्वी न होण्याचें कारण प्रांताप्रांतात वाद व भांडणें आहेत. ही वाद व भांडणे असण्याचे कारण सलग एक भाषिक विभागांचे प्रांत बनविण्याचे योग्य तत्वावर नव्हे तर कृत्रिम रीतीने त्या त्या वेळची कारभाराची सोय पाहून प्रांतांची निर्मिति करण्यांत आली. बेल्लारीसंबंधीचा कमिशनचा निर्णय सरकारनेहि मान्य केला नाही.

## प्रांत छोटे की मोठे ?

फेररचनेचा विचार करतांना प्रांत छोटे असावेत की मोठे असावेत याचाहि विचार करावयास हवा. कमिशनने आपल्या अहवालांत मोठ्या प्रांतांचे निर्मितीस अनुकूलता दर्शविलीं आहे. मोठ्या प्रांतांचे निर्मितीने राज्यकारभारावरील खर्चात काटकसर व बचत होईल. अर्थात हे तत्वहि कांटेकोरपणे पाळून चालणार नाही. परिस्थितीप्रमाणें त्यालाहि अपवाद केले पाहिजेत हे कमिशनला मान्य आहे. प्रांत किती मोठे असावेत त्यालाहि

मर्यादा आहे. त्या प्रांतांतील जनतेला स्वतःचे एकात्म जीवन रहाणार नाहीं, त्याचा कारभार कार्यक्षमता रहाणार नाहीं, आर्थिक प्रगति व समाजहिताच्या योजनात एकसूत्रीपणा रहाणार नाहीं, एवढे मोठे हे प्रांत असता कामा नये. हिंदी संघराज्याचा घटक या नात्याने आपली जबाबदारी पार पाडण्यास पुरेशी साधन संपत्ति प्रत्येक प्रांताजवळ असली पाहिजे व हीच कसोटी लावून त्याचा आकार ठरविला जावा असे कमिशनने सुचविले आहे.

कमिशनचे हे मत सर्वसाधारपणे मान्य होण्यासारखे आहे. पण माझ्या मतें प्रांतांच्या फेररचनेचा विचार करतांना प्रांत छोटे असावेत की मोठे असावेत हा प्रश्नच गौण, दुय्यम आहे. फेररचना करताना शक्य तो एका सलग भाषेचा प्रदेश एकत्र आणणे, राज्यकारभाराची सोय पहाणे आणि प्रांत शक्यतो आर्थिक दृष्टचा स्वयंपूर्ण करणे याच कसोटचा लावल्या पाहिजेत. या कसोटचांना उतरणारे प्रांत निर्माण केले तर ते फार लहानहि असणार नाहींत आणि फार मोठेहि असणार नाहींत. प्रांतांच्या फेररचनेत वर निर्देश केलेल्या कसोटयाच महत्वाच्या आहेतः प्रांत छोटा असावा की मोठा असावा ही कांहीं फेररचना करतांना विचारात घ्यावयाची मूलभूत कसोटी किंवा तत्व नव्हे. इतर कसोटयांचा विचार करतांना त्या अनुषंगानेच प्रांताच्या लहानमोठ्या आकाराचाहि विचार येऊन जातो. प्रांतांच्या फेररचनेत मूल तत्वाइतके महत्व या प्रश्नाला देण्याचे कारण नाहीं. कमिशननेहि तसे केलेले नाहीं. प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करतांना या मुद्याचाहि विचार त्यांत आला एवढेच.

## कांहीं इतर तत्वें

प्रांतांची फेररचना करताना आणखी कोणत्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत याचा विचार 'सम आदर फॅक्टर्स' (कांहीं इतर विचार) या प्रकरणात कमिशनने केला आहे, त्यांत (१) स्वयंनिर्णयाचे तत्व (२) ऐतिहासिक विचार (३) भौगोलिक विचार (४) राज्यकारभाराची सोय (५) एकूण परिस्थिति या गोष्टींचे विवेचन केलें आहे.

प्रांतांची फेररचना करतांना त्या त्या प्रदेशातील लोकांची इच्छा अजमावण्यास महत्व आहे हे खरे पण व्यापक राष्ट्रीय हिताशी ही इच्छा विरोधी असता कामा नये असे कमिशनचे मत आहे. कमिशन म्हणते

" लोकशाही देशात छोटया विभागातील लोकांच्या इच्छेचासुद्धा पूर्ण विचार केला पाहिजे हे नाकारता येणार नाहीं. पण त्याचबरोबर हेहि नाकारता येणार नाहीं कीं अशा इच्छांना कांहीं आवश्यक मर्यादा आहेत. प्रांतांच्या फेररचनेस स्वयंनिर्णयाचें तत्व लावावयाचे म्हटले तर निराळ्या प्रांतांचे मागण्यांना कांहीं मर्यादाच रहाणार नाहीं. प्रत्येक भाषिक किंवा अल्पसंख्य गट स्वत:साठीं प्रांत मागेल आणि लोकांच्या इच्छा तात्पुरत्या विचारांनीहि भारावल्या जाणें शक्य आहे. या मागण्या मान्य केल्या तर देशाची अनेक छोटया घटकांत विभागणी होईल. तेव्हां प्रांतांच्या फेररचनेसाठीं निरनिराळ्या भागातील लोकांच्या इच्छा लक्षात घेताना मानवी व भौतिक साधनसंपत्ति, अल्पसंख्य गटांची इच्छा, हिंदी राज्यघटनेचे दृष्टीने आवश्यक गोष्टी व व्यापक राष्ट्रीय हित या महत्वाच्या गोष्टींचा विचार केला पाहिजे."

प्रांतांच्या फेररचनेचा विचार करतांना लोकांची इच्छा अजमावण्याला महत्व आहेच पण त्याशिवाय इतर कोणत्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत हे कमिशनने सांगितलें आहे. या इतर गोष्टी विचारांत घेऊ नयेत असे भाषावार प्रांतांचे पुरस्कर्तेहि म्हणत नाहीं. सध्याच्या ब व क वर्गाचे कांहीं प्रांतांत आपले छोटे प्रांत कायम टिकविण्यासाठी चळवळ आहे. त्याला उद्देशून मुख्यत: कमिशनचे विवेचन असावे. पण भाषावार प्रांतांचे पुरस्कर्त्यांनी अशा छोटया प्रांतांचा पुरस्कार कधींच केलेला नाहीं. कमिशन ज्याला व्यापक राष्ट्रीय हित म्हणते ते लक्षांत घेऊनच भाषावार प्रांतांची मागणी करण्यात आलेली आहे.

फेररचना करतांना ऐतिहासिक विचाराला कितपत महत्व द्यावे ? विशिष्ट प्रदेशाचे इतिहासापेक्षा सबंध राष्ट्राचे इतिहासाला अधिक महत्व द्यावे असे कमिशनला वाटते. प्रादेशिक इतिहासांतून त्या प्रांताच्या पूर्वीच्या सरहद्दी समजतील पण फेर आखणी करतांना इतिहासापेक्षाहि आजच्या परिस्थितीला अधिक महत्व दिले पाहिजे असे कमिशनला वाटते. कमिशन म्हणते, " इतिहासावर जादा भर दिल्याने निरनिराळ्या प्रदेशांत वितुष्ट, अलिप्तपणा व संकुचितपणाची भावना वाढेल. हा पुनरुज्जीवन वादच अनेक प्रांताच्या मागण्यांचा पाया आहे. तो मर्यादित असेल आणि भारतीय इति-

हासाच्या मुख्य प्रवाहाशी सुसंगत असेल तर त्यात अनिष्ट कांहीं नाहीं. कांहीं प्रांतांचे बाबतीत प्रादेशिक भावनेचा तो महत्वाचा घटक आहे हे मान्य केले पाहिजे आणि तो विचारांत न घेणें कांहींसे वास्तवाला सोडून होईल. पण ऐतिहासिक युक्तिवादातील धोकेहि विसरून चालणार नाहीं. तेव्हां ऐतिहासिक संबंध, दुवे यांचे महत्व आम्ही जाणतो पण त्यावर आधारलेल्या युक्तिवादास वाजवीपेक्षा जास्त महत्व देण्याची आमची तयारी नाहीं."

एकदोन उदाहरणांनी हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. मराठ्यांनी ग्वाल्हेर, इंदूरवर स्वाऱ्या करून तो प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला होता. या इतिहासाचे आधारावर हा प्रदेश महाराष्ट्राला मिळावा अशी मागणी कोणी केली-तर ती मान्य होणार नाहीं. कमिशन ज्याला ' वितुष्ट, अलिप्तपणा व संकुचितपणाची भावना म्हणते ती यातूनच वाढीस लागेल. संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्त्यांपैकीं कोणीहि अशी मागणी केलेली नाही. मी केवळ इतिहासाचे आधारावर कशा वितुष्ट वाढविणाऱ्या मागण्या केल्या जाणे शक्य आहे याचे एक उदाहरण म्हणूनच या मागणीचा उल्लेख केला. बेळगांव जिल्ह्याचा मराठी भाषिक प्रदेश संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट करावा ही संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्त्यांची एक महत्वाची मागणी आता विचारासाठीं घेऊ या. इतिहास, संस्कृति, भाषा, आर्थिक जीवन, व्यापार, या सर्वच दृष्टीनी हा प्रदेश इतिहास काळापासून आजपर्यंत महाराष्ट्राशी संबंधित आहे तेव्हां तो महाराष्ट्रांत सामील करण्याची मागणी करण्यांत आली तर ती न्याय्यच आहे. ऐतिहासिक संबंध व दुव्याचे महत्व आम्ही जाणतो असे कमिशन म्हणते पण बेळगांवच्या बाबतींत मात्र तसे त्यांनी केलेले नाहीं. फक्त चंदगड तालुका तेवढा महाराष्ट्राला देऊन बेळगांव शहरासह बाकीचा मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकला जोडण्याची शिफारस अहवालांत केली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे विवेचन करताना याचा सविस्तर विचार पुढे येईलच. येथे केवळ मी उदाहरणापुरता विचार केला. इतिहासाचे आधारावर केलेल्या मागण्यांपैकीं वाजवी कोणत्या आणि अवाजवी कोणत्या हे कसे ठरवायचे याची कल्पना या दोन उदाहरणांवरून येईल.

प्रांतांच्या फेररचनेचा विचार करतांना राज्यकारभाराच्या सोयीचे दृष्टीने घटक भौगोलिकदृष्ट्या सलग असणें आवश्यक आहे यांत शंका नाहीं,

पण याचा अर्थ असा नव्हे कीं नद्या, पर्वत वगैरे नैसर्गिक सरहद्दींनी प्रांतांच्या सीमा निश्चित करण्यांत याव्या. कमिशनकडे पाठविण्यात आलेल्या कांहीं निवेदनातून अशी मागणी करण्यांत आली. अशा सीमा आखणें शक्य होईलच असे नाहीं असे कमिशनने म्हटले ते बरोबर आहे.

राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने भाषिक एकजिनसीपणा, भौगोलिक सलगता, एका भागातून दुसऱ्या भागात सहज जाता येईल असे दळणवळणाचे मार्ग, राजकीय व आर्थिकदृष्ट्या एक घटक असलेल्या भागात एकाच सरकारची सत्ता असावी या गोष्टी फेररचना करताना कमिशनने विचारांत घेतल्या आहेत व त्याबाबत मतभेद होण्याचे कारण नाहीं.

प्रांतांच्या फेररचनेस कोणतीहि एकच कसोटी लावणें चुकीचे होईल. प्रत्येक प्रांताचे बाबतींत एकूण सर्व परिस्थिती लक्षात घेऊनच निर्णय घेतला पाहिजे असे कमिशनला वाटते. कमिशन म्हणते, " फेररचनेचा प्रश्न एवढा गुंतागुंतीचा आहे कीं एकच कसोटी लावून कोणत्याहि प्रांताचे बाबतींत निर्णय घेणे अवास्तव होईल. प्रत्येक प्रांताचा विचार करतांना आम्ही केवळ त्या मागणीत असलेले गुणावगुण व त्या मागणीची पार्श्वभूमि यांचा विचार करून एकूण सर्व परिस्थिति व सुचविण्यांत आलेल्या योजनांचे मूल्यमापन करूनच निष्कर्ष काढले आहेत."

## मुख्य व दुय्यम कसोट्या

प्रांतांची फेररचना करतांना एकच एक कसोटीं लावता येणार नाहीं हे खरे पण मुख्य कसोट्या कोणत्या आणि दुय्यम कोणत्या हे ठरविणे शक्य आहे आणि आवश्यकहि आहे. अशा कांहीं कसोट्या कमिशननेहि ठरविल्या आहेत पण त्या लावताना सर्व प्रांतांचे बाबतींत सारखी भूमिका घेतली नाहीं. नव्या सोळा प्रांतांपैकी चौदा प्रांतांचे बाबतींत भाषेच्या तत्वावर रचना केली आणि दोनच प्रांतांचे बाबतींत मात्र हे तत्व लावले नाही. भाषा ही एकच एक कसोटी नव्हे हे मान्य पण तिला गौण लेखणेहि योग्य नाहीं. भाषा, आर्थिक स्वयंपूर्णता आणि राज्यकारभाराची सोय या तीनच कसोट्या प्रांतांच्या फेररचनेचा विचार करतांना खरोखर पुरेशा आहेत. त्या लावून प्रांत रचना केल्यास देशाची सुरक्षितता व एकतेला बाध येणार नाहीं. पंचवार्षिक योजनेतील कार्यक्रम अंमलांत आणणे सोपे जाईल. प्रांतांचा आकार

फार मोठा किंवा फार लहान न रहाता योग्य तोच राहील व प्रत्येक प्रांतांतील लोकांच्या संस्कृतीचे विकासास स्वाभाविक वाव मिळेल. व्यापक राष्ट्रीय हिताचे दृष्टीने कांहीं ठिकाणीं द्विभाषिक प्रांत ठेवणे फायद्याचे असेल तर ठेवले पाहिजेत असे कमिशनचे मत आहे पण ही भूमिका पटणारी नाहीं व तसे करण्याची आवश्यकता कशी नाहीं हेहि आपण पाहिले.

## अ, ब, क वर्ग रद्द

प्रांतांची अ, ब, क ही वर्गवारी कमिशनने रद्द केली. त्या अनुषंगाने राजप्रमुखपदहि रद्द करण्याची शिफारस करण्यांत आली. फेररचना करताना व प्रांतांच्या सीमा ठरवितांना कमिशनने जी तत्वे डोळ्यापुढें ठेवली त्याबद्दल मतभेद असू शकतील, नव्हे आहेतहि. पण अ, ब, क वर्गवारी व राजप्रमुखपद रद्द करण्याच्या कमिशनच्या शिफारशींचे मात्र सर्वत्र स्वागत झाले. याबदलामुळे आपल्या संघराज्यातील घटक आता समान दर्जाचे झाले आहेत.

## काँग्रेस नेत्यांचा गोंधळ

प्रांतांची फेररचना कोणत्या तत्वावर आणि कोणत्या पद्धतीने करावी याबाबतींत काँग्रेस नेते गोंधळून गेले आहेत. फाळणीच्या प्रश्नाचे वेळीं अचूक मार्गदर्शन करण्यांत त्यांना अपयश आले तसेच या प्रश्नाचे बाबतींत झाले आहे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत काँग्रेसने १९२० पासून सतत सुसंगतपणें भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केला पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र काँग्रेस नेते या भूमिकेपासून हळूहळू दूर जाऊ लागले. प्रांतरचना करतांना देशाचे ऐक्य महत्वाचे आहे, भाषावार प्रांतरचनेने फुटीरपणा वाढेल अशी भाषा ते बोलू लागले. भाषावार प्रांतरचना ही जनतेला स्वातंत्र्य लढ्यात एकत्र आणायला सहाय्यभूत झालेली एक महत्वाची मागणी होती. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस नेत्यांनी हा प्रश्न डावलला तरी जनता तो विसरणे शक्य नव्हते. तिने सतत जोराची मागणी केल्यामुळेंच काँग्रेसला व सरकारला दार कमिशन, जवाहर —वल्लभभाई—पट्टाभि समिति, फाजलअली कमिशन नेमावे लागले. मुंबई व पंजाब सोडून बाकीचे चौदा प्रांत भाषावार तत्वावर स्थापण्याची शिफारस या कमिशनने केली. या शिफारसीसंबंधी सरकारने आपला निर्णय १६ जानेवारी १९५६ ला जाहीर केला. मुंबईच्या बाबतींत

कमिशनने सुचविलेल्या द्विभाषिक प्रांताऐवजी महाराष्ट्र व गुजरात असे दोन प्रांत निर्माण करून मुंबई शहराचा कारभार मध्यवर्ति सरकारकडे सोपविण्याचे सरकारने ठरविले. पंजाब व आंध्राशिवाय बाकीच्या प्रांताचे बाबतींत किरकोळ फेरबदलांसह कमिशनच्याच शिफारशी सरकारने मान्य केल्या. महाराष्ट्रापासून मुंबईची फारकत केल्याचे निषेधार्थ मुंबई व महाराष्ट्रांत प्रचंड निदर्शने झाली. सरकारच्या निर्णयाचें निषेधार्थ बंगाल व ओरिसामध्येहि निदर्शनें झाली दिल्लीस भरलेल्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत या परिस्थितीचा विचार झाला. हिंसक व दहशती कृत्यांनी सरकारी निर्णयात बदल होणार नाहीं, असा इषारा देणारा ठराव कमिटीनें पास केला पण त्याचवेळीं प्रांतरचनेसंबंधीचा सरकारी निर्णय अंतिम नाहीं असे सूचित करणाऱ्या हालचालीहि दिल्लीत चालू होत्या. वर्किंग कमिटीने २३ जानेवारीला आपला ठराव केला. पण त्याच्या आदल्याच दिवशी संध्याकाळीं मध्यवर्ति सरकारचे दळणवळण मंत्री श्री. जगजीवनराम यांनी पश्चिम-बंगालचे मुख्यमंत्रि डॉ. बिधनचंद्र रॉय यांची भेट घेऊन त्यांच्यापुढे बंगाल बिहारच्या एकीकरणाची कल्पना मांडली. बिहारचे मुख्यमंत्रि डॉ. श्रीकृष्णसिंह यांच्याशीहि त्यांनी चर्चा केली. दोन्ही मुख्यमंत्र्यांनी या कल्पनेस अनुकूलता दर्शविली, एवढेच नव्हे तर तिला पाठिंबा दर्शविणारे संयुक्त पत्रक काढले. पंतप्रधान पंडित नेहरू व काँग्रेसचे अध्यक्ष श्री. ढेबर यांनी त्याचे स्वागत केले. बंगाल व बिहारमध्ये सामील होण्यास ओरिसाहि तयार असल्याचे मत त्या प्रांताचे मुख्य मंत्र्यांनी व्यक्त केले. याच धर्तीवर मद्रास व त्रावणकोर कोचीन यांचे एकीकरणाचा विचार करण्यास आम्ही तयार आहोत असे त्या दोन प्रांतांच्या मुख्यमंत्र्यांची सांगितले. कर्नाटकलाहि यात सामील करण्याची सूचना करण्यात आली. महाराष्ट्र व आंध्रच्या एकीकरणास आपण अनुकूल आहोत असे मत आंध्रच्या मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. राजस्तान, गुजरात व महाराष्ट्र यांचा त्रिभाषिक प्रांत स्थापन करण्याच्या हालचाली मुंबईत सुरू झाल्या.

## द्विभाषिक प्रांतांची लाट आली व विरली

एक दोन अपवाद सोडून एक भाषिक प्रांत स्थापण्याचा अंतिम निर्णय सरकारनें घेतला असता एकदम द्विभाषिक किंवा बहुभाषिक प्रांतांच्या

योजना भराभर पुढे मांडण्यात येऊ लागल्या व हिंदुस्थानचे ऐक्य साधण्याचा हाच खरा मार्ग आहे असे म्हणून या योजनांचा गौरव करण्यात येऊ लागला. प्रांतरचना समितीचा अहवाल व त्यावर सरकारने घेतलेला निर्णय बाजूला सारला जाऊन द्विभाषिक किंवा बहुभाषिक प्रांतांचे तत्वावर प्रांतांची पुन्हा नव्याने रचना होणार कीं काय असे वाटू लागले. द्विभाषिक प्रांतांची ही लाट एकदम कशाने उद्भवली? प्रांत रचना समिति देशात दीड वर्षे फिरून साक्षी गोळा करीत असता तिच्यापुढे ज्या सूचना मांडण्यात आल्या नाहींत त्या अचानक कोठून उद्भवल्या ? प्रांत रचना समितीच्या शिफारशीसंबंधी सरकारने आपला निर्णय १६ जानेवारीला जाहीर केल्यानंतर एक आठवडाभर देशात ज्या प्रतिक्रिया उठल्या त्याचा हा परिणाम होता. सरकारच्या निर्णयाविरुद्ध सर्वांत जास्त असंतोष मुंबई, महाराष्ट्र, ओरिसा, बिहार व बंगाल या भागात दिसून आला. त्यापैकीं मुंबई, महाराष्ट्रातील निदर्शने सर्वांत उग्र स्वरुपाची होती, मुंबईची महाराष्ट्रापासून फारकत केली आणि बेळगाव, कारवारमधील बहुसंख्य मराठी भाषिक भाग कर्नाटकला जोडले त्याच्या निषेधार्थ ही निदर्शने होती. या निदर्शनांचा परिणाम महाराष्ट्रातील कॉंग्रेस संघटनेवरहि झाला. महाराष्ट्रीय मंत्रि, उपमंत्रि, खासदार व आमदार यांनी राजिनामे द्यावेत असा आदेश देणारा ठराव महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीने १९ जानेवारीचे बैठकीत पास केला. मुंबई मध्यवर्ति सत्तेखाली ठेवण्याची एवढी गंभीर प्रतिक्रिया होईल याची सरकार व कॉंग्रेसचे वरिष्ठ नेत्यांना कल्पना नसावी. हिंसक व दहशतीच्या कृत्यांनी सरकारी निर्णयात बदल होणार नाहीं असा ठराव वर्किंग कमिटीने पास केला खरा पण हा ठराव करण्यापूर्वीच आपल्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता त्यांना भासू लागली होती व त्या दृष्टीने त्यांनी हालचालीहि सुरू केल्या होत्या. बिहार, बंगाल एकीकरणास पाठिंबा दर्शविणारे, रॉय-सिंह पत्रक हे या नव्या हालचालीतील पहिले पाऊल होते. मुंबई मध्यवर्ति सत्तेखाली ठेवण्याचा निर्णय महाराष्ट्रीय जनतेस मान्य नाही हे उघड झाले होते. दडपशाहीने चळवळ तात्पुरती दडपली गेली तरी मागणी मान्य होईपर्यंत असंतोष सारखा धुमसत राहून चळवळ मधूनमधून होत रहाणारच. हे कसे टाळावयाचे ? मुंबई महाराष्ट्राला द्यावयाची नाही हे धोरण तर ठाम ठरलेले. दुसरा उपाय म्हणजे समितीने सुचविलेला द्विभाषिक प्रांताचा. सध्याच्या

वातावरणांत गुजरात व महाराष्ट्राचे नेते तो मान्य करणार नाहीत हे उघड दिसत होते. प्रांतरचना समितीच्या अहवालावर महाराष्ट्रीयनेत्यांचा मुख्य आक्षेप हा होता की इतर भाषिकांना त्यांचे भाषिक प्रांत मिळाले आणि महाराष्ट्रीयांवरच तेवढा द्विभाषिक प्रांत का लादण्यात आला? सबंध देशाचीच पुनर्घटना द्विभाषिक प्रांतांचे तत्त्वावर केली तर महाराष्ट्रीयांचें आक्षेपाला जागा रहाणार नाही व ते मुंबईचा द्विभाषिक प्रांत मान्य करतील असे कॉंग्रेसचे वरिष्ठ नेत्यांना वाटले असावे व या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणून बिहार बंगालचे एकीकरणास त्या दोन्ही प्रांतांच्या मुख्यमंत्र्यांचे मन त्यांनी वळविले. पूर्व प्रदेशाचे मागोमाग दक्षिण प्रदेश, पश्चिम प्रदेशाच्या कल्पना पुढे आल्या. द्विभाषिक प्रांतांच्या या नव्या सूचनांना पाठिंबा देणे देशभक्तीचे निदर्शक समजले जाऊ लागले पण या सूचनांना पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींची नांवे पाहिली तर त्यात प्रांतांचे मुख्यमंत्रि, कॉंग्रेस नेते, प्रथमपासून भाषावर प्रांतरचनेस विरोध करणारे जनसंघासारख्या पक्षाचे नेते आणि या प्रश्नावर अनिश्चित धोरण असणारे अशोक मेहतांसारखे प्रजासमाजवादी नेते अशाच व्यक्ति असल्याचे दिसून येईल. प्रांतरचना समितीचे एक सभासद पंडित हृदयनाथ कुंझरूंनीहि बंगाल बिहार एकीकरण कल्पनेचे स्वागत करावे हे मात्र आश्चर्य होते. त्यांना ही सूचना पसंत होती तर प्रांतरचना अहवालातच मुंबईच्या द्विभाषिक प्रांताचे जोडीला बंगाल-बिहार द्विभाषिक प्रांताचा पुरस्कार त्यांनी का केला नाहीं ?

## अडचणीतून पळवाट

भाषावार तत्वाऐवजी बहुभाषिक प्रांतांचे तत्वावर देशाची पुनर्घटना करण्याची ही योजना पूर्ण विचार करून, गुणावगुण नीट पारखून नव्हे तर सध्याच्या अडचणीतून पळवाट म्हणून पुढे आली. कॉंग्रेसमधील कांहीं नेत्यांनाहि ही गोष्ट जाणवल्याशिवाय राहिली नाहीं, दक्षिण प्रदेश स्थापने करण्याचे योजनेसंबंधी बोलताना, म्हैसूरचे मुख्यमंत्रि श्री. के. हनुमंतय्या एका मुलाखतीत म्हणाले, " दक्षिण प्रदेशाची सूचना विचारासाठी अचानक पुढे आली ती त्यातील गुणांपेक्षाहि प्रांतरचना अहवालाचे अडचणीतून पळवाट म्हणूनच पुढे आलेली दिसते. अशा मोठ्या प्रश्नांचा विचार पलायनवादी मनोवृत्तीतून करता येणार नाहीं. " हैद्राबाद कॉंग्रेसचे एक नेते स्वामी

रामानंदतीर्थ यांनी थोड्या निराळ्या शब्दात असेच मत व्यक्त केले. मोठे द्विभाषिक प्रांत करण्याने प्रांतरचनेचा प्रश्न सुटेल असे मला वाटत नाहीं. पश्चिम बंगाल व बिहारचे मुख्यमंत्र्यांनी जो निर्णय घेतला त्याचे कारण गेल्या कांहीं दिवसात घडलेल्या अत्याचारी घटना. अशा अत्याचारांचा तीव्र निषेध केला पाहिजे हे निश्चित पण त्याचबरोबर हा प्रश्न आडवळणाने सोडविता कामा नये हेहि लक्षात घेतले पाहिजे"

## मागच्या इतिहासाचा विसर

भाषावार प्रांतांपेक्षा अधिक हिताची म्हणून द्विभाषिक प्रांताची योजना पुढे मांडताना मागच्या इतिहासाचाहि विसर कॉंग्रेस नेत्यांना पडलेला दिसतो ब्रिटिश राजवटींत सुरवातीला द्विभाषिक किंवा त्रिभाषिक प्रांतच होते. त्यांचा कारभार सुरळीत व गुण्यागोविंदाने चालला असता तर भाषावार प्रांतांची मागणीच उदयास आली नसती. बंगाल, बिहार एकीकरणाची योजना सध्या पुरस्कारिली जात आहे. पूर्वीं बंगाल, बिहारच नव्हे तर त्यांचे जोडीला ओरिसा, आसाम व छोटा नागपूर मिळून एकच प्रांत होता पण लोकांच्या तीव्र मागणीमुळें एकीकडे बिहार व ओरिसा व दुसरीकडे आसाम हे प्रदेश त्यांतून १९१२ सालीं बाजूला काढून त्यांचे प्रांत बनविण्यांत आले. १९३६ मध्ये बिहार व ओरिसामधून ओरिसा अलग करून त्याचा वेगळा प्रांत बनविण्यांत आला व त्यांत मद्रास व मध्य प्रांतातील उरिया भाषेचा कांहीं भाग जोडण्यात आला. त्याचवर्षी मुंबई इलाख्यातून सिंध अलग करून त्याचा प्रांत बनविण्यांत आला. सिंध विभक्त करा अशी कॉंग्रेसची मागणी होती. पूर्वीच्या मोठ्या प्रांतांत भिन्न भिन्न भाषा बोलणारांची एकत्र गठडी बांधलेली होती. कारभारात त्याचा कटु अनुभव आल्यामुळेंच बिहार ओरिसा, आसाम असे वेगळे प्रांत बनविण्यात आले, आता हे प्रांत पुनः एकत्र करून मोठे प्रांत बनविलें तर पूर्वीच्याच अडचणी व कटु अनुभव आल्याशिवाय रहाणार नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे हे मोठे प्रांत राज्य-कारभाराच्यादृष्टीने अवजड होतील. बिहार, बंगाल एक केले तर नव्या प्रांताची लोकसंख्या ६,५५,००,००० व क्षेत्रफळ १,०१,११० चौरस मैल होईल. हे दोन प्रांत एक होत असतील तर ओरिसाहि त्यांच्यात येण्यास तयार आहे. मग सीमेवर आसाम हा प्रांतच तेवढा अलग का ठेवायचा तोहि या

नियोजित पूर्व प्रदेशांत सामील करता येईल पण तसे केल्यास राज्य कारभाराचे दृष्टीने हा प्रांत फारच मोठा व अवजड होईल. (क्षेत्रफळ २,६०,२९० चौरस मैल, लोकसंख्या ८,९८,००,००० ) तीच गोष्ट पश्चिम प्रदेश व दक्षिण प्रदेशाच्या योजनांची (पश्चिम प्रदेश क्षेत्रफळ २,८३,६६० चौ. मैल, लोकसंख्या ५,६२,०० ००० दक्षिण प्रदेश क्षेत्रफळ १,३७,८८० चौ. मैल, लोकसंख्या ६,२६,००,००० ) राज्यकारभाराचे सोयीच्या दृष्टीनें घटक फार मोठे असू नयेत. तसेंच भिन्न भाषिक लोकांची एकत्र गठडी वळल्यानें मंत्रिपद व अधिकार पदांसाठीं त्यांच्यात भांडणे सुरू होतील. सध्याच्या मुंबई प्रांतात मुख्य मंत्रि गुजराती असल्याने कारभारात गुजरात्यांचे वर्चस्व आहे व त्या जमातीचे हितसंबंधाकडेच अधिक लक्ष दिलें जाते अशी तक्रार केली जाते व त्यांत अजिबात तथ्य नाहीं असे नाहीं. मुंबई प्रांतातील १९५०–५१, ५१–५२, ५२–५३ या सालांतील सरासरी जमाखर्चांचे आकडे पाहिले तर त्यात जमेच्या बाजूस प्रांतातील तिन्ही भाषिक घटकांनी पुढीलप्रमाणे वाटा उचललेला आहे. कर्नाटक ८.५ टक्के, गुजरात २२.५ टक्के व महाराष्ट्र ६० टक्के. खर्चहि याच प्रमाणांत केला जात असेल अशी अपेक्षा. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. खर्चाची सरासरी विभागणी पुढीलप्रमाणे आहे. कर्नाटक ११.६ टक्के, गुजराथ २५ टक्के, महाराष्ट्र ४७.१ टक्के. भांडवली खर्चांत तर हा पक्षपात अधिकच उघडपणे दिसून येतो. तिन्ही घटकांत या खर्चाची वांटणी पुढीलप्रमाणे आहे. कर्नाटक १३.२ टक्के, गुजरात ३३.४ टक्के, महाराष्ट्र ४०.२. टक्के याच भांडवली खर्चाचे आणखी पृथक्करण केले तर लहानमोठ्या पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्चात असाच पक्षपात दिसून येतो. १९५०-५१ ते १९५४–५५ पर्यंत लहानमोठ्या पाटबंधाऱ्यावरील सरासरी भांडवली खर्चांची विभागणी पुढीलप्रमाणे आहे. कर्नाटक २३ टक्के, गुजरात ४२.४ टक्के व महाराष्ट्र ३४.६ टक्के. याच कामासाठी १९५५–५६ चे अंदाजपत्रकात केलेली तरतूद पुढीलप्रमाणे होती. कर्नाटक १०.३ टक्के, गुजरात ६९.४ टक्के, महाराष्ट्र २०.३ टक्के. रस्त्यांवरील खर्च पाहिला तरीहि हीच गोष्ट निदर्शनास येते. १९४६-४७ ते १९५४-५५ पर्यंत रस्त्यावरील सरासरी खर्चामध्ये कर्नाटक ११.४ टक्के, गुजरात ५४.४ टक्के व महाराष्ट्र ३४.२ टक्के असा खर्च करण्यात आला. १९५५-५६ च्या अंदाज पत्रकात रस्त्यांवरील खर्चासाठी कर्नाटक ९.९ टक्के, गुजरात ५६.८ टक्के व

महाराष्ट्र ३३·३ टक्के अशी तरतूद केली होती. १९५४–५५ सालात स्कूल-बोर्डांना शाळा इमारतीसाठी दिलेल्या रकमेची विभागणी कर्नाटक १४·१ टक्के, गुजरात ५१·२ टक्के व महाराष्ट्र ३४·७ टक्के अशी आहे. प्रांतरचना अहवालावर मुंबई असेंब्लीत चर्चा झाली त्यावेळी श्री. व्ही. एन. पाटील यांनी केलेल्या भाषणात या आकड्यांचा तक्ता वाचून दाखविला. विवेचनाच्या सोयीसाठी येथे फक्त त्यातील टक्केवारी मी दिलेली आहे. सरकारच्या अंदाजपत्रकातील आकड्यावरूनच हे आकडे काढलेले आहेत. ते चुकीचे आहेत असा खुलासाहि कोणा जबाबदार मंत्र्याने किंवा अधिकाऱ्याने केलेला नाही तेव्हां ते बरोबर आहेत असे धरून चालावयास काहीच हरकत नाही.

द्विभाषिक किंवा बहुभाषिक प्रांतात निरनिराळ्या भाषिकात खर्चाचे व सोयीचे बाबतीत असा पक्षपात केला जातो असा मुंबई प्रांतांतील अनुभव आहे. नवे मोठे द्विभाषिक प्रांत निर्माण केल्यास तेथे याचीच पुनरावृत्ति होणार नाहीं याची काय हमी ? निरनिराळ्या भाषिक जमातीत यामुळे भांडणे व वितुष्ट निर्माण होते. कारभारात अडथळे येतात. औद्योगिक विकास योजनांच्या अंमलबजावणीत या निरनिराळ्या भाषिक जमातींकडून उत्साहाने सहकार्य मिळणार नाहीं. आपल्याला अन्यायाने व सापत्नभावाने वागविले जात आहे, आपल्या विकासाला पूर्ण वाव व सवलती दिल्या जात नाहीत अशी वृत्ति त्यांच्यात निर्माण होईल. एकभाषिक प्रांत निर्माण केल्यानें या साऱ्या अडचणी दूर होतील. असे भाषावार प्रांत निर्माण करणे शक्य असतांना द्विभाषिक किंवा बहुभाषिक प्रांतांचा हा आडवळणी घास कशासाठीं घ्यावयाचा ?

## सीमेवरील प्रदेशाचा प्रश्न

भाषावार प्रांतरचना करतांना ज्या अडचणी उद्भवतात त्यांचे निवारण सरळपणे केले पाहिजे. भाषावार प्रांतांचे तत्वच बाजूला सारून बहुभाषिक प्रांत निर्माण करणे हा या अडचणी दूर करण्याचा मार्ग नव्हे. त्यामुळे नव्या अडचणी निर्माण होतील. त्या कोणत्या याचे दिग्दर्शन मी केलेच आहे. भाषावार प्रांतरचना करताना मुख्य अडचण येते ती सरहद्दीवरील मिश्रभाषिक प्रदेशाच्या सीमा ठरवितांना. मुंबई शहराचा प्रश्न सोडला तर प्रांतरचनेसंबंधी सरकारने

क्र.(१३२) २०५ नों: दि: २-[illegible]/५५

घेतलेल्या निर्णयावर ठिकठिकाणी जी निदर्शने झाली ती मुख्यत: सीमेसंबंधीच्या सरकारी निर्णयाबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी होती. सरकारला सर्वांचे समाधान करणे शक्य नाही, कांहींहि निर्णय घेतला तरी कोणीतरी दुखावले जाणारच व या कटकटी आणि भांडणे चालू रहाणारच. असे सरकारी निर्णयाचे समर्थन करण्यात येते पण ते बरोबर नाहीं. लोकशाहीचे दृष्टीने सर्वमान्य व न्याय्य असे तत्व डोळ्यापुढे ठेवून सीमा निश्चित करण्यांत आल्या तर तक्रारीला जागा रहाणार नाहीं. आणि यानंतरहि तक्रारी करण्यांत आल्या तर त्या न्याय्य नसून स्वार्थी हेतूने किंवा विशिष्ट हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या उद्देशाने केल्या जात आहेत असेच म्हणावे लागेल.

## सीमानिश्चितीसाठी खेडे हाच घटक

सीमा निश्चित करण्याचा प्रश्न कांहीं प्रथमच नव्याने उद्भवलेला नाही. आंध्रची स्थापना झाली त्यावेळी वादग्रस्त बेल्लारी प्रदेशाच्या सीमा निश्चित करण्यासाठी न्यायमूर्ति मिश्रा यांचे कमिशन सरकारने नेमलें होते. या कमिशनने खेडे हाच घटक धरून सीमा निश्चित केल्या व सरकारने तो निर्णय मान्य केला. खेडे हाच घटक मानून विभागणी करणे हेच खरोखर न्याय्य तत्व होय, त्यामुळे कोणताहि भाषिक विभाग असंतुष्ट न रहाता विभागणी करता येते. पण प्रांतरचना समितीनें आपल्या अहवालात खेडे हा घटक न मानता जिल्हा हा घटक मानला. ही कसोटीहि सुसंगतपणे पाळली नाहीं. कांहीं ठिकाणी जिल्ह्यांचेच नव्हे तर तालुक्यांचे व खेड्यांचेहि तुकडे पाडले. यामुळेच सीमेवरील प्रदेशात समितीच्या शिफारशीबद्दल असंतोष होता. सरकारने यासंबंधी निर्णय घेताना जिल्ह्याऐवजी तालुका हा घटक मानला आणि शेजारच्या भाषिक प्रांतात एखादा भाग समाविष्ट करावयाचा असेल तर तेथे त्या भाषिकांची संख्या शेकडा ७० असली पाहिजे अशी अट घातली. वास्तविक आंध्रचे वेळी खेडे हा घटक मान्य केला असता आता तालुका हा घटक मानणे ही सरकारी धोरणातील विसंगति आहे. सीमेबाबत निश्चित कोणतें तत्व मानावे याबाबत सरकारचाच गोंधळ उडालेला आहे. सरकारी निर्णय जाहीर झाल्यानंतर देशात ठिकठिकाणी जी निदर्शने झाली त्यानंतरहि असंतोषाचे खरे कारण ओळखून ते दूर करण्यासाठी खेडे हा घटक मानण्याची सरकारची तयारी

नाहीं, तर भाषावार प्रांतरचनाच बाजूला ठेवून द्विभाषिक प्रांतांचे तत्वावर देशाची पुनर्घटना करण्याचा द्राविडी प्राणायाम सरकारने करून पाहिला पण त्यात यश आले नाहीं.

## द्विभाषिक प्रांत व कमिशन

- द्विभाषिक प्रांतांचा पुरस्कार कमिशनने आपल्या अहवालांत फक्त मुंबई व पंजाबचे बाबतीत केला. संबंध देशाची पुनर्घटना द्विभाषिक तत्वावर करावी असे कमिशनलाहि वाटत नव्हते हे यावरून दिसते. प्रांतांची फेररचना करतांना कमिशनने जो समतोल दृष्टिकोन पुढे ठेवला होता त्यांत द्विभाषिक किंवा बहुभाषिक प्रांतासंबंधी कमिशनने असे म्हटले आहे कीं, " ज्या ठिकाणी परिस्थिति समाधानकारक असेल आणि आर्थिक, राजकीय व कारभाराचे दृष्टीने समतोल राखण्यासाठीं अनेक भाषिक प्रांत असणेच फायद्याचे असेल तेथें असे प्रांत कायम ठेवणे. सर्वच प्रांत असे असावेत असे कमिशनला वाटत नाहीं हे यावरून उघड होते. मुंबई व पंजाब तेवढे द्विभाषिक ठेवण्याची शिफारस कमिशनने केली. कमिशनच्या कांहीं शिफारशींबद्दल मतभेद असले तरी सोळा प्रांतांपैकीं चौदा प्रांत भाषिक तत्वावर स्थापन होत असल्याने कमिशनचा अहवाल म्हणजे भाषावार प्रांतरचनेचे दृष्टीने आंध्रचे स्थापनेनंतर पुढचे पाऊल होते. जनतेची ही न्याय्य मागणी इतक्या वर्षानंतर पुरी होत असतांना भाषावार प्रांतरचनाच बाजूला ठेवून द्विभाषिक प्रांतांचे तत्वावर देशाची पुनर्घटना करणे म्हणजे मागे पाऊल टाकणे होय.

## प्रकरण तिसरें

# रशिया, चीनने प्रश्न कसा सोडविला?

प्रांतांची फेररचना कोणत्या तत्वावर केली पाहिजे, कमिशनने आपल्या डोळ्यापुढे कोणती तत्वे ठेवली, ती कितपत बरोबर आहेत, याचा विचार आपण आतापर्यंत केला. विवेचनाला पूर्णता येण्याचे दृष्टीने रशिया, चीन-सारख्या बहुभाषिक व हिंदप्रमाणेच विस्ताराने मोठ्या राष्ट्रांनी भाषिक प्रश्न सोडविताना कोणती तत्वे डोळ्यापुढे ठेवली, त्यांचे अनुकरण करणे हिंदमध्ये कितपत शक्य व उपयुक्त होईल याचाहि विचार करणें आवश्यक आहे.

हिंदप्रमाणेच रशिया बहुभाषिक देश आहे. १९१७ च्या क्रांतीनंतर कम्युनिस्ट नेत्यांनी तेथील भाषिक घटकांचा प्रश्न अत्यंत यशस्वीपणे सोड-विलेला आहे. झारचे राजवटीत रशियनाशिवाय इतर भाषिकांना स्वतःची भाषा व संस्कृति आहे, त्यांच्या विकासाला योग्य वाव दिला पाहिजे या गोष्टीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यांत आले व प्रांतांच्या सीमा राज्यकर्त्यांच्या लहरीप्रमाणे वाटेल तशा आंखण्यांत आल्या. क्रांतीनंतर ही सारी परिस्थिति बदलली. प्रत्येक भाषिक घटाच्या विकासाला पूर्ण वाव मिळेल अशी व्यवस्था कम्युनिस्ट नेत्यांनी निर्माण केली. नव्या राजवटीतहि रशियन भाषिकांकडून पूर्वीप्रमाणें आपली गळचेपी चालू राहील अशी भीति इतर भाषिक घटकांना वाटू नये यासाठीं त्यांना स्वयंनिर्णयाचा हक्क रशियन नेत्यांनी दिला. सोव्हिएट संघराज्य हे निरनिराळे घटक सक्तीने एकत्र येऊन नव्हे; तर स्वखुषीने एकत्र येऊन निर्माण झाले पाहिजे असा प्रयत्न त्यांनी केला.

सोव्हिएट संघराज्यात आज चार प्रकारचे घटक आहेत.

१. युनियन रिपब्लिक्स्, २. ॲटॉनॉमस रिपब्लिक्स्, ३. ॲटॉ-नॉमस रीजन्स, ४. नॅशनल एरियाज्.

असे चार निरनिराळ्या प्रकारचे घटक कां? सोव्हिएट संघराज्यात आज ६० भाषिक गट आहेत. भाषा, चालीरीति, इतिहास, सांस्कृतिक पातळी या बाबतीत ते एकमेकांपासून भिन्न आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने कांहीं गट फार मोठे आहेत तर कांहीं छोटे आहेत. रशियन, युक्रेनियन,

जॉर्जियन, आर्मेनियन, उझबेक वगैरे भाषिक गटांचा सांस्कृतिक विकास प्राचीन काळापासून होत आलेला आहे तर मारी, कोमी, चुकची, इव्हेन्की, नेत्सी वगैरे भाषिक गटांच्या विकासाला सुरवात क्रांतीनंतरच झालेली आहे. या फरकामुळे सर्वांसाठी एकाच प्रकारची घटक राज्यपद्धति अंमलांत आणणे चुकीचे झाले असते. म्हणून प्रत्येक भाषिक गटांतील लोकांची विशिष्ट परिस्थिति लक्षात घेऊन त्या घटकाच्या राज्यरचनेचे स्वरूप ठरविण्यात आले. वर उल्लेख केलेले चार घटक प्रकार अशा रीतीने अस्तित्वात आले. यापैकी प्रत्येक घटक आपले प्रतिनिधि निवडून अंतर्गत कारभार पहातो तसेच आपल्या प्रतिनिधिमार्फत सोव्हिएट संघराज्याच्या कारभारातहि भाग घेतो.

रशियन, युक्रेनियन, बायलोरशियन व ट्रान्सकॉकेशियन रिपब्लिक्स स्वखुषीने एकत्र येऊन १९२२ साली सोव्हिएट संघराज्य स्थापन झाले. त्यानंतर त्यात उझबेक, कझाक, जॉर्जियन, अझरबैजान, लिथुआनियन, मोल्डोव्हियन लाटव्हियन, किर्गिझ, ताजिक, आर्मेनियन तुर्कमेन, एस्टोनियन, कारेलो-फिनिश अशी आणखी बारा रिपब्लिक्स तेथील लोकांच्या इच्छेनुसार सामील झाली. या सर्व रिपब्लिक्सना समान हक्क आहेत. प्रत्येक रिपब्लिक मग ते आकाराने, लोकसंख्येने कितीहि लहान मोठे असो, बरोबरचेच समजले जाते. रशियन रिपब्लिक हे सर्वांत मोठे आहे. त्याची लोकसंख्या १०,९०,००,००० व क्षेत्रफळ १,७०,००,००० चौरस किलोमीटर आहे. पण तेथील लोकांना कोणतेहि खास हक्क व सवलती नाहींत.

सोव्हिएट संघराज्याचा दुसरा एक विशेष म्हणजे त्यातील प्रत्येक युनियन रिपब्लिक सार्वभौम आहे. स्वतः होऊन संघराज्य सरकारकडे सोपविलेले अधिकार सोडले तर बाकी सर्व बाबतीत ते स्वतंत्र आहे, अशारीतीने संघराज्याकडे सोपविलेले अधिकार रशियाचे घटनेच्या १४ व्या कलमात दिलेले आहेत. प्रत्येक युनियन रिपब्लिकला संघराज्यातून फुटून निघण्याचा हक्क आहे. दुसऱ्या कोणत्याहि देशाचे घटनेत घटकराज्याना असा हक्क नाहीं.

प्रत्येक युनियन रिपब्लिकला स्वतःची घटना आहे. ती तेथील सुप्रीम सोव्हिएटने मंजूर केलेली असते व तिलाच त्यात बदल करता येतो प्रत्येक युनियन रिपब्लिकचें राष्ट्रीय व आर्थिक विशेष, संस्कृति व चालीरीती लक्षात घेऊन ही घटना तयार केलेली असते. एकच अट म्हणजे सोव्हिएट संघराज्याच्या घटनेला धरून ती असली पाहिजे.

प्रत्येक युनियन रिपब्लिकचे आपल्या प्रदेशावर नियंत्रण असते. त्याच्या संमतीशिवाय त्यांच्या प्रदेशात कोणताहि बदल करता येत नाहीं आणि या बदलास रशियातील सर्वात वरिष्ट शासनसंस्थेची मंजुरी मिळावी लागते. प्रत्येक युनियन रिपब्लिकच्या स्वतःच्या फौजा आहेत. हे लष्कर कोणत्या पद्धतीने उभारायचे हे युनियन रिपब्लिकच ठरविते. फक्त मार्गदर्शक तत्वे संघराज्य सरकारने घालून दिलेली असतात. प्रत्येक रिपब्लिकचे लष्कर हा सोव्हिएट संघराज्याचे लष्कराचाच घटक समजला जातो.

परदेशांशी करार करण्याचा, राजकीय प्रतिनिधि नेमण्याचा हक्क प्रत्येक युनियन रिपब्लिकला आहे. संघराज्य सरकार फक्त हे संबंध कशा पद्धतीचे असावेत हे ठरविते. यूनोची स्थापना करण्यासाठी सानफ्रान्सिस्को येथे परिषद झाली त्यावेळी युक्रेन व बायलोरशियाला बरोबरीच्या नात्याने बोलाविण्यात आले होते. पॅरिसचे शांतता परिषदेतहि या दोन रिपब्लिक्सनी भाग घेतला होता. प्रत्येक युनियन रिपब्लिकच्या सार्वभौमत्वाचा निदर्शक असा स्वतंत्र ध्वज त्याला असतो. प्रत्येक युनियन रिपब्लिकचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व सुरक्षित राखण्याची जबाबदारी घटनेने सोव्हिएट सरकारवर टाकलेली आहे.

' स्वायत्त लोकसत्ताक ' (अॅटॉनॉमस रिपब्लिक) हा सोव्हिएट संघराज्याचे घटकांचा दुसरा प्रकार आहे. एखाद्या युनियन रिपब्लिकमध्ये स्वतःची वैशिष्टचे असलेला एखादा अल्पसंख्य राष्ट्रगट ( नॅशनॅलिटी ) असतो. या लोकांना स्वखुषीने एकत्र येऊन स्वायत्त लोकसत्ताक स्थापन करता येते. उदाहरणार्थ पेचोरा व विचेग्डा नद्यांचे खोऱ्यात कोमी लोक अनंत काळापासून रहात आलेले आहेत. झारचें राजवटीत त्यांचा एवढा छळ झाला की, आपला देश म्हणजे त्यांना तुरुंग वाटू लागला आता सोव्हिएट राजवटींत त्यांनी स्वतःचे स्वायत्त लोकसत्ताक स्थापन केलें आहे. शिक्षणाचा गंधहि नसलेल्या या भागात आज ९७ टक्के लोक साक्षर आहेत. अशाच प्रकारे इतर स्वायत्त लोकसत्ताकांचीहि प्रगति झालेली आहे.

प्रत्येक स्वायत्त लोकसत्ताकाला स्वायत्ततेचे अधिकार आहेत. सर्व शासनसंस्थाचा कारभार मातृभाषेतून चालतो. प्रत्येक स्वायत्त लोकसत्ताकाची स्वतःची घटना असते. तिला ते लोकसत्ताक ज्या युनियन रिपब्लिकचा घटक

असते त्याच्या सर्वश्रेष्ठ शासनसंस्थेची मान्यता मिळावी लागते. सोव्हिएट संघराज्य व युनियन रिपब्लिकचे घटनांना धरूनच ही घटना असते. स्वायत्त लोकसत्ताकाचे प्रदेशात बदल करायचा असेल तर त्या लोकसत्ताकाची संमति तर मिळवावी लागतेच पण युनियन रिपब्लिकचीहि मान्यता मिळावी लागते.

'स्वायत्त विभाग' ( ॲटॉनॉमस रीजन ) हा सोव्हिएट संघराज्याचे घटकांचा तिसरा प्रकार आहे. युनियन रिपब्लिक्समध्यें संख्येने लहान असलेल्या लोकांनी स्वखुषीने एकत्र येऊन हे विभाग स्थापन केलेले आहेत. या स्वायत्त विभागांना स्वायत्ततेचे अधिकार आहेत. सर्व सरकारी संस्थांचा कारभार त्या त्या विभागांच्या भाषेत चालतो.

सोव्हिएट संघराज्याचा स्वायत्त विभागापेक्षाहि छोटा घटक म्हणजे 'नॅशनल एरिया' ( राष्ट्रीय प्रदेश.) सोव्हिएट संघराज्याच्या निरनिराळ्या भागात छोट्या छोट्या वन्य जमातीसारख्या मागासलेल्या जमाती आहेत. या लोकांनी स्वखुषीने एकत्र येऊन आपले 'राष्ट्रीय प्रदेश' स्थापन केलेले आहेत. उत्तर सैबेरियात पोलुई, नादिम व पुर नद्यांचे खोऱ्यात नेनेटस् लोकांची वस्ती आहे, झारचे राजवटीत त्यांचा एवढा छळ झाला कीं ही जमात जवळजवळ नामशेष होण्याचे मार्गास लागली. १८९९ ते १९१३ या चौदा वर्षांत तिची लोकसंख्या १६००० वरून २००० पर्यंत खाली आली पण सोव्हिएट राजवटीत त्यांच्या विकासाला पूर्ण वाव मिळून त्यांचे जीवन ओळखता येणार नाहीं इतके बदलून गेले आहे.

'राष्ट्रीय प्रदेश' स्थापन करणाऱ्या जमातीस अंतर्गत कारभारात पूर्ण स्वायत्तता असते. एरिया सोव्हिएट ऑफ वर्किंग पीपल्स डेप्युटीज आणि त्यांचे कार्यकारी मंडळ या प्रदेशांतील शासन संस्था असून सुप्रीम सोव्हिएटने मान्य केलेल्या एका वटहुकमात त्यांचे हक्क व कर्तव्ये कोणती हे दिलेले आहे. सरकारी कामकाजातून त्या भागाची मातृभाषाच वापरली जाते.

सोव्हिएट संघराज्यातील निरनिराळ्या चार प्रकारच्या राष्ट्रघटकांचे स्वरुप असे आहे स्वतःची भाषा व सांस्कृतिक वैशिष्ट्ये असलेला राष्ट्रगट मग तो कितीहि लहान किंवा मोठा असो त्याच्या विकासास पूर्ण वाव देणारा स्वायत्त घटक तो स्थापन करू शकतो. अंतर्गत कारभारात या घटकाला पूर्ण स्वायत्तता असते. तेथील लोक आपला कारभार आपल्या भाषेत पाहू

शकतात. सर्व घटक आकाराने लहान मोठे असले तरी समान व सारख्या दर्जाचेच मानले जातात आणि त्यांना हक्कहि सारखेच असतात. यामुळे एकमेकाबद्दल द्वेषभाव, वितुष्ट निर्माण होण्याऐवजी सहकार्याची भावना त्यांच्यात वाढीस लागते व या सहकार्याचे भावनेमुळेच सबंध सोव्हिएट संघराज्याचा विकास होत आलेला आहे.

आपल्याकडे राष्ट्र घटकांचा प्रश्न या दृष्टीने हाताळला असता तर तो अधिक समाधानकारकपणे सोडविला गेला असता. पण प्रथमपासून या प्रश्नाचा या दृष्टीने विचारच फारसा झालेला नाहीं. प्रादेशिक भाषांची जसजशी वाढ होऊ लागली तसतशी ती भाषा बोलणाऱ्या महाराष्ट्र, गुजरात, बंगाल वगैरे प्रदेशांची सांस्कृतिक वैशिष्टये निर्माण होऊ लागली. रशियात ज्याला ' नॅशनॅलिटीज ' किंवा राष्ट्रगट म्हणतात तसे हे राष्ट्रगटच आपल्याकडे विकसित होत होते. राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ आणि या राष्ट्रगटांची स्वतःच्या विकासासाठी चालू असलेली चळवळ परस्परविरोधी नव्हे तर एकमेकांना पूरकच होत्या. राष्ट्रगटांचे विकासाच्या या चळवळीला भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचे स्वरुप आपल्याकडे आले व या मागणीला राष्ट्रीय चळवळींत महत्वाचे स्थान देण्यात आले, पण स्वातंत्र्य मिळेपर्यंत या मागणीला जेवढे महत्व देण्यात येत होते तेवढे नंतर देण्यात आलें नाहीं. हा प्रश्न पुढे ढकलण्याचा प्रयत्न झाला एवढेच नव्हे तर भाषावार प्रांतांची मागणी हिंदुस्थानचे ऐक्यास विरोधी आहे. फुटीरपणाची आहे असा खोडसाळ प्रचार करण्यांत येऊं लागला. पण अखेर नऊ वर्षानंतर का होईना ही मागणी मान्य करणें सरकारला भाग पडले. कांही थोडे अपवाद सोडले तर नव्या प्रांतांची रचना मुख्यतः भाषेच्या तत्वावरच करण्यांत आलेली आहे.

शास्त्रीय दृष्टीनें विचार केला तर भाषावार प्रांतांची मागणी म्हणजे हिंदमधील निरनिराळ्या राष्ट्रगटांनीं केलेली स्वायत्त राज्यघटकांचीच मागणी होती असे दिसून येईल. आपल्याकडे प्रांत हाच देशाचा घटक मानण्याची कल्पना ब्रिटिशांपासून आल्यानें या मागणीला भाषावार प्रांतांच्या मागणीचे स्वरूप आले. त्यातील भाषा हा शब्द त्या त्या प्रदेशाच्या सांस्कृतिक वैशिष्टयाचा निदर्शक होता. स्वतःच्या सांस्कृतिक वैशिष्टयांचा आम्हाला पूर्ण विकास ज्यामुळे करतां येईल असा आमच्या प्रदेशाचा स्वायत्त घटक हिंदी संघराज्यांत निर्माण करा असे या मागणीचे खरे स्वरूप होते.

रशियन नेत्यांनी ज्या तत्वांचा व पद्धतीचा अवलंब करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला त्या तत्वांचा व पद्धतींचा अवलंब आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी प्रथमपासून केला असता तर हा प्रश्न अधिक समाधानकारकपणें सुटला असता व कदाचित पाकिस्तानसुद्धां निर्माण झाले नसते.

सोव्हिएट संघराज्य निरनिराळे स्वायत्त घटक स्वखुषीनें एकत्र येऊन स्थापन झालेले आहे. संघराज्यांत सामील होण्याची सक्ति कोणावरहि केलेली नव्हती. स्वत:च्या संमतीने संघराज्याकडे सोपविलेले कांही अधिकार सोडले तर प्रत्येक घटक स्वतःच्या कारभाराचे बाबतीत सार्वभौम आहे, स्वतंत्र आहे. त्याला स्वत:ची घटना आहे, ध्वज आहे. सोव्हिएट संघराज्यांत राहून आपला विकास होत नाही असे वाटले तर फुटून निघण्याचा हक्कहि त्याला दिलेला आहे.

## पाकिस्तान टाळता आले असते

मुस्लिमांना हिंदु वर्चस्वाविषयीं वाटणारी खरी खोटी भीति नाहीशी करण्यासाठीं हिंदी संघराज्यांत सामील व्हावयाचे कीं नाही हे घटकांना स्वयंनिर्णयानें ठरविता येईल व त्यांना पुढें जरूर वाटल्यास फुटून निघण्याचाही हक्क राहील हे तत्व आपल्या राष्ट्रीय नेत्यांनीं स्पष्टपणें मान्य केले असते व मुस्लिम जनतेत त्याचा प्रचार करून हिंदु वर्चस्वाविषयीं तुम्हाला आता कोणतीहि भीति बाळगण्याचे कारण नाही अशी त्यांची खात्री पटवून दिली असती तर लीगच्या पाकिस्तानच्या मागणीमधला सारा जोरच नाहींसा झाला असता व पाकिस्तान अस्तित्वात आले नसते. पण कॉंग्रेस नेत्यांची या प्रश्नाबाबत प्रथमपासूनच स्पष्ट भूमिका नसल्याने मुस्लीम जातीयवाद बळावला व अखेर पाकिस्तान मान्य करावे लागले. राष्ट्रघटकांच्या प्रश्नाकडे रशियन नेत्यांनी प्रथमपासूनच ज्या तात्विक भूमिकेवरून पाहिले त्या भूमिकेचा विचारच आपल्याकडे फारसा झाला नाही. हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणांतसुद्धा स्वयंनिर्णयाचे तत्त्व फार उशीरा आले व त्या पक्षाने केलेल्या इतर चुकांमुळें त्यांच्या यासंबंधीचे भूमिकेचा फारसा कोणी विचारच केला नाही. उलट कम्युनिस्टांना एकच नव्हे तर अनेक पाकिस्तानें हवी आहेत असा त्यासंबंधी गैरसमज निर्माण करण्यांत आला.

रशियाने आपल्या घटनेत घटकांना स्वयंनिर्णयाचा व फुटून निघण्याचा हक्क दिला पण प्रत्यक्षांत कोणताही घटक फुटून निघाला नाहीं. कारण त्याला तशी आवश्यकताच वाटली नाहीं. सोव्हिएट संघराज्यांत आपल्याला बरोबरीच्या नात्यानें वागविले जात आहे, आपल्या विकासाला पूर्ण वाव मिळत आहे, पुढे या परिस्थितीत फरक पडलाच तर आपल्याला फुटून निघण्याचा हक्क आहेच, अशा समाधानाच्या भावनेनें प्रत्येक घटक सोव्हिएट संघराज्यांत राहून त्याच्या सर्वांगीण प्रगतीत उत्साहाने भाग घेऊ लागला. आपल्याकडे मात्र पाकिस्तान निर्माण झाले व स्वातंत्र्य मिळाले तरी भाषावार प्रांतांची मागणी पुढे ढकलण्यांत आल्यानें प्रांताप्रांतात असंतोष निर्माण झाला. स्वातंत्र्याच्या सुरवातीलाच जातीय दंगली व निर्वासितांच्या पुनर्व्यवस्थेसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांना सरकारला तोंड द्यावे लागले हे खरे. तरीहि नव्या घटनेबरोबरच नवे भाषावार प्रांत अस्तित्वात येतील अशी योजना सरकारला आखता आली असती. निदान पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीचे सुरवातीस तरी नवे प्रांत अस्तित्वात यावयास हवे होते. म्हणजे या योजनेच्या अंमलबजावणीत लोकांकडून अधिक सहकार्य सरकारला मिळवता आले असते पण या मागणीनें फुटीरपणा वाढेल, देशाचे ऐक्यास बाध येईल असाच गैरसमज करून घेण्यांत येऊन प्रश्न पुढे ढकलण्यात आला. पण लोकांचे चळवळीच्या दडपणामुळें १ ऑक्टोबर १९५३ ला आंध्र प्रांताची स्थापना करावी लागली, प्रांतांच्या फेररचनेचे विचारासाठी कमिशन नेमावे लागले आणि त्यांच्या शिफारशींप्रमाणें एक दोन अपवाद सोडल्यास भाषावार तत्वावर प्रांतांची फेररचना ऑक्टोबर १९५ मध्ये होत आहे.

## ब्रिटिश कल्पनांचा पगडा

स्वतःचे सांस्कृतिक वैशिष्टच असलेला राष्ट्रगट मग तो लोकसंख्या व क्षेत्रफळाचे दृष्टीने कितीहि लहान किंवा मोठा असो त्याला त्याच्या आकारमानाप्रमाणें लहान मोठा स्वायत्त घटक स्थापण्याची संधि सोव्हिएट नेत्यांनी दिली. असे घटक स्थापल्याने तेथे कोणत्याही प्रकारचा फुटीरपणा निर्माण न होता उलट सहकार्य व ऐक्याची भावनाच वाढली. आपल्याकडेहि असे स्वायत्त घटक निर्माण करणे शक्य होते पण प्रथमपासून ब्रिटिश लोकशाही व राज्यकारभाराचे कल्पनांचाच आपल्यावर अधिक पगडा असल्याने प्रांतांच्या

परिभाषेतच आपण विचार केला, प्रांतांना 'स्टेट' किंवा 'राज्य' नांव दिलेले असले तरी त्यामुळे कांही या कल्पना बदललेल्या नाहींत. प्रांत रचना करतांना राज्य कारभाराच्या सोयीकडेच अधिक लक्ष देण्यांत आले. स्वत:चे भाषिक व सांस्कृतिक वैशिष्टय असलेल्या राष्ट्रगटांचे स्वायत्त घटक निर्माण करण्याचे रशियन नेत्यांचे तत्त्व आपण अनुसरले असते तर फेररचनेचा प्रश्न किती सोपा झाला असता हे पहाण्यासारखे आहे.

प्रादेशिक भाषांच्या वाढीबरोबर महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, बंगाल वगैरे स्वत:चे वैशिष्ठय असलेले राष्ट्रगट आपल्याकडे विकसित झाले आहेत. सोव्हिएट संघराज्यातील घटकांप्रमाणेच त्यांनाहि हिंदी राज्यघटनेशी सुसंगत अशी स्वत:ची घटना, स्वत:चा ध्वज व स्वत:चे लोकसत्ताक राज्य (रिपब्लिक) स्थापन करण्याची संधि दिली असती तर स्वत:चे विकासाला आपणास पूर्ण वाव मिळाला आहे, अशी समाधानाची भावना त्यांच्यात निर्माण झाली असती. त्यांच्यात फुटीरपणा वाढला असता ही भीति अनाठायी आहे. या स्वायत्त घटकांच्या आतच स्वत:चे निराळे वैशिष्ठय असलेले राष्ट्रगट असल्यास त्यांनाहि अंतर्गत कारभारापुरती स्वायत्तता देऊन त्यांचे स्वायत्त विभाग निर्माण करता आले असते. विशेषत: एका भाषेच्या प्रांतांत भिन्न भाषिकांचीं वस्ती असलेले कांहीं भाग आहेत. त्यांचा प्रश्न या पद्धतीने सोडविता आला असता व द्विभाषिक प्रदेशामुळे निर्माण झालेले झगडें मिटविता आले असते.

## आदिवासींचे स्वायत्त घटक

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत आदिवासी व वन्य जमाती विखुरलेल्या आहेत. त्या बऱ्याच मागासलेल्या आहेत. त्यांना सुधारण्यासाठीं शिक्षण व इतर बाबतींत सरकार सवलती देत आहे पण एवढ्याने त्यांचा प्रश्न सुटणार नाहीं रशियात अशा जमातींचे स्वायत्त घटक निर्माण करण्यांत येऊन त्यांना अंतर्गत कारभारांत स्वायत्तता देण्यांत आली तसे आपल्याकडे करण्यांत आले तर या जमातींची सुधारणा अधिक झपाट्याने होईल.

## फुटून निघण्याचा हक्क नको

सोव्हिएट संघराज्याप्रमाणें घटकांना फुटून निघण्याचा हक्क देण्याची मात्र आपल्याकडे आवश्यकता नाहीं. आपल्याकडे राष्ट्रवादाचा विकास

रशियापेक्षां निराळ्या तऱ्हेने झालेला आहे. ब्रिटिशाविरुद्ध चालविलेल्या स्वातंत्र्य लढ्यातून एकराष्ट्रीयत्वाचे भावनेचा उदय झाला या लढ्यात हिंद-मधील सर्व भाषिक गट एकत्र आले. आपणच हिंदुस्थानचे खरे सत्ताधारी, इतर भाषिक गट किंवा प्रांत दुय्यम असून त्यांनी आपले ऐकले पाहिजे अशी भावना कोणत्याहि एका गटात निर्माण झाली नाहीं. आपल्या राष्ट्रवादात एकच उणीव होती ती म्हणजे मुस्लीम जातीयवादावर तो विजय मिळवू शकला नाहीं. मी वर म्हटल्याप्रमाणें सोव्हिएट नेत्यांप्रमाणें त्यावेळीं आपण स्वयंनिर्णयाचे तत्व आणि फुटून निघण्याचा हक्क मान्य केला असता आणि मुस्लिम जनतेत त्याचा प्रचार करून हिंदुवर्चस्वाबद्दलची त्यांची भीति नाहीशी केली असती तर पाकिस्तानची स्थापना व देशाची फाळणी टाळता आली असती. पण पाकिस्तान स्थापन झाल्यानंतर बाकीच्या हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र फुटून निघण्याचा हक्क मान्य करण्याची आवश्यकता नाही. फुटून निघावेसे का वाटते ? आपल्या विकासास अडथळे होत आहेत दुसरा एखादा घटक आपल्यावर वर्चस्व गाजवीत आहे असा अनुभव येत असेल तर हिंदी संघराज्याचा घटक न रहाता फुटून निघून आपण आपले स्वतंत्र राज्य स्थापावे असे एखाद्या घटकाला वाटू लागेल अशी परिस्थितीच आप-ल्याकडे नाहीं.

प्रत्येक घटकाच्या प्रदेशांत त्याच्या संमतिशिवाय कोणताहि बदल करण्यांत येऊ नये हे तत्व रशियाप्रमाणेंच आपल्याकडे पाळायला हरकत नाहीं. घटकांच्या सीमा ठरवितांना सुद्धा तेथील लोकांची इच्छा लक्षात घेतली पाहिजे. सीमेवरच्या वादग्रस्त द्विभाषिक प्रदेशावर दोन्ही प्रांत हक्क सांगत असतील तर तो प्रश्न कसा सोडवायचा ? खेडे हाच सर्वात छोटा घटक मानून या प्रदेशाची विभागणी करणे हाच हा प्रश्न सोडविण्याचा न्याय्य मार्ग आहे. प्रांत पुनर्रचना कमिशने व सरकारने तसे न केल्यामुळें निरनि-राळ्या प्रांतांत सीमेबाबत वाद व कटकटी निर्माण झाल्या आहेत.

भाषिक घटकांचा प्रश्न रशियाने ज्या तत्वांचा अवलंब करून सोड-विला त्याच तत्वाचा अवलंब करून कम्युनिस्ट चीननेहि तो सोडविला.

चीनमध्यें चिनी हीच मुख्य जमात असली तरी इतर भाषा बोलणाऱ्या ६० लहान मोठ्या अल्पसंख्य जमाती आहेत. त्या सर्वांची मिळून

लोकसंख्या चार कोट आहे. देशाच्या निम्म्या भागात त्यांची वस्ती विखुरलेली असली तरी मुख्यत: सरहद्दीवरील भागातच त्यांची संख्या आढळते. यातील प्रमुख जमातींची लोकसंख्या पुढीलप्रमाणें---चुआंग ६० लाख, हुई ४० लाख, यी ३३ लाख, मिओ २३ लाख, युघूर ३० लाख, तिबेटी ३० लाख, पुयी ११ लाख, मंगोलियन १५ लाख, कोरियन ११ लाख, तुंग ६ लाख, याओ ६ लाख, ताय ५ लाख. या सर्व जमातींना स्वत:चा इतिहास व संस्कृति असून चीनच्या विकासात त्यांनी महत्वाची भर घातली आहे.

चीनमध्यें कम्युनिस्ट राजवट येईपर्यंत या अल्पसंख्य जमातींना स्वातंत्र्य व समानतेची वागणूक आणि दर्जा कधींच मिळाला नव्हता. अगदी प्राचीन राजाप्रमाणेंच मांचू राजे व चँग–कै–शेकनेहि त्यांचा छळ केला. चँगचे राजवटीत तर या छळणुकीची परमावधी झाली. सिकँग प्रांतांतल्या यी लोकांनीं अखेर हताश होऊन १९४७ मध्यें बंड केलें तेव्हां चँगने त्यांच्या वस्तीवर विमानातून बाँबफेक करून दहा हजार लोकांना ठार व जखमी केले. अशी दडपशाही चालू असताहि स्वातंत्र्य व समतेसाठीं या जमातींचा लढा चालूच होता. कम्युनिस्टांचे हाती सत्ता आल्यावर अनेक वर्षे कुंठित झालेले त्यांचे आर्थिक व सांस्कृतिक जीवन विकसित होऊ लागले.

मार्क्सवाद–लेनिनवादाची तत्वे चीनमधील विशिष्ट परिस्थितीला लावूनच भाषिक घटकांचा प्रश्न चीनचे नेत्यांनी सोडविला. सर्व भाषिक अल्पसंख्यांकाना समान हक्क देण्यांत आले. त्यांना प्रादेशिक स्वायत्तता देण्याचे धोरण त्यांनी अंमलांत आणले. नव्या चीनची घटना तयार होण्यापूर्वी चिनी जनतेच्या राजकीय सल्लागार परिषदेने ( चायनीज पीपल्स पोलिटिकल कन्सल्टेटिव्ह कॉन्फरन्स ) आखलेला समान कार्यक्रम हाती घेण्यांत आला. त्यातल्या ५१ व्या कलमांत प्रादेशिक स्वायत्ततेचे तत्व मान्य केले होते. हे कलम पुढील प्रमाणें आहे.

" अल्पसंख्य जमातींची वस्ती ज्या भागांत आहे तेथे प्रादेशिक स्वायत्तता दिली जाईल व त्या त्या जमातीची लोकसंख्या आणि प्रदेशाचे आकारमानानुसार निरनिराळ्या प्रकारचे स्वायत्त राज्यघटक निर्माण करण्यांत येतील. ज्या भागांत निरनिराळ्या जमाती एकत्र रहात आहेत तेथे स्थानिक सरकारमध्ये प्रत्येक जमातीस योग्य प्रतिनिधित्व देण्यांत येईल."

या धोरणानुसार चीनमध्यें गेल्या चार वर्षांत अनेक स्वायत्त घटक ( Autonomous regions ) निर्माण करण्यांत आले. इनर मंगोलियन ॲटानॉमस रीजनसारख्या मोठ्या प्रदेशाप्रमाणेंच जिल्ह्याच्या आकाराचेहि कांहीं प्रदेश आहेत. ऑक्टोबर १९५३ पर्यंत कौंटी किंवा त्यापेक्षा मोठ्या आकाराचे असे पन्नास स्वायत्त प्रदेश निर्माण करण्यांत आले. तिबेटचे मुक्ततेनंतर तेथील लोकांनाहि प्रादेशिक स्वायत्ततेचे अधिकार देण्यांत आले.

या व्यवस्थेमुळें प्रत्येक प्रादेशिक घटकांची राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात झपाट्याने प्रगति होत आहे चीनच्या मुक्ततेपूर्वी आंतर्मंगोलियांत शेती उत्पादन जास्तीत जास्त जेवढे झाले होते त्याच्यापेक्षां २५ टक्के अधिक उत्पादन १९५२ मध्ये झाले. दूध दुभत्याचे उत्पादन दुपटीने वाढले. ६० टक्के मुले शाळेत जाऊ लागली. क्वेचौ प्रांतातील मियो ( Miao ) लोक फार दारिद्र्यांत व मागासलेल्या स्थितीत रहात होते १९५१ मध्ये त्यांचे स्वायत्त सरकार स्थापन झाले. जमीन सुधारणा अमलात आल्या. १९५२ साली तांदळाचे उत्पादन त्यापूर्वीच्या जास्तीतजास्त आकड्यापेक्षाहि २३ टक्क्यांनी वाढले. प्रत्येक खेड्यात प्रौढांसाठी सायंकाळची शाळा काढण्यांत आली. आतां तेथे ५६ प्राथमिक शाळा व एक दुय्यम शाळा आहे. एक प्रादेशिक आरोग्य केंद्र, तीन प्रसूति केंद्रे स्थापन करण्यांत आली असून १५४ सुइणींना बाल जन्माच्या नव्या पद्धतीचे शिक्षण देण्यात आले आहे. मिओंची लोकसंख्या अवघी तेवीस लाख आहे पण स्वायत्तता मिळाल्याने ते एवढी प्रगति करू शकले.

## चीनचे कारभारविभाग

प्रांतिक व स्थानिक सरकारांवर देखरेख ठेवून त्यांना मार्गदर्शन करण्याचे उद्देशाने चीनचे सहा मोठे कारभार विभाग पाडण्यांत आले आहेत. ( Greater Administrative Areas ) १ उत्तर, २ ईशान्य, ३ वायव्य, ४ पूर्व, ५ मध्यदक्षिण व ६ नैऋत्य. कारभाराचे दृष्टीने आंतर्मंगोलियाचा स्वायत्त घटक व तिबेट मोठ्या कारभार विभागांएवढे आहेत. प्रत्येक विभागाला एक ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कमिटी असते. मध्यवर्ति सरकारच या कमिटचा नेमते. व त्यांच्या वतीने त्या काम पहातात प्रांतिक सरकारे मध्यवर्ति सरकारच्या अधिकार क्षेत्राखालीच आहेत पण ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कमिटचांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली त्यांचा कारभार चालतो.

कारभाराच्या सोयीसाठीं प्रत्येक प्रांताच्या अनेक कौंटीज पाडलेल्या आहे व प्रत्येक प्रांतात ५० ते १०० व कांहीं प्रांतात १३० ते १४० कौंटीजहि आहेत. चीनमध्ये सध्या ३० प्रांत आहेत.

**ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रीजन्स** : कौंटींजना मार्गदर्शन करणें सोपे जावे म्हणून प्रत्येक प्रांताचे असे रीजन्स ( प्रदेश ) पाडलेले आहेत. प्रत्येक ' रीजन 'चे प्रादेशिक सरकार असतें तें प्रांतिक सरकारला जबाबदार असते. सबंध देशात १५२ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रीजन्स आहेत.

**कौंटी** : कौंटीचे सरकार प्रांतिक सरकारचें मार्गदर्शनाखालीच काम करते. चीनमध्ये २०२३ कौंटीज आहेत.

**चू** (Chu-districts). कौन्टीची विभागणी जिल्ह्यात केलेली आहे चीनमध्ये १८९३० चू आहेत.

**ह्सिआंग** ( Hsiang ). सर्वांत छोटा कारभार विभाग. एक किंवा अधिक खेडी यात असतात. चीनमध्यें दोन लाख ह्सिआंग आहेत. बहुतेक मोठी शहरे मध्यवर्ति सरकारचे अधिकाराखाली असून बाकीची प्रादेशिक सरकारांचे अधिकाराखाली आहेत. १४ म्युनिसिपालिटचा मध्यवर्ति सरकारचे अधिकाराखाली आहेत. त्यांत पेकिंग, टिनस्टिन, शेनयांग, पोर्ट आर्थर, डायरेन, अनशान, फुशुन, पेंकी, हार्बिन, चँगचुन, सिअेन, शांघाय, वुहान, कँटन व चुंकिंग आहेत. खालील प्रकारची शहरे मध्यवर्ति सरकारचे अधिकाराखाली येतात. ग्रेटर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह एरियाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कमिटीचे मुख्य ठाणे, प्रमुख बंदरे, प्रांतांची आर्थिक व सांस्कृतिक केंद्रे, दहा लाखापेक्षां अधिक वस्तीचे किंवा कमी वस्ती असूनहि औद्योगिकदृष्टचा महत्वाचे शहर.

होपे प्रांतातील फेंगफेंग मायनिंग डिस्ट्रिक्ट, होनान प्रांतातील चिओत्सो मायनिंग डिस्ट्रिक्ट असे १४ जिल्हे चीनमध्ये असून त्यांचा स्वतंत्र कारभार घटक करण्यात आला आहे.

## चीनमधील भाषा

चीनमधील चिनीशिवाय बाकीच्या जमाती ४० निरनिराळ्या भाषा बोलतात. स्वतःची भाषा वापरण्याचा हक्क त्यांना दिलेला आहे. पूर्वी या भाषांची गळचेपी होत होती. कांहीं ठिकाणी तर त्या वापरण्यास बंदी होती

क्रमिक पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके सरकारी पत्रके– सारी चिनीमधून निघत आता ही परिस्थिति बदलली आहे.

चीनमधील स्वायत्त प्रदेश (autonomous regions) तीन प्रकारचे आहेत.

( १ ) एकच राष्ट्र जमातीची (national minority) वस्ती असलेले प्रदेश.

(२) एक मोठी राष्ट्र जमात व कांहीं भागात फारच थोडी संख्या असलेल्या इतर जमाती मिळून स्थापन झालेले प्रदेश. त्यांत मोठ्या राष्ट्र-जमातीइतकीच स्वायत्तता छोट्या जमातींनाहि असते.

(३) भिन्न राष्ट्र जमातीच्या दोन किंवा अधिक विभागांनीं एकत्र येऊन स्थापन केलेले प्रदेश.

पहिल्या प्रकारच्या स्वायत्त प्रदेशाचे उदाहरण म्हणून उत्तर शेचवान ( Szechuan ) प्रांतातील पिंगवू ( Pingwu) स्वायत्त प्रदेशाचा उल्लेख करता येईल. तेथील तिबेटी लोकांनी हा स्वायत्त प्रदेश स्थापन केलेला आहे. दुसऱ्या प्रकारचे उदाहरण म्हणजे आंतर्मंगोलियाचा स्वायत्त प्रदेश. अनेक जमातींनी एकत्र येऊन स्वायत्त प्रदेश स्थापल्याच्या तिसऱ्या प्रकारचे उदाहरण म्हणजे क्वांगसी प्रांतातील लुंगशेंग. तेथे टुंग च्वांग, मिआवो याओ व लिंग या जमाती एकत्र रहातात.

या प्रदेशांचे सरकार आपल्या कारभारात त्या प्रदेशात सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेचाच उपयोग करते. पण ही भाषा अपरिचित असलेली एखादी जमात तेथे असेल तर तिच्यासाठीं तिच्या भाषेचाहि उपयोग केला जातो. ज्या स्वायत्त प्रदेशात एकापेक्षा अधिक जमाती आहेत तेथे त्यांचे प्रतिनिधी असलेले संमिश्र सरकार स्थापण्याची तरतूद चीनचे घटनेत केलेली आहे. लोकप्रतिनिधी परिषदा (म्हणजेच आपल्याकडची विधिमंडळे) किंवा त्यांच्या सल्लागार स्थायी समित्यांचें बैठकींत प्रत्येक राष्ट्रजमातीचे प्रतिनिधीला आपल्या भाषेतून बोलता येते. सर्व महत्वाचे अहवाल, कागदपत्रे व भाषणांचे त्या त्या जमातीच्या भाषांत भाषांतर करण्यांत येतें किंवा दुभाषे पुरविले जातात. एखाद्या राष्ट्र जमातीसंबंधीचे निर्णय तिच्या प्रतिनिधींशी पूर्ण चर्चा करून एकमत झाल्यानंतरच घेतले जातात.

चीनमध्ये ९० टक्के लोकसंख्या चिनी (हान) लोकांची आहे. देशाचे खरे सत्ताधारी आपणच, इतर जमाती कनिष्ट प्रतीच्या आहेत, त्यांना आपल्यासारखे हक्क मिळता कामा नयेत अशी भावना अनेक शतकांचे परंपरेने त्यांच्यात निर्माण झाली होती व त्याचीच प्रतिक्रिया म्हणून इतर जमातींमध्ये आपल्या जमातीपुरतेच पहाण्याची संकुचित वृत्ति निर्माण झाली होती राष्ट्रीय विकासास या दोन्ही प्रवृत्ति अनिष्ट आहेत हे ओळखून कम्युनिस्टांनी जनतेतून या दोन्ही प्रवृत्तींचे उच्चाटन करण्यासाठीं पद्धतशीर प्रचारमोहीम केली व सर्व जमाती सारख्याच, सर्वांना सारखा दर्जा व सारखे हक्क, कोणी उच्च नाहीं, कोणी नीच नाही अशी भावना निर्माण केली एवढेच नव्हे तर चीनचे घटनेत हे तत्व साकार झाले प्रत्येक जमातीला स्वायत्तता आणि जेथे एकापेक्षा अधिक जमाती असतील तेथे त्यांचे संमिश्र सरकार या तरतुदी या उद्देशानेच करण्यांत आल्या.

जून १९५२ पर्यंत १३० स्वायत्तप्रदेश स्थापन करण्यांत आले होते. त्यापैकी कांहीं तर कौंटी किंवा जिल्ह्याच्याच आकाराएवढे लहान आहेत. दोनशे संमिश्र सरकारे स्थापन करण्यांत आली.

भाषिक घटकांचा प्रश्न चीननें कशा पद्धतीनें सोडविला हे आपण आतापर्यंत पाहिले. रशियाचे तत्वांचाच अवलंब चीनने केला व तरीहि रशिया व चीनचे पद्धतीत थोडा फरक आहे. अनेक प्रजासत्ताक घटकराज्यांचे मिळून बनलेले सोव्हिएट युनियन हे एक संघराज्य आहे. तसा चीन नाहीं. रशियाप्रमाणें चीनमध्ये अनेक प्रजासत्ताक राज्ये ( रिपब्लिक्स ) नाहींत. या राज्यांना ज्याप्रमाणें फुटून निघण्याचा हक्क रशियाचे घटनेत दिलेला आहे तसा चीनचे घटनेत दिलेला नाहीं. युनियन रिपब्लिक्स, ऑटॉनॉमस रिपब्लिक्स, ऑटॉनॉमस रीजन्स आणि नॅशनल एरिआज असे चार प्रकाचे घटक सोव्हिएट संघराज्यांत आहेत. चीनमध्ये मात्र ऑटॉनॉमस रीजन्समध्येच देशाची विभागणी केलेली आहे. हे रीजन्स मात्र त्यातील जमातीच्या लोकसंख्येप्रमाणे कमीजास्त मोठे आहेत. त्यांतील कांहीं कौंटी किंवा जिल्ह्याएवढे लहान आहेत तर कांही मोठ्या प्रांताएवढे आहेत. ही झाली भाषिक किंवा सांस्कृतिक गटांचे दृष्टीने केलेली विभागणी. पण राज्यकारभाराच्या दृष्टीने ग्रेटर अॅडमिनिस्ट्रेटिव्ह एरियाज, प्रांत, कौंटीज व खेडी असे कार-

भाराचे घटक पाडलेले आहेत. सर्व स्वायत्त प्रदेशांना कारभाराचे बाबतीत स्वायत्तता देण्यांत आली आहे.

भाषिक घटकांचा प्रश्न सोडवितांना रशियाचें अनुकरण कितपत करतां येईल याचा विचार आपण केलेलाच आहे. आता चीनचे अनुकरण कितपत करता येईल हे पाहू या. चीनमध्ये ९० टक्के लोकसंख्या चिनींची ( हान लोकांची ) असून इतर भाषा बोलणारे राष्ट्रगट किंवा जमाती लोकसंख्येचे दृष्टीने फार लहान आहेत. यांतली सर्वांत मोठी जमात चुआंगची लोकसंख्या ६० लाख आहे. आपल्याकडे प्रांत पुनर्रचना कमिशनने सुचविलेला सर्वात लहान प्रांत असलेल्या विदर्भाची लोकसंख्या सुद्धा यापेक्षा जास्त म्हणजे ७६ लाख आहे. लोकसंख्या व क्षेत्रफळाचे दृष्टीने हिंदमधल्या प्रत्येक प्रमुख प्रादेशिक भाषेचा स्वतंत्र प्रांत निर्माण होऊ शकेल अशी आपल्याकडे परिस्थिति आहे. चीननें प्रांतांची विभागणी केवळ राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने केली व त्यांत निरनिराळ्या भाषिक घटकांचे स्वायत्त प्रदेश निर्माण केले. आपल्याकडे प्रमुख भाषिक घटकांचेच निरनिराळे प्रांत बनविणें शक्य आहे. त्यांत पुनः इतर भाषिक वस्तीचा भाग किंवा आदिवासी व वन्य जमातींचे वस्तीचा भाग असल्यास चीनप्रमाणें त्यांचे स्वायत्त प्रदेश निर्माण करून त्यांना स्वायत्तता देता येईल.

राज्य कारभाराच्या सोयीचे दृष्टीने चीनने देशाचे सहा मोठे कारभार विभाग ( Greater Administrative Areas ) पाडले. पंतप्रधान पंडित नेहरूंनीं सुचविलेली व सरकारने मान्य केलेली देशाचे पांच विभाग (झोन्स) पाडून विभाग मंडळे नेमण्याची सूचना त्याच धर्तीची आहे. या विभाग मंडळांचे स्वरूप काय असावे ? त्यांची भूमिका केवळ सल्लागाराची असावी कीं त्यांचे निर्णय प्रांतांवर बंधनकारक असावेत. याबद्दल आपल्याकडे मतभेद आहेत. विभाग मंडळांना सल्लागारापेक्षा अधिक अधिकार दिले तर त्यामुळे प्रांतिक स्वायत्ततेस बाध येईल असे कांहीं प्रांतांना वाटते तर उलट विभागमंडळे म्हणजे केवळ सल्लागार मंडळें रहाणार असतील तर ती परिणामकारक कार्य करू शकणार नाहींत असेहि मत व्यक्त करण्यांत येत आहे. आर्थिक योजनांचे अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी प्रांताप्रांतांतील सहकार्याने दूर कराव्या हा विभाग मंडळांचे स्थापनेमागील मुख्य उद्देश आहे. प्रांतांच्या

अधिकारांत हस्तक्षेप करण्याची भूमिका त्यामागें नाहीं पण त्याचबरोबर विभाग मंडळांना सल्लागारापेक्षां अधिक दर्जा नाहीं. त्यांच्या शिफारशी आपण ऐकून घ्याव्यात आणि सोडून द्याव्यात अशी वृत्ति प्रांतांत वाढू देणेंहि इष्ट नाही यासाठी कांही बाबतींत त्यांना निर्णयाचे अधिकार असणे आवश्यक आहे.

चीनमध्यें या बाबतींत काय परिस्थिति आहे? तेथे जे सहा मोठे कारभार विभाग पाडण्यात आलें आहेत. त्यांचे व प्रांतांचे संबंध, त्यांना असलेले अधिकार कोणत्या स्वरूपाचे आहेत? प्रांतांचे कारभारावर देखरेख ठेवून त्यांना मार्गदर्शन करण्याचे उद्देशाने चीनमध्ये हे मोठे कारभार विभाग पाडण्यात आले आहेत. प्रत्येक विभागाची एक कारभार समिति ( अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कमिटी ) असते. चीनच्या मध्यवर्ति सरकारनेच ती नेमलेली असून त्याच्या वतीनेच ती काम पहाते. तिने केलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणें प्रांतिक सरकारे कारभार पहातात. मध्यवर्ति सरकारनें प्रांतिक सरकारला उद्देशून एखादा हुकूम काढला तर तो प्रांतांबरोबरच अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कमिटयांकडे पाठविण्यांत येतो. त्याचे मार्गदर्शन व देखरेखींचे काम सोपे करण्याचा त्यामागें उद्देश असतो. आपल्याकडे जी विभाग मंडळे नेमली जाणार आहेत त्यांचे अधिकार अशाच स्वरूपाचे असले पाहिजेत. तरच आपले कार्य ती परिणामकारकपणे बजावू शकतील.

भाषिक घटकांचा प्रश्न रशिया व चीनने ज्या तत्त्वांचा अवलंब करून सोडविला त्याच तत्त्वांचा अवलंब हिंदमध्ये आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी केला असता तर हा प्रश्न समाधानकारकपणे सुटून त्याबाबत निर्माण झालेले संघर्ष टाळतां आले असते. रशिया-चीनचे तंतोतंत अंधानुकरण करावे असे कोणीच म्हणत नाहीं. ती तत्त्वें अंमलांत आणतांना हिंदमधील विशिष्ट परिस्थिति लक्षात घेऊन तपशीलाचे बाबतींत फरक करावे लागतील. ते कसे व कोठे करावे लागतील हेहि मी आतापर्यंतच्या विवेचनांत सूचित केलेले आहे.

प्रांतांची फेररचना कोणत्या तत्वांवर करणे योग्य याचा सविस्तर विचार आपण आतापर्यंत केला रशिया व चीनसारख्या बहुभाषिक व हिंदप्रमाणेच विस्ताराने मोठ्या असलेल्या देशांनी हा प्रश्न कसा सोडविला हेहि आपण पाहिले. प्रांतांची फेररचना भाषेच्या तत्वावर केल्यानेच राज्यकार-

भाराची सोय होईल. आपल्या भाषेचा प्रांत नाहीं म्हणून निरनिराळ्या भाषिकात असलेला असंतोष दूर झाल्याने देशाचे ऐक्य व संरक्षणासहि बळकटी येईल. निरनिराळ्या विकास योजनांच्या अंमलबजावणीत सर्व भाषिकांचे हार्दिक सहकार्य मिळेल, भाषावार प्रांत आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होतील की नाहीं अशी एक शंका व्यक्त केली जाते पण आपल्या देशांत या कसोटीला उतरणारे भाषावार प्रांत निर्माण करणे शक्य आहे. तेव्हां हीहि अडचण राहिलेली नाहीं दोन प्रांतांच्या सीमेवरील मिश्रभाषिक प्रदेशाची विभागणी खेडे हाच घटक मानून केली तर तक्रारीला जागा रहाणार नाहीं. एवढेहि करून एखाद्या प्रांतात दुसऱ्या भाषिकांचा कांहीं सलग भाग राहिला तर रशिया-चीनप्रमाणे त्याचा स्वायत्त घटक करावा तसेच आदिवासी व वन्य जमातींचे प्रदेशांचेहि स्वायत्त घटक करून त्यांना स्वायत्ततेचे अधिकार द्यावे. घटकांना फुटून निघण्याचा हक्क देण्याची मात्र आवश्यकता नाहीं. आपल्याकडे निरनिराळ्या घटकांत एकराष्ट्रीयत्वाची भावना स्वातंत्र्य लढ्यातूनच निर्माण झालेली आहे. हिंदी संघराज्यातून फुटून निघावे असे कोणत्याहि घटकाला वाटत नाहीं. भाषावार प्रांतरचनेची चळवळ म्हणजे फुटीरपणाची चळवळ नसताहि तसा प्रचार आधीच केला जात आहे. त्यांत फुटून निघण्याच्या हक्काची मागणी भाषावार प्रांतरचनेचे पुरस्कर्त्यांनी केली तर या विरोधी प्रचाराला आणखी जोर चढेल. रशियाचे विशिष्ट परिस्थितीत फुटून निघण्याचा हक्क तेथे मान्य करण्यांत आला पण कम्युनिस्ट चीननेहि याबाबतींत रशियाचे अनुकरण केलेले नाहीं हे लक्षात घेण्यासारखे आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेतां हिंदमध्ये घटकांना फुटून निघण्याचा हक्क देण्याची आवश्यकता नाहीं व तशी मागणी कोणी केलेलीहि नाहीं.

e222

## भाग दुसरा
# नियोजित फेररचना

### नवे प्रांत :

प्रांतांची फेररचना करतांना कोणती तत्त्वें डोळ्यापुढें ठेवली पाहिजेत याचा विचार आपण केला. आता प्रत्येक प्रांतासंबंधी प्रांतरचना कमिशनने केलेल्या शिफारशी व सरकारने त्यासंबंधी घेतलेला निर्णय, त्या प्रांतातील जनतेत यासंबंधीं उठलेल्या प्रतिक्रिया यांचा तपशीलवार विचार करूं या.

प्रत्येक प्रांतासंबंधी आपल्या तपशीलवार शिफारशी कमिशनने ज्या क्रमाने मांडल्या त्याच क्रमाने प्रत्येक प्रांताचा विचार करण्याचे मी योजले आहे.

## मद्रास

कमिशनने प्रथम मद्रासचा विचार केला आहे कमिशनने सुचविलेल्या मद्रास प्रांताची लोकसंख्या सुमारे तीन कोट व क्षेत्रफळ सुमारे ५०,१७० चौरस मैल राहील. सध्याच्या मद्रास प्रांतांत मलबारचे दोन जिल्हे, दक्षिण कॅनरा व म्हैसूरच्या सीमेवरचे कानडी भाषिक प्रदेश विशेषत: कोईमतूर जिल्ह्यांतील कोल्लेगल तालुका हे बिगर तामिळ विभाग आहेत. नियोजित मद्रास प्रांतातून हे भाग कमिशनने वगळले आहेत. सबंध कोल्लेगल तालुका अलग न करता त्याचा फक्त उत्तरेकडचा भाग अलग करावा अशी मद्रासची मागणी होती, पण तालुक्याची फाळणी न करता तो सबंध तालुकाच अलग करावा अशी शिफारस कमिशनने केली.

### केरळमधील तामिळ जिल्हे

त्रावणकोर कोचीनमधील म्हणजेच केरळमधील तामिळ भाषिक प्रदेश मद्रासला जोडावे ही मद्रासची एक प्रमुख मागणी होती, त्रिवेंद्रम जिल्ह्यातील थोवला, अगस्तीश्वरम, कालकुलम्‌विला, विलावनकोड व नेय्यातिंकर हे पांच तालुके, कोट्टायम जिल्ह्यातील देवीकुलम व पीरमेडे हे दोन तालुके, क्विलॉन जिल्ह्यातील शेनकोट्टा तालुका आणि त्रिचूर जिल्ह्यातील चित्तूर तालुका हे नऊ तालुके आपणास मिळावे अशी मद्रासची मागणी होती. या

नऊ तालुक्यांपैकी थोवला, कालकुलम, अगस्तीश्वरम, विलावनकोड आणि शेनकोट्टा हे पांच तालुकेच मद्रासला जोडण्याची शिफारस कमिशनने केली. यापैकीं पहिल्या चार तालुक्यात तामिळ लोकसंख्या ७९ टक्के व शेनकोट्टा-मध्ये ती ९३ टक्के आहे.

त्रावणकोर कोचीनमधील बाकीचे चार तामिळ भाषिक तालुके मद्रासला कां जोडण्यांत आले नाहींत ? देवीकुलम व पीरमेडे तालुक्यात तामिळ लोकसंख्या अनुक्रमे ७२ व ४४ टक्के आहे. पण यापैकी बरीच संख्या बाहेरून येऊन मळ्यात काम करणाऱ्या तामिळ मजुरांची आहे. ते काहीं स्थायिक लोक नाहींत. अशी फिरती लोकसंख्या पीरमेडेमध्ये ३० टक्के व देवीकुलम-मध्ये ४६ टक्के आहे. ती वजा जातां या दोन्ही तालुक्यांतील स्थिर तामिळ लोकसंख्या अनुक्रमे १४ व २६ टक्के आहे असे कमिशनचे म्हणणे. यावर तामिळ भाषिकांतर्फे असे सांगण्यांत येते की या दोन तालुक्यांत सुरवातीला तामिळ लोकसंख्या बरीच अस्थिर होती हे खरे पण आतां ते बहुसंख्य आहेत व १९५४ चे निवडणुकांत त्रावणकोर तामिळनाड कॉंग्रेसनेच या भागातल्या दोन्ही जागा जिंकल्या. पण देवीकुलम तालुक्यातील पल्लीवसल, पकुथी व पीरमेडे तालुक्यातील पेरुवन थानाडु हे भाग त्रावणकोर कोचीनमध्येच ठेवण्यास त्रावणकोर तामिळनाड कॉंग्रेसनेहि तयारी दर्शविली होती. तेव्हां या दोन तालुक्यावरील त्रावणकोर कोचीनचा हक्क अंशत: मान्य करण्यांत आला आहे असे कमिशनचे म्हणणे. प्रदेशांची फेरआंखणी करतांना केवळ भाषेचीच कसोटी लावावी हे कमिशनला योग्य वाटत नाहीं. हे दोन्ही तालुके म्हणजे त्रावणकोर कोचीनचा एक दशांश भाग आहे. तेथील वस्ती तुलनेनें विरळ असून या भागाची वाढ केल्यास इतर भागातील लोकवस्तीची दाटी कमी करता येईल. त्रावणकोर कोचीनमधील पेरियार व इतर नद्या याच भागांतील अन्नमलाई पर्वतात उगम पावतात. तेथील जंगले, मळे व वीज निर्मितील वाढ त्रावणकोर कोचीनमध्ये हा प्रदेश राहिल्यानेच होऊ शकेल असे कमिशनला वाटते.

नेय्यातिंकर तालुक्यांत ८६ टक्के लोक मल्याळी आहेत. चित्तूर तालुक्यांत तामिळ भाषिक ९५ टक्के आहेत असा दावा मांडण्यात आला होता पण शिरगणतीतील कागदांची फेरपहाणी केल्यावर असे आढळून आले

की मल्याळी लोक ५९·८ टक्के होते म्हणून हे दोन्ही तालुके मद्रासला जोडू नयेत अशी कमिशनची शिफारस आहे.

सरकारने आपला निर्णय जाहीर केला त्यात कमिशनने सुचविलेल्या मद्रास प्रांतात फारच थोडा बदल केला आहे. शेनकोट्टा तालुक्याचा अगदी पश्चिमेकडील भाग मद्रासला जोडण्यात येणाऱ्या भागातून वगळला जावा एवढाच हा बदल आहे.

## मद्रासमधील प्रतिक्रिया

देवीकुलम व पीरमेडे हे दोन तालुके मद्रासला जोडले नाहीत याचे निषेधार्थ तामिळ अरसु कझागम या संघटनेच्या सभासदांनी १८ जानेवारीस मद्रास स्टेशनवर व सेक्रेटरिएटपुढे निदर्शन केले. निदर्शकांचे नेतृत्व आमदार के. विनायकम यांच्याकडे होते. या निर्णयाचे निषेधार्थ तामिळ मंत्री व आमदारांनी राजिनामे द्यावे अशी त्यांची मागणी होती. त्यागराय कॉलेजच्या ६०० विद्यार्थ्यांनी हरताळ पाळला. मद्रासचे मुख्यमंत्री श्री. कामराज नाडर ग्रॅंड ट्रंक एक्स्प्रेसने दिल्लीस निघाले होते. तीन निदर्शकांनी साखळी ओढून गाडी थांबवली व निषेधाच्या घोषणा केल्या. कांचीपुरममधील शाळा कॉलेज विद्यार्थ्यांनीं हरताळ पाळला. मदुराई व विरुधनगर येथेहि हरताळ पाळण्यात आला. १९ जानेवारीलाहि मद्रासचे विद्यार्थ्यांनी हरताळ पाळला. तिरुचिरपल्ली येथेहि हरताळ पाळण्यात आला.

सरकारी निर्णयाबद्दलच्या मद्रासमधील लोकमताची कल्पना या निदर्शनांवरून येईल. खेडे हाच किमान घटक मानून सीमेवरील द्विभाषिक प्रदेशाची विभागणी केली असती तर हा असंतोष निर्माण झाला नसता.

# केरळ

कमिशनने सुचविलेल्या केरळ प्रांताची लोकसंख्या १,३६,००,००० व क्षेत्रफळ १४,९८० चौरस मैल आहे. सध्याच्या त्रावणकोर कोचीनमधून थोवला, अगस्तीश्वरम, कालकुलम, विलवनकोड व शेनकोट्टा हे पाच तामीळ तालुके वगळण्यात आले असून मलबार जिल्हा व दक्षिण कानडा जिल्ह्याचा कासारगड तालुका हे भाग त्यास नव्याने जोडण्यात आले आहेत. नियोजित प्रांतात मल्याळी लोकसंख्या ९४ टक्के असून ती भौगोलिकदृष्ट्या सलग आहे.

मलबार जिल्ह्यात मल्याळी भाषिक ९६ टक्के असल्याने तो जिल्हा केरळला जोडणे आवश्यकचं होते. सबंध दक्षिण कानरा जिल्हा केरळला जोडावा अशी केरळची मागणी होती त्यापैकी दार कमिशनने फक्त कासार-गड तालुक्याचाच समावेश केरळमध्ये केला होता आणि प्रांतरचना कमि-शननेहि तेच केले आहे. शिरगणतीप्रमाणे या तालुक्यांत मल्याळी भाषिक ७२ टक्के आहेत. चंद्रगिरी नदीपर्यंतचाच या तालुक्याचाच भाग केरळला जोडावा असे या भागातील कानडी भाषिकांचे मत आहे पण कमिशनने सबंध तालुकाच केरळला जोडण्याची शिफारस केली आहे.

कूर्ग केरळला जोडावा ही मागणी कमिशनने अमान्य केली असून तो कर्नाटकात समाविष्ट केला आहे. केरळची त्यासंबंधीची मागणी असमर्थनीय आहे. कूर्गमधील ३५ टक्के लोक कानडी बोलतात. २९ टक्के लोक कूर्गी किंवा कोडगू बोलतात. ही भाषा कानडीचीच पोटभाषा समजली जाते. सांस्कृतिकदृष्ट्या कर्नाटकशीच त्याचे निकटचें संबंध आहेत. भौगोलिक-दृष्ट्याहि तो कर्नाटकशीच सलग आहे.

अमीनदेव व लखदिव बेटे केरळला जोडावी अशी केरळची मागणी होती यापैकी लखदिव बेटे मलबार जिल्ह्याचा भाग असून तो केरळला जोडल्याने ती केरळची झालीच आहेत. अमीनदिव बेटे दक्षिण कानराला जोडण्याची शिफारस कमिशनने केली.

कमिशनच्या केरळसंबंधीच्या शिफारशीवर निर्णय घेतांना सरकारनें त्यात एवढाच बदल केला आहे की शेनकोट्टा तालुक्याचा पश्चिम भाग मद्रासला न जोडता केरळमध्येंच कायम ठेवला आहे. दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे 'अमीनदिव, लखदिव व मिनिकॉय बेटे केरळमध्ये समाविष्ट न करता मध्यवर्ति सरकारचे नियंत्रणाखाली सोपविली आहेत.

## कासारगडचा प्रश्न

कासारगड तालुका केरळमध्यें समाविष्ट केल्याचे निषेधार्थ २१ जाने-वारी १९५६ ला तेथे एक मिरवणूक काढण्यांत यऊन तो कर्नाटकला जोड-ण्याच्या घोषणा करण्यात आल्या. पंधरा जणांना अटक झाली. डॉ. के. शेट्टी यांनी ऑनररी मेडिकल ऑफिसरचे जागेचा राजिनामा दिला. श्री. के. पी. गंगाधर राय यांनी कर्नाटक प्रदेश कॉंग्रेसचे सभासदत्वाचा व आणखी पाच

जणांनी वॉर्ड काँग्रेस कमिटी सभासदत्वाचे राजिनामे दिले. कासारगड तालुक्यासंबंधीच्या सरकारी निर्णयाबद्दल निषेध व्यक्त करणारे पत्रक मद्रासचे आरोग्यमंत्री श्री. ए. बी. शेट्टी, खासदार श्री. बी. शिवराव, खासदार श्री. के. एस. हेगडे, व आमदार श्री. एस. नरसपय्या यांनी काढले. त्यात ते म्हणतात, " सबंध कासारगड तालुका केरळमध्ये समाविष्ट करण्याच्या सरकारी निर्णयाने दक्षिण कानरामधील सर्व गटाच्या लोकांची तीव्र निराशा झाली. इतर ठिकाणचे सरहद्दीचे वाद सोडविताना सरकारने तालुक्यापेक्षाहि लहान घटक, पोलीस ठाणीसुद्धा विचारात घेतली आहेत. चंद्रगिरी-पयस्विनी नदी ही केरळ व दक्षिण कानरामधील सीमारेषा समजण्यात यावी अशी मागणी दक्षिण कानराचे प्रतिनिधींनी केली होती. केरळला आता सबंध कासारगड तालुका म्हणजे ७६० चौरस मैलांचा प्रदेश दिला जात आहे. तालुक्याचा दोन तृतियांश भाग चंद्रगिरी–पयस्विनी नदीच्या दक्षिणेस आहे. त्याबद्दल वाद नाहीं. तो केरळला जोडण्यास दक्षिण कानराने हरकत घेतलेली नाहीं. वाद आहे तो नदीच्या उत्तरेकडील $\frac{1}{3}$ भागाबद्दल. २६० चौरस मैलाचा हा भाग केरळला जोडल्याने त्या प्रांताचा असा काय फायदा होणार आहे व तेथील लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यास कितपत मदत होणार आहे? येथील लोकसंख्येचा केरळमध्ये समाविष्ट होण्यास विरोध आहे. केरळच्या जनतेशीहि त्यांचे काहीं साम्य नाहीं. गुणांचे दृष्टीने जो निर्णय समर्थनीय ठरत नाहीं व पंचायत बोर्डापासून मध्यवर्ति पार्लमेंटपर्यंत दक्षिण कानरामधील प्रत्येक लोकनियुक्त प्रतिनिधीचा ज्याला विरोध आहे असा निर्णय लादणें मोठी चूक असून त्याचे जे परिणाम होतील त्याबद्दल आपणा सर्वानाच खेद वाटेल."

सरहद्दीवरील वादग्रस्त प्रदेशाची विभागणी करतांना खेडे हाच सर्वात लहान घटक मानून ती केली असती तर दक्षिण कानरामधील जनतेच्या या असंतोषाला जागा राहिली नसती.

सध्याच्या त्रावणकोर कोचीनमधील पाच तामिळ तालुके नियोजित केरळमधून वगळण्यात आले. त्याचे निषेधार्थ त्रावणकोर कोचीन असेंब्लीतील सहा काँग्रेस सभासदांनीं राजिनामे दिले. त्यांचा हा विरोध मात्र समर्थनीय नाहीं. तामिळ तालुके मद्रासला मिळणेच न्याय्य व स्वाभाविक होते तेव्हां

त्या निर्णयांत बदल करण्याची आवश्यकता नाहीं.

केरळच्या कांहीं भागांत दाट लोकवस्ती आहे पण लोकवस्तीचा प्रश्न सोडविण्यासाठी भाषिक व सांस्कृतिकदृष्टचा आपल्याशी साम्य नसलेल्या प्रदेशावर केरळनें हक्क सांगणे मात्र न्याय्य नाहीं. लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यास मदत व्हावी या उद्देशानेच विरळ लोकवस्तीचे देवीकुलम व पीरमेडे हे तालुके केरळमध्येच राहू देण्याची शिफारस कमिशननें केली पण यादृष्टीनें या प्रश्नाचा विचार करणेंच योग्य नाहीं. आमच्या लोकसंख्येला आमचा प्रदेश पुरत नाहीं म्हणून आम्हाला आणखी प्रदेश हवा या नाझी तत्वाचाच अंशतः पुरस्कार यांत दिसतो. केरळला लोकसख्येचा प्रश्न सोडवायचा असेल तर इतर भाषिक प्रदेशांवर हक्क सांगणे हा त्यावर उपाय नसून लोकसंख्येचे नियमन हाच खरा उपाय आहे.

# कर्नाटक

केरळनंतर कमिशनने विचारात घेतलेला प्रांत म्हणजे कर्नाटक. नियोजित कर्नाटक प्रांताची लोकसंख्या १,९०,०० ००० व क्षेत्रफळ ७२,७३० चौ. मैल आहे.

या प्रांतात पुढील प्रदेश समाविष्ट करावे असे कमिशनने सुचविले आहे. (१) सध्याचे म्हैसूर राज्य. यातून बेल्लारी जिल्ह्याचा सिरगुप्पा तालुका, बेल्लारी तालुका, हॉस्पेट तालुका व मल्लपुरम उपतालुक्यातील तुंगभद्रा धरणाचा भाग वगळण्यांत यावा. (२) मुंबई प्रांतातील दक्षिणेकडचे चार कानडी भाषिक जिल्हे-बेळगांव ( चंदगड तालुका वगळून ), विजापूर, धारवाड व उत्तर कानरा ( म्हणजेच कारवार ) (३) रायचूर व गुलबर्गा जिल्हे (४) कासारगड तालुका वगळून दक्षिण कानरा जिल्हा. (५) मद्रासचा कोईमतूर जिल्ह्यातील कोल्लेगल तालुका. (६) कूर्ग. कमिशनच्या शिफारशींवर १६ जानेवारीस सरकारने आपला निर्णय जाहीर केला. त्यात कर्नाटकचे नांव म्हैसूर ठेवण्यांत आले. रायचूर जिल्ह्यांतील अलमपूर व गडवल तहशील आणि गुलबर्गा जिल्हयांतील तांडूर व कोंडगल तहशील त्यातून वगळण्यांत आले. आणि बिदर जिल्हयांतील हुमनाबाद, बिदर, भलकी व संतपूर तहशील कर्नाटकात समाविष्ट करण्यांत आले. बेल्लारी

जिल्ह्याचा कांहीं भाग आंध्रमध्ये समाविष्ट करावा या कमिशनच्या शिफारशीसंबंधी दोन्ही सरकारांशी चर्चा करून नंतर निर्णय घेण्यांत येईल असे जाहीर करण्यांत आले. बेल्लारीचा कांहीं भाग कमिशनने सुचविल्याप्रमाणें आंध्रमध्ये समाविष्ट न करता म्हैसूरमध्येच ठेवण्याचे सरकारने ठरविले आहे.

कोलार जिल्ह्यांत तेलगू भाषिक ५४ टक्के व कन्नड भाषिक फक्त २१ टक्के आहेत. भाषिकदृष्टचाच विचार केला तर हा प्रदेश आंध्रमध्ये समाविष्ट करावयास पाहिजे पण तसे आपण का केले नाही याची कारणे कमिशनने दिली आहेत. कोलार जिल्ह्याचा म्हैसूरशी दीर्घकाल निकटचा संबंध आहे. सोन्याच्या खाणीचा तेथील प्रमुख धंदा म्हैसूर सरकारनेच वाढविलेला आहे. म्हैसूरकडून त्यास स्वस्त दरात वीज व इतर सवलती मिळतात. खाणीत काम करण्यासाठीं आसपासच्या भागातील कामगार आलेले असून त्यात तामिळ सर्वात जास्त आहेत. कर्नूल किंवा हैद्राबादपेक्षा बंगलोरला हा जिल्हा जवळ आहे, आंध्रमध्यें तो समाविष्ट केला तर तो त्या प्रांतांच्या अगदीं नैऋत्य टोकाला म्हणजे मुख्य केंद्रापासून बराच दूर येईल. या जिल्ह्यातील तेलगू लोकसंख्याहि फार मोठी नाही. या सर्व दृष्टींनी विचार करून कमिशनने हा जिल्हा म्हैसूरमध्येच राहू देण्याचे ठरविले.

कोलार जिल्हा आंध्रला जोडावा असा तेलगू लोकांचाहि फारसा आग्रह असल्याचे दिसत नाही. कमिशनपुढे दिलेल्या साक्षीत किंवा पाठविलेल्या निवेदनात हा जिल्हा आंध्रला जोडावा असे तेलगू नेत्यांनीं आग्रहाने मांडले असल्याचा उल्लेख कमिशननेहि आपल्या अहवालात केलेला नाही. तेव्हां आंध्रचे लोकांचाच विरोध नसेल तर हा जिल्हा कर्नाटकात राहू देण्यास हरकत नाहीं.

## बेल्लारीचा प्रश्न

कर्नाटक आंध्रमध्यें सर्वात जास्त वाद आहे तो बेल्लारी जिल्ह्याचे विभागणीसंबंधी. बेल्लारी जिल्ह्याचे कांहीं तालुके आणि तुंगभद्रा धरण जेथें येते तो भाग आंध्रमध्ये समाविष्ट करावा अशी कमिशनची शिफारस आहे. या जिल्ह्याच्या वादग्रस्त तालुक्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी न्यायमूर्ति मिश्रा यांची नेमणूक सरकारने केली होती. हे तालुके म्हैसूरमध्ये समाविष्ट करावे हा त्यांचा निर्णय १९५३ साली सरकारने मान्यहि केला. हा निर्णय बदलून

हे तालुके आता आंध्रला जोडावे असे कमिशनने सुचविले आहे.

न्यायमूर्ति मिश्रा यांनी मुख्यतः भाषिक दृष्टीने या प्रश्नाचा विचार केला. आमचा दृष्टिकोन थोडा निराळा आहे असे कमिशनचे म्हणणे. कमिशन म्हणते,''आम्ही काढलेला निष्कर्ष म्हणजे राज्यकारभाराची सोय,आर्थिक संबंध व आंध्रच्या रायलसीमा जिल्ह्यांचे दृष्टीने तुंगभद्रा धरणाचे महत्व या तीन मुख्य विचारांचा एकत्रित परिणाम आहे.'' म्हैसूरपेक्षा आंध्रशी विशेषतः रायलसीमा भागांशी बेल्लारीचे निकटचे संबंध आहेत. आंध्रसह मद्रासचा एक प्रांत असतांना गेली दीडशें वर्षे रायलसीमाची अनधिकृत राजधानी असेच स्वरूप बेल्लारी शहरास आले होते. हे जुने संबंध एकदम तोडले गेल्याने शहरातील लोकांना बरेच हाल सोसावे लागत आहेत. आंध्र भागातल्या बऱ्याच महत्वाच्या कचेऱ्या बेल्लारीस होत्या. बेल्लारी जिल्हा व शहराचा बराच व्यापार अजूनहि आंध्र भागाशी चालतो. रायलसीमा जिल्ह्यांचे राजधान्यांशी बेल्लारी शहर रेल्वे व रस्त्यांनी जोडलेले आहे आणि ते बंगलोरपेक्षा कर्नूलला अधिक जवळ आहे. बेल्लारीहून बंगलोरला जावयाचे तर सर्वांत जवळचा मार्ग आंध्रचे प्रदेशातूनच जातो.

आंध्र प्रांत स्थापन झाल्यानंतर तुंगभद्रा प्रॉजेक्ट बोर्डाचे कार्य समाधानकारकपणे होईना. एकदा तर एवढ्या गंभीर तक्रारी करण्यांत आल्या की बोर्डाची पुनर्घटना करणे आवश्यक वाटले. बोर्डाचे पुनर्घटनेनंतर नियंत्रणाचे काम सोपे झाले असले तरी धरणाची जागा असलेला भाग आंध्रमध्यें समाविष्ट केला तर झगड्याची कारणे बरीच कमी होतील असे कमिशनला वाटते. रायलसीमा भागाचेच फायद्यासाठींच मुख्यतः धरणाची योजना आखण्यांत आली होती.

बेल्लारी जिल्ह्याचे तीन तालुके आंध्रला जोडावे असे कमिशनने सुचविले. त्याबाबतींत कमिशनचा युक्तिवाद असा की हे तालुके एक भाषिक आहेत असे मानता येणार नाहींत. हॉस्पेट व बेल्लारीमधील शहरी भागात तर मिश्र वस्ती झपाट्यानें वाढू लागली आहे. कोलार जिल्ह्याचे भवितव्यासंबंधी निर्णय घेताना भाषेला विशेष महत्व कमिशनने दिले नाहीं. ५४ टक्के तेलगू भाषिक असताहि तो जिल्हा कर्नाटकातच ठेवला. बेल्लारीसंबंधी निर्णय घेतानाहि तसाच विचार केला पाहिजे असे कमिशनचे म्हणणे.

बेल्लारीचे कांहीं तालुके कर्नाटकातून काढून आंध्रला जोडावे असे आम्ही सुचविले असले तरी कोलार जिल्हा कर्नाटकातच ठेवला आहे असा युक्तिवाद करून कन्नड जनतेचे समाधान करण्याचा प्रयत्न कमिशनने केला व दळणवळणाची साधने, व्यापार वगैरे दृष्टीने बेल्लारी आंध्रलाच अधिक जवळ आहे असे दाखविले. पण दळणवळणाचे मार्ग आणि व्यापारापेक्षाहि भाषा व संस्कृतीचे बंधन अधिक निकटचे आहेत. व त्यादृष्टीने बेल्लारीचे कानडी भाषिक भाग कर्नाटकातच समाविष्ट झाले पाहिजेत. न्यायमूर्ति मिश्रा यांनी खेडे हा घटक मानून विभागणी केली. तो निर्णय आता बदलण्याचे कारण नाहीं व सरकारलाहि तशी आवश्यकता वाटली नाहीं.

कूर्ग केरळऐवजी कर्नाटकांतच समाविष्ट करणें कसे योग्य होईल याचा विचार केरळवरील विवेचनाचे वेळी केलेलाच आहे.

## बेळगांववरील अन्याय

बेल्लारीइतकाच वादग्रस्त प्रश्न बेळगाव जिल्ह्याचा. या जिल्ह्या-पैकी फक्त चंदगड तालुका कर्नाटकापासून अलग काढून मुंबई प्रांतास जोडावा अशी शिफारस कमिशनने केली व सरकारनेहि ती मान्य केली. चंदगड तालुक्यात मराठी भाषिक ९२·४ टक्के आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात मराठी लोकसंख्या असल्यावर हा तालुका कर्नाटकात सामील करणे अशक्यच होते. बाकीच्या दहा तालुक्यांपैकीं खानापूर, बेळगांव व चिकोडी तालुक्याचा मराठी भाषिक भाग कर्नाटकात समाविष्ट करू नये अशी महारा-ष्ट्राची मागणी होती. ती कमिशनने व सरकारनेहि मान्य केलेली नाही. खानापूर तालुक्यांत मराठी भाषिक ५३·९ टक्के व बेळगांव तालुक्यांत ५१·४ टक्के आहेत. हे बहुमत फारसे मोठे नाहीं असे कमिशनचे म्हणणे. बाकीच्या सात तालुक्यांपैकी सहा तालुक्यांत कानडी भाषिक बहुसंख्य आहेत. सातवा तालुका चिकोडीमध्येहि सर्वांत मोठा गट कानडी भाषिकांचाच आहे. सर्व तालुक्यांचे कानडी व मराठी दोन्ही भागांशी आर्थिकसंबंध आहेत. बेळगांव शहर व इतर वादग्रस्त भागाचे मराठी भाषिक जिल्ह्यांशी कांही विशेष आर्थिक संबंध आहेत असे म्हणता येणार नाहीं. म्हणून खानापूर बेळगाव तालुका आणि चिकोडी तालुक्याचा कांहीं भाग बेळगांव जिल्ह्यापासून अलग करण्याचे कारण नाहीं असे कमिशनचे म्हणणें.

बेळगांव शहरात मराठी भाषिक बहुसंख्य आहेत असा दावा मांडण्यांत आला आहे. त्यावर कमिशनचे म्हणणे असे की गेल्या खानेसुमारीचे वेळीं या शहरातील लोकांच्या मातृभाषेसंबंधी वेगळी नोंद ठेवण्यांत आली नाहीं. पण पूर्वी इतर भागांतून लोक येथें येऊन स्थायिक झालेले आहेत आणि बेळगाव शहरात मराठी भाषिक बहुसंख्य आहेत हे मान्य केले तरीहि तालुक्यांत त्यांचे बहुमत अल्प आहे आणि आर्थिक संबंधहि विशिष्ट भाषिक विभागाशीच निगडित झालेले नसल्यानें तालुका व शहर दोहोंचे भवितव्य राज्यकारभाराची सोय पाहूनच ठरविले पाहिजे अकरा तालुक्यापैकी चंदगड मुंबई प्रांतात समाविष्ट होणार. राहिलेल्या दहा तालुक्यापैकीं नऊ कर्नाटकात जावयाचे तर दहावा वादग्रस्त बेळगांव तालुकाहि बेळगांव शहरासह कर्नाटकांत समाविष्ट करणे कारभाराचे दृष्टीने सोयीचे होईल. बेल्लारी शहारांत तेलगू भाषिक फारसे बहुसंख्य नसले तरी ते शहर व बेल्लारी तालुका आंध्रमध्यें समाविष्ट करावा असे आम्हीं सुचविले. त्याच तत्वानुसार बेळगांव शहर व तालुक्यासंबंधी शिफारस आम्ही केली आहे, असे कमिशनने अहवालात म्हटले आहे.

कमिशनचा हा युक्तिवाद पटणारा नाहीं. चंदगड तालुक्याचे जोडीला बेळगाव जिल्ह्याचे बाकीचे मराठी भाषिक भागहि कर्नाटकापासून अलग करणेच आवश्यक होतें. बेल्लारीचे बाबतींत जी तत्त्वे आपण अनुसरली तीच बेळगावचे बाबतींत अनुसरली असे कमिशन म्हणते तेहि बरोबर नाहीं. बेल्लारीचे कांहीं तालुके आंध्रमध्ये समाविष्ट करतांना या तालुक्यांचा आंध्रचे भागाशीच जास्त निकटचा संबंध आहे. त्यांचा व्यापारहि आंध्र भागाशीच जास्त आहे असे कमिशनने दाखविले आहे. बेळगावच्या बाबतीत तशी परिस्थिति आहे काय ? बेळगाव जिल्ह्याचे जे वादग्रस्त तालुके कर्नाटकाला जोडावे असे कमिशन म्हणते ते तालुके कर्नाटकाशी कांहीं विशेष आर्थिक व्यापारी किंवा इतर संबंधांनी निगडित झालेले आहेत काय ? या तालुक्यांचे कानडी किंवा मराठी भाषिक विभागाशीं विशेष आर्थिक संबंध नाहीत असे म्हणतांना कानडी भागाशी ते नाहीत याची कबुलीच कमिशनने दिली आहे. या तालुक्यांचे मराठी भागाशी विशेष संबंध नाहीत हे कमिशनचे म्हणणे मात्र बरोबर नाही. उलट बेल्लारीच्या तालुक्यांचे आंध्रशी

जेवढे संबंध त्यापेक्षाहि बेळगावच्या मराठी भाषिक तालुक्यांचे मराठी जिल्ह्यांशी अधिक निकटचे संबंध आहेत. बेळगांव जिल्ह्याचा हा मराठी भाषिक पट्टा सलग आणि महाराष्ट्रापासून अविभाज्य आहे. त्याच्या उत्तर, दक्षिण आणि पश्चिम तिन्ही बाजूंना महाराष्ट्राचा प्रदेश आहे. कोकण व महाराष्ट्राला जोडणारा तो एकच दुवा आहे. सह्याद्रीचे रांगांनी कोकण व देश अलग होतात ते बेळगांवजवळ एकत्र येतात. बेळगांवद्वारेच कोकण बाकीच्या महाराष्ट्राशी जोडले गेलेले आहे. रत्नागिरीच्या दक्षिण भागात जावयाचे तर बेळगांव स्टेशनवरूनच जावे लागते. शहापूर, बेळगाव, नंदगड, हुड्डी, संकेश्वर, निपाणी ही बेळगांव जिल्यातील मराठी भाषिक विभागातील व्यापारी शहरे म्हणजे कोकण व घाटावरच्या प्रदेशाशी व्यापाराची मोठी केंद्रे आहेत. प्राचीन काळापासून त्यांच्यात व्यापार चालू आहे. त्यांच्यातील दळणवळणाचे मार्ग मराठी भागातूनच जातात. वाटेत कोठेहि कानडी प्रदेश लागत नाही. बेळगाव जिल्याच्या २००० चौरस मैलाच्या व ५७८ खेड्यांच्या सलग टापूत बहुसंख्य मराठी वस्ती आहे. इतर लोकहि रोजच्या व्यवहारात मराठीचा वापर करतात. या भागांत कानडी शाळा फारच थोड्या आहेत. बँकांचे हिशेब मराठीत ठेवले जातात. असेंब्ली मतदारसंघांच्या याद्या मराठीत प्रसिद्ध होतात. या भागातील मूळचे रहिवासी मराठीच आहेत. सहाव्या शतकांतील कदंब राजे मराठाच होते. अशोक किंवा दक्षिणेतील राष्ट्रकूटांइतके हे घराणें प्राचीन आहे. त्यांचे ताम्रलेख कानडीत नसून संस्कृतात आहेत. फार प्राचीन कालापासून मराठे या भागांत रहात आलेले आहेत हे यावरून सिद्ध होते.

केवळ आर्थिक व व्यापारीच नव्हेत तर बेळगांव जिल्ह्यांतील मराठी विभागाचे महाराष्ट्राशी सांस्कृतिक संबंध आहेत. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक क्षेत्रांत महाराष्ट्राचे परंपरेतूनच येथील लोकांना स्फूर्ति मिळाली आहे. कानडी विभागापेक्षां हा मराठी विभाग अधिक पुढारलेला आहे. याचे कारण महाराष्ट्रांतील सामाजिक सुधारणांचें अनुकरण येथेहि झाले. सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणब्राह्मणेतर चळवळी, डॉ. आंबेडकरांच्या शेड्यूल्ड् कास्टस् फेडरेशनची चळवळ, सर्वांची वाढ महाराष्ट्राप्रमाणें या भागात झाली पण जिल्ह्याच्या कानडी भागांत त्या

मूळ धरू शकल्या नाहींत ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. येथील राजकीय पक्षांचे कार्यकर्ते मार्गदर्शनासाठीं महाराष्ट्रातील नेत्यांकडेच पहातात याप्रमाणें सर्वच दृष्टींनी बेळगाव जिल्ह्याचा मराठी भाग महाराष्ट्राशी एकजीव झाला असता त्यापैकी फक्त चंदगड तालुका मुंबई प्रांतात ठेवणें हा मोठा अन्याय आहे.

बेळगांव शहर कानडी विभागानें वेढलेले असल्याने ते कर्नाटकात सामील करणेच योग्य होय असा एक युक्तिवाद केला जातो पण तो चुकीच्या माहितीवर आधारलेला आहे. बेळगाव तीन बाजूंनी तर महाराष्ट्राच्या सलग प्रदेशास जोडलेलेच आहे पण चौथ्या म्हणजे पूर्वेच्या बाजूचा दहा मैलांपर्यंतचा सलग टापूहि मराठी भाषिकांचा आहे. शहरात मराठी भाषिक ५७ टक्के व कानडी फक्त २१ टक्के आहेत. प्राथमिक शाळा मराठी २९ तर कानडी अवघ्या ११ आहेत. मराठी माध्यमाच्या दुय्यम शाळा ७ व कानडी माध्यमाची दुय्यम शाळा फक्त एक आहे. कॉलेज विद्यार्थ्यांतहि १४०० मराठी व ८०० कानडी आहेत. व्यापार, संस्कृति, इतिहास, भाषा सर्वच दृष्टींनी बेळगाव शहर महाराष्ट्राचा भाग असता ते कर्नाटकाला जोडण्यात आलें; प्रांतरचना समितीचे अहवालाविरुद्ध बेळगावात मोठी निदर्शने झालीं. ती या उघड अन्यायाविरुद्ध झालेली स्वाभाविक व उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती.

मद्रासचा कोइमतूर जिल्ह्यातील कोल्लेगल तालुका कर्नाटकांत समाविष्ट करावा अशी कमिशनची शिफारस आहे पण या तालुक्याचा फक्त उत्तरेकडचा भाग कर्नाटकास जोडावा अशी मागणी मद्रासने केलेली होती. तालुक्याची विभागणी करावयाचीच नाहीं असे कांहीं कमिशनचेहि तत्व नाहीं. कांहीं ठिकाणीं त्यांनी तालुक्यांचीहि विभागणी करण्याची शिफारस केलेली आहे. खेडे हाच घटक मानून ही विभागणी केली असती तर मद्रासच्या तक्रारीस जागा राहिली नसती.

ब्रिटिश राजवटींत चार प्रांतात विभागला गेलेला कानडी भाषिक प्रदेश कर्नाटक प्रांताचे स्थापनेनें प्रथमच एकत्र येत आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचा १९२७ मधील ठराव. सर्वपक्षीय परिषदेचा १९२८ मधील ठराव तसेच ( Indian staturory ) कमिशनचा १९३० चा अहवाल यांत कानडी भाषिक प्रदेशाच्या एकीकरणाची मागणी न्याय्य आहे हे मान्य केले

होते. सर्व कानडी लोक एका सरकाराखाली आले तर त्यांचीं प्रगति होऊन ते आपला कारभार अधिक चांगल्याप्रकारे करू शकतील असे मत दार कमिशननेहि व्यक्त केले होते.

**दोन कर्नाटकांची मागणी**

सध्याचे म्हैसूर राज्य आहे तसेच ठेवून म्हैसूर बाहेरच्या कानडी जिल्ह्याचा आणखी एक निराळा प्रांत करण्यात यावा अशीहि मागणी कांहीं गटांकडून करण्यांत येते. म्हैसूर बाहेरचे कानडी विभाग मागासलेले आहेत त्यांचा निराळा प्रांत केला तर तो तुटीचा होईल. म्हैसूर सरकारच्या पहाणी समितीने हाच निष्कर्ष काढला. पुढारलेले म्हैसूर राज्य आणि हे मागासलेले कानडी जिल्हे एकत्र आणून एकच प्रांत करण्यास म्हैसूरमधल्या कांहीं गटांचा विरोध असला तरी म्हैसूरमधल्याच बहुसंख्य लोकांना असे वाटते कीं एकीकरणाने तात्पुरती गैरसोय झाली तरी अखेर फायदाच होईल. म्हैसूर बाहेरच्या कानडी लोकांचा तर एकाच प्रांतास पाठिंबा आहे.

कर्नाटकचे एकाऐवजी दोन प्रांत करण्याच्या मागणीमागे जातीयवाद हे आणखी एक महत्वाचे कारण आहे. कानडी भाषिकात लिंगायत व वक्कलिग या दोन मोठ्या जमाती आहेत. म्हैसूरबाहेरच्या कानडी भागात ३५ ते ४० टक्के लोकसंख्या लिंगायतांची आहे तर म्हैसूर राज्यात वक्कलिग २९ टक्के आहेत संयुक्त कर्नाटकामध्ये लिंगायत २० टक्के. वक्कलिग १३ ते १४ टक्के व हरिजन १७ ते १८ टक्के असे या तिन्ही जमातींचे प्रमाण राहील. यापैकी कोणत्याहि दोन जमाती एकत्र आल्या की तिसरी अल्पसंख्य होईल. नव्या प्रांतात पूर्वीच्या मानाने ज्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण कमी होणार त्यांचा कर्नाटक एकीकरणास विरोध असणें जातीयदृष्टीने स्वाभाविक आहे पण जातीयवृत्ति प्रभावी ठरण्याची फारशी शक्यता नाहीं. संकुचित जातीय वृत्तींना अवास्तव महत्व देऊन संयुक्त कर्नाटकास विरोध करणें योग्य नाहीं.

म्हैसूर राज्याबाहेरचे कानडी विभाग मागासलेले आहेत हे म्हणणेहि खरे नाहीं, मुंबई प्रांतातल्या कानडी जिल्ह्यांत सरकारने विद्यापीठांपर्यंत शिक्षणाची सोय केलेली आहे वाहतुकीची सोयहि चांगली आहे.

या सर्व गोष्टी विचारात घेता कर्नाटकाचे दोन प्रांत करण्याऐवजी

एक प्रांत करण्याचा कमिशनचा आणि सरकारचा निर्णयच योग्य आहे.

# हैद्राबाद

हैद्राबाद राज्याचा विचार करताना सध्याच्या हैद्राबाद राज्याची फाळणी करून मराठवाडा मुंबई प्रांतास व कानडी जिल्हे कर्नाटकास जोडण्याची शिफारस कमिशनने केली व सरकारने ती मान्य केली. याच न्यायाने तेलंगणचा तेलगू भाषिक प्रदेश आंध्रला जोडणें योग्य ठरले असतें पण आताच तसे न करता पांच वर्षे तेलंगणाचा स्वतंत्र प्रांत करावा व पांच वर्षानंतर तेथील विधिमंडळाच्या निर्णयानुसार त्याचे भवितव्य ठरवावे अशी शिफारस कमिशनने केली.

हैद्राबाद राज्याचे भवितव्याचा विचार करताना असा प्रश्न प्रथम उद्भवतो की हैद्राबादची फाळणी करायची किंवा ते हल्लीप्रमाणेंच कायम ठेवायचे ? सध्याच्या हैद्राबाद राज्यात तेलगू भाषिक ४७·८ टक्के, मराठी २४.३ टक्के, उर्दू ११·६ टक्के, कन्नड भाषिक १०·५ टक्के आणि इतर भाषा बोलणारे ५·८ टक्के आहेत. त्याची भाषिक फाळणी करून भाषिक विभाग लगतच्या प्रांतांना जोडण्याची मागणी अनेकदा करण्यांत आलेली असून तिला तेथील लोकमताचा पाठिंबा आहे. उलट फाळणीच्या विरोधकांतर्फे असा युक्तिवाद करण्यांत येतो की बहामनी राजांचे कालापासून गेली सहाशें वर्षें एक घटक म्हणून अस्तित्वात असलेला हा विभाग तसाच राहू द्यावा. सांस्कृतिक संगमाचा तो एक नमुना असून इतर भागांना आदर्श म्हणून कायम ठेवावा. हैद्राबाद आहे तसेच राहू दिले तर उत्तर भारतीय संस्कृतीचें ते केंद्र बनून दक्षिणेंत हिंदीचा प्रसार करू शकेल असेहि एक कारण कमिशनपुढें मांडण्यांत आले.

निजामाच्या राज्यात तेलंगण, कर्नाटक व मराठवाड्याचा प्रदेश एकत्र आला. पण तीन भाषांचे हे लोक स्वखुषीने एकत्र आलेले नसून ही एकी त्यांच्यावर लादली गेलेली आहे. कॉंग्रेससह सर्व पक्षांनी फाळणीची मागणी केलेली आहे. हैद्राबाद राज्य आहे तसेच कायम ठेवल्याने तेथील लोकांची प्रगति खुंटेल असे सर्व पक्षांचे म्हणणे आहे. विधिमंडळातील निरनिराळे पक्ष व सभासदांनीहि कमिशनपुढें ज्या साक्षी दिल्या त्यावरून कमिशनला असे

दिसून आलें की आहे हीच परिस्थिति कायम ठेवावी असे म्हणणारा गट दुर्लक्ष करण्याइतका लहान आहे.

गेल्या दोनशें वर्षात हैद्राबादमध्ये एक विशिष्ट दक्षिणी संस्कृति निर्माण झाली असून ती जतन करण्याने हिंदचे ऐक्यास मदत होईल असाहि एक युक्तिवाद फाळणी विरोधकांतर्फे केला जातो पण हैद्राबाद, औरंगाबाद, बिदर व गुलबर्गा ही शहरे सोडली तर बाकीच्या भागात तिन्ही भाषिक जमातींना समान अशी कोणतीहि संस्कृति विकसित झाल्याचे कमिशनला आढळून आले नाहीं उलट संस्कृतिभेदच कसा आढळून येतो हे सांगतांना कमिशन लिहिते, "औरंगाबाद ते वरंगळपर्यंत साध्या निरीक्षकालाहि लोकांच्या भाषेतच नव्हे तर पेहराव, रहाणी, चालीरीतीतहि फरक असल्याचे दिसून येईल."

उस्मानिया विद्यापीठात उर्दूऐवजी हिंदी हे शिक्षणाचे माध्यम केल्याने सबंध हैद्राबादेत हिंदीच. प्रसार करता येईल असे एक कारण हैद्राबाद राज्य टिकविण्यासाठी पुढें मांडले ज ते पण प्राथमिक व दुय्यम शिक्षण मातृभाषेतूनच दिले जावे अशी लोकांची स्वाभाविक आकांक्षा असल्याने तेलगू व मराठी भाषिक लोक हिंदी माध्यमास मान्यता देणार नाहींत.

हैद्राबाद राज्य आहे तसेंच कायम ठेवावें ही बाजू अशा रीतीने भुसभुशीत पायावर आधारलेली आहे. फाळणी करणेंच योग्य आहे असे स्पष्ट दिसल्यानंतर तेथील तिन्ही भाषिक प्रदेश लगतच्या प्रांतांना जोडणे हाच योग्य मार्ग ठरतो. त्याप्रमाणे मराठी व कानडी भाग शेजारच्या प्रांतास. जोडण्याची शिफारस कमिशनने केली. पण तेलंगण मात्र आजच आंध्राला न जोडता पांच वर्षानंतर त्याचे भवितव्य तेथील विधिमंडळाचे बहुमताने ठरवावे व तोपर्यंत तो स्वतंत्र प्रांत राहू द्यावा अशी कमिशनची शिफारस अ हे.

## विशाल आंध्रची मागणी

विशाल आंध्रचे स्थापनेस कमिशनचा विरोध नाहीं. तेलंगणासह विशाल आंध्र स्थापन झाल्याने ३,२०,००,००० लोकसंख्येचा, विपुल पाणी व वीजपुरवठा, तसेच खनिज संपत्ति आणि महत्वाचा कच्चा माल असलेला प्रांत निर्माण होईल. आंध्रच्या कायम राजधानीचा प्रश्न सुटेल. कृष्णा व गोदावरी नद्यांवरील धरण योजना एका सरकारचे नियंत्रणाखाली येतील

तेलंगणाने आंध्रशी असलेले आर्थिक संबंधहि कांही कमी महत्वाचे नाहींत. एकीकरणाने दोन्ही प्रदेशांचा फायदा होईल. दुष्काळाचे काळात तेलंगणात धान्यटंचाई असते. पण आंध्र ही टंचाई दूर करू शकेल. तसेच आंध्रला लागणारा कोळसा तेलंगणातील सिंगारेणी खाणीमधून मिळू शकेल. तेलंगण आंध्रला जोडल्याने स्वतंत्र प्रांत म्हणून राज्यकारभारासाठी जो जादा खर्च आला असता त्याची बचत होईल. विशाल आंध्राची मागणी आंध्र व तेलंगण मधील बहुतेक सार्वजनिक संस्था व व्यक्तींनी केलेली आहे तेव्हां सबळ कारणाशिवाय ती अमान्य करता येणार नाहीं असे कमिशनचे मत आहे.

विशाल आंध्र स्थापन व्हायला पाहिजे व ते ध्येय साध्य होण्याचे मार्गात ज्यामुळें अडथळे येतील असे कांहींहि होऊ देता कामा नये हे कमिशनला मान्य आहे. मग तेलंगणचा स्वतंत्र प्रांत करण्याची शिफारस कमिशनने का केलीं ? व पांच वर्षांनंतर तेथील विधिमंडळाच्या दोनतृतीयांश बहुमताने तेलंगणचे भवितव्य ठरविण्याची तरतूद का केली ? तेलंगणच्या खास गरजा पुऱ्या करण्यासाठीं रायलसीमेसंबंधी असलेल्या श्री बाग कराराचे धर्तीवर करार करायला आंध्र नेते तयार होतील, तेलंगणसाठीं नोकऱ्यांत एक तृतीयांश म्हणजेच लोकसंख्येच्या प्रमाणांत जागा राखून ठेवाव्या व त्या भागाचे विकासाकडे विशेष लक्ष पुरवू अशी हमी देण्यास आंध्रचे नेते तयार होतील पण अशा तरतुदी तेलंगणचे दृष्टीने समाधानकारक नाहींत. तेलंगणच्या खास गरजा पुरविण्यासाठीं योजलेल्या उपायावर मध्यवर्ति सरकारची देखरेख असल्याशिवाय ते उपाय परिणामकारक होणार नाहींत पण तसे करण्यापेक्षां तेलंगणचा स्वतंत्र प्रांतच पांच वर्षे ठेवावा असे कमिशनला वाटते. या निर्णयाचे आणखी एक कारण म्हणजे आंध्र प्रांत अजूनहि संक्रमणावस्थेत आहे. आंध्रला अजून आपले जमीन सुधारणासंबंधीचे धोरण ठरवायचे आहे. मद्रासच्या फाळणीतून उद्भवलेले प्रश्न अजून पूर्णपणें सुटलेले नाहींत. अशा स्थितींत तेलंगण आंध्रला जोडल्यानें दोन्ही प्रदेशांत राज्यकारभाराच्या अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे. या सर्व गोष्टी विचारात घेऊन तेलंगणचा सध्या स्वतंत्र प्रांत करण्याची शिफारस कमिशनने केली.

कमिशनच्या मते या योजनेचा फायदा म्हणजे आंध्रच्या एकीकरणाचे

उद्दिष्ट साधण्यांत त्यामुळें अडथळे येत नाहींत, दोन्ही सरकाराच्या राज्य-कारभार यंत्रणेलाहि तोपर्यंत स्थिर स्वरुप येईल. जमीन महसूल पद्धति वगैरेंचा फेरविचार करून त्यात एकसूत्रीपणा आणता येईल. एकमेकाबद्दल अविश्वास दूर करून खऱ्या एकीला अनुकूल असे लोकमत तयार करण्याची संधि मिळेल. आंध्र व तेलंगणचे हितसंबंध समान असल्यानें दो ही प्रदेशातील लोक जवळ येतील. पण असे न होता तेलंगणमध्यें स्वतंत्र रहाण्याचीच वृत्ति बळावली तर मात्र तो प्रांत स्वतंत्र ठेवावा लागेल.

विशाल आंध्र स्थापन व्हायला पाहिजे हे कमिशनने मान्य केले असता पांच वर्षापुरता तेलंगण स्वतंत्र ठेवण्याची शिफारस तर्कशुद्ध नाहीं तेलंगणचे हितसंबंध सुरक्षित व्हावे यासाठीं आवश्यक त्या तरतुदी करण्यास आंध्रचे नेते तयार आहेत. तेलंगणची बहुसंख्य जनता एकीकरणास अनुकूल आहे. विरोध आहे तो कांहीं अल्पसंख्य हितसंबंधी गटांचा. जुने हैद्राबाद संस्थान हिंदच्या नकाशावरून अजिबात पुसून न टाकता कोणत्या तरी स्वरुपात निदान नावानें तरी कायम ठेवावे अशी वृत्ति या विरोधामागें आहे. पांच वर्षांचे काळांत त्यांचा हा विरोध कमी न होता वाढतच जाईल. या गटांत मुख्यतः जमीन-दार वर्ग आहे. पुढच्या निवडणुकात पैशाच्या जोरावर तो बहुमत मिळवि-ण्याचाहि प्रयत्न करील व विशाल आंध्रच्या बाजूने दोन तृतीयांश बहुमत मिळू नये अशी खटपट करील. अशा रीतीनें पांच वर्षे तेलंगण स्वतंत्र ठेवण्याच्या तरतुदीने तो कायमचाच आंध्रपासून अलग होण्याचा धोका आहे.

इतर प्रांतांच्या बरोबरच विशाल आंध्र स्थापन होण्याने एक फायदा म्हणजे आंध्रला जे दोनदा संक्रमण काळातून जावे लागले असते ते एकदाच जावे लागेल. पांच वर्षात कारभाराची घडी नीट बसल्यानंतर तेलंगण सामील झाल्यानें पुनः अडचणी येऊन घडी व्यवस्थित बसविण्यात आणखी कांहीं संक्रमण काल जाऊ देण्यापेक्षां एकदाच सुरवातीलाच काय वर्षे जाऊ द्यायची असतील ती जाऊ देणें चांगले.

### बिदर जिल्ह्याची फाळणी

बिदरच्या सबंध जिल्ह्याचा समावेश कमिशनने तेलंगणात केला आहे वास्तविक हा जिल्हा बहुभाषिक आहे. तेथे मराठी भाषिक ३९ टक्के, कन्नड २८ टक्के उर्दू, १६ टक्के व तेलगू भाषिक १५ टक्के आहेत. हैद्राबादच्या

फाळणीबरोबरच या जिल्ह्याचीहि फाळणी करून त्या त्या भाषेचे प्रदेश त्या त्या प्रांतात समाविष्ट करणेच न्याय्य होईल. तेलगू भाषिक फक्त १५ टक्के असता हा सबंध जिल्हाच तेलंगणमध्येच राहू देणे तर केव्हांहि योग्य होणार नाहीं. जिल्ह्यांची फाळणी करू नये असे कांहीं कमिशनचे ठाम धोरण नाहीं. इतर कांहीं प्रांतांच्या सरहद्दी ठरवितांना जिल्ह्यांचीच नव्हे तर तालुक्यांची व तालुक्याच्या भागाचीहि फाळणी कमिशनने केली. त्याच न्यायाने बिदर जिल्ह्याचीहि फाळणीहि करायला हवी होती. हिंद सरकारला या मागणीची न्याय्यता पटल्यामुळेच १६ जानेवारीस प्रांतरचनेसंबंधीचा आपला निर्णय जाहीर करतांना बिदर जिल्ह्याचे कानडी व मराठी भाषिक तहशील कर्नाटक व महाराष्ट्रात सरकारने समाविष्ट केले. या निर्णयानुसार बिदर जिल्ह्यातील हुमनाबाद, बिदर, भलकी व संतपूर हे तहशील कर्नाटकाला मिळाले व निलंगी, उदगीर आणि अहमदपूर हे तहशील महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आले.

## उर्दू भाषिकांचा प्रश्न

हैद्राबादचा विचार करतांना आणखी एका प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे. निजामाच्या राजवटीत उर्दू हीच राज्यकारभाराची व शिक्षणाची भाषा असल्यामुळे कारभारात उर्दू जाणणारांना महत्व आले होते. हैदाबाद व शिकंदराबादेत ४५·४ टक्के लोक उर्दू भाषिक आहेत. हैद्राबाद तेलंगणची किंवा विशाल आंध्रची राजधानी झाले तर आपले काय होणार अशी या उर्दू भाषिकांना भीति वाटते. यावर उपाय म्हणून हैद्राबाद व शिकंदराबाद ही शहरे मध्यवर्ति कारभाराखाली सोपवावी अशी सूचना कांहींनी कमिशनपुढे केली, पण कमिशनला ती व्यवहार्य वाटत नाहीं. उर्दू भाषिकांचे भाषिक, सांस्कृतिक व इतर हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी पुरेसे सुरक्षित हक्क त्यांना द्यावे. शिक्षण संस्था व राज्यकारभारात उर्दूचे खास स्थान मान्य करण्यात यावे. नोकऱ्यांत भरती करतांना उर्दू भाषिकांचे बाबतींत भेदभाव केला जाऊ नये वगैरे उपायांचा अंतर्भाव या संरक्षण हक्कात असावा असे कमिशनने सुचविले आहे ते योग्यच आहे.

## तेलंगणला अनावश्यक सवलती

प्रांतरचना कमिशनच्या शिफारशींप्रमाणें हैद्राबाद (तेलंगण) पांच वर्षे

स्वतंत्र न ठेवता आंध्रमध्यें सामील करून इतर प्रांतांच्या बरोबरीनेच तेलगू भाषिकांचा एक प्रांत स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तो स्वागतार्ह असला तरी त्यासाठीं तेलंगण भागास अनावश्यक जादा संरक्षण हक्क व सवलती देण्यांत आल्या आहेत. तेलंगणासाठीं, प्रादेशिक समिति स्थापन करण्यांत येणार असून तेथील प्रतिनिधींना मंत्रिमंडळांत ४० टक्के जागा मिळणार आहेत. हे प्रमाण त्यांच्या लोकसंख्येचे प्रमाणापेक्षाहि जास्त आहे. आंध्रची लोकसंख्या २,०९,००,००० व तेलंगणची १,१३,००,००० आहे म्हणजे नव्या प्रांतांत त्यांची लोकसंख्या ३४·३५ टक्के असता मंत्रिमंडळांत मात्र त्यांना ४० टक्के प्रतिनिधित्व मिळणार आहे. वास्तविक हा सारा तेलगू भाषिक प्रदेश एकच असता तेलंगणासाठी निराळी प्रादेशिक समिति व मंत्रिमंडळांत टक्केवारी ठरवून देण्याची आवश्यकताच नाहीं. शिक्षणासाठीं पुरेशा सवलती, नोकऱ्यात लोकसंख्येचे प्रमाणांत जागा आणि तेलंगणच्या विकास योजनांकडे विशेष लक्ष एवढ्या गोष्टी पुरेशा आहेत यापेक्षा अधिक सवलती दिल्याने संकुचित वृत्तीला उत्तेजन मिळेल.

## आंध्र

हैद्राबादनंतर आंध्रचा विचार कमिशनने केला आहे. १ ऑक्टोबर १९५३ ला जो आंध्र प्रांत अस्तित्वात आला त्याच्यात फारसे बदल कमिशनने सुचविले नाहींत.

आंध्र प्रांत निर्माण झाला तरी आंध्र–ओरिसा, आंध्र–मद्रास, व आंध्र–कर्नाटक सरहद्दीसंबंधींच्या आंध्रच्या तक्रारी अजून दूर झालेल्या नाहींत. सध्याच्या आंध्र–ओरिसा सरहद्दीमध्ये कोणताहि बदल करू नये अशी कमिशनची शिफारस आहे. ओरिसांतील सबंध कोरापत जिल्हा, गंजम जिल्ह्यातील पार्लाकिमेडी इस्टेट, छत्तरपूर आणि नेदरायपूर तालुके म्हणजेच आंध्रच्या सध्याच्या सीमेपासून या जिल्ह्यांतील ऋषिकुल्य नदीपर्यंतचा टापू आपणास मिळावा अशी आंध्रची मागणी आहे. कोरापत जिल्ह्याचे आंध्रमधील पर्वतीपुरम, श्रीककुलम व विशाखापट्टण जिल्ह्याशी निकटचे व्यापारीसंबंध आहेत. म्हणून तो आंध्रला जोडावा असा आंध्रचा दावा आहे. कमिशनचे यावर उत्तर असे की कोरापत जिल्ह्यात ओरिसा भाषिकच

बहुसंख्य आहेत. त्याशिवाय कोंड व पराजा भाषा बोलणारांची संख्या २५ टक्के आहे त्यामुळे तो आंध्रचा भाग मानता येणार नाहीं आंध्रशी व्यापारी संबंध तितके निकटचे नाहींत. तेव्हां आंध्रची ही मागणी समर्थनीय नाहीं. कमिशनने दिलेला निर्णयच योग्य आहे.

पार्लाकिमेडी संस्थान व इस्टेट तेथील राजाच्या इच्छेनुसार ओरिसात समाविष्ट करण्यांत आली. भाषिक दृष्टयाहि ते समर्थनीयच होते असे कमिशनचे म्हणणे. बेहरामपूर भागांत ओरिसा भाषेचाच पगडा अधिक आहे असे त्यावेळी सिद्ध झाल्यानें तो भागहि ओरिसात समाविष्ट करण्यांत आला कमिशनच्या मते हे निर्णय बदलण्याचे कारण नाहीं. तसेच ज्या गंजम जिल्ह्यात हे दोन्ही भाग आहेत तेथे ओरिसा भाषिकच बहुसंख्य असून तेलगू भाषिक फक्त १५ टक्के आहेत. तेव्हां हा महत्वाचा किनारपट्टीचा भाग जिल्ह्यापासून अलग काढण्याची कांहींच आवश्यकता नाहीं.

तेलगू भाषिकांचा हा छोटासा टापू ओरिसातून अलग काढून आंध्रला जोडण्याचे कारण नाहीं पण राज्यकारभाराचे दृष्टीनें तेथे त्यांचा एक निराळा जिल्हा किंवा उपजिल्हा करण्यांत यावा. तेथे कारभार तेलगू भाषेतून चालविण्याची त्यांना मोकळीक असावी. तसेच शाळातूनहि तेलगू माध्यम असावे. त्यांच्या टापूत अंतर्गत कारभारापुरती त्यांना स्वायत्तता देण्यांत यावी. अर्थात एकंदर प्रांताच्या हिताला विरोधी असे धोरण ते स्वीकारीत नाहींत अशी दक्षता घेतली जावी. रशिया व चीनमध्यें एका भाषिक घटकात दुसऱ्या भाषिकांचा कांहीं प्रदेश आला असेल तर त्याचा स्वायत्त प्रदेश करण्यांत येऊन कारभाराचे बाबतींत त्याला स्वायत्तता दिली जाते. अशीच व्यवस्था ओरिसांतील या आंध्र भाषिक टापूबद्दल केल्यास त्यांच्या तक्रारी दूर होतील.

आंध्र–मद्रास सरहद्द ठरविण्याचे काम एका सरहद्द कमिशनकडे सोपविण्यांत आले आहे. दोन्ही सरकारातील वाटाघाटींनी हा प्रश्न समाधानकारकपणे सोडविला जाईल अशा अपेक्षेने कमिशनने या बाबतींत कांहींहि शिफारस केलेल्या नाहींत. सरहद्दीवरील वादग्रस्त विभागाची विभागणी करताना खेडे हाच घटक मानून ती केली तर तक्रारी कायमच्या दूर होतील.

बेल्लारी जिल्ह्यांतील कांहीं भागांची मागणी आंध्रने केलेली आहे. हे

भाग आंध्रला न जोडता कर्नाटकांत समाविष्ट असणेच कसे योग्य आहे याचे सविस्तर विवेचन कर्नाटकाचा विचार करतांना केलेले आहे. येथे त्याची पुनरुक्ति करीत नाहीं.

### मद्रास शहराचा प्रश्न

मद्रास शहराचे कारभाराची कांहीं खास व्यवस्था करण्यांत यावी अशी मागणी कमिशनला पाठविलेल्या निवेदनांत आंध्रने केली आहे. मद्रास शहराचा प्राचीन इतिहास पहाता तें मूळ तेलगु भाषिकांचे असून तेलगू भाषिकांशीच त्याचें निकटचे संबंध होते असा आंध्रचा दावा आहे. हे शहर आंध्र व मद्रास सरकारच्या संयुक्त कारभाराखालीं सोपविण्यांत यावे अशी आंध्रची सूचना आहे कमिशनला ती अव्यवहार्य वाटते. शहराच्या एकूण लोकसंख्येत तामिळ भाषिक दोन तृतीयांशापेक्षां अधिक आहेत तेंव्हां मद्रास प्रांतापासून हे शहर अलग करण्याची मागणी कच्च्या पायावर आधारलेली आहे. ऐतिहासिक कारणे आजच्या परिस्थितींत लागू पडत नसल्याने ती विचारात घेता येत नाहींत. तेंव्हां मद्रास शहरासंबंधीचा पूर्वी घेतलेला निर्णय बदलण्यास कोणतेहि सबल कारण नाहीं हे कमिशनचे म्हणणे बरोबर आहे.

मद्रास शहरातील अल्पसंख्य तेलगू भाषिकांचे समाधान करण्याचे दृष्टीनें एक व्यवस्था मात्र करता येण्यासारखी आहे. मद्रास कार्पोरेशनच्या स्थायी समितीत तामिळ भाषिकाप्रमाणेंच तेलगू भाषिकांचे प्रतिनिधि असावे व शहराचे कारभारात त्यांचाहि सल्ला घेतला जावा. तसेच तेलगू भाषिक भागांत शाळा काढण्याची त्यांना मोकळीक असावी. चीनमध्यें एका प्रांतांत दोन भाषिक जमाती जेथे आहेत तेथे त्यांचे संमिश्र सरकार स्थापण्याची तरतूद केली आहे. त्याच धर्तीवर मद्रास शहराचे बाबतीत संमिश्र स्थायी समितीची ही सूचना मी करीत आहे.

## मुंबई

कमिशनच्या अहवालावर सर्वांत जास्त असंतोष मुंबईसंबंधीच्या शिफारशींनी निर्माण झाला. इतर चौदा प्रांत भाषिक पायावर निर्माण केले असता मुंबई प्रांताच्या बाबतींत मात्र तो न्याय कमिशनने लावला नाहीं.

कच्छ व सौराष्ट्रासह गुजरात आणि मराठवाड्यासह महाराष्ट्र यांचा द्विभाषिक प्रांत निर्माण करण्याची शिफारस कमिशनने केली. पण या शिफारशीला महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही भागांत एवढा जोराचा विरोध झाला की द्विभाषिक प्रांताची शिफारस सरकारलाहि बाजूला सारावी लागली. कच्छ व सौराष्ट्रासह गुजरात, मराठवाडा व विदर्भासह पण मुंबई शहर वगळून महाराष्ट्र असे दोन प्रांत निर्माण करावे आणि मुंबई शहराचा कार-भार मध्यवर्ति सरकारकडे सोपवावा असा निर्णय सरकारने १६ जानेवारी १९५६ ला जाहीर केला. मुंबई मध्यवर्ति सरकारकडे सोपविण्याच्या निर्ण-याचे निषेधार्थ मुंबई व महाराष्ट्रात एक आठवडा मोठी निदर्शने झाली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने सर्व महाराष्ट्रीय मंत्री, आमदार व खासदार यांचे राजिनामे पार्लमेंटरी बोर्डाने स्वीकारावे असा ठराव पास केला, पार्लमेंटरी बोर्डाच्या आदेशानुसार शिस्त पालनासाठी हे राजिनामे परत घेण्यात आले असले तरी मुंबईचा कारभार मध्यवर्ति सरकारकडे सोपविण्याचा निर्णय महाराष्ट्रातल्या काँग्रेससह सर्व पक्षांना पसंत नाहीं व त्यांच्या इच्छेविरुद्ध हा निर्णय त्यांच्यावर लादण्यात आला आहे.

सध्याच्या मुंबई प्रांताची फेररचना करताना पुढील निरनिराळे पर्याय सुचविण्यात आले आहेत.

(१) कच्छ व सौराष्ट्रासह गुजरात आणि मराठवाड्यासह महाराष्ट्र यांचा द्विभाषिक प्रांत करावा–कमिशनची शिफारस.

(२) कच्छ सौराष्ट्रासह गुजरात आणि विदर्भ, मराठवाड्यासह महाराष्ट्र यांचा द्विभाषिक प्रांत. श्री. शंकरराव देव व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस यांचा पहिला पवित्रा.

(३) राजस्तान, गुजरात व महाराष्ट्र यांचा पश्चिम प्रदेश प्रांत स्थापण्याची सूचना.

(४) आंध्र व महाराष्ट्र यांचा एक प्रांत स्थापण्याची योजना.

(५) गुजरात, महाराष्ट्र व मुंबई असे तीन प्रांत स्थापण्याची योजना.

(६) कच्छ, सौराष्ट्रासह गुजरात, मुंबई वगळून विदर्भासह महाराष्ट्र असे दोन प्रांत स्थापून मुंबई शहराचा कारभार मध्यवर्ति सरकारकडे सोपविणे.

(७) कच्छ, सौराष्ट्रासह सर्व गुजराती भाषिक प्रदेशाचा गुजरात आणि मुंबई, विदर्भ, बेळगावसह सर्व मराठी भाषिक प्रदेशाचा संयुक्त महाराष्ट्र असे दोनच प्रांत स्थापन करणे.

या प्रत्येक पर्यायाचा आता थोडा सविस्तर विचार करू या.

## द्विभाषिक प्रांताची योजना

प्रथम कमिशनची द्विभाषिक प्रांताची योजना विचारासाठी घेऊ या. कमिशनचा अहवाल वाचताना एक गोष्ट प्रथमच लक्षात येते ती म्हणजे द्विभाषिक तत्वाची आठवण मुंबई प्रांताच्या विचाराचे वेळीच कमिशनला प्रथम झालेली दिसते. मुंबईपूर्वी मद्रास, केरळ, कर्नाटक, हैद्राबाद, आंध्रचा विचार कमिशनने केला पण तेथे कोठे त्रिभाषिक तत्वाचा पुरस्कार केलेला नाहीं. मद्रास व केरळचा मिळून दक्षिण प्रांत स्थापण्याची सूचना कमिशना पुढे मांडण्यात आली होती पण कमिशनने या सूचनेचा पुरस्कार केलेल नाहीं. सध्याचे हैद्राबाद राज्य द्विभाषिक आहे पण ते तसेच राहू द्यावे असे कमिशनने सुचविलेले नाहीं. सध्याचा मध्यप्रदेशहि द्विभाषिक प्रांत आहे तो तसाच कायम न ठेवता त्यातून विदर्भ अलग काढण्याची शिफारस कमिशनने केली. देशाचे ऐक्याच्या व व्यापक राष्ट्रहिताच्या दृष्टीने द्विभाषिक किंवा बहुभाषिक प्रांत योग्य आहेत असे कमिशनला खरोखरच वाटत असेल तर इतर प्रांतांच्या बाबतीत या तत्वाचा पुरस्कार न करता मुंबई प्रांताच्या बाबतीतच का केला या विसंगतीचे उत्तर अहवालात कोठेहि दिलेले नाहीं.

भाषावार प्रांतरचनेऐवजी द्विभाषिक किंवा बहुभाषिक पायावर प्रांतरचना करणे कितपत योग्य होईल, याचे सविस्तर विवेचन 'फेररचनेची तत्वें' या प्रकरणात मी केलेले आहे. त्याची पुनरुक्ति न करता मुंबई प्रांतासंबंधीच्या कमिशनच्या शिफारशीच्या अनुषंगाने आवश्यक तेवढेच विवेचन येथे करतो.

बहुभाषिक प्रदेशात अंतर्गत झगडे निर्माण होऊन कारभाराचे कार्यक्षमतेस बाध येतो हे खरे असले तरी हिंदी संघराज्यामध्ये अत्यंत कार्यक्षम कारभार हाकणारे जे कांहीं प्रांत आहेत त्यापैकी सध्याचा मुंबई प्रांत एक आहे असे कमिशनने म्हटले आहे. कर्नाटकचे जिल्हे अलग केल्यानंतर मुंबई सारख्या कार्यक्षम प्रांताची आणखी विभागणी करावी कीं नाहीं याचा फार

गंभीरपणे विचार केला पाहिजे असे कमिशनचे मत आहे. पण अशा कार्यक्षम प्रांतातून कर्नाटकचे जिल्हे तरी अलग का काढले ? कानडी भाषिकांना स्वत:चा भाषिक प्रांत मिळावा म्हणूनच ना ? मग गुजराती व महाराष्ट्रीयांनाहि स्वत:चा भाषिक प्रांत का मिळू नये ? मुंबई प्रांतातून कर्नाटकचे जिल्हे बाजूला काढण्यात कार्यक्षम कारभारापेक्षाहि भाषिक एकतेला जास्त महत्व दिले पाहिजे याची कबुलीच कमिशनने दिली आहे. आणि कारभाराचे कार्यक्षमतेबाबतच बोलावयाचे तर असे म्हणता येईल कीं मुंबईचा एक भाषिक प्रांत असता तर सध्यापेक्षाहि अधिक कार्यक्षमता त्यात दिसून आली असती. सध्याच्या मुंबई प्रांतात कारभार व निरनिराळ्या योजनांच्या खर्चाची विभागणी लोकसंख्येच्या प्रमाणात न करता निरनिराळ्या भाषिकात कसा पक्षपात केला जातो, याचे विवेचन बहुभाषिक प्रांतासंबंधी विचार करतांना 'फेररचनेची तत्वें' या प्रकरणात मी केलेलेच आहे. अशा पक्षपातामुळेच भाषिक तेढ वाढत जाते. भाषावार प्रांतरचना हाच ती नाहीशी करण्याचा मार्ग आहे.

## द्विभाषिक प्रांतास गुजराती अनुकूल ?

कमिशनने आपल्या अहवालात प्रथमपासून असे भासविले आहे कीं भाषिक प्रांत फक्त महाराष्ट्रीयांना हवा आहे. गुजरात्यांचा त्या बाबत तेवढासा आग्रह नाहीं. त्यांच्यातल्या फक्त एका गटाची तशी मागणी आहे. मुंबई प्रांत जवळजवळ आहे अशाच स्वरुपात राहिला तर त्या संमिश्र प्रांतात राहण्यास बहुसंख्य गुजराती भाषिकांना समाधान वाटेल असे दिसते. अहवालातील पुढील उतारे पहा :

The urge for further disintegration of the State comes firstly from the sponsers of the movement for Samyukta Maharashtra and secondly from a section of the Gujarati speaking population.

Alongside the Samyukta Maharashtra movement there has also grown up a demand for the formation of Maha-Gujarat by uniting the states of Saurashtra and Kutch with Gujarati speaking areas of Bombay. This demand however cannot be regarded as pressing because, by and large, the

Gujarati speaking people would now seem to be content to remain in the composite State of Bombay if it continues to remain more or less as at present constituted.

गुजराती लोक व्यापक राष्ट्रवादी आहेत आणि महाराष्ट्रीय मात्र संकुचित प्रांतवादी आहेत असे सूचित करण्याचा खोडसाळ प्रयत्न यात आहे.

महाराष्ट्रीयांनाच तेवढा संयुक्त महाराष्ट्र हवा, गुजराती मात्र हल्लीच्या मुंबई प्रांतात नांदण्यास समाधानानें तयार होतील हे मत कमिशननें कशाचे आधारे बनविले ? गुजरात प्रदेश कॉंग्रेस कमिटीनें त्यांना तसे स्पष्ट आश्वासन दिले म्हणून. कमिशन यासंबंधी लिहिते : Our assessment of Gujarati sentiment, as has been mentioned earlier however is that influential sections among the Gujaratis would prefer to stay in a composite state even after the separation of the Karnatak districts. We are strengthened in this belief by the categorical assurance af the Gujarat Pradesh Congress Committee to the effect that important elements amongst the Gujarati speaking people would be prepared to live and work together in one state with their Maharashrian Brethern in the larger national interests, as also in the interests of the city of Bombay to which they seem to be greatly attached."

**व्यापक राष्ट्रहिताचा आव**

गुजरात प्रदेश कॉंग्रेसच्या या आश्वासनाने गुजराती जनतेचा महागुजरातबद्दल फारसा आग्रह नसून व्यापक राष्ट्रहिताच्या दृष्टीने व मुंबई शहराचे हितसंबंधांच्या दृष्टीने महाराष्ट्रीय बंधूंबरोबर एका प्रांतात रहाण्यास ते तयार आहेत असा ग्रह होतो खरा, पण तो खरा नाहीं. सरदार पटेलांपासून गुजरातच्या सर्व प्रमुख नेत्यांनी महागुजरातची मागणी अनेकदा केलेली आहे. व्यापक राष्ट्रहिताचा आव आणून द्विभाषिक प्रांतात रहाण्याची तयारी त्यांनी दर्शविली असली तरी त्यामागे खरा उद्देश मुंबई महाराष्ट्राला मिळू द्यावयाची नाहीं हा आहे. संयुक्त महाराष्ट्राची महाराष्ट्रीयांचीच मागणी एवढी तीव्र आहे कीं त्याना संयुक्त महाराष्ट्र मिळाला कीं आपणास महागुजरात आपोआपच मिळतो, त्यासाठी विशेष जोरदार चळवळ करण्याचे किंवा आग्रह धरण्याचे कारण नाहीं, हे गुजरातच्या कॉंग्रेस नेत्यांनी प्रथम-

पासून ओळखले होते. त्यांना खरी काळजी होती ती मुंबईच्या भवितव्याची. तेथील गुजराती भांडवलदारांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी त्यांना मुंबई महाराष्ट्रास मिळू द्यावयाची नव्हती. त्यासाठीच द्विभाषिक प्रांतात रहाण्याची तयारी त्यांनीं दर्शविली. महाराष्ट्रीय नेते द्विभाषिक प्रांत मान्य करणार नाहींत हेहि त्यांना माहीत होते. मग जो द्विभाषिक प्रांत अस्तित्वातच येणार नाहीं त्याला अनुकूलता दर्शविण्यात त्यांचे काय बिघडत होते ! उलट आपण संकुचित प्रांतवादी नसून व्यापक राष्ट्रहित पहातो असा देखावा त्यांना करता आला. द्विभाषिक प्रांताला त्यांची खरोखरच तयारी असती आणि व्यापक राष्ट्रहिताचे दृष्टीने ते खरोखरच विचार करीत असते तर श्री. शंकरराव देव यांनी सुचविलेली आणि महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने प्रथम पाठिंबा दिलेली विदर्भासह मुंबईचा द्विभाषिक प्रांत करण्याची योजना गुजराती नेत्यांनी का मान्य केली नाहीं ? ही योजना त्यांनी फेटाळली तेव्हांच त्यांचा व्यापक राष्ट्रहिताचा बहाणा खोटा असल्याचे उघड झाले.

महाराष्ट्रात मुंबईचा समावेश करण्यास कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा विरोध आहे हे तिच्या ठरावाने दिसून आले. मुंबई महाराष्ट्राला मिळू द्यावयाची नाहीं हा आपला उद्देश अशा रीतीने साध्य होत आहे असे दिसताच गुजराती नेत्यांनी पवित्रा बदलून द्विभाषिक प्रांताला असलेला पाठिंबा काढून घेतला आणि महाराष्ट्र, मुंबई शहर व गुजरात असे सध्याच्या मुंबई प्रांताचे तीन प्रांत करावेत या वर्किंग कमिटीच्या ठरावास पाठिंबा देणारा ठराव गुजरात प्रदेश कॉंग्रेस कमिटीनें पास केला.

संयुक्त महाराष्ट्राबाबत महाराष्ट्रीय नेत्यांचा जेवढा आग्रह होता तेवढा महागुजरातबाबत गुजराती नेत्यांचा नव्हता. द्विभाषिक प्रांत त रहाण्यास ते तयार होते. महागुजरातची मागणी तेथील एका गटाचीच होती असे म्हणून गुजराती व्यापक देशहित डोळ्यापुढे ठेवतात आणि महाराष्ट्रीय मात्र संकुचित प्रांतवादी असें ध्वनित करण्याचा प्रयत्न कमिशननें अहवालात केला तो कसा चुकीचा आणि महाराष्ट्रीयांवर अन्याय करणारा आहे हे यावरून दिसून येईल.

द्विभाषिक प्रांताचीच योजना कां योग्य हे दाखविताना संयुक्त महाराष्ट्राची मागणी का मान्य करता येत नाहीं याची कारणे कमिशननें अह·

वालात सांगणे आवश्यक होते. " संयुक्त महाराष्ट्राचे स्थापनेबावत उत्तर व दक्षिण महाराष्ट्राचे जिल्ह्यातील लोकमत सर्वसाधारण अनुकूल दिसते या वस्तुस्थितीची आम्हाला जाणीव आहे. पण त्याचबरोबर मध्यप्रदेशाच्या मराठी भाषिक जिल्ह्यातील महत्वाच्या गटांना संयुक्त महाराष्ट्राचे ध्येय मान्य नाही या वस्तुस्थितीकडेहि आम्ही दुर्लक्ष करू शकत नाहीं. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापनेबाबत महाराष्ट्रीय लोकमतात एकवाक्यता नाही हेच यावरून दिसून येते " असें कमिशननें म्हटले आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी एकमुखी नसल्यानें ती मान्य करता येत नाही असेच कमिशनला थोडक्यात म्हणावयाचे आहे. विदर्भातल्या काही गटांचा संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यास विरोध आहे हे खरे. पण कमिशन ज्याला महत्वाचे गट म्हणते तसे ते गट नाहीत. त्यांना फारच थोडा पाठिंबा तेथील जनतेत आहे. ते विदर्भाचे प्रातिनिधिक मत नव्हे पण त्यालाच जादा महत्व कमिशननें दिले.

## स्वतंत्र विदर्भाची मागणी

विदर्भ महाराष्ट्रात समाविष्ट न करता त्याचा स्वतंत्र प्रांत करण्याची मागणी आपण का मान्य केली यासंबंधी कमिशन अहवालात लिहिते, "विदर्भाची आर्थिक स्थिति समाधानकारक आहे. बृहन्मुंबईशिवाय महाराष्ट्र स्थापन झाला तर तो मोठ्या प्रमाणावर तुटीचा प्रांत होईल म्हणून या भागात महाराष्ट्राला मिळण्याबाबत काहीशी नाखुषी दिसते. विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला तर त्याची साधनसंपत्ति त्याच्या भागातच योग्य विकास योजनांसाठीं खर्च केली जाईल की नाही याची शंका वाटते. आमच्याकडे पाठविलेल्या निवेदनात स्वतंत्र विदर्भाच्या स्थापनेस अनुकूल अशी जी कारणें उघड सांगण्यात आली किंवा सूचित करण्यात आली त्यातील कांहींचा उल्लेख आम्ही येथे करतो. महाराष्ट्राचा एकच प्रांत स्थापन झाला तर त्याची स्वाभाविक राजधानी मुंबई शहर होणार. नागपूर पूर्णपणे त्याच्या छायेखाली जाईल अशी भीति व्यक्त करण्यात आली. विदर्भ महाराष्ट्राला मिळाल्यास त्याच्या राजकीय जीवनात जातीयवादाचा प्रवेश होईल असेहि सांगण्यात येत आहे. जमीन व कुळासंबंधी कायदे मुंबई प्रांताच्या धर्तीवर करावे लागतील. संक्रमण कालात विदर्भाला आपल्या हितसंबंधांचे रक्षणासाठी झगडावे लागेल. अशा परिस्थितीत हा धोका पत्करण्याची विदर्भातील

जनतेच्या महत्वाच्या गटांची इच्छा नाहीं. "

विदर्भाच्या साधनसंपत्तीचा उपयोग इतर भागांच्या विकास योजनांसाठी केला जाईल, ही भीति अनाठायी आहे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने प्रांतपुनर्रचना समितीस सादर केलेल्या निवेदनात म्हटल्याप्रमाणे " कोणत्याहि राष्ट्रविकास कार्याचे बाबतीत मध्यप्रदेशाचे मराठी जिल्हे विशेष पुढे गेले आहेत असे दिसून येत नाहीं म्हणून नवीन राज्यात मध्यप्रदेशाचे मराठी जिल्हे व मराठवाडा यापेक्षा मुंबई राज्यातील मराठी जिल्ह्यावर उत्पन्नाचा अधिक भाग खर्च करावा लागेल अशी बिलकुल परिस्थिति नाहीं " संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यास नागपूरचे महत्व कमी होईल अशी भीति तेथील लोकांना वाटते. असे दुसरे कारण अहवालात दिले आहे. पण नागपूर कराराने ही भीति दूर करण्यात आली आहे. महाराष्ट्र व नागपूर विदर्भाचे नेत्यात २८।९।१९५३ ला हा करार झाला. " नव्या राज्यातील वरिष्ट न्यायालयाचे (हायकोर्ट) मुख्य पीठ मुंबई येथे राहील व दुय्यम पीठ नागपूर येथे राहील. नागपूरचे न्यायालय सर्व साधारणपणे महाविदर्भ प्रदेशातील काम पाहील. (नागपूर करार कलम ७) वर्षात कांहीं विशिष्ट काळासाठी सरकार अधिकृतपणे नागपूर येथे हलविण्यात येईल आणि राज्य कायदेमंडळाचे किमान एक तरी अधिवेशन दरवर्षी नागपुरास घेण्यात येईल. (नागपूर करार कलम १०) नागपूरचे महत्व कायम ठेवण्याची याप्रमाणे खबरदारी घेण्यात आली असताहि या भीतीला अहवालात अवास्तव महत्व दिले आहे.

" विदर्भ महाराष्ट्राला मिळाल्यास त्याच्या राजकीय जीवनात जातीय वादाचा प्रवेश होईल " हे अहवालातील विधान तर अत्यंत खोडसाळपणाचे आहे. त्याची दखल घेण्याच्याहि योग्यतेचे ते नाहीं. महाराष्ट्रीयांकडे कसे दूषित दृष्टीने पाहिले जात आहे याची मात्र त्यावरून कल्पना येते.

विदर्भातील लोकांना वाटणारी भीति दूर करण्यासाठी ज्या सवलती अकोला व नागपूर करारांनी दिल्या आहेत त्या अमलात आणणे कठीण आहे व एका गटाला त्या समाधानकारक वाटत नाहींत. एवढीच टीका अहवालात केली आहे. पण अमलात आणण्यास कठीण असे त्यात काय आहे. याचा कांहीहि खुलासा कमिशनने केलेला नाहीं. मध्यप्रदेशांतील मराठी

भापी बहुसंख्य लोकांचा नागपूर करारास पाठिंवा आहे. महत्वाच्या व प्राति-निधिक अशा व्यक्तींनीच नव्हे तर प्रातिनिधिक संघटना अगर इतर संस्था यांनीं याबावत जे मतप्रदर्शन केलें त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते. असे संयुक्त महाराष्ट्र परिषदेने आपल्या निवेदनात म्हटले आहे पण त्याची दखल न घेता एका विशिष्ट गटाचीच भीति खरी धरून कमिशनने विदर्भ प्रांताची मागणी मान्य केली.

विशाल आंध्रचा मार्ग मोकळा ठेवून तेलंगण प्रांताची निर्मिति कमि-शनने केली व पांच वर्षानी विधिमंडळातील दोन तृतियांश सभासदांच्या बहुमताने आंध्रमध्ये सामील होण्याची मोकळीक त्यांना दिली. विदर्भाच्या बाबतींत मात्र अशा प्रकारची कोणतीहि तरतूद कमिशनने केली नाहीं. संयुक्त महाराष्ट्र आज तर नाहीच पण पुढेहि होऊ द्यावयाचा नाहीं हाच उद्देश यामागे होता.

## ब्रिटिश थाटाचा युक्तिवाद

हिंदुस्थानातील राजकीय पक्षात व निरनिराळ्या जमातींत एकमत नाहीं म्हणून आम्हाला त्यांच्या हाती सत्ता सोपविता येत नाही असे स्वातं-त्र्याची मागणी फेटाळताना ब्रिटिश राज्यकर्ते नेहमी म्हणत. महाराष्ट्रीयांत एकमत नाहीं म्हणून संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करता येत नाही हा कमिशनचा युक्तिवाद त्याच थाटाचा आहे. संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यास विदर्भातील कांही नेत्यांचा विरोध असला तरी तेथील प्रातिनिधिक लोकमत संयुक्त महाराष्ट्राच्याच बाजूचे आहे.

विदर्भाचा स्वतंत्र प्रांत न करता तो महाराष्ट्रातच समाविष्ट केला पाहिजे ही मागणी न्याय्य असल्याचे कॉंग्रेस वर्किंग कमिटीला व सरकारलाहि पटले व मुंबई वगळून पण विदर्भासह महाराष्ट्र स्थापन करण्याचा निर्णय १६ जानेवारी १९५६ ला जाहीर करण्यांत आला. विदर्भातील बहुसंख्य जनतेला हा निर्णय पसंत नसता तर त्याविरुद्ध निदर्शने करून तिने आपला विरोध व्यक्त केला असता. पण विदर्भात तसे कांहीं घडले नाहीं यावरून कमिशन म्हणते तसा 'महत्वाच्या गटां'चा महाराष्ट्रांत सामील होण्यास विरोध नाही हे सिद्ध झाले. विदर्भाला इतर मराठी भाषिक प्रदेशापासून अलग काढून त्याचा स्वतंत्र प्रांत करण्यांत मराठी भाषिकांवर जो अन्याय

कमिशनने केला. तो सरकारकडून दूर घेण्यांत तरी मराठी भाषिकांना यश आले आहे.

## मुंबई शहराचा प्रश्न

मुंबई प्रांताचा द्विभाषिक प्रांत करण्याची शिफारस कमिशनने केली ती मुख्यत: मुंबई शहरासाठीं. "मुंबई प्रांतातून महाराष्ट्र व गुजराती विभाग करतांना सर्वात कठीण प्रश्न मुंबई शहराचे भवितव्याचा आहे" असे कमिशनने म्हटले आहे.

यापूर्वी दार कमिशन व काँग्रेसच्या जवाहर–वल्लभभाई–पट्टाभि समितीनेहि या प्रश्नाचा विचार केला होता. "सध्याच्या मुंबई प्रांताची फाळणी होऊन महाराष्ट्राचा निराळा प्रांत करण्यांत आला तर मुंबई शहराचा एक स्वतंत्र राजकीय घटक करण्यांत यावा." अशी शिफारस दार कमिशनने केली होती व त्या शिफारशीचे समर्थनार्थ पुढील युक्तिवाद केला होता. "ते (मुंबई) हिंदुस्थानातले एक मोठे शहर आहे एवढेच नव्हे तर मुख्यत: बहुभाषिक आहे. ( Cosmopolitan multilingual city) आपला व्यापार व उद्योगाची ती मुख्य नस ( nerve centre ) असून बाहेरच्या जगाची सर्वात मोठी खिडकी आहे. ( Our biggest window to the outside world ) सर्व जमातींचे लोकांच्या श्रमांनीं हे मोठे शहर उभारले गेलेले असून त्याच्या अनेकांगी ( many sided ) जीवनास, ज्यामुळें बाध येईल अशा कोणत्याहि कल्पनेचा किंवा सूचनेचा विचार करणे आम्हाला अशक्य आहे. ते एकाच भाषिक गटाचे आहे असे मानून एका निव्वळ भाषिक प्रांतास जोडता येणार नाहीं. तसे केल्यास त्याचे प्रभुत्व झपाट्याने कमी होईल यात शंका नाहीं. मुंबईची लोकसंख्या गेल्या कांहीं वर्षांत झपाट्याने वाढली आहे. ती मिश्र लोकसंख्या आहे व महाराष्ट्रीय त्यात अल्पसंख्य आहेत याबद्दल फारच थोडी शंका आहे. पण त्यांची थोडी बहुसंख्या असती तरी त्यामुळें मुंबईचें बहुभाषिक स्वरूप बदलू शकत नाहीं."

काँग्रेसच्या जवाहर वल्लभभाई पट्टाभि समितिनेहि असेच मत व्यक्त केले होते. ही समिति लिहिते, "बृहन्मुंबई हा कोणत्याहि एका निव्वळ भाषिक प्रांताचा भाग होणार नाहीं हे स्पष्टपणें व भर देऊन सांगण

आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. सध्याच्या मुंबई प्रांताचे भाषिक प्रांत बनविण्यांत आले तर बृहन्मुंबईचे भागाचा स्वतंत्र घटक करावा लागेल.

मुंबई शहर कोणत्याहि एका भाषिक प्रांतास जोडू नये हे दार कमिशन व जवाहर वल्लभभाई पट्टाभि समितीचे मत प्रांतपुनर्रचना कमिशनला मान्य आहे पण मुंबई प्रांताची भाषावार विभागणी केली तर या शहराचा स्वतंत्र घटक करावा हे मात्र त्यांना मान्य नाहीं.

## मुंबई महाराष्ट्रात का नको ?

मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट का करता येत नाहीं याची प्रांतपुनर्रचना कमिशनने दिलेली कारणे दार कमिशन व जवाहर वल्लभभाई पट्टाभि समितीच्या कारणांसारखीच आहेत. त्यातले मुख्य कारण म्हणजे इतर भाषिक अल्पसंख्याकांना वाटणारी भीति. वास्तविक अशी भीति वाटण्याचे कांहीं कारण नाहीं हे महाराष्ट्रीय प्रतिनिधींनी कमिशनपुढें दिलेल्या साक्षीत स्पष्ट केले होते. बृहन्मुंबई व हिंदी संघराज्याच्या इतर भागात व्यापार उद्योग आणि दळणवळणाचे स्वातंत्र्य राहील अशी घटनेतच तरतूद आहे. तसेच अल्पसंख्याकांना भेदभावाची वागणूक देण्यास घटनेने बंदी केलेली आहे तेढ, अविश्वास व असंतोषाचे वातावरण निर्माण करून स्वतःच्याच दीर्घकालीन हितसंबंधांना बाध आणण्याइतके महाराष्ट्राचे भावी सरकार अदूरदर्शी असेल असे मानण्यास कोणतेहि विशेष कारण नाहीं. या गोष्टी कमिशनचे निदर्शनास आणल्या होत्या. या युक्तिवादातील तर्कशुद्धता कमिशनलाहि पटली होती पण इतर जमातींना वाटणारी भीति आम्ही सहज बाजूला सारू शकत नाहीं असे कमिशनने म्हटले आहे. ( We are impressed by the cogency of these arguments but we cannot lightly brush aside the fears of other communities.)

इतर जमातींना वाटणारी भीति सहज बाजूला सारावी असे कोणीच म्हणत नाहीं. महाराष्ट्रीयांनीहि तसे केलेले नाहीं. अल्पसंख्याकांचे पूर्ण समाधान ज्यामुळे होईल असे त्यांना पाहिजे असलेले सर्व प्रकारचे संरक्षण हक्क व सवलती देण्याची तयारी महाराष्ट्रीय नेत्यांनी दर्शविली होती. तरीहि अल्पसंख्याकांच्या भीतीला अवास्तव महत्व देऊन महाराष्ट्राची न्याय्य मागणी कमिशनने अमान्य केली.

" मुंबईमध्ये महाराष्ट्रीय १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें अल्पसंख्य आहेत. त्यांची लोकसंख्या फक्त ४३ ६ टक्के आहे. मद्रास व कलकत्त्यापेक्षा या शहराची परिस्थिति निराळी आहे कारण त्या दोन्ही शहरांत सर्वांत मोठ्या भाषिक गटाची लोकसंख्या दोनतृतीयांश आहे. शहराची मिश्र लोकसंख्या, त्याची भावी वाढ निरनिराळ्या भाषिक गटांच्या सहकार्यावर अवलंबून आहे ही वस्तुस्थिति आणि अल्पसंख्य भाषिक गटांची मतें व भीति–ती अतिशयोक्त वाटली तरी–लक्षात घेता मुंबई शहराचे खास स्थान (Special Position) मान्य केले पाहिजे असा आमचा निष्कर्ष आहे." असे कमिशन म्हणते.

मुंबई शहरात महाराष्ट्रीय १९५१ चे खानेसुमारीप्रमाणे बहुसंख्य नाहींत व यावावतींत कलकत्ता व मद्रासशी मुंबईची तुलना करून मुंबई महाराष्ट्रीयांची नाहीं असे दाखविण्याचा प्रयत्न कमिशनने केला आहे पण एखाद्या प्रदेशाचे भवितव्य ठरवितांना तो नैसर्गिकदृष्ट्या कोणत्या प्रदेशात आहे, तेथील अनेक पिढ्यांचे मूळचे रहिवासी कोण आहेत हा निकष मानला पाहिजे. १८८१ मध्यें मुंबईतील लोकसंख्येत मराठी भाषिकांचे प्रमाण शेकडा ५०·१ व कोकणी भाषिकांचे शेंकडा ४·४ होते. १९२१ मध्ये ते अनुक्रमें ५१·४ व २·८ होते. १९३१ मध्ये मराठी भाषिकांचे प्रमाण शेकडा ४७·६ पर्यंत खाली आले तरी मराठी व कोकणी भाषिकांचे मिळून प्रमाण ५१·१ टक्के होते. कोकणी मराठीची पोटभाषा असल्याने ते लोक मराठी भाषिकच आहेत. एखाद्या भाषिक प्रदेशाचा भाग ठरविण्यासाठी तेथील लोकवस्तीत त्या भाषिकांचे प्रमाण शेकडा ५० पेक्षा तरी अधिक हवे हा नियम लावल्यास १९३१ पर्यंत तरी मुंबई शहर महाराष्ट्राचाच निर्विवाद भाग होते. १९३१ नंतर मुंबईत अन्य भाषिक लोक मोठ्या प्रमाणात आले व त्यांची बहुसंख्या झाली म्हणून ते शहर त्यांचे हा युक्तिवाद मान्य केला तर त्याचे घोर परिणाम होतील. जे लोक आपल्या प्रदेशात अन्य भाषिकांची वसाहत होऊ देतात त्यांच्यावर कांहीं काळाने आपल्या प्रदेशाचा कांहीं भाग गमावण्याचे संकट ओढवते असा त्याचा अर्थ लावावा लागेल.

## मुंबई महाराष्ट्राशी एकजीव

मुंबईच्या दक्षिणेस व पूर्वेस मराठी भाषिकांचाच प्रदेश शेकडो मैल

पसरलेला आहे. मुंबईपासून ७५ मैलांचे त्रिज्येत येणारा सर्व प्रदेश तर मराठी भाषिक आहेच पण २७५ मैलाच्या त्रिज्येत येणाऱ्या प्रदेशापैकीहि सात अष्टमांश भूभाग मराठी भाषिक आहे. मुंबई मराठी भाषिकांचे प्रदेशातच पूर्णपणे आहे हे यावरून निर्विवाद सिद्ध होते. कलकत्ता व मद्रास शहरांचे स्थानसुद्धा या दृष्टीने मुंबईसारखें नाहीं हे संयुक्त महाराष्ट्र परिषदेने आपल्या निवेदनांत नकाशे व वर्तुळे काढून चांगल्या प्रकारे दाखविले आहे. मुंबई मराठी भाषिकांचे सर्वात मोठे शहर आहे. मराठी भाषिकांचा प्रांत करतांना त्यांचे सर्वात मोठे शहर त्यात नसेल तर त्या प्रांताला कांही अर्थ नाहीं. मराठी वृत्तपत्रे, मराठी भाषेतील इतर प्रकाशने, मराठी नाट्यकला, महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व सांस्कृतिक हालचालींचे मुंबई प्रमुख केंद्र आहे. महाराष्ट्रातील सर्व रेल्वे मार्ग व सडका मुंबईच्या दिशेने जातात. महाराष्ट्रातील सर्व व्यापारी व व्यावसायिक हितसंबंध मुंबईत केंद्रित झाले आहेत. घाटाखालच्या व घाटावरच्या असंख्य महाराष्ट्रीयांच्या रोजगाराचे व उपजीविकेचे ते प्रमुख केंद्र आहे. मुंबईस पाणीपुरवठा व वीज महाराष्ट्रातूनच मिळते. अशा सर्व दृष्टींनी मुंबई महाराष्ट्राशी एकजीव झालेले असता ते महाराष्ट्रास जोडण्याची मागणी नाकारणे हा मोठा अन्याय आहे. मुंबई महाराष्ट्राशी एकजीव झालेली असता ती अलग काढणे म्हणजे शरीराचा एखादा अवयव तोडण्यासारखेच आहे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने आपल्या निवेदनांत म्हटल्याप्रमाणें "मुंबई महराष्ट्र प्रदेशाचा निव्वळ एक प्राकृतिक भाग नसून सांस्कृतिक, बौद्धिक, सामाजिक इत्यादि अनेकविध मराठी जीवनाचे ते सर्वात मोठे केंद्र आहे. मुंबई राजधानी नाहीं अशा महाराष्ट्र राज्याची निर्मिति ही अनाकलनीय, अविचारणीय गोष्ट आहे. मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला गेल्यास महाराष्ट्र राज्याचा कारभारच अशक्य होऊन जाईल."

मुंबईचे जीवन तर महाराष्ट्रावर अवलंबून आहेच पण महाराष्ट्राचेहि जीवन मुंबईवर अवलंबून आहे. मुंबई महर महाराष्ट्रापासून वेगळे काढले तर महाराष्ट्राला दरवर्षी सहा कोट रुपये तूट येईल असे प्रांतपुनर्रचना कमिशननेच आपल्या अहवालात म्हटले आहे. हा अंदाज करतांना कमिशनला विदर्भाशिवाय महाराष्ट्र अभिप्रेत आहे पण विदर्भ मिळाला तरीही तूट अशी कितीशी कमी होईल ?

समाजवादी प्रजासत्ताक राष्ट्राचे ध्येय आपल्या सरकारने घोषित केलें आहे पण मुंबई शहरातील खरे मूळचे रहिवासी कोण याकडे लक्ष न देता ब्रिटिश राजवटीत ज्यांच्या हाती धनसत्ता गेली त्यांनाच त्या शहराचे भवितव्य ठरविताना महत्व देण्यांत आले तर सरकार ज्या समाजवादी प्रजासत्ताक राज्याच्या घोषणा करते त्याच्या मूलभूत पायावरच घाव घातल्यासारखे होणार आहे.

मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्यात आणखी एक धोका म्हणजे मुंबई शहराची प्रादेशिक भाषा म्हणून मराठी मान्य केली न जाण्याचा संभव आहे. मुंबई हे मराठी भाषिकांचे सर्वात मोठे शहर. ते महाराष्ट्रापासून अलग झाले तर मुंबईचे सर्व कारभारविषयक आणि शैक्षणिक धोरण अशा रीतीने आखले जाईल की तेथील मराठी लोकांचा आपली मातृभाषा, साहित्य व संस्कृति यांच्याशी कोणत्याहि प्रकारचा जिवंत संबंध रहाणार नाही.

## मध्यवर्ति सत्तेखाली मुंबई

मुंबई शहराचा स्वतंत्र घटक करावा किंवा ते मध्यवर्ति सरकारचे नियंत्रणाखाली सोपवावे या दोन्ही सूचना कमिशनला मान्य नाहींत. कमिशन यासंबंधी लिहिते. " बृहन्मुंबईचा स्वतंत्र राजकीय घटक करावा हा दार कमिशन व जवाहर–वल्लभभाई पट्टाभि समितीने सुचविलेला पर्याय मान्य केला तर कांहीं गंभीर अडचणी उपस्थित होतील. या विभागाची लोकसंख्या आणि आकार व विशेषतः तो शहर घटक होणार हे लक्षात घेता आमच्या मतें तो हिंदी संघराज्याचा पूर्ण घटक मानला जाणार नाहीं. उलट एका लोकशाहीदृष्ट्या पुढारलेल्या प्रांताच्या राजकीय जीवनाचे बृहन्मुंबई हे केंद्र असल्याने मध्यवर्ति सरकारकडे त्याचा कारभार सोपविला तर तें प्रतिगामी पाऊल मानले जाईल. "

कमिशनच्या मतें आणखी एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा म्हणजे वीज व पाणीपुरवठा आणि आणखी विस्तारासाठीं बृहन्मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशावर अवलंबून आहे. महाराष्ट्राच्या अंतर्गत प्रदेशाशी ( hinterland ) बृहन्मुंबईचा असलेला स्वाभाविक संबंध हे त्या प्रदेशाचा स्वतंत्र घटक न करण्याचे दुसरे कारण आहे.

## मुंबई व गुजरातचे संबंध

द्विभाषिक प्रांताची शिफारस करतांना कमिशनने केलेला एक महत्वाचा युक्तिवाद म्हणजे मुंबई शहराचा विकास महाराष्ट्राइतकाच गुजरातशी निगडित आहे. कमिशन लिहिते. " राज्य कारभाराचे दृष्टीनें महाराष्ट्रापासून शहर ( मुंबई ) वेगळे काढणे इष्ट नाहींच पण कारभाराचे दृष्टीने बृहन्मुंबई गुजरातपासून वेगळे काढून महाराष्ट्राचा भाग केले तर भावी काळात शहराच्या वाढीवर त्याचे परिणाम तितकेच प्रतिकूल होतील. बृहन्मुंबई महाराष्ट्राचा भाग झाला तर गुजराती व इतर जमातीत मोठे मानसिक असमाधान निर्माण होण्याचा संभव असून त्याचा परिणाम शहराच्या औद्योगिक व व्यापारी जीवनावर होणार नाहीं अशी अपेक्षा करणे शहाणपणाचे होणार नाहीं. आम्हाला वाटते कीं ते निराळे करण्याने गुजरात किंवा महाराष्ट्र आणि एकंदर देशाची होणारी हानि एवढी मोठी आहे कीं, या बाबत कोणताहि धोका पत्करणे शहाणपणाचे होणार नाहीं."

मराठी व गुजराती विभाग बृहन्मुंबईच्या आर्थिक शिलकीवर अवलंबून आहेत. मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेल्या आकड्यांप्रमाणें मार्च १९५३ अखेरच्या तीन वर्षांची बृहन्मुंबईची सरासरी शिल्लक १२ कोट रुपये होती. भावी काळांत ही शिल्लक कमी होण्याऐवजी वाढण्याचाच संभव आहे. या शिलकीचा कांहीं भाग महाराष्ट्र व गुजरातचे तुटीच्या विभागांना वाटून देण्या संबंधी निरनिराळ्या सूचना करण्यांत आल्या आहेत पण प्रत्यक्षात अशी समाधानकारक व्यवस्था करणें कठीण जाईल असे कमिशनला वाटते. मुंबईशिवाय पश्चिम महाराष्ट्र व गुजरात हे प्रांत स्थापन केले तर त्यांना अनुक्रमे ६ कोट व अडीच कोट रुपयांची तूट येईल. म्हणून नुसत्या आर्थिक कारणासाठीसुद्धा बृहन्मुंबई गुजरात व महाराष्ट्रापासून अलग करू नये असे कमिशनला वाटते.

मुंबईचे संबंध महाराष्ट्राशी निगडित आहेत याबद्दल वाद नाहीं पण ते गुजरातशीहि निगडित आहेत हे कमिशनचे म्हणणें मात्र पटणारे नाहीं. गुजराती भांडवलदारांनी मुंबईत गिरण्या व कारखाने उभारले हे खरे. मुंबईत त्यांचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत हेहि मान्य. पण तेवढ्यामुळें गुजरातमधील सर्वसामान्य जनतेचे जीवन मुंबईशी निगडित झालेले आहे

असे म्हणता येणार नाहीं. मुंबई हे जसे महाराष्ट्रीय जनतेचे एक मोठे सांस्कृतिक केंद्र आहे तसे गुजराती जनतेचे नाहीं. मुंबई महाराष्ट्रात सामील होण्यास मुख्यत: विरोध आहे तो गुजराती भांडवलदारांचा. सर्वसामान्य गुजराती जनतेचा नव्हे. तेव्हा या मूठभर भांडवलदारांच्या समाधानासाठी मुंबईचा द्विभाषिक प्रांत करून इतर प्रांताच्या बाबतींत मान्य केलेली भ षावार प्रांतांची मागणी मुंबईच्या बाबतींतच तेवढीं अमान्य करणे हा केवळ महाराष्ट्रीय जनतेवरच नव्हे तर गुजराती जनतेवरहि अन्याय आहे.

महाराष्ट्रीयांच्या न्याय्य आकांक्षा पुऱ्या होतील अशी दक्षता आम्ही घेतली आहे असें कमिशनचें म्हणणे. सध्याच्या मुंबई प्रांतात महाराष्ट्रीय ४४ टक्के आहेत. कमिशनने सुचविलेल्या नियोजित प्रांतात त्यांची लोकसंख्या ४८ टक्के होईल व एकूण ४,०२,००,००० लोकसंख्येपैकी मराठी भाषिक जिल्ह्यातील लोकसंख्या २,१३,००,००० असेल. म्हणजे लोकसंख्येच्या दृष्टीनें नव्या प्रांतांत महाराष्ट्रीयांची स्थिति अधिक समाधानकारक राहील असे कमिशनचे म्हणणे. पण कमिशनच्या या युक्तिवादानें महाराष्ट्रीयांचे समाधान होणार नाहीं. त्यांचा झगडा टक्केवारीसाठी नाही. इतर भाषिकां-प्रमाणे त्यांना स्वत:चा भाषिक प्रांत हवा आहे आणि ती मागणी कमिशननें मान्य केलेली नाहीं.

सध्याच्या मुंबई प्रांतात एखाद्या विशिष्ट भागाच्या किंवा गटाच्या हितसंबंधांचे बाबतीत पक्षपात केला जातो असा आरोप करता येणार नाहीं व नियोजित प्रांतातहि दोन्ही भाषिक विभागांना समान व न्याय्य वागणूक मिळणार नाहीं अशी भीति बाळगण्याचे कारण नाहीं. असे मत कमिशनने व्यक्त केले आहे. सध्याच्या मुंबई प्रांतात निरनिराळ्या योजनांवरील खर्चाचे बाबतीत गुजराती, महाराष्ट्र व कर्नाटक विभागात कसा पक्षपात केला जात आहे. यासंबंधी अंदाज पत्रकातील आकड्यांचाच आधार देऊन मुंबई असेंब्लीच्या एका आमदाराने केलेल्या भाषणाचा उल्लेख 'फेररचनेची तत्वे' या प्रकरणात मी केला आहे. येथें त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. त्यातील माहिती चुकीची असल्याचा इन्कार कोणाहि सरकारी मंत्र्याने किंवा अधिकाऱ्याने केलेला नाहीं. भाषावार प्रांत केले तर अशा तक्रारीना जागा रहाणार नाहीं.

बेळगांव व कारवारचा मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकला जोडून कमि-

शनने मराठी भाषिकावर कसा अन्याय केला याचे विवेचन कर्नाटकसंबंधी लिहिताना मी केलेच आहे. त्याचीहि पुनरुक्ति येथे करीत नाहीं.

## विदर्भासह द्विभाषिक प्रांताची सूचना

मुंबईसाठी द्विभाषिक प्रांताची शिफारस करताना कमिशनने जो युक्तिवाद केला त्याचा परामर्श आतापर्यंत घेतला. कमिशनच्या शिफारशींना पर्याय म्हणून विदर्भासह द्विभाषिक प्रांताची योजना श्री. शंकरराव देव यांनी सुचविली व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या पहिल्या बैठकीत या योजनेस पाठिंवा दर्शविण्यात आला. पांच वर्षानंतर वाटल्यास गुजराथने अलग व्हावे अशीहि तरतूद या योजनेत करण्यात आली होती. संयुक्त महाराष्ट्रावाबतचा ठाम आग्रह सोडून महाराष्ट्रीय कॉंग्रेस नेत्यांनी ही योजना सुचविली याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्राची त्यांची मागणी तेवढीशी जोरदार नाहीं, कांहीं आश्वासने दिली तर द्विभाषिक प्रांत किंवा मुंवई शिवाय महाराष्ट्र ते स्वीकारतील असा लावण्यांत आला. व्यापक राष्ट्रहितासाठी भाषिक प्रांताची संकुचित मागणी सोडून द्विभाषिक प्रांतात रहायला आम्ही तयार आहोत. असे गुजराती नेते म्हणत होते. त्यांना आव्हान देण्यासाठी व त्यांचे खरे उद्देश पारखून घेण्यासाठीच ही योजना पुढे मांडली होती. द्विभाषिक प्रांताच्याच दृष्टीने विचार केला तर कमिशनचे योजनेपेक्षाहि श्री. शंकरराव देवांची योजना त्या तत्वाला अधिक सुसंगत होती. एका प्रांतात मराठी व गुजराती भाषिकांचा सर्व प्रदेश एकच यावा असा त्यात प्रयत्न होता. पण गुजरातचे नेत्यांना ही योजना मान्य झाली नाहीं. त्यांचे द्विभाषिक प्रांताचे प्रेम केवळ मुंबई महाराष्ट्राला मिळू नये एवढ्यासाठीच होते. हे उघड झाले. द्विभाषिक प्रांत त्यांनाहि मनातून नको होता. मुंबई महाराष्ट्राला दिली जात नाहीं, हे स्पष्ट झाल्यावर महागुजरातची मागणी करणारा ठराव गुजरात प्रदेश कॉंग्रेसनें पास केला हे याचेच निदर्शक होते.

बंगाल बिहारचे एकीकरणाचे योजनेस त्या दोन्ही प्रांतांच्या मुख्य मंत्र्यांनीं संमति दर्शविल्यावर द्विभाषिक बहुभाषिक प्रांतांच्या ज्या योजना भराभर मांडण्यांत येऊ लागल्या त्यांत राजस्थान, गुजरात व महाराष्ट्र यांचा पश्चिम प्रदेश स्थापण्याची एक सूचना होती. या नव्या प्रांतांत महाराष्ट्रीयांचे बहुमत रहात नसल्यानें गुजरातचे नेते तिला अनुकूल होते पण राजस्थानचाच विरोध झाल्यानें ती सूचना बारगळली.

कमिशननें सुचविलेला द्विभाषिक प्रांत, श्री. शंकरराव देव यांनी सुचविलेला विदर्भासह द्विभाषिक प्रांत आणि त्रिभाषिक पश्चिम प्रदेश या तिन्ही योजना वारगळल्या पण त्यापैकी एखादीहि तात्पुरती तडजोड म्हणून मान्य केली असती तरी लोकांचे समाधान झाले नसते. भाषिक कटकटी, वाद, पक्षपाती वागणूक हे प्रकार चालूच राहिले असते. तेव्हां गुजराती व मराठी भाषिकांच्या प्रदेशाचे भाषिक प्रांत स्थापणे हाच एक योग्य मार्ग होता. आंध्र व महाराष्ट्राचा एक प्रांत करण्याची योजना मांडण्यांत आली तर तिचा आपण विचार करू असे मत आंध्रचे मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. पण इतर द्विभाषिक योजनांप्रमाणेच या योजनेचेहि फारसे स्वागत झाले नाहीं.

## मुंबईसंबंधी सरकारी निर्णय

कच्छ, सौराष्ट्रसह गुजरात व विदर्भासह महाराष्ट्र असे दोन प्रांत स्थापन करून मुंबई शहराचा कारभार मध्यवर्ति सरकारकडे सोपविण्यात येईल. असा निर्णय सरकारनें १६ जानेवारी १९५६ ला जाहीर केला. भाषिक प्रांतांचे तत्व अखेर मुंबई प्रांताची फेररचना करतांनाहि लावण्यांत आले पण मुंबई शहर मात्र महाराष्ट्रात समाविष्ट करण्यांत आले नाहीं. हा निर्णयच आपण का घेतला व तो कसा योग्य आहे याचे कोणतेहि स्पष्टीकरण सरकारी घोषणेत किंवा पंतप्रधान नेहरूंनी त्यादिवशी रेडिओवरून केलेल्या भाषणांत नव्हते. " गोड समजूतदारपणा ( sweet reasonableness ) व शांततापूर्ण सहकार्याने या प्रश्नाचा विचार करा " अशी विनंति पंडित नेहरूंनी केली पण सरकारनें मुंबईसंबंधी घेतलेल्या निर्णयातच समजूतदारपणाचा अभाव होता. " भौगोलिकदृष्ट्या मुंबई शहर महाराष्ट्राने वेढलेले असून ते महाराष्ट्राचा भाग मानता येईल " ही गोष्ट पंडित नेहरूंनी मान्य केली. पंडितजींना हे खरोखर मान्य असेल तर मुंबई महाराष्ट्रास जोडणे हाच वस्तुस्थितीशीं सुसंगत निर्णय होऊ शकतो. पण तो न घेता मुंबई शहर मध्यवर्ति कारभाराखाली सोपविण्याचे सरकारनें ठरविले. हाच निर्णय कसा योग्य आहे हे दाखविणारी कोणतीहि कारणे सरकारला देता आलेली नाहींत. कारण तशी कारणे सरकारजवळ नाहींतच, मुंबईवरचा महाराष्ट्राचा हक्क मान्य असता भांडवलदारांच्या दडपणामुळे सरकारने हा निर्णय घेतला याशिवाय याचा दुसरा कोणता अर्थ लावता येईल ?

### मुंबईतील लोकमताचा कौल

सवंध गुजराती भाषिक प्रदेशाचा गुजरात प्रांत स्थापन करण्याची गुजरातची मागणी आता मान्य झाली आहे. मुंबई महाराष्ट्रापासून अलग काढून महाराष्ट्रावर मात्र अन्याय करण्यात आला आहे. तात्पुरती व्यवस्था म्हणून सरकारने मुंबई मध्यवर्ति कारभाराखाली सोपविली असे म्हणता येत नाहीं. सरकारी घोषणेत व पंडित नेहरूंचे भाषणात तसा कांहींहि उल्लेख नाहीं. मुंबईसंबंधीचा निर्णय घेताना खुद्द मुंबईतील लोकांचा कौलच सर्वात महत्वाचा मानला पाहिजे. कॉर्पोरेशन ही मुंबईची प्रातिनिधिक संस्था. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारा ठराव तिच्या बैठकीत बहुमताने पास झाला. मुंबईतील प्रातिनिधिक लोकमताचाच हा कौल होता. मुंबई भागातून निवडून आलेल्या मुंबईसंबंधीच्या निर्णयाचे निषेधार्थ आमदारांनी राजिनामे दिले. इतर आमदारांनी राजिनामे दिले व परत घेतले तसे त्यांनीं केलेले नाही. खुद्द मुंबईतील प्रातिनिधिक लोकमताचा कौल मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे बाजूनें आहे. हे याप्रमाणे सिद्ध झाले असता महाराष्ट्रापासून मुंबईची फारकत करण्याचा निर्णय नुसता अन्याय्यच नव्हे तर लोकशाही-विरोधी आहे आणि तो कायम असेपर्यंत महाराष्ट्रात त्याविरुद्ध असंतोष कायमच रहाणार.

## मध्यप्रदेश

मुंबईनंतर विदर्भाचा विचार कमिशननें केला आहे. विदर्भाचा स्वतंत्र प्रांत करण्याची काहीहि आवश्यकता कशी नाहीं व विदर्भाचे मराठी भाषिक जिल्हे महाराष्ट्रातच समाविष्ट करणें कसे योग्य होईल याचे विवेचन मुंबई प्रांतासंबंधी लिहितांना मी केले आहे.

तेव्हां कमिशननें त्यानंतर विचारास घेतलेला प्रांत मध्यप्रदेशाकडे आपण वळू या. कमिशननें सुचविलेल्या नव्या मध्यप्रदेशात पुढील विभागांचा समावेश केला आहे.

(१) विदर्भ अलग काढल्यानंतर राहिलेले सध्याच्या मध्यप्रदेशाचे १६ जिल्हे.

(२) भोपाळ

(३) विंध्यप्रदेश

(४) मध्यभारत ( मंदसोर जिल्ह्यातील सुनेल वगळून )

(५) राजस्थानच्या कोटाह् जिल्ह्यातील सिरोंज सबडिव्हिजन.

या प्रांताची लोकसंख्या २,६१,००,००० व क्षेत्रफळ १,७१,२०० चौरस मैल होईल. मध्य हिंदुस्थानातील सर्व हिंदी भाषिक प्रदेश एकत्र आणून हा प्रांत बनविला आहे. भोपाळ, विंध्यप्रदेश, मध्यभारत हे संस्थानांच्या विलीनीकरणाच्या वेळी बनवलेले छोटे छोटे प्रांत या नव्या प्रांतात समाविष्ट करण्यात आले आहेत. क वर्गाचे प्रांत लगतच्या मोठ्या प्रांतात समाविष्ट करावे या कमिशनच्या शिफारशींना अनुसरूनच हा निर्णय आहे. मध्यभारत हा ब वर्गाचा प्रांतहि यात विलीन करावा की नाहीं हा थोडासा वादग्रस्त प्रश्न होता पण मध्यप्रदेशात तो समाविष्ट करणेच राज्यकारभाराच्या दृष्टीने सोयीचे होईल असे कमिशनला वाटते. मध्य हिंदुस्थानात छोटे क व ब वर्गाचे प्रांत न ठेवता हिंदी भाषिक प्रदेशाचा एक मोठा सलग प्रांत करण्याची कल्पना स्वागतार्ह आहे. मतभेद आहेत ते सीमाप्रदेशाचे निर्णयासंबंधी-महाकोसलच्या सीमेवरील निमार, बेतूल, छिंदवाडा व बालाघाट या जिल्ह्यातील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करावा अशी मराठी भाषिकांची मागणी आहे. खेडे हाच घटक मानून ही विभागणी करावयास हवी होती पण कमिशननें होते तसेच हे जिल्हे मध्यप्रदेशात कायम ठेवले आहेत.

मध्य भारतातील मंदसोर जिल्हा व राजगड आणि गुणा जिल्ह्यांचा कांहीं भाग आपणास मिळावा अशी राजस्तानची मागणी आहे. त्यापैकीं मंदसोर जिल्ह्यातील सुनेल शहर फक्त राजस्तानला जोडावे असे कमिशनने सुचविले आहे व बाकीच्या प्रदेशाची मागणी अमान्य केली आहे. सुनेल शहर सोडून राजस्तानने मागितलेला बाकीचा प्रदेश मध्य भारताशीच सलग आहे. आणि मध्यभारताचा भाग म्हणूनच त्याचा कारभार दीर्घकाल पाहिला गेलेला आहे. जिल्ह्याचे विभागणीबाबत लोकमतहि अनुकूल नाहीं. म्हणून त्याची विभागणी करू नये असे कमिशनचे म्हणणे पण या प्रदेशाचे बाबतीतहि खेडे हा घटक मानून विभागणी करणेच योग्य झाले असते.

राजस्तानातील कोटाह व झालवाड भाग मध्यभारतास जोडावे अशी मध्यभारताची मागणी होती. त्यापैकी फक्त कोटाह जिल्ह्यातील सिरोंज

सबडिव्हिजन राजस्तानातून काढून नियोजित मध्यप्रदेशात समाविष्ट करावी असे कमिशनने सुचविले आहे.

बस्तर जिल्ह्याचा दक्षिण भाग तेलगू भाषिक असल्याने आंध्रला मिळावा अशी आंध्रची मागणी होती त्याचा कांहीं भाग ओरिसाला जोडावा अशी ओरिसाची मागणी होती. तर बस्तरच्या कांहीं भागात बोलली जाणारी हळबी भाषा मराठीच पोटभाषा असल्याने तो मराठी भाषिक प्रदेशात समाविष्ट करावा अशी मराठी भाषिकांची मागणी होती. यापैकी कोणत्याच प्रांताने आपला दावा पुरेशा पुराव्यानिशी सिद्ध केला नसल्याने कमिशनने कोणाचीच मागणी मान्य केलेली नाहीं. नियोजित मध्यप्रदेशा-संबंधीच्या शिफारशीत सरकारनेहि कोणताच बदल केलेला नाहीं.

# राजस्तान

मध्यप्रदेशानंतर कमिशनने राजस्तानचा विचार केला आहे. सध्याच्या राजस्तानला पुढील प्रदेश जोडावे असे कमिशनने सुचविले.

(१) मध्यभारताच्या मंदसोर जिल्ह्यातील सुनेल शहर.

(२) हिस्सार जिल्ह्याचा लोहारू उपतहशील.

(३) अजमीर.

हे नवे प्रदेश राजस्तानला मिळणार असून कोटाह जिल्ह्यातील सिरोंज सबडिव्हिजन मात्र या प्रांतापासून अलग करून मध्य प्रदेशात समाविष्ट करण्यात येईल. नियोजित प्रांताचे क्षेत्रफळ १३२,३०० चौरस मैल व लोकसंख्या १,६०,००,००० होईल. आर्थिक परिस्थितीत सध्यापेक्षा विशेष फरक पडणार नाहीं असे कमिशनने म्हटले आहे.

## राजस्तानच्या फाळणीची सूचना

राजपुतान्यातील एकोणीस संस्थाने एकत्र करून सध्याचे राजस्तान राज्य अस्तित्वात आले. सध्याच्या राजस्तानची विभागणी अधिक कार्यक्षम कारभाराचे दृष्टीने पुढीलप्रमाणे तीन घटकात करावी अशी मागणी कमि-शनकडे पाठविलेल्या कांहीं खलित्यात करण्यात आली.

(१) पश्चिम राजस्तान. सीमेवरच्या या प्रांतास मरुप्रदेश म्हणावे.

(२) पूर्व राजस्तान. दिल्ली व उत्तर प्रदेशाचे सीमेवरचे कांहीं भाग यात समाविष्ट करावे.

(३) दक्षिण राजस्तान. पश्चिमेस अरवली पर्वत, उत्तरेस सांभार सरोवर व पूर्वेस नियोजित मध्य प्रदेश अशा याच्या सरहद्दी राहतील.

राजस्तानच्या फाळणीची ही मागणी कमिशनने मान्य केलेली नाहीं. कमिशनने दर्शविलेला विरोध योग्यच आहे. फाळणीची मागणी लोकांची नसून कांहीं हितसंबंधी गटांची आहे. हिंद पाक सीमेवर मरुप्रदेशासारखा छोटा प्रांत निर्माण केल्यास ७०० मैलांच्या सरहद्दीचे संरक्षण करण्यास पुरेसे मनुष्यबळ व साधनसामग्री या छोटया प्रांताजवळ असणार नाहीं. तसेच राजस्तानच्या पसरत्या वाळवंटास प्रतिबंध करण्याची योजना हाती घ्यावयाची तर हा छोटा प्रांत ती पार पाडू शकणार नाहीं अशी कारणे फाळणीस विरोध दर्शविताना कमिशनने दिली आहेत. ही मान्य होण्या-सारखीच आहेत.

' क ' वर्गाचे प्रांत शेजारच्या प्रदेशात विलीन करावयाचे या धोरणा-नुसार अजमीर राजस्तानात समाविष्ट करण्याची कमिशननी केलेली शिफा-रस योग्यच आहे व त्याबाबत दोन्ही प्रदेशातहि मतभेद नाहींत. १९४७ सालीं घटना समितीने चीफ कमिशनरांचे प्रांतांसाठी एक समिती नेमली होती. तिच्यावरील अजमीरच्या प्रतिनिधीने, अजमीर नजीकच्या काळांत शेजारच्या सलग घटकांत समाविष्ट होईल असेच मत व्यक्त केले होते.

अबु तालुक्यावर गुजरात आणि राजस्तान दोघेहि हक्क सांगत आहेत. सिरोही संस्थानचा हा भाग जानेवारी १९५० मध्ये मुंबई प्रांतात समाविष्ट करण्यात आला. तालुक्यातील ६५ टक्के लोकांची मातृभाषा राजस्तानी असून ते राजस्तानात समाविष्ट होण्यासच अनुकूल आहेत. सिरोही संस्थान राजस्तानास जोडण्यात आले आणि त्याचाच भाग असलेला अबू तालुका मात्र मुंबई प्रांताला जोडण्यात आला. असे करण्यास कोणतेहि सबळ आर्थिक किंवा कारभारविषयक कारण नव्हते. तेव्हां हा तालुका राजस्तानांत समाविष्ट करण्याची कमिशनची शिफारस योग्यच आहे.

## योग्य निर्णय बदलला

सध्या पंजाबच्या हिस्सार जिल्ह्यात समाविष्ट केलेल्या लोहारूच्या

बावतीतील अन्यायहि कमिशनने असाच दूर केला. साडेतीनशे वर्षांपूर्वी हे संस्थान स्थापन झाल्यापासून राजस्तानशी त्याचे निकटचे संवंध होते. भौगोलिकदृष्ट्या ते राजस्तानशी सलग आहे तसेच राजस्तानशी त्याचा व्यापार विशेषत: लोकरीचा व्यापार वराच चालतो. या सर्व दृष्टीनीं लोहारू राजस्तानला जोडण्याची शिफारस कमिशनने केली. पण सरकारने ते पंजाव-मध्येंच ठेवण्याचे ठरविले. शीखांचे समाधानाशिवाय दुसरे कोणतेहि समर्पक कारण यामागें दिसत नाहीं.

पेप्सूचा मोहिंदरगड जिल्हा राजस्तानला जोडण्याची मागणी मात्र कमिशनने मान्य केलेली नाहीं. भाषेच्या दृष्टीने तो राजस्तानच्या बाहेर आहे. कारभाराचे दृष्टीने तो पेप्सूपासून तुटलेल्या बेटासारखाच (enclave) आहे पण पेप्सू पंजावमध्ये समाविष्ट केल्यावर ही अडचण रहाणार नाहीं असे कमिशनचे म्हणणे.

वन्सवारा व दुंगारपूर मुंबई प्रांतास ( म्हणजेच गुजरातला) जोडावी अशी गुजरातची मागणी होती. ऐतिहासिकदृष्ट्या हा भाग गुजरातशी निगडित होता. माही नदी त्यातूनच वहाते व गुजरातचे विकासाच्या दृष्टीने तिचे महत्व असल्यानें हा प्रदेश गुजरातला जोडावा असे गुजरातचे म्हणणे. कमिशनच्या मते इतिहासकालात कांहीहि संबंध असले तरी अलीकडच्या इतिहासात हा विभाग राजस्तानशीच जास्त निगडित आहे. तसेच माही नदीच उपयोग गुजरात व राजस्तान दोघांनाहि आहे. त्याबाबतच्या अडचणी प्रादेशिक फेरविभागणी न करताहि सोडविता येतील.

अलवार व भरतपूर संस्थाने बृहत दिल्ली किंवा व्रजप्रदेश प्रांतास जोडावी अशी एक सूचना कमिशनपुढे करण्यात आली होती पण वृहतदिल्ली किंवा व्रजप्रदेश स्थापन करण्याची शिफारसच कमिशनने न केल्यानें हा प्रश्नच उपस्थित होत नाहीं.

# पंजाब

मुंबई प्रांताचे फेररचनेइतकाच वादग्रस्त प्रश्न पंजाबचे फेररचनेचा आहे. आणि मुंवईसाठी जशी द्विभाषिक प्रांताची शिफारस कमिशनने केली तशीच पंजाबसाठी द्विभाषिक प्रांताची शिफारस केली. सध्याचा पंजाब,

पेप्सु आणि हिमाचल प्रदेश हे तिन्ही प्रदेश मिळून हा नवा प्रांत व्हावा असे कमिशनने सुचविले.

पंजाबचे फेररचनेसंबंधी मुख्यतः तीन सूचना पुढे मांडण्यात आल्या आहेत.

(१) पंजाबी भाषिक प्रांत ही मागणी मुख्यतः अकाली शीखांची असून पुढील पंजाबी भाषिक भाग या प्रांतात समाविष्ट करावे असे त्यांनी सुचविले आहे.

(अ) पंजाब—गुरुदासपूर, अमृतसर, फिरोजपूर, लुधियाना, जालंदर, अंबाला, कर्नाळ (पानिपत तहशील वगळून) हे जिल्हे आणि सिर्सा व फत्तेबाद तहशील व हिस्सार जिल्ह्याचा तोहाना उपतहशील.

(आ) पेप्सू—पतियाळा, बर्नाळा, भतिंडा, कपुर्थळा, फत्तेगडसाहेब व संगरूर (झिंद व निर्वाणा तहशील सोडून).

(इ) राजस्तान—गंगानगर जिल्हा.

(२) महापंजाब ही मागणी मुख्यतः पंजाबातील कांहीं हिंदु संघटना तर्फे करण्यात आली असून महापंजाबात केवळ पंजाब, पेप्सू व हिमाचल प्रदेशच नव्हे तर सध्याच्या दिल्ली प्रांताचे कांहीं विभाग आणि उत्तर प्रदेशाचे पश्चिमेकडचे दोन तीन जिल्हे त्यात समाविष्ट करावे असा त्यांचा आग्रह आहे.

(३) पंजाब, पेप्सू व हिमाचल प्रदेशचा एक प्रांत. कमिशनची शिफारस.

(४) पंजाब व पेप्सूचा एक प्रांत व हिमाचल प्रदेश मध्यवर्ति नियंत्रणाखालील प्रदेश करावा. कमिशनचे अध्यक्ष फाजलअलींची शिफारस.

या निरनिराळ्या सूचनांचा आता सविस्तर विचार करू या.

## पंजाब भाषिक प्रांताची मागणी

पंजाबी भाषिक प्रांताची मागणी मान्य का करावी यासाठी पुढील मुद्दे अकाली शीखांच्या बाजूने मांडण्यात येतात.

(१) त्यामुळे असंतोषाची सर्व कारणे दूर होतील. भाषिक वाद मिटेल. शिक्षण मातृभाषेतून देणे शक्य होईल व लोकांच्या प्रगतीस मदत होईल.

(२) हा घटक भौगोलिकदृष्ट्या सुटसुटीत, आर्थिकदृष्ट्या सुस्थिर, धान्याचे दृष्टीने शिलकीचा व नैसर्गिक साधनसंपत्तिचे दृष्टीने संपन्न होईल.

(३) अशा प्रांताच्या स्थापनेनें वायव्य सरहद्दीचे संरक्षणास बळकटी येईल.

(४) शीख जमातीचे समाधान होईल.

पंजाबी भाषिक प्रांताच्या मागणीस पंजाबी भाषिकांच्या मोठ्या गटाचाच विरोध आहे. पंजाबमध्ये खरोखर भाषिक प्रश्नच नाही. पंजाबी व हिंदी भाषा एकमेकाशी जवळच्या असून त्या दोन्ही पंजाबातील सर्व गटांचे लोकांना चांगल्या समजतात. प्रांतातील सध्याच्या व्यवस्थेमुळे पंजाबी भाषा व संस्कृतीचे वाढीस कोणताहि अडथळा येत नाहीं. सध्याच्या प्रांतात पंजाबी व हिंदी असे भिन्न सांस्कृतिक विभाग नाहीत असे कमिशनने म्हटले आहे.

पंजाबची फाळणी होण्यापूर्वीपासून पूर्व पंजाबच्या बऱ्याच भागात पंजाबी बोलली जात आहे पण फाळणीपूर्वी इंग्रजी जेथें वापरले जात नसेल त्या बाबतींत अधिकृत भाषा म्हणून पंजाबी नव्हे तर उर्दू मान्य करण्यात आली होती. ही परिस्थिति अजून कायम आहे. अगदी अलीकडें साचारग्यानी कर्तारसिंग योजना तयार करण्यात आली त्यानुसार पंजाबचे पंजाबी व हिंदी असे दोन भाषिक विभाग पाडून राज्यकारभार व शिक्षणासाठी तेथें पंजाबी व हिंदी या प्रादेशिक भाषा मान्य केल्या जाणार आहेत. गुरुमुखी लिपीतील पंजाबी हीच पंजाबी भाषा म्हणून मान्य करावी ही मागणीहि अलीकडच्या कांहीं वर्षांतलीच आहे: वारिस शहासारख्या प्रसिद्ध पंजाबी लेखकांनी आपले लेखन काही गुरुमुखींत केलेले नाही. फाळणी होईपर्यंत पंजाब विद्यापीठांत पंजाबी भाषेचे परीक्षांसाठी गुरुमुखी किंवा फारसी यापैकी कोणतीहि लिपी वापरण्याची सवलत देण्यांत आली होती. पंजाबचा भाषिक प्रश्न अशा रीतीने मुख्यत: लिपीचा प्रश्न आहे.

हा लिपीचा प्रश्न कसा सोडवायचा ? पंजाबी भाषेला गुरुमुखी इतकीच देवनागरी लिपीहि सोयीची आहे. हिंदू आतांपर्यंत ती वापरीत आले असून आपल्यावर गुरुमुखी लादली जाण्यास त्यांचा विरोध आहे. गुरुमुखी लिपी असलेला पंजाबी भाषिक प्रांत स्थापन झाला तरी पंजाबी भाषेची वाढ होण्यास त्यामुळे कितपत मदत होईल. हिंदी मातृभाषा

असणारांना हिंदीतूनच शिक्षण द्यावे लागेल, व पंजाबात हिंदीचा वाढता प्रसार होत आहे. पंजाब विद्यापीठाच्या हिंदी व पंजाबी परीक्षांना गेल्या पांच वर्षांत जालंदर डिव्हिजनमधून बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ६२·२ टक्के विद्यार्थी हिंदी परीक्षांना व फक्त ३७·८ टक्के पंजाबी परीक्षांना बसले होते. सध्याच्या पंजाबमधील सहा पंजाबी भाषिक जिल्ह्यांचे हे आकडे आहेत. १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणे या जिल्ह्यात ९७·२ टक्के पंजाबी भाषिक व १·३२ टक्के हिंदी भाषिक होते. पंजाब विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेत इतिहास भूगोलाचे पेपर पंजाबी किंवा हिंदीतून लिहिण्याची सवलत आहे. चार वर्षांत परीक्षेला बसलेल्या १,०३,७५८ विद्यार्थ्यांपैकी ७३·५ टक्के विद्यार्थ्यांनी हिंदीत व २६·५ टक्के विद्यार्थ्यांनी पंजाबीत उत्तरे लिहिली. पंजाबी भाषिक प्रांत स्थापन केला तरी त्यांत हिंदी भाषा मोठ्या प्रमाणावर रहाणार हे यावरून दिसून येईल. पाकिस्तानी पंजाबांतून आलेले निर्वासित आणि भाक्रा धरण योजनेसाठी झालेली वसाहत यामुळे पंजाबची दोन भाषिक विभागांत झालेली विभागणी हळूहळू नाहीशी होत असून दोन्ही भाषिक लोक एकमेकात मिसळल्याने सलग एक भाषिक प्रांत स्थापन करणे अशक्य आहे. पंजाबी भाषिक प्रांताचे स्थापनेने सध्याच्या झगड्यांची कारणे दूर होणार नाहींत. भाषिक किंवा जातीय प्रश्न सुटणार नाहीं. आणि जातीय गटातील सध्याची तेढ कमी होण्याऐवजी वाढेल अशा भूमिकेवरून पंजाबी भाषिक प्रांताचे स्थापनेस कमिशनने विरोध दर्शविलेला आहे.

## प्रश्न केवळ भाषिक नव्हे जातीय

कमिशनचा हा विरोध कितपत बरोबर आहे ? पंजाबचे फेररचनेचा विचार करताना पंजाबचा प्रश्न केवळ भाषिक नसून जातीय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. खरी असो किंवा खोटी असो शीखांना हिंदु वर्चस्वाची भीति वाटते हे मान्य केले पाहिजे. तसेच शीखांनी मागणी केलेला पंजाबी भाषिक प्रांत स्थापन झाल्यास त्यांत शीखांचे वर्चस्व होईल अशी भीति हिंदूंना वाटते. दोन्ही जमातींची ही परस्पराविषयीची भीति कशी नाहीशी करावयाची ? मुस्लीम लीगप्रमाणे अकाली शीखांचे नेते जातीयवादी असले तरी पाकिस्तानप्रमाणे स्वतंत्र शीखिस्तानची फुटीर मागणी त्यांनी केलेली नाहीं हे लक्षात घेतले पाहिजे. हिंदी संघ राज्यातच रहावयाला ते तयार

आहेत, आपली मागणीसुद्धा त्यांनी शीख प्रांताचे स्वरूपात नव्हे तर पंजाबी भाषिक प्रांताचे स्वरूपात मांडली आहे. आपल्या मागणीचे उघड जातीय स्वरूप छपविण्याचा हा प्रयत्न आहे अशी टीका याबाबत त्यांच्यावर केली जात आहे.

सध्याच्या पंजाबचे हिंदी भाषिक विभाग आणि पंजाबी विभाग असे दोन स्पष्ट दिसण्यासारखे भाग आहेत ही गोष्ट अमान्य करता येणार नाहीं. निर्वासितांचे आगमन, भाक्रा योजना यामुळें दोन्ही भाषिकांची वस्ती कांहीं ठिकाणी एकमेकात मिसळली असली तरी तेथे अजून स्पष्ट ओळखण्यासारखे दोन भाग आहेत. हे लक्षात घेऊन पंजाब व पेप्सूमधील पंजाबी भाषिक प्रदेशाचा रशिया–चीनचे धर्तीवर एक स्वायत्त प्रदेश स्थापण्यात यावा. पंजाबाच्या अंतर्गतच हा स्वायत्त प्रदेश राहील पण अंतर्गत कारभाराचे बाबतींत त्यास स्वायत्तता राहील. या प्रदेशात कांहीं हिंदी भाषिक अल्पसंख्य राहिले तर त्यांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याची तरतूद केली जावी आणि हिंदी भाषा वापरण्याची मोकळीक त्यांना दिली. जावी मागासलेल्या हिमाचल प्रदेशाचाहि पंजाब अंतर्गत स्वायत्त प्रदेश स्थापण्यात यावा. पंजाब, पेप्सू व हिमाचल प्रदेशाचा मिळून एक प्रांत व्हावा व त्यांचे एक सरकारहि असावे पण या मोठ्या प्रांतातच पंजाबी भाषिक प्रदेश व हिमाचल प्रदेश असे दोन स्वायत्त प्रदेश व त्यांची निराळी सरकारे असावी आपल्या घटनेत अशा प्रकारच्या प्रांतांतर्गत स्वायत्त प्रदेशांची तरतूद नसल्याने घटनेत बदल करून ती करावी लागेल. पण अशा योजनेने पंजाबी, हिंदी आणि पहाडी (हिमाचल प्रदेश) या तिन्ही भाषिकांचे समाधान होऊन त्यांच्या विकासास योग्य संधि मिळेल.

पेप्सू पंजाबमध्यें विलीन न करतां स्वतंत्र ठेवावे ही सूचना कमिशनने अमान्य केली हे योग्यच झाले. संस्थानांचे विलीनीकरण करतांना पंजाबातील संस्थाने एकदम पंजाबात विलीन होण्यास तयार होणार नाहींत म्हणून पतियाळा व पूर्व पंजाब संस्थाने एकत्र आणून पेप्सू स्थापन करण्यांत आले 'ब' वर्गाचे राज्यात ते सर्वात छोटे आहे भौगोलिकदृष्टचा सलग नसलेले तुकडे पेप्सूत एकत्र आणण्यांत आले. आकाराने ते लहान असल्याने कारभाराचे बाबतीतहि त्याला अडचणी येतात. इंडियन अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस

(११) २०२२८ वि:
२०५ नों: दि:

मधील लोक नोकऱ्यांवर ठेवणे त्यास परवडत नाहीं. पेप्सू व पंजाबात अनेक प्रश्न समान असून धोरणांत किमान एकसूत्रीपणा आणण्यासाठीं संयुक्त सल्लागार मंडळे किंवा परिपदांचे मार्गांचा अवलंब करावा लागतो. यापेक्षा पेप्सू पंजाबमध्येंच विलीन केल्यास ते काटकसरीचे तर होईलच पण कारभार अधिक कार्यक्षम होईल असे कमिशनने म्हटले आहे.

पेप्सूत शीखांची लोकसंख्या ४९ टक्के आहे. जवळजवळ बहुमत असल्याने हे आपलेच राज्य आहे असे शीखांना वाटते. पंजाबी भाषिक प्रांताची मागणी मान्य होत नसेल तर निदान पेप्सू तरी कायम रहावे असे त्यांना वाटत असावे.

नियोजित पंजाबात पतियाळाचे महत्व कमी होईल असेहि पेप्सूचे लोकांना वाटते. पण पंजाब सरकारच्या कांही कचेऱ्या तेथे ठेवून हे महत्व टिकविता येईल असे कमिशनने सुचविले आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेता पेप्सूचा स्वतंत्र घटक ठेवण्याची आवश्यकता नाहीं.

महापंजाबची मागणी पंजाबातील कांही हिंदू संघटनांतर्फे केली जात आहे पंजाब, पेप्सू व हिमाचल प्रदेशाचे जोडीला सध्याच्या दिल्ली प्रांताचा कांहीं भाग आणि उत्तरप्रदेशचे पश्चिमकडचे दोनतीन जिल्हे एकत्र आणून महापंजाब स्थापावा अशी त्यांची सूचना आहे. प्रांतांत हिंदूंचे हाती सत्ता नेहमी कायम रहावी या दृष्टीनें ही मागणी केली जात असल्याची शीखांची तक्रार आहे. कमिशनने सुचविलेल्या पंजाबला आणखी प्रदेश जोडण्याची आवश्यकता नाही.

## सरकारची योजना

पंजाब व पेप्सूचा एक प्रांत करण्याचे सरकारने ठरविले. पंजाबी भाषिक प्रांताची शीखांची मागणी नाकारण्यांत आली तरी त्यांचे समाधान होईल अशी तडजोड शोधून काढण्यांत आली. नव्या योजनेप्रमाणें पंजाबी व हिंदी असे दोन भाषिक विभाग पाडण्यांत आले असून कारभाराचे बाबतीत त्यांना बरीच स्वायत्तता देण्यांत आली आहे. स्थानिक स्वराज्य, शिक्षण, आरोग्य, शेती, सहकारी संस्था, आर्थिक पुनर्वटना या सर्व बाबतींत प्रादेशिक मंडळेच कारभार पहातील. प्रांतिक असेंब्लीत त्या त्या विभागातून निवडून आलेल्या सभासदांची ही मंडळे बनविण्यांत येतील. सबंध प्रांतासाठी जे

प्रांतिक सरकार राहील त्याच्याकडे कपडा व सुव्यवस्था कर, अर्थ आणि वाहतूक ही चारच खाती रहातील.

पंजाब बद्दलच्या या योजनेबाबत अनेक शंका व्यक्त करण्यांत येत आहेत. पंजाबची ही दुसरी फाळणी असून शीख व हिंदूंत त्यामुळे सहकार्य निर्माण होण्याऐवजी आपण त्या जातीचेच हित पहाण्याची संकुचित जातीय वृत्ति बळावेल. भाषिकदृष्ट्या विभाग पाडलेले असले तरी ते प्रत्यक्षत: जातीयच आहेत. कर व उत्पन्नाच्या निरनिराळ्या योजनांसाठीं खर्चाच्या वाटणीबाबत दोन्ही विभागांत भांडणें होऊन प्रांतिक सरकारचा कारभार चालणेच कठीण होऊन बसेल. सरहद्दीवरच्या प्रांतांत अशी भांडणें नेहमी रहाणे देशाच्या संरक्षणाचे दृष्टीने धोक्याचे आहे अशी टीका या योजनेवर करण्यांत येत आहे.

ही भीति व टीका कितपत वाजवी आहे ? ती वाजवी नाहीं असे मला वाटते. रशिया–चीनचे धर्तीवर काहीं ठिकाणीं स्वायत्त प्रदेश किंवा विभाग निर्माण केल्याने फेररचनेचा प्रश्न समाधानकारकपणे सुटेल व कोणत्या भागात असे स्वायत्त प्रदेश निर्माण करता येतील हे मी सुचवलेच आहे. पंजाबची योजना म्हणजे त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल असून ती स्वागतार्ह आहे असे मला वाटते. रशिया–चीनमध्ये विशिष्ट जमातीसाठीं स्वायत्त प्रदेश निर्माण करण्यांत आले. तेथे जातीय व संकुचित वृत्ति निर्माण झाली नाहीं. पंजाबमध्येहि ती निर्माण होणार नाहीं. अशी वृत्ति केव्हां बळावते ? विशिष्ट जमातीचे विकासाला पूर्ण वाव मिळाला नाही. आपल्या भाषा व संस्कृतीकडे दुर्लक्ष केले जात आहे असे तिला दिसून आले, तर त्यातून ही संकुचित जातीय वृत्ति बळावते. पंजाबच्या नव्या योजनेने शीख व हिंदु, पंजाबी व हिंदी यांच्यातील झगड्यांचे कारणच नाहीसे होईल. विभाग दोन केले तरी गव्हर्नर, कायदेमंडळ, हायकोर्ट पब्लिक सर्व्हिस कमिशन एकच रहाणार आहे. समान प्रश्नांवर त्यामुळें दोन्हीं विभागांत सहकार्य चालूच राहील. यासर्व दृष्टींनी विचार करता ही योजना प्रांताच्या हिताचीच ठरेल. अनुभव निराळा आला तर ती बदलता येईल पण प्रयोग करून पहायला काहींच हरकत नाहीं.

•

प्रांतरचनेसंबंधी १६ जानेवारी १९५६ ला सरकारने आपला निर्णय

e222

जाहीर केला त्यात हिमांचल प्रदेशाचा प्रश्न अनिर्णित ठेवला होता कमिशनचे अध्यक्ष न्या. फाजलअली यांनीं या प्रांतासंबंधी आपली भिन्नमतपत्रिका अहवालास जोडली असून हिमाचलप्रदेश स्वतंत्र घटक करावा आणि तो मध्यवर्ति सरकारचे नियंत्रणाखाली असावा असे सुचविले. क वर्गाचे इतर प्रांत शेजारच्या प्रदेशात समाविष्ट केले तरी हिमाचलप्रदेश स्वतंत्रच ठेवावा असे मत संस्थानी खाते व सरदार पटेलांनींहि व्यक्त केले होते. हिमाचल प्रदेश पंजाबात विलीन करण्यास स्थानिक जनतेचा विरोध आहे. पूर्व पंजाब हायकोर्टाचे अधिकार क्षेत्रांत हिमाचल प्रदेशहि आणावा अशी सूचना १९५० साली करण्यात आली होती पण स्थानिक लोकांच्या विरोधामुळे ती अंमलात आली नाहीं. कमिशनपुढें दिलेल्या साक्षीत प्रांतातील दोन छोटे गट सोडले तर कॉंग्रेस, प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट सर्वच राजकीय पक्षांनी विलीनीकरणास विरोध दर्शविला.

हिमाचल प्रदेशातील लोक पंजाबांत सामील होण्यास तयार नाहीत याचें फाजलअलींच्या मते एक कारण म्हणजे पंजाबी लोकाविषयी त्यांना वाटणारा अविश्वास. पूर्वीच्या संस्थानी राजवटीत पंजाबांतलेच सेवानिवृत्त अधिकारी तेथे नेमले जात. पण ते स्थानिक लोकांचा विश्वास संपादू शकले नाहींत. त्यांचे दारिद्र्य व अज्ञानाचा बाहेरच्या लोकांनी फायदा घेतला. हिमाचल प्रदेशचे लोकांना पंजाबांत दुय्यमस्थान प्राप्त होईल. सरंजामशाहीतून मुक्त झालेले हे लोक उत्साहाने प्रगति करून इतर पुढारलेल्या भागांबरोबर येत असता त्यांच्या उत्साहास पायबंद बसेल असे कोणतेहि पाऊल टाकता कामा नये. पंजाबात सामील होण्यांत त्यांच्या प्रगतीत अडथळे येतील. लोकसंख्येचे प्रमाणांत प्रतिनिधित्व असल्यानें विधिमंडळांत त्यांचा प्रभाव पडणार नाहीं.

विलिनीकरणामुळे कारभाराचे खर्चात बचत होईल असा युक्तिवाद मांडला जातो पण कारभाराची सोय व कार्यक्षमता अधिक महत्वाची असून ती शाश्वत नसेल तर खर्चाचे बचतीस विशेष महत्व नाही. हिमाचल प्रदेशांत न्यायदान पद्धत अधिक स्वस्त व जलद आहे. ज्युडिशिअल कमिशनर प्रत्येक जिल्ह्याला भेट देतो व खटल्याचा त्वरित निकाल लावतो. पंजाबात सामील झाल्यावर या सोयीस हिमाचल प्रदेशचे लोक मुकतील.

त्यांना पंजाव हायकोर्टाकडे अपीले करावी लागतील त्यास जादा खर्च येईल आणि त्यात वेळहि जादा जाईल.

हिमाचल प्रदेश हा एक मागासलेला भाग असून त्याच्या वाढीसाठी बराच खर्च करणे आवश्यक आहे. हा भार उचलून त्याची प्रगति पंजाब किती झपाट्याने करू शकेल याची शंका आहे. पंजावात सामील केल्यावरहि या भागाचे वाढीसाठी मध्यवर्ति सरकारलाच खर्च करावा लागेल हे मान्य केले जात आहे. मग हा प्रदेश मध्यवर्ति सरकारचेच नियंत्रणाखाली का असू नये ? चिनी,. पांगी वगैरे हिमाचल प्रदेशातील सरहद्दीवरच्या वन्य जमाती सुखासमाधानाने राहिल्या पाहिजेत. आपणाकडे इतर लोकांइतके लक्ष दिले जात नाहीं अशी भावना त्यांच्यात निर्माण होऊ न देण्याची काळजी आपण घेतली पाहिजे. तसेच सरहद्दीवरचा हा प्रदेश असल्याने तेथे बाहेरून अतिक्रमण होत नाहीं याचीहि खबरदारी घेतली पाहिजे. मध्यवर्ति सरकारचें नियंत्रणाखाली हा प्रदेश ठेवल्यानेच या गोष्टी साधतील. पंजाब मंत्रिमंडळातच हिमाचलप्रदेशासाठी एक मंत्रि नेमणे, त्याच्यासाठी स्पेशल डेव्हलपमेंटबोर्ड नेमणे या सवलतींनी हिमाचलप्रदेशाचे समाधान होणार नाहीं. कारण एखाद्या विभागासाठीं मंत्रि नेमला तरी तो मुख्यमंत्र्यानेंच निवडलेला असल्याने मंत्रिमंडळाशी चांगले संबंध ठेवण्याच्या विचारापुढे आपल्या विभागाच्या खऱ्या हितसंबंधाकडे त्याचे दुर्लक्ष होण्याचा संभव असतो. डेव्हलपमेंट बोर्डाची रचना कितीहि काळजीपूर्वक केली तरी प्रत्यक्ष मध्यवर्ति कारभाराची सर त्यास येणार नाहीं असे फाजलअलींना वाटते.

### स्वायत्त घटक हाच मार्ग

हिमाचल प्रदेशाचा इतर प्रांतांच्या बरोबरीचा प्रांत करण्याइतकी त्या प्रांताची आर्थिक स्थिति नाही. त्याचा पंजाबात सामील होण्यास विरोध आहे. क प्रांत रद्द करण्याचे कमिशनने व सरकारने ठरवले असल्याने त्याचा क प्रांत करता येत नाहीं. त्याचा कारभार मध्यवर्ति सरकारकडे सोपविण्याची फाजलअलींची सूचना मान्य केली तर इतर मागासलेले प्रदेशहि तशीच मागणी करू लागतील. मध्यवर्ति कारभाराखाली कमीतकमी प्रदेश असणेच संघराज्याच्या तत्वाशी सुसंगत होईल. म्हणून फाजलअलींची सूचनाहि मान्य करता येत नाहीं. अशा परिस्थितीत हिमाचल प्रदेशाचा

प्रश्न कसा सोडवायचा? रशिया—चीनचे अनुकरण केल्याने यातून आपणास मार्ग काढता येईल. रशिया व चीनमध्ये स्वतःचे सांस्कृतिक वैशिष्ट्य असलेल्या विभागांचे स्वायत्त विभाग निर्माण करण्यात आले असून त्यांचे आकारमान व लोकसंख्येप्रमाणें त्यांना स्वायत्ततेचे कमी जास्त अधिकार दिलेले आहेत स्वतंत्र प्रांताचा किंवा घटकांचा दर्जा या प्रदेशांना नाहीं पण कारभारात त्यांना स्वायत्तता आहे. हिमाचल प्रदेशाचे बाबतींत याचे अनुकरण करायचे तर हिमाचल प्रदेश पंजाबात समाविष्ट करावा पण कारभाराचे दृष्टीनें त्याचा स्वायत्त प्रदेश बनविण्यात यावा. हिमाचल प्रदेश देशाचाच एक घटक आहे त्याच्या विकासासाठी मदत करणें आपले कर्तव्य आहे असे समजून पंजाब व मध्यवर्ति सरकारनें शक्य ती मदत करावी. हिमाचल प्रदेशाचा पुरेसा विकास झाल्यावर त्याला पंजाबांत विलीन व्हावेसे वाटले तर तेथील लोकमताचा कौल घेऊन त्यानुसार निर्णय घेण्यांत यावा हिमाचल प्रदेशाचा प्रश्न सोडविण्याचा हाच सर्वांत समाधानकारक मार्ग आहे.

हिमाचल प्रदेश पंजाबमध्यें सामील न करता कांहीं काल तो मध्यवर्ति सत्तेखालीं ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला. वास्तविक असे करण्याची आवश्यकता नाहीं. हिमाचल प्रदेशाचा स्वायत्त प्रदेश करता आला असता किंवा पंजाबच्या पंजाबी व हिंदी विभागासाठीं जशी योजना आखली तशी हिमाचल प्रदेशाचे बाबतींतहि आखता आली असती.

## दिल्ली

पंजाबनंतर दिल्लीचा विचार कमिशनने केला आहे. मध्यवर्ति सरकारची राजधानी या दृष्टीने दिल्ली हा मध्यवर्ति सरकारचे नियंत्रणाखालील प्रदेश रहावा असा निर्णय कमिशनने घेतला असून इतर पर्यायापेक्षा तोच योग्य आहे.

सध्याचा दिल्ली प्रांत कायम ठेवावा काय असा एक विचार कमिशनपुढे होता. सध्या दिल्ली हा क वर्गाचा प्रांत आहे. क वर्गाच्या प्रांतांचे अधिकार आधीच मर्यादित. त्यांत दिल्ली प्रांताचे अधिकारावर आणखी मर्यादा घालण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था. स्थानिक स्वराज्य संस्था, इंप्रूव्हमेंट ट्रस्ट हे विषय प्रांतिक विधिमंडळाच्या कक्षेतून वगळण्यात

आले आहेत. कांहीं अधिकार मध्यवर्ति सरकारकडे तर कांहीं प्रांतिक सरकारकडे यामुळे राजधानीच्या वाढीत अडथळे येत असून कारभाराचा दर्जाहि खालावला आहे.

क वर्गाचे प्रांत ठेवायचे नाहींत त्यांचा मध्यवर्ति नियंत्रणाखालील प्रदेश तरी करायचा किंवा ते लगतच्या प्रांतात विलीन करायचें ही कमिशनची भूमिका आहे. दिल्ली देशाची राजधानी आहे. राजधानी मध्यवर्ति सरकारचेच नियंत्रणाखाली ठेवण्याची बहुतेक देशातील प्रथा आहे व तीच शिफारस कमिशनने केली आहे. फक्त नव्या दिल्लीचा कारभार मध्यवर्ति सरकारकडे सोपवावा अशी एक सूचना करण्यात आली होती पण नवी दिल्ली व जुन्या दिल्लीची फारकत करणे अशक्य आहे. कायदा व सुव्यस्था, लोकांचे सामाजिक जीवन, व्यापार व उद्योग वगैरे दृष्टींनी नवी व जुनी दिल्ली एकच घटक आहे. लोकवस्ती मुख्यतः शहरी आहे तेव्हां कार्पोरेशन स्थापन केल्यानेच तेथील लोकांच्या गरजा व आकांक्षांचे समाधान होईल असे कमिशनला वाटते.

इतर प्रांतांप्रमाणें दिल्लीसाठीं लोकनियुक्त प्रांतिक सरकार न राहिल्याने तेथील लोकांचा मतदानाचा हक्क हिरावून घेतला जात असल्याची तक्रार केली जाते त्याला कमिशनचे उत्तर असे कीं, राजधानीत रहाण्याचे फायदे मिळवावयाचे तर त्यासाठीं ही किंमत तेथील लोकांनी दिली पाहिजे आणि इतर देशांतील राजधान्यांचे मानाने दिल्लीतील लोकांचा मतदानाचा हक्क अजिबात हिरावून घेतलेला नाहीं. पार्लमेंटात त्यांना पूर्ण प्रतिनिधित्व आहे. उलट अमेरिकेतल्या कोलंबिया जिल्ह्यातील लोकांना नगरपालिका, प्रांतिक सरकार व फेडरल सरकार यापैकी कोठेच भाग घेता येत नाहीं.

# उत्तर प्रदेश

उत्तर प्रदेशाच्या सध्याच्या सरहद्दीत कमिशनने कोणताहि बदल सुचविलेला नाहीं पण कमिशनचे एक सभासद सरदार पणीक्कर यांनी अहवालास जोडलेल्या भिन्न मतपत्रिकेत या प्रांताच्या फाळणीची शिफारस केली आहे.

**पणीक्करांची फाळणीची सूचना**

उत्तर प्रदेशाचे फाळणीबाबत पणीक्करांची भूमिका अशी कीं संघ-राज्याचा कारभार यशस्वी व्हावयाचा तर त्याचे घटक समतोल असणें आवश्यक आहे. उत्तर प्रदेश तसा नाहीं. त्य.ची लोकसंख्या ६,३०,००,००० म्हणजे देशाच्या लोकसंख्येच्या एकषष्ठांश आहे. आंध्र, तेलंगण, कर्नाटक व केरळ हे चार प्रांत एकत्र केले तर त्यांची एवढी लोकसंख्या होईल. तसेच पंजाब, राजस्तान व नियोजित मध्यप्रदेश या तीन प्रांतांच्या एकत्रित लोक-संख्येपेक्षाहि उत्तर प्रदेश मोठा आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने घटक असमान असले तर मोठ्या घटकांचे वजन व अधिकार मर्यादित करण्याची दक्षता इतर देशांचे घटनांतून घेण्यांत आली आहे. अमेरिकेत सिनेटमध्यें प्रत्येक घटकाला लोकसंख्येच्या प्रमाणांत नव्हे तर सारखे प्रतिनिधित्व आहे. पण आपल्या घटनेंत अशी तरतूद करण्यांत आलेली नाहीं. लोकसंख्येच्याच प्रमा-णांत उत्तर प्रदेशाला लोकसभेत ८६ ( ४९९ पैकीं ) व राज्यसभेत ३१ (२१६ पैकीं) जागा आहेत. सरकारच्या सध्याच्या रचनेमुळे अखिल भार-तीय प्रश्नांत उत्तर प्रदेशाचे प्रभुत्व किंवा वर्चस्व होते असे मत दक्षिणेतल्या प्रांतांनींच नव्हे तर पंजाब, बंगाल व इतर प्रांतांतल्या लोकांनींहि कमिशन-पुढे व्यक्त केले. ही भावना अशीच कायम राहिली व ती दूर करण्याचे उपाय योजले नाहींत तर हिंदचे ऐक्यास त्यामुळें धोका आहे. अमेरिकन घटनेप्रमाणें सिनेटमध्ये म्हणजे आपल्याकडे राज्यसभत सर्व घटकांना सारखे प्रतिनिधित्व दिले तरी हा प्रश्न समाधानकारकपणें सुटणार नाहीं. कारण राज्यसभेपेक्षा लोकसभेस जास्त महत्त्व आहे. या परिस्थितीत एकच मार्ग म्हणजे उत्तर प्रदेशाची फाळणी करणें.

उत्तर प्रदेश एकात्म (homogeneous) प्रांत असून फाळणीनें आर्थिक घडी बिघडेल असा एक मुद्दा मांडण्यांत येतो. आजचा उत्तर प्रदेश शंभर वर्षांपेक्षा जुना नाहीं. ब्रिटिशांना जसजसे प्रदेश मिळत गेले तसतसे ते एकत्र करून हा प्रांत अस्तित्वात आला. तो पूर्वी एकात्म नव्हता व नंतर त्यातल्या निरनिराळ्या भागातील लोकांत एकीची भावाच फारशी आढळत नाहीं. गढवाल, कुमाव व बुंदेलखंडाच्या डोंगराळ भागातील लोक व गंगेच्या सुपीक खोऱ्यांतील लोक यांच्यांत फारच थोडे साम्य आहे.

स्वाभाविकच त्यांचे प्रश्नहि निराळे असून एवढ्या मोठ्या लोकसंख्येचा कारभार पहाणारे सरकार त्यांच्या विशिष्ट प्रश्नांकडे लक्ष देऊ शकत नाहीं.

## कार्यक्षमतेचा दावा व वस्तुस्थिति

उत्तर प्रदेशाच्या सध्याच्या आकारामुळें कारभारात काटकसर व कार्यक्षमता आली आहे असा दावा मांडण्यात येतो पण तो कसा खरा नाहीं हे पणीक्करांनी आंकड्यांचे आधारे दर्शविले आहे. फायनान्स कमिशनचा १९५१–५२ चा अहवाल पाहिला तर राज्यकारभारावरच्या खर्चाचे शेंकडा प्रमाण उत्तर प्रदेशापेक्षा आसाम, मुंबई, मध्य भारत, म्हैसूर, त्रावणकोर-कोचीन या प्रांतात कमी आहे. राष्ट्रउभारणीच्या योजनांवरचा खर्च सरकार वाढवूं शकते कीं नाहीं ही काटकसर व कार्यक्षमतेची खरी कसोटी आहे. बिहार व ओरिसा सोडले तर बाकी बहुतेक प्रांतात शिक्षण, आरोग्य वगैरें योजनांवरील खर्चाचे शेंकडा प्रमाण उत्तर प्रदेशापेक्षा जास्त आहे. साक्षरतेत 'अ' वर्गाचे प्रांतात उत्तर प्रदेश सर्वात मागासलेला आहे. आरोग्य, वहातूक कायदा व सुव्यवस्था याबाबतींत मुंबई किंवा दक्षिणेकडील प्रांतापेक्षा उत्तर प्रदेशाची स्थिति चांगली आहे असे म्हणता येणार नाहीं.

फाळणीने कांहीं भागांत अडचणी येणार असल्यानें राजकीय अस्थिरता निर्माण होणार असली तर तिला होणारा विरोध समजण्यासारखा आहे. पण अशी कारणे पुढे मांडण्यांत आलेली नाहींत. फाळणीनंतरहि उत्तर प्रदेशची लोकसंख्या चार कोट राहून तो देशातला सर्वात मोठा घटक राहीलच. कानपूरचा प्रमुख औद्योगिक भाग त्यात असेल. अलाहाबाद, लखनौ, बनारस ही शहरे असतील, सध्याचा अवाढव्य आकार कमी झाल्याने कारभारात कार्यक्षमता येईल असे पणीक्करांचे म्हणणे.

उत्तर प्रदेशाचे मीरत, आग्रा, रोहिलखंड व झाशी डिव्हिजन (मीरत डिव्हिजनमधील डेहराडून जिल्हा व रोहिलखंड डिव्हिजनमधील पिलभिट जिल्हा वगळून) विंध्य प्रदेशाचा दतिया जिल्हा, आणि मध्यभारतातील भिंद, मोरेना, गिर्द (ग्वाल्हेर) व शिवपुरी हे चार जिल्हे मिळून एक नवा प्रांत स्थापन करावा अशी पणीक्करांची सूचना आहे. त्याचे क्षेत्रफळ ५१,३४६ चौरस मैल व एकूण लोकसंख्या १९५१ चे खानेसुमारीप्रमाणे २,४३,६५,९३१ असेल. राहिलेल्या उत्तर प्रदेशाचे क्षेत्रफळ ७४,९१८ चौरस

मैल व लोकसंख्या ४,११,८२,०७५ असेल. नव्या प्रांतास आग्रा प्रांत म्हणावे. आग्रा हीच त्याची राजधानी करता येईल. नव्या प्रांताचे उत्पन्न २७ ते २८ कोट रुपये व शिल्लक १ ते १॥ कोट राहील. राहिलेल्या उत्तर प्रदेशाचे उत्पन्न साडे पस्तीस कोटीचे आसपास राहून पावणे चार ते चार कोट रुपये तूट येईल. पण कांही करांचा फेरविचार करून ही सुरवातीची तूट भरून काढता येईल असे पणीक्करांचे मत आहे.

## कमिशनची भूमिका

फाळणीबाबतच्या पणीक्करांच्या सूचनेशी कमिशनचे बाकीचे सभासद सहमत नाहींत. पण फाळणीला विरोध दर्शवितांना पणीक्करांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना त्यानी दिलेली उत्तरे समाधानकारक वाटत नाहींत. कारभाराचे दृष्टीने उत्तर प्रदेश प्रमाणाबाहेर मोठा व अवाढव्य आहे असे पणीक्करांचे म्हणणे. त्याला कमिशनच्या बाकीच्या सभासदांचे उत्तर असे की नियोजित मुंबई, मध्यप्रदेश व राजस्तान क्षेत्रफळाचे दृष्टीने उत्तर प्रदेशापेक्षाहि मोठे होतील. उत्तर प्रदेश प्रमाणाबाहेर मोठा आहे तो क्षेत्रफळाचे दृष्टीने नव्हे तर लोकसंख्येचे दृष्टीने, हा पणीक्करांचा मुद्द होता. तो कमिशनवरील त्यांच्या सहकाऱ्यांनी लक्षातच घेतलेला दिसत नाहीं.

" बंगालच्या फाळणीचे परिणाम पहाता आपण फार सावधगिरीची भूमिका घेतली पाहिजे आणि ज्यामुळे अनावश्यक चळवळ होईल व सध्या नसणारे प्रश्न निर्माण होतील असे काहीहि करता कामा नये." असे पणीक्करांच्या सहकाऱ्यांनी म्हटले आहे पण याबाबतहि पणीक्करांची भूमिका त्यांनी समजावून घेतलेली नाहीं असे वाटते. उत्तर प्रदेशच्या फाळणीची तुलना बंगालच्या फाळणीशी करता येणार नाही. बंगालची फाळणी जातीय दृष्टीनें करण्यांत आली म्हणून त्याचे गंभीर परिणाम झाले. उत्तर प्रदेशची फाळणी राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें करावयाची आहे. त्यामुळे गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाहीं हा पणीक्करांचा युक्तिवादच अधिक पटतो.

शिक्षण, आरोग्य वगैरे राष्ट्र उभारणीच्या सामाजिक कार्यक्रमाना इतर बऱ्याच प्रांतांच्या मानाने उत्तर प्रदेशात कमी खर्च केला जातो हे फायनान्स कमिशनच्या १९५२ च्या अहवालातील आकडे देऊन पणीक्करांनी

दाखविले. हा खर्च अलीकडच्या कांहीं वर्षात वाढला आहे. असे नुसतेच मोघम विधान पणीक्करांचें सहकाऱ्यानी केले आहे व शिक्षणाच्या बाबतींत तो ५० टक्के वाढला असे एकच उदाहरण दिले आहे पण इतर प्रांताच्या तुलनेने हा खर्च वाढला आहे असे त्यांनी दाखविलेले नाहीं. साक्षरतेचे प्रमाणाच्या बाबतीत उत्तर प्रदेश मागे आहे हे त्यांना मान्य करावे लागलेच आहे. जमीनदारी पद्धति नष्ट करण्याचे बाबतीत उत्तर प्रदेश आघाडीवर आहे. एवढी एकच गोष्ट त्याच्या कार्यक्षम कारभाराच्या बाजूने त्यांना दाखविता आली आहे.

उत्तरप्रदेश लोकसंख्येने इतर प्रांतांपेक्षा मोठा. पार्लमेंटच्या दोन्ही गृहात त्याला इतरांपेक्षा जास्त जागा. त्यामुळे अखिल भारतीय प्रश्नांमध्ये तो आपले वजन अधिक पाडू शकतो अशी कांहीं प्रांतांची तक्रार आहे. ही तक्रार समर्थनीय नाहीं असें कमिशनचे म्हणणे. पार्लमेंटच्या दोन्ही गृहात उत्तर प्रदेशाला इतरांपेक्षा जास्त जागा असल्या व तेथील सर्व सभासदांनी जरी एक गट केला तरी पार्लमेंट किंवा मंत्रिमंडळावर वजन पाडण्याएवढा तो मोठा गट होत नाहीं आणि पार्लमेंटात जे सभासदांचे गट बनतात ते प्रांतवार नव्हे तर पक्षवार बनतात असा कमिशनचा युक्तिवाद आहे त्यावर एवढेच म्हणता येईल की, पक्षवार गट बनले तरी त्यात अधिकाररूढ पक्षात इतर प्रांतांपेक्षा उत्तर प्रदेशचे सभासदांचीच संख्या जास्त असल्याने इतरापेक्षा ते आपली बाजू जास्त प्रभावीपणें मांडून सरकारी धोरणावर प्रभाव पाडू शकतात असा अनुभव इतर प्रांतांचे सभासदांना येतो ही गोष्टहि नाकारता येणार नाहीं प्रांताची फाळणी हाच त्यावर उपाय आहे. राज्यकारभाराच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनेहि ती आवश्यक आहे.

उत्तर प्रदेशच्या फाळणीची मागणी करणारे निवेदन प्रांताच्या पश्चिमेकडच्या १६ जिल्ह्यातील ९७ आमदारांनी सादर केले होते पण पुढे ७० आमदारांनी त्यातून अंग काढून घेतले. याचा उल्लेख कमिशनने अहवालात केला आहे. फाळणीच्या मागणीला फारच थोडा पाठिंबा आहे असे यावरून दिसते, पण फाळणीची मागणी करणाऱ्या ९७ सभासदांपैकी ७० सभासद गळतात ते कांहीं केवळ आपल्या चुकीची खात्रीं पटल्यामुळे नव्हे तर त्यांच्यावर दडपण आले असणेहि शक्य आहे. कारभाराची कार्यक्षमता हे

प्रांतरचनेच्या आधारभूत तत्वांपैकी एक तत्व कमिशनने मानलेले आहे. तेव्हां फाळणीची मागणी असो किंवा नसो, कारभाराच्या कार्यक्षमतेसाठी ती आवश्यक असेल तर केली पाहिजे.

# बिहार

बिहारचे फेररचनेसंबंधी शिफारस करतांना कमिशनने पुढील मागण्यांचा विचार केला आहे.

(१) दक्षिण बिहारमध्ये झारखंड प्रांताची स्थापना.

(२) सिंधभूम जिल्ह्यातील सेराईकेल्ला सबडिव्हिजन ओरिसास जोडावी ही ओरिसाची मागणी.

(३) पश्चिम बंगालने सरहद्दीत सुचविलेले बदल.

(४) पश्चिम बंगालच्या उत्तरेकडचे दार्जिलिंग, जलपैगुडी, माल्डा व पश्चिम दीनाजपूर व दक्षिणेकडचे सुंदरगड, कुंजहार व मयूरभंज हे भाग बिहारला मिळावे ही बिहारची मागणी.

## झारखंड प्रांतांची मागणी

दक्षिण बिहारमधील छोटा नागपूर डिव्हिजन व संथाळ परगणे एकत्र करून झारखंड प्रांत स्थापावा अशी झारखंड पक्षाची मागणी आहे. प्रांतातील आदिवासी व वन्य जमातींचा हा पक्ष आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुका त्याने याच प्रश्नावर लढविल्या. याशिवाय छोटा नागपूर डिव्हिजन व संथाळ परगणा जिल्ह्यातील ३३ आमदारांनीं प्रांताच्या फाळणीची मागणी कमिशनपुढे मांडली. पण झारखंड पक्ष व हा ३३ आमदारांचा गट यांच्यामागे बहुमत नाहीं. दक्षिण बिहारबाहेर तर फाळणीला विरोध आहेच पण खुद्द दक्षिण बिहारमध्येहि या दोन गटांशिवाय इतरांचा फाळणीला विरोध आहे. छोटा नागपूर डिव्हिजन आणि संथाळ परगणा एकत्र केले तरी त्यात वन्य जमातींची वस्ती एकतृतीयांशापेक्षा फारशी जास्त नाहीं. शिवाय फाळणीचा परिणाम बिहारच्या अर्थव्यवस्थेवर होईल. कोळशाच्या खाणी व प्रमुख औद्योगिक विभाग दक्षिण बिहारमध्ये असून बाकीचा बिहार शेतीप्रधान आहे. दक्षिण बिहारवरच त्याची वाढ अवलंबून आहे. छोटा नागपूरकडे बिहार सरकारनें दुर्लक्ष केले अशी तक्रार केली जाते. छोटा नागपूरमध्ये

पाटबंधाऱ्याच्या योजना कमी आहेत हे खरे पण उत्तर बिहार शेतीप्रधान असल्याने तेथे त्या प्रथम हाती घेण्यात आल्या व आता दक्षिण बिहारमध्येहि घेतल्या जाणार आहेत. या सर्व गोष्टी लक्षात घेता बिहारच्या फाळणीस कमिशनचा विरोध आहे.

## आदिवासींचा स्वायत्त प्रदेश

बिहारच्या फाळणीची आवश्यकता नाहीं. पण रशिया चीनचे धर्तीवर आदिवासी वस्तीचा बिहारअंतर्गत स्वायत्तप्रदेश स्थापन करण्यात यावा. छोटा नागपूर डिव्हिजन व संथाळ परगणा जिल्ह्यासाठी खास विकास मंडळ (स्पेशल डेव्हलपमेंट बोर्ड) स्थापण्याची शिफारस कमिशनने केली आहे पण तेवढ्याने आदिवासींचे समाधान होणार नाहीं. दुसरे कोणीतरी आपल्यासाठी सुधारणांच्या योजना आखीत आहेत यापेक्षा आपणच आपले भाग्यविधाते आहोत अशी भावना त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे. स्वायत्त प्रदेश केल्याने ते साध्य होऊ शकेल.

सिंधभूम जिल्ह्यातील सेराईकेल्ला व खरस्वान भाग ओरिसाला जोडावेत अशी ओरिसाची मागणी आहे. ही दोन्ही संस्थाने प्रथम ओरिसा-तच विलीन करण्यांत आली होती पण १९४८ मध्ये निर्णयाचा फेरविचार करून ती बिहारला जोडण्यांत आली. या भागात ओरिसा भाषिकांचा गटच सर्वात मोठा आहे म्हणून ते ओरिसाला जोडावे असा ओरिसचा दावा आहे पण ग्रामीण भागांत ओरिसा भाषिकांची वस्ती फक्त २६ टक्के असून तीहि विशिष्ट भागांत एकवटलेली नाही. सबंध सिंधभूम जिल्हाच ओरि-साला जोडावा म्हटले तर तेहि समर्थनीय होणार नाहीं. कारण भौगोलिक स्थान व दळणवळण मार्गाचे दृष्टीने तो छोटानागपूरशीच निगडित आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेता ओरिसाची मागणी कमिशनने नाकारली हे योग्यच झाले असे दिसून येईल.

## बंगाल–बिहार सीमेचा प्रश्न

यानंतरचा प्रश्न म्हणजे बंगाल–बिहार सरहद्दीचा. पूर्णिया जिल्ह्या-तील महानंदा नदीच्या पूर्वेकडचा सर्व भाग बंगालला जोडावा अशी बंगा-लची मागणी आहे. पश्चिम बंगाल भौगोलिकदृष्ट्या सलग होण्याचे दृष्टीनें हा भाग त्या प्रांताकडे असणें आवश्यक आहे असे बंगालचे नेत्यांना वाटते.

बंगालचे उत्तरेकडचे जिल्हे आणि दक्षिणेकडचे जिल्हे यांना जोडणारा मोठा रस्ता (नॅशनल हायवे) याच भागातून जातो. पण त्यासाठीं हा सबंध भाग बंगालला जोडण्याची आवश्यकता नाही. त्या रस्त्याशी संबंधित असे पुढील प्रदेश बंगालला जोडावे असे कमिशनने सुचविले आहे. (१) किशनगंज सबडिव्हिजनमधील महानंदा नदीच्या पूर्वेकडचा भाग (२) त्याच्याशीच सलग असा गोपालपूर रेव्हिन्यू ठाण्याचा हमरस्त्यापर्यंतचा सलग भाग. गोपालपूर ठाण्याचे भागातील हमरस्त्याचे नियंत्रण पश्चिम बंगाल सरकारकडे असावे.

किशनगंज सबडिव्हिजनमध्ये बहुसंख्य वस्ती मुस्लीम आहे. त्यांचे भाषिक व सांस्कृतिक हक्क सुरक्षित राखण्यासाठी त्या भागात शिक्षण व कारभाराचे बाबतीत उर्दूचे खास स्थान मान्य करण्यात यावे, तसेच या भागात सध्याच एवढी दाट वस्ती आहे कीं, निर्वासितांची पुनर्व्यवस्था तेथे केली जाणार नाहीं असे आश्वासन पश्चिम बंगाल सरकारने द्यावे असेहि कमिशनने सुचविले आहे.

पूर्णिया जिल्ह्याबाबतच्या या शिफारशी करतांना बंगालची न्याय्य मागणी मान्य करण्याबरोबरच बिहारवर अन्याय होऊ नये याची दक्षता कमिशनने घेतली आहे असे दिसून येईल. सरकारनेहि त्यात बदल केला नाही.

संथाळ परगण्याचा कांहीं भाग बंगालला जोडावा. ही बंगालची दुसरी महत्वाची मागणी आहे, पण या जिल्ह्यात बंगाली भाषिक फारच थोडे आहेत. राजमहाल सबडिव्हिजनमध्ये ते १६ टक्के पाकरमध्ये १३ टक्के आणि इतर भागात त्यापेक्षाहि कमी आहेत. संथाळ लोकांनीहि बंगालमध्ये सामील होण्यास अनुकूलता दर्शविलेली नाहीं. या सर्व गोष्टी विचारात घेता संथाळ परगणा बिहारमध्येच ठेवण्याचा कमिशनचा निर्णय योग्य आहे.

मानभूम जिल्हाहि बंगालला जोडण्याची बंगालची मागणी आहे. मानभूम जिल्हा दामोदर नदीने विभागलेल्या दोन निरनिराळ्या भागांचा मिळून झालेला आहे. त्यापैकीं धनबाद भागात हिंदी भाषिक बहुसंख्य आहेत तर पुरुलिया भागात बंगाली भाषिक बहुसंख्य आहेत. तर धनबाद भागात हिंदी भाषिक ६५ टक्के आहेत. हा भाग बिहारमध्येच ठेवण्याची कमिशनची शिफारस आहे. पुरुलिया उपजिल्हा (चास ठाणे वगळून) मात्र बंगालला

जोडावा असे कमिशनने सुचविले आहे. चास ठाणे धनबादशी सलग असल्याने वगळण्यात आले आहे. पण सरकारने या निर्णयात थोडा बदल केला. पुरुलिया उपजिल्ह्याचा जो भाग पश्चिम बंगालला जोडावयाचा त्यांतून चंदिल ठाणा व बाराभूम ठाण्यातील पतमडा पोलिस स्टेशन त्यातून वगळण्यात आले. हा बदल आपण का केला याचे कोणतेहि स्पष्टीकरण सरकारने केलेले नाहीं. सरकारी निर्णयाचे निषेधार्थ बंगालमध्ये हरताळ व निदर्शने होऊन असंतोष व्यक्त करण्यात आला.

पश्चिम बंगालचे दार्जिलिंग व इतर कांहीं जिल्हे तसेच बिहारला सलग असलेले ओरिसाचे तीन जिल्हे बिहारला जोडावे अशी त्या प्रांताची मागणी होती पण भाषा, संस्कृति, कारभाराची सोय किंवा दुसऱ्या कोणत्याहि विशेष कारणांसाठीं ती समर्थनीय असल्याचे कमिशनला आढळून आले नाही.

कमिशनने सुचविलेल्या बिहार प्रांताची लोकसंख्या ३,९००,००० व क्षेत्रफळ ६६,५२० चौरस मैल राहील.

## बंगाल

बिहारचा विचार करतांना सीमेवरील प्रदेशासंबंधी बंगालने केलेल्या मागण्यांचा विचार केलाच आहे. आता त्या प्रांताच्या इतर मागण्या कितपत न्याय्य आहेत ते पाहू या.

आसामचा गोलपारा जिल्हा बंगालला जोडावा अशी बंगालची मागणी आहे. ती अमान्य करताना कमिशनने म्हटले आहे की, या जिल्ह्यांत बंगाली भाषिक बहुसंख्य आहेत असे १९५१ चे खानेसुमारीवरून दिसत नाहीं. पण १९३१ व १९५१ चे खानेसुमारीचे आंकड्यांत आश्चर्यकारक तफावत आहे व त्याचे समाधानकारक स्पष्टीकरण करता येणार नाहीं असे कमिशननेच मान्य केले आहे. सबंध जिल्हा बंगालला जोडणे योग्य नसले तरी खेडे हा घटक पाडून बहुसंख्य बंगाली भाषिक प्रदेश त्या प्रांतात समाविष्ट केला तर असमाधानाला जागा रहाणार नाहीं.

बंगाल-बिहार सीमेवरील प्रदेशासंबंधी कमिशनच्या शिफारशी व सरकारने घेतलेला निर्णय यामुळे बंगालचे समाधान झाले नाहीं. मागण्यांचे

मानाने फारच थोडा प्रदेश त्या प्रांतास मिळाला. बिहारचा १०,००० चौरस मैलांचा प्रदेश बंगालला जोडावा अशी मागणी न्यू बंगाल असोसिएशनने १९४८ साली धटना समितीकडे पाठविलेल्या निवेदनांत केली होती. त्याच-वेळी सरकारचेवतीने कै. नलिनीरंजन सरकार यांनीं एक निवेदन तयार केले त्यांत १६,००० चौरस मैल प्रदेशाची मागणी केली होती. पश्चिम बंगाल असेंब्लीत १९५२ साली पास झालेल्या ठरावांत हीच मागणी करण्यात आली. पश्चिम बंगाल सरकारने प्रांतरचना कमिशनकडे जे अधिकृत निवेदन पाठविले त्यांत ११८४० चौरस मैल क्षेत्रफळ व ५७ लाख लोक-संख्या असलेल्या टापूची मागणी केली. पश्चिम बंगाल प्रदेश कॉंग्रेसने ६७ लाख लोकसंख्या असलेल्या १३,९५० चौरस मैल प्रदेशाची मागणी केली. या निरनिराळ्या मागण्यांच्या मानाने कमिशनने फक्त १७ लाख लोक-संख्येचा ३८१२ चौरस मैल प्रदेश बंगालला जोडण्याची शिफारस केली. सरकारी मागणीच्या फक्त एक तृतीयांश आणि प्रदेश कॉंग्रेसचें मागणीच्या एक चतुर्थांश प्रदेश बंगालला मिळाला.

नियोजित बंगालचे क्षेत्रफळ ३४,५९० चौरस मैल व लोकसंख्या २,६५,००,००० आहे.

## बंगाल बिहारचा एक प्रांत

कमिशनच्या शिफारशींनी बंगाल व बिहार दोन्ही प्रांतांचे समाधान झाले नाहीं. दोन्ही प्रांतांत निदर्शने झाली. हे वाद मिटविण्याचा एक मार्ग म्हणून बंगाल बिहारचा एक प्रांत करण्याची योजना पुढे आली. दोन्ही प्रांतांच्या मुख्यमंत्र्यानी संयुक्त पत्रक काढून या योजनेस पाठिंबा दर्शविला व अंतिम निर्णय असेंब्लीच्या बहुमतानेच घेतला जाईल. असे जाहीर केले. त्याप्रमाणे बिहार असेंब्लीत बंगाल बिहार एकीकरणाचे योजनेस पाठिंबा देणारा ठराव पास झाला.

बिहार बंगालचा एक द्विभाषिक प्रांत करण्याने दोन्ही प्रांतांच्या फेर-रचनेचा प्रश्न समाधानकारकपणे सुटेल कां ? दोन प्रांतांचा एक प्रांत केल्याने राज्यकारभाराचा खर्च कमी होईल असे सांगण्यात येते. दोन गव्ह-र्नर, दोन मंत्रिमंडळे कमी झाल्याने खर्च थोडा कमी होईल हे खरे पण अधि-काराच्या जागांबाबत, निरनिराळ्या योजनांच्या खर्चाचे वाटणीबद्दल, नोक-

ऱ्यातील बंगाली व बिहारीचे प्रमाणाबाबत वाद निर्माण होत रहातील. पक्षपाताच्या तक्रारी उद्भवतील. दोन प्रांत एक करण्यास बिहार असेंब्लीने मंजुरी दिली असली तरी राजधानी पाटणा कीं कलकत्ता, मुख्यमंत्री बिहारी कीं बंगाली या वादांना आताच तोंड फुटले आहे. द्विभाषिक प्रांतातील कटकटींचा कटु अनुभव मध्यप्रदेश, हैद्राबाद व मुंबई प्रांतात पुरेसा आला असतांना, बंगाल बिहारमध्ये तोच प्रयोग पुनः कशासाठीं ? दोन्ही प्रांतात सध्या असमाधान आहे ते सरहद्दीवरच्या प्रदेशाची विभागणी योग्य झाली नाहीं म्हणूनच ना ? भाषिकदृष्टचा खेडे हाच सर्वात लहान घटक मानून विभागणी केल्यानें हा प्रश्न सोडविता येईल.

# आसाम

हिंदच्या ईशान्य सीमेवरील आसाम प्रांताचे फेररचनेचा विचार करतांना मुख्यतः पुढील मागण्या लक्षात घ्याव्या लागतील.

(१) सध्याचे आसाममध्ये त्रिपुरा व मणिपूर समाविष्ट करावे आणि नॉर्थ ईस्ट फ्रांटिअर एजन्सीचे कारभाराशी आसपासचे अधिक निकटचे संबंध असावे.

(२) टेकडयांचे प्रदेशाचा प्रांत स्थापन करावा.

(३) नाग टोळीवाल्यांच्या प्रदेशाचे आसाम व हिंदपासून वेगळे असे स्वतंत्र राज्य स्थापन करावे.

(४) कामतापूर प्रांत स्थापन करून त्यांत गोलपारा, गारो टेकडया, कुचबिहार, दार्जिलिंग व जलपैगुडी हे प्रदेश समाविष्ट करावे.

(५) पूर्वांचल प्रांत स्थापन करून त्यांत काचारभोवतालचे प्रदेश समाविष्ट करावे.

## त्रिपुरा व मणिपूरचा प्रश्न

त्रिपुरा आसाममध्ये समाविष्ट करावे अशी शिफारस कमिशनने केली पण सरकारने ते मध्यवर्ति कारभाराखालीच ठेवण्याचे ठरविले आहे. वास्तविक क वर्गाचे प्रांत शेजारच्या प्रदेशात विलीन करावयाचे या धोरणानुसार त्रिपुरा आसाममध्ये विलीन करणेच योग्य होते तसे केल्याने दुसरा एक फायदा झाला असता, या भागातील सबंध हिंद पाक सीमा एकाच सरकारचे

म्हणजे आसामचे नियंत्रणाखाली आली असती. त्रिपुरात ५९ टक्के बंगाली भाषिक आहेत पण त्याची मागणी बंगालने केलेली नाहीं किंवा तेथील लोकांचीहि बंगालमध्ये समाविष्ट करण्याची मागणी नाहीं. त्रिपुराचे आसामशीच अधिक निकटचे संबंध आहेत. त्रिपुराचे विकासासाठी वेगळी अॅडमिनिस्ट्रेटिव्ह डिव्हिजन करण्यांत यावी, त्यांत शिक्षण व कारभारासाठीं बंगाली भाषा मान्य करावी. वन्य जमातींनाहि योग्य संरक्षण हक्क द्यावे अशा कमिशनच्या शिफारशी आहेत त्या पटण्यासारख्या असताहि सरकारनें त्रिपुरा आसाममध्ये विलीन केले नाहीं.

त्रिपुराप्रमाणेच मणिपूरहि आसामला जोडावे अशी मणीपूरची मागणी होती. ती मान्य न करता मणिपूर सध्या मध्यवर्ति कारभाराखालीच रहावे असे कमिशनने सुचविले आहे. त्रिपुराप्रमाणेच मणिपूर क वर्गाचा प्रांत आहे. तेव्हां ते आसाममध्ये समाविष्ट करावयास हवे होते. मग कमिशनने असा निर्णय कां घेतला? मणिपूरला स्वतःची विशिष्ट संस्कृति असून आसाम किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रांतांत सामील होण्यास तेथील लोकांचा विरोध आहे. आसामशी त्यांचे भाषिकदृष्ट्याहि निकट संबंध नाहींत. सरहद्दीवरचे टेकड्यांचे जिल्हे, त्रिपुरा आणि त्यांचे जोडीला मणिपूर या सरहद्दीवरील महत्वाचे विभागाचा कारभार आसामकडे सोपवून त्या प्रांतावर कारभाराचा जादा भार लादणें योग्य नाहीं असे कमिशनचे म्हणणें पण मणिपूर फार काल स्वतंत्र ठेवता येणार नाहीं ते अखेर आसाममध्येच समाविष्ट करावे लागेल हे कमिशनला मान्य आहे. मग आजच ते समाविष्ट कां करू नये? आसामवर त्यामुळे जो कारभाराचा जादा भार पडणार त्यासाठी मध्यवर्ति सरकारने मदत द्यावी. नाहीतरी मध्यवर्ति नियंत्रणाखाली तो प्रदेश ठेवून सरकार त्याचा खर्च करणारच. आसाममध्ये सामील केल्यानें मणिपुरी लोकांच्या भाषिक व सांस्कृतिक विकासास अडथळा येणार नाहीं याची मात्र दक्षता घेतली पाहिजे. त्यासाठीं त्रिपुराकरता जशा तरतुदी कमिशननें सुचविल्या तशाच मणिपूरसाठीहि करण्यांत याव्या. पण ते मध्यवर्ति कारभाराखाली ठेवण्याचे कारण नाहीं.

### ईशान्य सीमा प्रदेशाचा प्रश्न

नॉर्थ ईस्ट फ्राँटिअर एजन्सीचा प्रदेश घटनेचे दृष्टीनें आसामचाच भाग

असला तरी त्याचा कारभार राष्ट्राध्यक्ष यांचेकडे सोपविला असून ते तो गव्हर्नरांमार्फत पहातात. गेली कांहीं वर्षे मध्यवर्ति सरकार या प्रदेशासाठी बराच पैसा खर्च करीत आहे हा प्रदेश नुसता घटनेच्या दृष्टीनें आसामचा भाग न ठेवता त्याचा कारभारहि अधिकाधिक प्रमाणांत आसामकडे सोपवावा अशी आसामची मागणी आहे. पण ती कमिशनने व सरकारनें मान्य केली नसून सध्याचीच व्यवस्था कायम ठेवण्याचे ठरविले आहे. वास्तविक मध्यवर्ति सरकार या भागाचे कारभारावर जेवढा खर्च करते तेवढी मदत आसामला दिली तर तोहि त्याचा कारभार चांगल्या प्रकारे पाहू शकेल आणि ईशान्य सीमेवरील सर्व प्रदेशाचा कारभार कांही प्रांतिक व काही मध्यवर्ति सरकारकडे न रहाता एकाच सरकारचे नियंत्रणाखाली येईल व त्यामुळे संरक्षणास अधिक बळकटी येईल.

**टेकड्यांचे प्रांताची मागणी**

आसाममधील सर्व टेकड्यांचे जिल्ह्यांचा स्वतंत्र प्रांत स्थापन करावा अशी मागणी कमिशनपुढे करण्यात आली. वन्य जमातींच्या नेत्यांची एक परिषद ऑक्टोबर १९५४ मध्ये गारो टेकड्यातील तुरा येथे भरून त्यात अशा प्रांताची मागणी करण्यात आली. ही मागणी कमिशनला मान्य नाहीं.

ब्रिटिश राजवटींत इतर प्रदेशातींल लोकांचा संपर्क या प्रदेशाला पोचू नये असा प्रयत्न हेतुपूर्वक करण्यात आला. हिंदी अधिकाऱ्यांनाहि या प्रदेशांत जाऊ देत नसत. युरोपियन व ख्रिस्ती मिशनऱ्यांवर मात्र असा निर्बंध नव्हता. त्यांच्या प्रचारामुळे या वन्य जमातीत फूट पडली व त्यांच्या कल्पनांचा पगडा असलेला एक वर्ग निर्माण झाला. स्वतंत्र प्रांताची मागणी मुख्यत: या वर्गाची आहे. वन्य जमातीतील सर्वसामान्य जनतेचा तिला पाठिंबा नाहीं. अशा परिस्थितींत स्वतंत्र प्रांत स्थापन करणे त्यांच्या हिताचे होणार नाहीं असे कमिशनचे मत आहे.

टेकड्यांचे प्रदेशासाठी विकासाच्या योजना सरकारने आंखल्या आहेत. या प्रदेशाचा स्वतंत्र प्रांत केला आणि मध्यवर्ति सरकारने त्याला मदत दिली तरी या विकास योजना पार पाडण्यास आवश्यक तो पैसा, साधने किंवा मनुष्यबळ या प्रदेशाजवळ नाही म्हणून त्याचा प्रांत करता येणार नाहीं असे दुसरे कारण कमिशनने दिले आहे.

टेकड्यांचे प्रदेशाचा निराळा प्रांत केल्याने कारभाराचा खर्च वाढेल. आसाम व या प्रदेशात धोरण आणि कार्यक्रमाचे बाबतीत एकसूत्रीपणा आणणे कठीण जाईल. दोन्ही प्रांतांची राजधानी, गव्हर्नर, हायकोर्ट व इतर अनेक गोष्टी समाईक असाव्या असे सुचविण्यात आले आहे पण त्यामुळेहि प्रत्यक्षात गैरसोय आणि झगडेच निर्माण होतील असे कमिशनला वाटते.

स्वतंत्र प्रांताबाबत टेकड्यांचे प्रदेशातच एकमत नाहीं. युनायटेड मिकिर व उत्तर काचार टेकट्या आणि मिझो ( लुशाई ) टेकड्या स्वतंत्र प्रांतास अनुकूल नाहींत. लुशाई टेकड्यांचे जिल्हा कौन्सिल व कार्बी-आद-खार ( मिकिर हिल्स नॅशनल कौन्सिल ) सध्याचीच परिस्थिति कायम राखण्यास अनुकूल आहेत. स्वतंत्र प्रांताची चळवळ फक्त गारो, खासी व जेंतिया प्रांतापुरती मर्यादित आहे पण तेथेहि एका वजनदार गटाचा स्वतंत्र प्रांतास विरोध आहे. या गोष्टी लक्षात घेता टेकड्यांचे प्रदेशाचा निराळा प्रांत करू नये अशी शिफारस कमिशनने केली आहे.

टेकड्यांचे प्रदेशाचा स्वतंत्र प्रांत करू नये हे मान्य पण सध्याची परिस्थिति समाधानकारक नाहीं. सध्या या प्रदेशासाठी जिल्हा व प्रादेशिक स्वायत्त कौन्सिले स्थापन करण्यात आली आहेत पण त्यांना पुरेशी स्वायत्तता नाहीं. ती अधिक प्रमाणात मिळावी अशी तेथील नेत्यांची मागणी आहे ती पुरी करणे मात्र आवश्यक आहे. विकास योजना आंखणे व पार पाडणे सोपे जावे यासाठी या प्रदेशाकरिता एक कमिशनर व डेव्हलपमेंट बोर्ड नेमण्याची शिफारस कमिशनने केली आहे. तात्पुरती योजना म्हणून ते ठीक आहे पण अधिक स्वायत्तता देणे हाच खरा मार्ग आहे.

## नागांची स्वतंत्र राज्याची मागणी

नाग टोळ्यांचे प्रदेशाला तर नुसता स्वतंत्र प्रांत नको असून हिंदुस्थानपासून स्वतंत्र असे राज्यच हवे आहे. स्वायत्त कौन्सिलांच्या निवडणुकीवर नागांनी बहिष्कार घातला व त्यामुळे तेथील कारभार सध्या आसाम सरकारलाच प्रत्यक्षपणे पहावा लागत आहे. या प्रदेशाचे बाबतीत सध्या कोणताहि बदल करू नये असे कमिशनला वाटते. मिशनऱ्यांच्या एकतर्फी प्रचारामुळे या भागात हिंदविरोधी वृत्ति निर्माण झाली असून स्वतंत्र नाग राज्याची मागणी त्यातूनच उद्भवलेली आहे. यावर उपाय म्हणजे या प्रदे-

शाला अधिक स्वायत्तता देणे पण त्याचबरोबर त्यांच्यात फुटीरवृत्ति वळावणार नाहीं अशी दक्षता घेणे. त्यासाठी या प्रदेशाचे विकासाचा कार्यक्रम विलंब न लावता हाती घेतला पाहिजे व तेथील लोकांच्या सहकार्यानेच तो पार पाडला पाहिजे. म्हणजे मिशनरी प्रचाराचा पगडा कमी होऊन हिंदबद्दल त्यांना विश्वास वाटू लागेल व स्वतंत्र राज्याची मागणी स्वाभाविकच मागे पडेल.

## पूर्वाचल प्रांताची सूचना

पूर्वाचल प्रांत स्थापन करून त्यांत काचार, त्रिपुरा, पिझो (लुशाई) टेकड्या, नाग टेकड्या, मणिपूर व नेफा (नॉर्थ ईस्ट फ्रांटिअर एजन्सी) हे प्रदेश समाविष्ट करावे अशी मागणी काचार राज्यपुनर्रचना समितीनें कमिशनपुढे मांडली. कमिशनला ती मान्य नाही कारण एकतर हा प्रांत तुटीचा होईल हे त्या समितीनेच मान्य केले आहे. त्यांच्या तीन बाजूंना परदेशी सरहद्द असेल. तिची सुरक्षितता राखण्याइतकी साधनसंपत्ति व स्थैर्य या प्रांतास असणार नाहीं असे दुसरे कारण कमिशननें दिले आहे.

पूर्वाचल प्रांताची मागणी मुख्यत: आसाममधील बंगाली लोकांची आहे. बंगाली भाषेकडे आसाम सरकार दुर्लक्ष करते. याचे एक उदाहरण म्हणून असे सांगण्यात येते की १९४७-४८ मध्ये गोलपारा जिल्ह्यात बंगाली माध्यमाच्या सरकारी प्राथमिक शाळा २५२ होत्या. त्यांची संख्या कमी होत होत आता फक्त एक शाळा तेथे आहे. या तक्रारी खऱ्या असल्या तरी त्यावर उपाय कमिशनच्या मताप्रमाणें स्वतंत्र प्रांत निर्माण करणें हा नसून बंगाली भाषिकांचे भाषिक व सांस्कृतिक हक्क सुरक्षित राखले जावेत यासाठी तरतूद करणें हाच आहे.

गोलपारा, गारो टेकड्या, जलपैगुडी, कुचबिहार व दार्जिलिंग हे प्रदेश समाविष्ट करून पूर्वाचलाच्या वायव्येस कामतापूर प्रांत स्थापन करावा अशीहि एक मागणी कमिशनपुढे करण्यांत आली. पण पूर्वाचलाला ज्या कारणांसाठी विरोध केला त्याच कारणांसाठी कामतापूर प्रांत स्थापण्यासहि कमिशनचा विरोध आहे व तो योग्य आहे.

## ईशान्य प्रदेशाचा एकच प्रांत

आसामच्या फेररचनेसंबंधी निरनिराळ्या सूचनांचा विचार केल्यावर

सबंध ईशान्य प्रदेशाचा एकच प्रांत करणे हेच संरक्षणाच्या व कारभाराच्या दृष्टीने सोयीचे व हिताचे होईल असे वाटते. नॉर्थ ईस्ट फ्रॉंटिअर एजन्सी म्हणजे ईशान्य सीमेवरील टोळीवाल्यांचे प्रदेशाच्या कारभारासाठी मध्यवर्ति सरकार आज जो खर्च करीत आहे तेवढी मदत आणखी कांहीं वर्षे असामला द्यावी लागेल हे खरे पण तो प्रदेश मध्यवर्ति कारभाराखाली न ठेवता आसाममध्ये समाविष्ट करणेच योग्य होईल, पण हा बदल न करता सरकारने सध्याचाच आसाम प्रांत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

# ओरिसा

आसामनंतर कमिशनने मणिपूरचा विचार केला पण मणिपुरचे विवेचन आपण आसाम बरोबरच केलेले असल्याने त्यासंबंधी पुन: लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

कमिशनने सर्वात शेवटी विचारात घेतलेला प्रांत म्हणजे ओरिसा या प्रांताचे फेररचनेसंबंधात मुख्यत: पुढील दोन मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

(१) मयूरभंज, सुंदरगड व कुंजहार हे ओरिसातील उत्तरेकडचे तीन जिल्हे बिहारला जोड वे अशी बिहारची मागणी आहे.

(२) सबंध कोरापत जिल्हा पार्लाकिमेडी इस्टेट व गंजम जिल्ह्यातील छत्तरपूर आणि बेहरामपूर तालुक्यांचा कांहीं भाग मिळून ऋषिकुल्य नदीपर्यंतची किनारपट्टी आंध्रला जोडावी अशी आंध्रची मागणी आहे.

बिहार व आंध्रचा विचार करताना या मागण्यांचा विचार आपण केलेलाच आहे.

ओरिसाने इतर प्रदेशाच्या बाबतीत केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणें आहेत.

(१) श्रीककुलम जिल्ह्यातील वंशधारा नदीपर्यंतचा किनारपट्टीचा प्रदेश.

(२) रायपूर जिल्ह्यातील फुलझहार व बिंद्रा–नवाढा हे माजी जमीनदारीचे भाग. बिलासपूर जिल्ह्यातील चंद्रपूरचा माजी जमीनदारी भाग व बस्तर जिल्ह्याचा काही भाग.

(३) बिहारचा सिंघभूम जिल्हा व विशेषत: सराईकेला व खरस्वान.

(४) पश्चिम बंगालच्या मिदनापूर जिल्ह्यातील नैऋत्य भाग.

श्रीककुलम जिल्ह्यात वंशधारा नदीपर्यंतचे किनारपट्टीचे टापूत ओरिया भाषिकांची वस्ती जास्त असल्याने ओरिसाला तो पाहिजे आहे पण सबंध जिल्ह्यात तेलगू वस्ती ८९ टक्के आहे. इच्छापुरम, सोमपेटा व नेव–काली तालुक्यातहि तेलगू बहूसंख्य आहेत म्हणून किनारपट्टीचा हा छोट साच टापू आंध्रपासून अलग काढून ओरिसाला जोडण्यास कमिशनचा विरोध आहे.

मध्यप्रदेशातल्या रायपूर जिल्ह्यातील फुलजहार व बिंद्रा-नवागड भागावर, तसेच बिलासपूर जिल्ह्यातील चंद्रपूरवर आणि बस्तर जिल्ह्याच्या काही भागावर ओरिसानें हक्क सांगितला आहे पण या सर्व मागण्या कमिशनला अमान्य आहेत. या भागात ओरियाऐवजी हिंदी भाषिकच बहुसंख्य असल्याने कमिशनने त्या अमान्य केल्या हे योग्यच झाले.

पश्चिम बंगालच्या मिदनापूर जिल्ह्याचा काही भाग ओरिसाला जोडण्याची मागणीहि न्याय्य नाहीं कारण या भागात बंगालीचाच पगडा असून ओरिया भाषिकाची वस्ती थोडी आहे. पूर्वी ओरिसातील राजांचे ताब्यात हा प्रदेश होता म्हणून तो आताहि असावा हे म्हणणे समर्थनीय नाहीं.

ओरिसाच्या सध्याच्या प्रदेशांत कोणताहि बदल करण्याची आवश्यकता नाही हा कमिशनचा निष्कर्ष आहे. कमिशनचे शिफारशींविरुद्ध ओरिसातहि मोठी निदर्शने झाली हे खरे पण ओरिसाच्या मागण्यांचा विचार करता त्या फारशा न्याय्य असल्याचे दिसत नाही व कमिशनचा आणि सरकारचा निर्णयच योग्य आहे.

* * *

# भाषिक अल्पसंख्याकांना संरक्षण

प्रत्येक प्रांताचे फेररचनेचा सविस्तर विचार आतापर्यंत आपण केला. आता नवे प्रांत निर्माण करतांना राज्य कारभाराचे दृष्टीने कोणते प्रश्न उद्‌भवतील व ते कसे सोडविले पाहिजेत याचा विचार करावयाचा आहे.

भाषावार प्रांत स्थापन झाले तरी एका प्रांतात दुसऱ्या भाषेचे लोक रहाणारच. या भाषिक अल्प संख्याकांना संरक्षण कसे द्यावयाचे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. "भाषिक प्रांतांचे तत्वातच ही गोष्ट अनुस्युत आहे की अशा प्रांतात भाषिक अल्प संख्यांकांना दुय्यम नागरिकाचा दर्जा प्राप्त होणार." (...it is contended that it is implicit in the very formative principle of a linguistic state that in such a state minorities must be reduced to the status of inferior citizens) कमिशनचे हे विधान भाषावार प्रांतांचे पुरस्कर्त्यांवर अत्यंत अन्याय करणारे आहे. त्यांच्यापैकी कोणाहि जबाबदार नेत्याने अशी कल्पना मांडलेली नाहीं.

## कमिशनचा दृष्टिकोन

या प्रश्नाचा विचार करतांना कमिशनने आपल्या डोळ्यापुढे पुढील तत्त्वें ठेवलेली आहेत.

(१) भाषिक अल्प संख्याकांचा प्रश्न एकभाषिक प्रांताप्रमाणेच बहुभाषिक प्रांतांतहि असल्याने योजावयाचे उपाय दोन्हीकडे योजता येतील असेच असले पाहिजेत.

(२) अल्पसंख्याकांना आपले शैक्षणिक, सांस्कृतिक व इतर हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी वाजवी संरक्षक हक्क आवश्यक असले तरी फुटीरपणाची वृत्ति त्यांच्यात कायमची निर्माण होईल किंवा इतर लोकांत त्यांनी स्वाभाविकपणे मिसळून जाण्यांत अडथळे येतील असे त्यांचे स्वरूप असता कामा नये.

(३) अल्पसंख्याकांना द्यावयाच्या संरक्षक हक्कांचे स्वरूप असे असता कामा नये की राजकीय पक्ष त्याचा दुरुपयोग करून देशविरोधी (disloaylty to the state) वृत्ति निर्माण करतील.

(४) एका प्रांतात विशिष्ट भाषिक गट बहुसंख्य आहे व त्याच भाषेचे

लोक इतर प्रांतांत स्थायिक झालेले आहेत. अशा परिस्थितीत तो प्रांत इतर प्रांतातील त्या भाषिकांचाहि हितरक्षणकर्ता आहे असे मानता येणार नाहीं.

कमिशनची ही तत्त्वे सर्वमान्य होतील अशीच आहेत.

## मातृभाषेंत शिक्षण

भाषिक अल्पसंख्याकांना मातृभाषेंत शिक्षण मिळण्याचा हक्क असला पाहिजे. अल्पसंख्याकांना स्वतःच्या भाषेंतून शिक्षण देणाऱ्या खासगी शाळा काढण्याचा हक्क घटनेनें दिला आहे. पण अशा शाळा विशेषतः ग्रामीण भागांत काढण्याइतकी साधनसंपत्ति अल्पसंख्यांकांपाशी नाहीं. तेव्हां अल्प संख्यांकांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून मिळण्याची तरतूद करण्याची जबाबदारी सरकारवर टाकावी. ही कमिशननें केलेली सूचना योग्यच आहे हा हक्क घटनेनें मान्य करून त्याच्या अंमलबजावणीसाठी योग्य ते उपाय योजण्याचे अधिकार मध्यवर्ति सरकारला असावे असे कमिशननें सुचविले आहे.

दुय्यम शाळातून प्रादेशिक भाषा हेच माध्यम असावे पण त्या भागांत निराळी शाळा काढण्याइतकी अल्पसंख्यांकांची संख्या असेल, तेथें तशी शाळा काढून किंवा एखाद्या शाळेत एक तृतीयांश विद्यार्थी असे असल्यास त्यांच्या-साठीं त्यांच्या मातृभाषेतून शिक्षणाची सोय करावी असा ठराव मध्यवर्ति शिक्षण सल्लागार मंडळाने १९४९ मध्ये पास केला. ही व्यवस्था पुरेशी आहे की नाही याबद्दल कमिशनला शंका असून याबावत सरकारने अधिक निश्चित धोरण आखून त्याच्या अंमलबजावणीसाठी परिणामकारक उपाय योजावे असे अहवालात सुचविले आहे.

राज्यकारभारासाठी अल्पसंख्यांकांचे भाषेचा कितपत उपयोग करता येईल हा त्यानंतरचा महत्वाचा प्रश्न आहे. द्विभाषिक प्रदेशात अल्पसंख्यांकांचे भाषेला मान्यता दिली पाहिजे हे मान्य करण्यात आले असले तरी याबाबत निश्चित धोरण अजून आखण्यात आलेले नाहीं. एक भाषा बोलणारांची ७० टक्क्यापेक्षा अधिक लोकसंख्या जेथे असेल तोच प्रांत एकभाषिक समजण्यात यावा. जिल्हयाचे बाबतीतहि हेच तत्व लागू करावे. एखादा भाषिक गट सबंध प्रांतात अल्पसंख्य असेल पण विशिष्ट जिल्हयात त्याची संख्या ७० टक्क्यापेक्षा जास्त असेल तर त्या जिल्हयात त्यांची भाषाच राज्यकारभारा-साठी वापरण्यात यावी असे कमिशनने सुचविले आहे.

## नोकऱ्यांत भेदभाव नको

नोकऱ्यात भाषिक अल्पसंख्यांकांना घेण्याचे बाबतीत काही प्रांतात भेदभाव केला जातो. कायम वास्तव्याची, तसेच प्रादेषिक भाषा येण्याची अट घातली जाते. त्यामुळें अल्पसंख्यांकांना नोकऱ्या मिळणे कठीण जाते. हा भेदभाव दूर केला जावा ही कमिशनची शिफारस योग्यच आहे.

अल्पसंख्याकांचे हक्क सुरक्षित राखले जातात की नाही हे पहाण्याची जबाबदारी गव्हर्नरांकडे सोपविण्यात यावी असे कमिशननें सुचविले आहे. सध्याचा गव्हर्नर हा ब्रिटिश राजवटीतील एकतंत्री गव्हर्नर नव्हे तेव्हां या अधिकारांचा दुरुपयोग केला जाण्याची शक्यता नाहीं.

फेररचनेमुळे अधिकारी व नोकरवर्गांच्या वाटणीचा प्रश्न उपस्थित होतो. आपण कोणत्या प्रांतांत रहावयाचे हे ठरविण्याची मोकळीक अधिकाऱ्याना शक्य तो दिली जावी. त्यांच्या सिनिऑरिटीला धक्का पोचू नये. पगाराचे स्केल व अटी पूर्वीच्या प्रांतापेक्षा कमी असू नयेत. छोटा प्रांत मोठ्या प्रांतांत विलीन झाला म्हणजे तेथील अधिकारी कमी दर्जाचे असे समजण्यात येऊ नये. या कमिशननें केलेल्या सूचना सर्वमान्य होण्यासारख्याच आहेत.

नव्या प्रांतरचनेमुळे प्रादेशिक भावना न बळावता राष्ट्रीय ऐक्य कसे वाढीस लागेल या दृष्टीने कमिशनने शेवटच्या प्रकरणांत कांहीं सूचना केल्या आहेत. इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसप्रमाणें इंडियन सर्व्हिस ऑफ इंजिनिअर्स, इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस, इंडियन मेडिकल ॲन्ड हेल्थ सर्व्हिस यासारख्या आणखी अखिल भारतीय सर्व्हिसेस निर्माण करण्यात याव्या व प्रत्येक प्रांतात असलेल्या अशा अधिकाऱ्यापैकीं निम्मे बाहेरच्या प्रांतातले असावे. हायकोर्ट जज्जांपैकीहि एक तृतीयांश बाहेरच्या प्रांतातले असावे, उत्तरेत दक्षिणेकडील भाषा व दक्षिणेत हिंदीचे शिक्षणास उत्तेजन द्यावे. या त्यापैकीं कांहीं सूचना आहेत

## खिलाडू स्पर्धा व सहकार्य

मला वाटते नुसते ठराविक प्रमाणात प्रांताबाहेरचे अधिकारी नेमण्याचे राष्ट्रीय ऐक्य वाढण्यास विशेष मदत होणार नाहीं. प्रांता प्रांतात खिलाडू स्पर्धा व सहकार्य निर्माण होण्याचे दृष्टीने योजना आंखल्या गेल्या पाहिजेत.

अखिल भारतीय संगीत महोत्सव, अखिल भारतीय कवि संमेलन, अखिल भारतीय क्रीडा महोत्सव, एका प्रांताच्या कला पथकाने दुसऱ्या प्रांतास भेट देऊन तेथे आपले कार्यक्रम करणे. प्रत्येक प्रादेशिक भाषेतल्या निवडक व उत्कृष्ट ग्रंथांचे हिंदीत भाषांतर करणे, यासारख्या सांस्कृतिक सहकार्याच्या योजना आंखल्या तर त्यातून ऐक्याची भावना निश्चित वाढेल.

प्रांताच्या फेररचनेची आजच आवश्यकता का आहे ? आर्थिक स्वयंपूर्णता व राज्यकारभाराची सोय या गोष्टी लक्षात घेऊन भाषावार प्रांत रचना करणे कसे शक्य आहे ? हिंदचे ऐक्यास त्यामुळे कोणतीही बाध न येता निरनिराळ्या भाषिक गटांचे विकासास खुला वाव मिळाल्याने त्यांच्यातील असंतोष नाहींसा होऊन प्रगति अधिक झपाट्याने कशी होईल ? हे आतापर्यंतच्या विवेचनात आपण पाहिले. प्रत्येक प्रांतासंबंधीं कमिशनने केलेल्या शिफारशी व सरकारने घेतलेला निर्णय याचा तपशीलवार विचार केला. खेडें हाच घटक मानून सरहद्दींची विभागणी केली असती तर अनेक वादग्रस्त प्रश्न समाधानकारकपणे सुटले असते. प्रांतरचनेच्या कटकटी व वाद पुनः पुनः उपस्थित व्हावयास नको असतील तर भाषावार तत्वावर प्रांतरचना करणे आणि खेडे हाच घटक मानून सीमेवरील वादग्रस्त प्रदेशाची विभागणी करणे हाच एक मार्ग आहे.

# भाषावार प्रांतांची वाटचाल

(भाषावार प्रांतांचे चळवळींतील महत्त्वाच्या तारखा)

**डिसेंबर १९२०**—नागपूर येथील काँग्रेस अधिवेशनात भाषावार प्रांत रचनेचे उद्दिष्ट मान्य करण्यांत आले.

**१९२७**—भाषावार प्रांतरचना करण्याची वेळ आता आली आहे. आंध्र, उत्कल, सिंध व कर्नाटकचे स्थापनेनें सुरवात करावी–काँग्रेसचा ठराव.

**ऑगस्ट १९२८**—सर्व पक्षीय परिषदेच्या नेहरू समितीचे अहवालांत भाषावार प्रांतरचनेस पाठिंबा.

**ऑक्टोबर १९३७**—कलकत्ता येथील काँग्रेस बैठकीत भाषावार प्रांतांचे धोरणाचा पुनरुच्चार, आंध्र व कर्नाटक स्थापण्याची शिफारस.

**जुलै १९३८**—' काँग्रेसचे हाती सत्ता येताच भाषावार प्रांतरचना हाती घेतली जाईल, वर्किंग कमिटीचा वर्धा येथील ठराव.

**१९४५-४६**—कारभाराचे घटक शक्य तो भाषिक व सांस्कृतिक पायावर स्थापण्यात यावे. काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा.

**जुलै १९४८**—भाषावार प्रांतांचे विचारासाठी दार कमिशनची नेमणूक.

**डिसेंबर १९४८**—दार कमिशनचा अहवाल प्रसिद्ध. प्रांतांच्या फेर-रचनेचा प्रश्न सध्या पुढे ढकलावा. केवळ भाषावार तत्वावर प्रांतरचना करणे इष्ट नाहीं.

**डिसेंबर १९४८**—भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाचे विचारासाठी काँग्रेसच्या जयपूर अधिवेशनात नेहरू–पटेल–पट्टाभि समिति नेमण्यात आली.

**एप्रिल १९४९**—नेहरू-पटेल-पट्टाभि समितीचे अहवालास वर्किंग कमिटीने मान्यता दिली. भाषावार प्रांतांचे काँग्रेसचे जुने धोरण अंमलात आणतांना देशाचे राजकीय व आर्थिक स्थैर्यास धोका निर्माण होत नाहीं, तसेच राज्यकारभारातील अडचणी व झगडे निर्माण होत नाहींत याचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. प्रांताचे फेररचनेस सध्याची वेळ योग्य नाहीं. पण लोकांची भावना तीव्र व आग्रही असेल तर तिचे समाधान कर-ण्याचा विचार करावा लागेल. यासाठी दोन अटी पुऱ्या करण्यात आल्या पाहिजेत. (१) भाषावार प्रांतरचनेचे तत्व ज्या विभागाबद्दल एकमत असेल

तेथेंच सुरवातीला लावण्यांत यावे. (२) सर्वच प्रांतांच्या योजना एकाच वेळीं अंमलांत येणार नाहींत. आंध्रचे स्थापनेनें सुरवात करण्यांत यावी.

१९५१—प्रांतांची फेररचना करतांना भाषिक विचार महत्वाचा असला तरी आर्थिक व कारभारविषयक बाजूहि विचारांत घेतल्या पाहिजेत. कॉंग्रेसचा निवडणूक जाहीरनामा.

१५ डिसेंबर १९५२—आंध्र प्रांताच्या मागणीसाठीं श्री. रामलूंचे ५८ दिवसांचे अन्नसत्याग्रहानंतर निधन.

१९ डिसेंबर १९५२—आंध्र प्रांत स्थापन करण्याचा निर्णय सरकारनें जाहीर केला व त्याच्या आर्थिक आणि इतर प्रश्नांबाबत अहवाल सादर करण्यासाठीं न्यायमूर्ति वांचू यांची नेमणूक केली.

२६ मार्च १९५३—न्या. वांचूंचा अहवाल सादर. बेल्लारी जिल्हा आंध्रमध्यें समाविष्ट करावा पण कर्नाटक स्थापन झाल्यावर त्याचे कानडी भाषिक भाग त्या प्रांतास जोडावे अशी शिफारस,

२१ एप्रिल १९५३—बेल्लारी तालुक्याचे भवितव्याबाबत अहवाल सादर करण्यासाठीं न्यायमूर्ति मिश्रा यांची नेमणूक.

४ जून १९५३—न्या. मिश्रा यांचे शिफारशीनुसार सबंध बेल्लारी तालुका म्हैसूरमध्यें समाविष्ट करण्याचा सरकारी निर्णय.

१० ऑगस्ट १९५३—लोकसभेत आंध्रप्रांताचे बिल मांडले.

२८ सप्टेंबर १९५३—महाराष्ट्र व विदर्भ नेत्यांत नागपूर करार.

१ ऑक्टोबर १९५३ —आंध्र प्रांत अस्तित्वांत आला.

२९ डिसेंबर १९५३—प्रांतपुनर्रचना कमिशनची नेमणूक.

१० ऑक्टोबर १९५५—प्रांतपुनर्रचना कमिशनचा अहवाल प्रसिद्ध.

११ ऑक्टोबर १९५५—अहवालाचे निषेधार्थ बेल्लारीत हरताळ.

—बेळगांवांत निदर्शकांवर अश्रुवायू.

—अहवालास मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचा पाठिंबा.

१४ ऑक्टोबर १९५५—प्रांतरचना अहवालाविरुद्ध होणाऱ्या चळवळीत सामील न होण्याचा कॉंग्रेसजनांना वर्किंग कमिटीचा आदेश.

१८ ऑक्टोबर १९५५—कटकमध्यें प्रांतरचना अहवालाविरुद्ध निदर्शन. असेंब्ली, हायकोर्टाचे काम बंद पडले.

१९ **ऑक्टोबर** १९५५—'विशाल आंध्र स्थापनेचा निर्णय ताबडतोब द्या'. तेलंगणच्या ५० काँग्रेस कार्यकर्त्यांचा नेहरूंकडे खलिता.

२१ **ऑक्टोबर** १९५५—विदर्भासह मराठी व गुजराती भाषिकांचा द्विभाषिक प्रांत स्थापावा. पुण्याच्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे बैठकींतील ठराव.

२५ **ऑक्टोबर** १९५५—महाराष्ट्र, गुजरात व मुंबई शहर असे तीन प्रांत करावे. गुजरात प्रदेश काँग्रेस कमिटीचा ठराव.

६ **नोव्हेंबर** १९५५—संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा.

९ **नोव्हेंबर** १९५५—मुंबई शहर, विदर्भासह महाराष्ट्र व गुजरात असे तीन प्रांत करावे. काँग्रेस वर्किंग कमिटीचा निर्णय.

१५ **नोव्हेंबर** १९५५—बेल्लारीसाठी सत्याग्रह सुरू.

१७ **नोव्हेंबर** १९५५—मुंबई शहराचा स्वतंत्र प्रांत करण्याचे योजनेचा वर्किंग कमिटीनें फेरविचार करावा. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा ठराव.

—मुंबई शहराचे भवितव्यासंबंधीं अशोक मेहता-हॅरिस योजना.

१८ **नोव्हेंबर** १९५५—मुंबई शहर महाराष्ट्र व गुजरात असे ३ प्रांत करावे असा ठराव मुंबईचे मुख्यमंत्री श्री. मुरारजी देसाई यांनीं मुंबई असेंब्लीत मांडला. मुंबईत संयुक्त महाराष्ट्रवाद्यांचे निदर्शन.

२१ **नोव्हेंबर** १९५५—संयुक्त महाराष्ट्राचे मागणीसाठीं मुंबईत एक दिवसाचा सार्वत्रिक संप. निदर्शनें व गोळीबारांत १५ ठार.

२२ **नोव्हेंबर** १९५५—मुंबई असेंब्लीतील त्रिप्रांत ठरावावरील चर्चा व असेंब्लीची बैठक बेमुदत तहकूब. महाराष्ट्रीय आमदारांनीं दिलेले राजिनामे परत घेतले.

२३ **नोव्हेंबर** १९५५—विंध्य प्रदेश विलीनीकरणाविरुद्ध देशामध्ये निदर्शन.

२७ **नोव्हेंबर** १९५५—देशाचा एकच घटक मानून कारभार हाका. दिल्लीचे भाषणांत राजाजींची सूचना.

१ **डिसेंबर** १९५५—'श्री. शंकरराव देव की नेहरू असे कोणी विचारल्यास नेहरूंचें नेतृत्व मी मान्य करीन. निदर्शने, संप, उपवास व

राजिनाम्याने नव्हे तर काँग्रेसनिष्ठा व हृदयपरिवर्तनानेच संयुक्त महाराष्ट्र मिळेल. फलटणला श्री. यशवंतराव चव्हाणांचे भाषण.

—प्रांतरचना अहवालाचे निषेधार्थ बिहार असेंब्लीपुढे निदर्शन.

**१४ डिसेंबर १९५५**—लोकसभेत प्रांतरचना अहवालावर चर्चा सुरू.

**२२ डिसेंबर १९५५**—देशाचे पाच विभाग पाडून विभाग सल्लागार मंडळे नेमण्याची नेहरूंची सूचना.

—मुंबई कार्पोरेशन बैठकीत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारा ठराव पास.

**२७ डिसेंबर १९५५**—संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्नावर मुंबईचे दारूबंदी-खात्याचे उपमंत्री डॉ. टी. आर. नरवणे यांचा राजिनामा.

**४ जानेवारी १९५६**—तडजोडीचे प्रयत्न निष्फळ ठरले. श्री. शंकरराव देव यांचे निवेदन.

**८ जानेवारी १९५६**—मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी शांततेने चळवळ करावी. बृहन्मुंबई संयुक्त महाराष्ट्र वकील परिषदेत डॉ. जयकरांचे भाषण.

**१६ जानेवारी १९५६**—प्रांतरचनेसंबंधी सरकारी निर्णय जाहीर. मुंबई शहराचा कारभार मध्यवर्ति सरकारकडे सोपविण्याचे ठरविले. निर्णय जाहीर होण्यापूर्वीच मुंबईत मोठ्या प्रमाणावर धरपकड. त्याचे निषेधार्थ मुंबईत एक आठवडा स्वयंस्फूर्त संप व निदर्शने. सरकारी आकड्यांप्रमाणें ७१ ठार व ५५० जखमी व त्यापैकी पोलीस गोळीबारात ६८ ठार व २५० जखमी.

**१७ जानेवारी १९५६**—श्री. एस्. एम्. जोशी व तीन प्रजासमाजवादी आमदारांचे राजिनामे.

**१८ जानेवारी १९५६**—मुंबईच्या पांच काँग्रेस आमदारांचे राजिनामे.

—सर्व महाराष्ट्रीय मंत्री, उपमंत्री, आमदार व खासदार यांनी पार्लमेंटरी बोर्डाकडे राजिनामे पाठवावे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्य-कारिणीचा ठराव.

**२१ जानेवारी १९५६**—पश्चिम बंगालमध्ये हरताळ.

**२३ जानेवारी १९५६**—राजिनामे परत घ्या, दंगलीमुळे प्रांतरचना

(१२९) २०२२८ वि

२०५ नों: दि:

निर्णयात बदल केला जाणार नाहीं. काँग्रेस वर्किंग कमिटीचा ठराव.

---बंगाल--विहार एकीकरणास पाठिंबा दर्शविणारे डॉ. बिधनचंद्र रॉय व श्री. श्रीकृष्णसिंह यांचे संयुक्त पत्रक.

२६ जानेवारी १९५६—महाराष्ट्र, मुंबई, गुजरात व राजस्तान यांचा पश्चिम प्रदेश स्थापना करावा. मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचा ठराव.

२८ जानेवारी १९५६---काँग्रेस वर्किंग कमिटीने आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंति करणारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा ठराव. संयुक्त महाराष्ट्र परिषदेशी कोणतेहि संबंध ठेवू नका असा काँग्रेस-जनांना आदेश.

२ फेब्रुवारी १९५६—मुंबईचे मेयर पुप्पाला यांचा राजिनामा.

४ फेब्रुवारी १९५६--द्विभाषिक प्रांतांनी गोंधळ वाढेल. आचार्य नरेंद्रदेवांचे मत.

५ फेब्रुवारी १९५६—मुंबई महाराष्ट्राची पण त्यासाठी चळवळ नको. गुजरात्यांचे प्रेम संपादा. श्री. जयप्रकाश नारायण यांचे पत्रक.

६ फेब्रुवारी १९५६—संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्नावर जेथे बहुसंख्य सभासदांनी राजिनामे दिले त्या नगरपालिका व ग्रामपंचायतींचा कारभार हाती घेण्यासाठी सरकारी वटहुकूम.

६ व ७ फेब्रुवारी १९५६—पुण्यास भरण्यालेल्या सर्वपक्षीय कार्य-कर्त्यांचे बैठकींत संयुक्त महाराष्ट्रासाठीं असहकार व नियंत्रित स्वरूपाचा सत्याग्रह करण्याचा निर्णय. संयुक्त महाराष्ट्र समितीचीं स्थापना

११ फेब्रुवारी १९५६--मुंबईतील प्रकारांची चौकशी व्हावी. श्री. शंकरराव देवांचे मत.

१२ फेब्रुवारी १९५६—अमृतसर काँग्रेस अधिवेशनांत मोठ्या द्विभा-षिक प्रांतांचे पुरस्काराचा ठराव.

१६ फेब्रुवारी १९५६—संयुक्त महाराष्ट्र समितितर्फे महाराष्ट्रांत संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा.

२० फेब्रुवारी १९५६—मुंबईची दंगल पूर्वनियोजित. सरकार उलथून पाडण्याचा उद्देश. मुंबईचे मुख्यमंत्रि श्री. मुरारजीभाई देसाई यांचा कौन्सिलमध्ये आरोप.

—दक्षिण प्रदेश योजनेचे निषेधार्थ बंगालमध्यें हरताळ.

२२ **फेब्रुवारी** १९५६—मुंबई दंगल चौकशीस श्री. मुरारजी देसाईंचा नकार.

२४ **फेब्रुवारी** १९५६—प्रांतरचनेचे कांहीं वादांत सार्वमत घेतले जाण्याची शक्यता. लोकसभेत नेहरूंचे भाषण.

—बंगाल बिहार एकीकरण योजनेविरुद्ध बंगालमध्ये हरताळ.

२५ **फेब्रुवारी** १९५६—बंगाल-बिहार एकीकरणास पाठिंबा दर्शविणारा ठराव बिहार असेंब्लीत १५७ विरुद्ध २५ मतांनी पास.

**८ मार्च** १९५६—९३ ग्रामपंचायती, ६ जिल्हा बोर्डे १३ बरो म्युनिसिपालिट्या व २७ म्युनिसिपालिट्यांचे सभासदानी राजिनामे दिले. स्थानिक स्वराज्यमंत्री चव्हाणांचे असेंब्लीत निवेदन.

९ **मार्च** १९५६—मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी बेळगावांत सत्याग्रह सुरू.

—नगर जिल्ह्यातील अकोल्यात चव्हाणांना काळी निशाणें.

११ **मार्च** १९५६—मुंबईवर महाराष्ट्राचा हक्क पण निर्णय घेणे गुजरात्यांकर सोंपवावे. आचार्य विनोबा भावे यांचे मत.

—अकोला पोट निवडणुकीत स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते ब्रिजलाल बियाणींचा पराभव.

—त्रावणकोर-कोचीनचे काँग्रेस मंत्रिमंडळाचा राजिनामा.

१३ **मार्च** १९५६—विदर्भासाठी प्रादेशिक कौन्सिलची कन्नमवार व बियाणींची मागणी.

१५ **मार्च** १९५६—प्रांतरचना प्रश्नावर सत्याग्रह नको. प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकारिणीचा ठराव.

१७ **मार्च** १९५६—मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी यवतमाळला सत्याग्रह.

२१ **मार्च** १९५६—मुंबईचे महसूलमंत्री श्री. हिरे यांचेविरुद्ध पुण्यात निदर्शन.

२२ **मार्च** १९५६—देवगिरीकरांविरुद्ध सोलापुरांत निदर्शन.

२३ **मार्च** १९५६—काँग्रेस पोटनिवडणुका लढविणार नाहीं असे.

देवगिरीकरांनीं सोलापुरला एका मुलाखतीत सांगितले.

२५ मार्च १९५६––संयुक्त महाराष्ट्र चळवळ बंद करा. श्री. जयप्रकाश नारायण यांची सूचना.

२७ मार्च १९५६––मुंबई असेंब्लीत प्रांत पुनर्रचना बिल मांडले. असेंब्लीपुढें सत्याग्रह.

३ एप्रिल १९५६––मुंबई प्रश्न कायमचा निकालात निघालेला नसून निराळ्या वातावरणात त्यावर पुन: विचार करता येईल–नेहरूंची मुलाखत.

४ एप्रिल १९५६––द्विभाषिक प्रांतांना अनुकुलता दर्शविणारा ठराव म्हैसूर असेंब्लीत पास.

––मुंबई शहरातील पोटनिवडणुका न लढविण्याचा कॉंग्रेस मध्यवर्ति पार्लमेंटरी बोर्डाचा निर्णय.

८ एप्रिल १९५६––प्रांतपुनर्रचना बिल मुंबई असेंब्लीत १४८ विरुद्ध २५ मतांनी मंजूर. २३ कॉंग्रेस आमदारांचा विरोध. ७२ तटस्थ, ३९ गैरहजर. (३२ आमदारांचे संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्नावर यापूर्वीच राजिनामे.)

११ एप्रिल १९५६––हैद्राबाद असेंब्लीपुढे मराठवाडा संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे निदर्शने.

१२ एप्रिल १९५६––मुंबईचा समावेश महाराष्ट्रांत करण्याची सूचना हैद्राबाद असेंब्लींत मंजूर.

१६ एप्रिल १९५६––बंगाल–बिहार एकीकरणाऐवजी संयुक्त राज्य ( युनियन ) स्थापण्याचे योजनेवर दोन्ही प्रांतांचे मुख्यमंत्र्यात एकमत.

१७ एप्रिल १९५६––महाराष्ट्र कॉंग्रेस सार्वत्रिक निवडणुकाहि लढविणार नाहीं. श्री. देवगिरीकर यांची दिल्लीस मुलाखत.

१८ एप्रिल १९५६––प्रांतपुनर्रचना बिल लोकसभेत मांडले.

––मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी आतापर्यंत एकूण ३६०० सत्याग्रहींनी सत्याग्रह केला.

संग्रहालय, ठा. स्थळप्रत
अनुक्रम 20228 दि:
क्रमांक 204 .... नों. दि.




भारताचे १ ऑक्टोबर १९५६ पासून अस्तित्वांत येणारे नवे प्रांत आणि विभाग दर्शविणारा नकाशा.